म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ७६८

# वंग-चित्रे.

पु. ल. देशपांडे.

REFBK-0027419
REFBK-0027419

भू-प्रवास
७६८
२८७१९
२४।३।८४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
दा. क्र. ७६८ २८७१९
२४।३।८४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे



# व्यंग-चित्रे

## पु. ल. देशपांडे

REFBK-0027419

REFBK-0027419

प्रकाशक/मुद्रक
म. ना. जोशी

सन् पब्लिकेशन्स्
३१७ नारायण पेठ,
दै. प्रभात समोर,
पुणे - ३०.
फोन ४४९५४१
निवास ३३९६५२


लेखक
पु. ल. देशपांडे
१, रुपाली,
७७७ शिवाजीनगर, पुणे - ४

© सर्व हक्क प्रकाशकाकडे

प्रथमावृत्ती १९७४
द्वितीय आवृत्ती १९७९
तृतीय आवृती १९९१

मूल्य ९० रुपये





## উৎসর্গ

প্রিয় বন্ধু সলিল ঘোষকে –

যিনি আমার সঙ্গে না থাকলে
আমার জীবনে আমি কখনও
বঙ্গভাষা ও বঙ্গ সংস্কৃতির সঙ্গে
অত ঘনিষ্ঠ পরিচয় লাভ করতে
পারতাম না।

বু. ন.

# प्रस्तावना

१९७० साली, बंगाली भाषेशी सलगी करावी म्हणून मी शांतिनिकेतनात गेलो. तिथल्या माझ्या वास्तव्यात मनावर उमटलेली ही वंगचित्रे. त्यानंतर गंगेचे पाणी खूपच वाहून गेले. बांगला देशाची निर्मिती झाली. नक्षलवादी चळवळीचे उग्र स्वरूप उरले नाही. कालीपदबाबूंसारखे तपोधन कलावन्त काळाच्या पडद्याआड गेले. शांतिनिकेतनातल्या मित्र-मैत्रिणींच्या पत्रांचा ओघ मंदावला आहे. पण ते दिवस आणि रात्री आजही माझ्या स्मरणात ताज्या आहेत. एखादे सुंदर स्वप्न पडावे तसे हे माझे वास्तव्य झाले. आता माझ्या ग्रंथसंग्रहात सतत एखाद्या बंगाली ग्रंथाची भर पडत असते. बंगाली नाटक सिनेमा पाहताना किंवा पुस्तक वाचताना आता मला मी निराळ्या भाषेतून हे समजून घेतो आहे असे वाटत नाही.

•

रवीन्द्रांचे माझ्या संग्रहातील हाताला लागेल ते पुस्तक घेऊन मी फुरसदीच्या क्षणी वाचत असतो. ते क्षण सत्कारणी लागले नाहीत असे मला केंव्हाही वाटत नाही. त्यांच्या साहित्यामुळे शांतिनिकेतनपासून असलेले दूरत्व भासत नाही की तिथे जाण्याची ओढ अधिक लागते हे मला सांगता येत नाही. शांतिनिकेतनात गेलो त्यावेळी गुरुदेवांच्याच शब्दांत सांगायचे म्हणजे 'जीबोने आज कि प्रथम एलो बशन्तो?' — (जीवनातच आज प्रथमच वसन्त आला का ?) असा प्रश्न मला पडला होता. पुढे साऱ्या ऋतूंतले सौन्दर्य पाहाण्याची त्यांनीच दृष्टी दिली. वसंताचे स्वागत करणारे रवीन्द्र ग्रीष्माला देखील 'अग्निस्नाने शुचि होक धरा -' अग्निस्नानाने पृथ्वी शुचिर्भूत होवो म्हणताना दिसले. आज एखाद्या पहाटे मराठी नाटकातले एखादे जुने पद माझ्याबरोबरच माझ्या मनात जागे होते, तितक्याच सहजतेने बंगाली बाऊलांच्या गीतांतले गीतही माझ्या बरोबर उठते. आकाशातले ढग नकळत 'बादोल बाऊल बाजाय रे अॅक्तारा —' (मेघ बाऊल एकतारी वाजवतोय) ही ओळ सुचवून जातात. पावसाळ्यात पानांवरून पाण्याचे थेंब टप्टप् गळू लागले की ते रवीन्द्रांच्या कवितेतल्या 'पाताय पाताय टुपुर टुपुर नुपूर मधुर बाजे'चे स्मरण करून देतात. एका फार मोठ्या भांडाराच्या किल्ल्या मला गवसल्या ह्याचे मला समाधान आहे. आनंदाचे हे क्षण चारचौघांना वाटून टाकावे म्हणून मी ही वंगचित्रे काढण्याचा प्रयत्न केला. १९७१ साली ही लेखमाला महाराष्ट्र टाइम्सच्या रविवारच्या पुरवणीतून प्रसिद्ध होत आली. आज ती संग्रहित होऊन येते आहे.

माझे मित्र सलील घोष यांना मी हे पुस्तक अत्यंत कृतज्ञतेने अर्पण करतो आहे. सलीलमुळेच बंगाली भाषा आणि संस्कृती यांच्याशी इतका निकटचा परिचय होणे शक्य झाले.

**पु. ल. देशपांडे**

१ रुपाली,
७७७, शिवाजीनगर,
पुणे - ४११ ००४.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
वा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

श्री: रविंद्रनाथ टागोर यानी रेखाटलेले एक चित्र





श्री रविंद्रनाथ टागोर यानी रेखाटलेले एक चित्र

सन् पब्लिकेशन्स

३७७, नारायण पेठ, दैनिक प्रभात समोर, पुणे-३०.

फोन: ४४९५४१



मी बंगाली भाषा शिकणार असल्याची खबर, मला बंगालीचे ओ की ठो माहिती होण्यापूर्वी थेट नक्षलवाडीपर्यंत गेली असेल. दोष लोकांचा नाही. माझाच ! माझ्या पोटातले मला कळण्याआधी ओठांत हुळहुळायला लागते. काही माणसे कशी बाजारातून साधी लसूण आणायला निघाली तरी आपल्या जाण्याचा हेतू क्रांतिकारकासारखा गुप्त ठेवतात. आम्ही लसूण आणण्याआधीच संध्याकाळी पिठलं भात असल्याचा बेत जाहीर करून मोकळे. काहीही चांगलं सुचलं की ते कुणाला तरी सांगून टाकायची मला घाई सुटते. बंगाली भाषा शिकण्याचं हे असंच झालं.

माझ्या ह्या कल्पनेचं राजकीय परिभाषेत बोलायचं म्हणजे 'संमिश्र स्वागत' झालं. 'ह्या वयात करायचं काय बंगाली—' येथपासून 'त्यासाठी बंगालपर्यंत कशाला जाताय् कडमडायला—' येथपर्यंत नाना प्रतिक्रिया ! पण भाषा पुस्तकातून शिकता येत नाही त्याला काय करणार ? पुस्तकात असतात ते 'भाषा'नामक दुनियेच्या नकाशातली ठळक शहरे दाखवणारे ठिपके आणि नद्या-पर्वतांसाठी काढलेल्या काळ्या निळ्या ओळी. ते शब्द, त्यांचे उच्चार, त्यांचे साहचर्य, त्यांची रसरूपगंध निर्माण करण्याची शक्ती ही जिथे

ती भाषा जिवंत पिंडांतून उमटत असते त्या ठिकाणी जाऊनच ऐकणे आवश्यक असते. ज्ञानेश्वरीतली एक तरी ओवी अनुभवावी असे म्हटले आहे. भाषा देखील अशीच अनुभवावी. मला बंगाली भाषा शिकायची नव्हती; अनुभवायची होती. तिच्याशी सख्य करायचे होते. तिची नाना स्वरूपे भोगायची होती. बंगाली रसगुल्ल्यासारखी आणि हिल्सा माशासारखी बंगाली भाषाही मला खायची होती. ते मुंबईत राहून कसे जमणार ? ह्या सबगोलंकारी शहराला स्वतःचा भाषापिंडच नाही. तसे आम्ही इंग्लिशसुद्धा बोलतो. पण ती कामचलाऊ सोय. सतत इंग्रजीत व्यवहार करणारे बँकेतले कर्मचारीसुद्धा आकडेमोड करताना 'पाच साते पस्तीस हातचे आले तीन...' असे पुटपुटत मराठीत हिशेब करतात आणि कागदावर आकडे मांडतात ते अरेबिक ! खरी भाषा माणसाच्या रक्तातून उमटते. म्हणूनच सातारा कोल्हापूरकडल्या शेतकऱ्याच्या तोंडच्या संतापाच्या किंवा कौतुकाच्या 'च्यायला'ची सर नवसाहित्यातल्या फ्याशनेबल 'च्यायला'ला येत नाही. (आणि म्हणूनच कधी कधी तो अश्लील वाटतो !) शेतकऱ्याच्या तोंडी मात्र तो त्या मातीतून घडलेल्या पिडातून उमटणारा, संतापाचा, वैतागाचा किंवा आनंदाचा ओंकारध्वनीच असतो ! म्हणूनच भाषा शिकायची असेल तर ती जिथं आतून उमटते अशा ठिकाणी जाणेच प्राप्त होते.

मला ह्या बंगालीचीच भूक का लागली ते मात्र सांगता येणे शक्य नाही. ती भाषा भोगण्यापलीकडे माझा कोणताही हेतू नव्हता. मी एखाद्या बिसमिल्लांची सनई ऐकायला जातो, ती काही पुढेमागे आपल्यालाही वाजंत्री वाजवायला जायला मिळावे म्हणून नव्हे, संगीतविषयक ज्ञानसंपादनासाठी नव्हे की लगेच दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रातून त्या वाजवण्याचा पंचनामा करण्यासाठीही नव्हे. मला टागोर आणि शरद्‌बाबू काय पण साध्या बंगाली दुकानदारासारखेही बोलता येणार नाही हे काय मला कळत नाही ? पण संगीताइतकाच 'भाषा' हा मानवनिर्मित चमत्कार मला आवडतो. शब्द पारखीत बसायला आवडते. मग ते विदग्धांचे असोत की जानपदांचे. 'शकून गे मायेऽ सांगताऽहेऽ' ह्या ओळीतल्या एका 'माये'वरून जीव ओवाळावासा वाटतो. 'फलाटदादा'ला 'सांगा हो तुम्ही फलाटदादा' म्हणण्याऐवजी 'वो' म्हणायचे भर्डेकरांना कसे सुचले ह्याचे मला अजब वाटते ! सर्व्हिस् मोटारीत मागल्या बाजूला शिटांच्या मधल्या पोकळीत माणसे कोंबीत असत. त्या जागेला पश्चिम महाराष्ट्रात 'हौदा' म्हणतात. वऱ्हाडात त्याला 'बगीचा' म्हणतात हे ऐकल्यावर भलती मजा वाटली. जानपदांच्या भाषेतली रासवट रानफुले तर अतिशय लाघवी. माणसांच्या जिवंत श्वासांची संगत घेऊन उमटणाऱ्या वेगवेगळ्या भाषांची ओळख करून घ्यायची म्हणजे त्या माणसांची आणि त्यांच्या जीवनपद्धतीचीच

ओळख करून घ्यायला हवी. मराठी शिकणाऱ्या माझ्या एका इंग्रज स्नेह्याने मला 'खरकटे' ह्याचे भाषान्तर विचारले होते. मी ते अजून शोधतो आहे. भाषाभाषांच्या अशा नाना लहरी. हे सारे ठाऊक असूनही मी बंगालीशी दोस्ती जमवायला निघालो होतो. हेतू शोधायचाच तर कदाचित एवढे म्हणता येईल की, पंचविशीत मराठी आणि इंग्रजीतून वाचलेले रवीन्द्रनाथ आणि शरद्‌बाबू मूळ बंगालीतून वाचण्याची जुनी ओढ पन्नासाव्या वर्षी पुन्हा प्रकटली. लहानपणातले काही रोग मध्यमवयात पुन्हा उपटतात म्हणे ! तसेही असेल. ह्याखेरीज 'भारतीय एकात्मता', 'प्रान्तीय सख्य' वगैरे राजकारणी व्यासपीठावर जन्मून सरकारी कमिट्यांतून ज्यांचे दहनदफन होते असले कुठलेही हेतू माझ्या मनात नव्हते. माझ्या घामाचा दाम खर्चून मी हा षौक करीत होतो. एकात्मतेच्या राजकीय घोषणांवर माझा विश्वास नाही. माणसांचे लागेबांधे सरकारी धोरणातून जुळवता येत नाहीत. माणसा माणसांतल्या प्रेमाचे सूत्र हे अर्थशास्त्रज्ञ आणि राजनीतिज्ञ जोडू शकणार नाहीत. प्रेमाचे झरे निराळे, गंगोत्री निराळी आणि प्रयागक्षेत्रेही निराळी !

माणसाला कसली ओढ केव्हा अस्वस्थ करील हे सांगणे अशक्य आहे. एकदा मला माझ्या एका मित्राचा फोन आला. त्याला 'वैशाख मास वासन्तिक समय शोभला' हे अण्णा किर्लोस्करांचे पद हवे होते. वास्तविक ह्या मित्राने माझ्याकडे गाण्याची मागणी केल्यावर एखाद्या अब्दुलमियाने देवळातल्या भटजीबुवाकडे जानवे मागितले तर भटजीबुवांना जसे वाटेल तसेच मलाही वाटले. पण त्याच्यावर बाका प्रसंग आला होता. त्याच्या घरी एक तामीळ गृहस्थ आले होते. चांगले साठीच्या घरातले. त्यांच्या बालपणी त्यांच्या शेजारी कुणी मराठी गृहस्थ राहात असत. त्यांची मुलगी हे गाणे म्हणायची. त्या तामीळ गृहस्थाला एकाएकी ह्या मराठी गाण्याची तहान लागली. त्याच्या शैशवाचे चित्र ह्या गाण्याचे सूर गुणगुणल्याखेरीज पुरे होईना. ते संपूर्ण गाणे ऐकल्यावर त्यांचे मन शान्त झाले. बंगाली भाषेच्या बाबतीत माझीही अवस्था थोडीशी त्या तामीळ गृहस्थासारखीच होती. माझ्या आजोबांनी रवीन्द्राच्या गीतांजलीचे मराठी भाषान्तर केले त्यावेळी मी शाळकरी वयाचा होतो. घरात आजोबांच्यामुळे रवीन्द्रांचा प्रवेश झाला होता. शेकडो वर्षांपूर्वी, खरे खोटे देव जाणे, पण आमचे पूर्वजही म्हणे बंगालात भुकेकंगाल होऊन अन्नाच्या शोधात गोव्यापर्यन्त आले होते. त्यामुळे मराठी बामणात आमचीच तेवढी बंगाली बामणासारखी, मासेखाऊ बामण जमात. हाही एक बादरायणी संबंध. पुढे जातीधर्माचे विचार शिथिल झाले आणि कुमारवयात पंजाब-वंग-मराठा हे तीन देश क्रांतिकारकांच्या पराक्रमामुळे त्रिमूर्तीसारखे एकदम पाहण्याची सवय लागली. जगदीशचंद्र बोसांपासून ते सुभाषचंद्र बोसांपर्यन्त अनेक क्षेत्रांतल्या भीमपराक्रमी बंगाली

लोकांची चरित्रे पाह्यला मिळाली. नंतरच्या काळात रवीन्द्र आणि शरदबाबूंची जबरदस्त मोहिनी. काशीनाथ रघुनाथ मित्र, विठ्ठल सीताराम गुर्जर, मामा वरेरकर, शं.बा. शास्त्री, पु.बा. कुलकर्णी, गं.दे. खानोलकर ह्यांच्या सारख्यांच्या कृपेमुळे शरद, बंकिम, रवीन्द्र, विवेकानंद ह्यांचे मराठीतून दर्शन घडले. न्यू थिएटर्सच्या चित्रपटांनी शरदबाबूंचा बंगाल डोळ्यांनी पाहायला मिळाला. नाटक, संगीत, रेडिओ, टेलिव्हिजन ह्यांच्या नादाने होणाऱ्या दहा ठिकाणच्या भ्रमंतीत अनेक बंगाली कलावन्तांचा स्नेह लाभला. टेलिव्हिजनच्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाला मी पंकज मलिकांना रवीन्द्रांचे गीत गायला बोलावले होते. दिल्लीला असताना टेलिव्हिजनवर नृत्यसंगीताच्या कार्यक्रमासाठी अनेक बंगाली कलावन्त यायचे. ढिल्या धोतराचा एक सोगा झब्ब्याच्या खिशात घातलेले, लांबलांब केस राखणारे, बहुधा चष्मा लावणारे वंग तरुण आणि कुरंगनयना, श्यामला, ईषद्‌पृथुला आणि आनितम्बकुन्तला वंग तरुणी! मनात दडलेल्या वंग प्रेमाच्या रोपट्याला हे अधूनमधून होणारे शिंपणे जिवन्त ठेवीत होते. 'मन हे ओढाळ गुरूं' म्हटलेच आहे. कुठल्या क्षणी कुठे ने म्हणेल कुणी सांगावे?

•

अध्यात्म विषयात रंगलेल्या माझ्या एका वृद्ध विद्वान मित्राबरोबर जुहूच्या किनाऱ्यावरून हिंडत होतो. वेद, उपनिषदे, धर्मशास्त्र वगैरे ग्रंथांतले विचार मला संगीतासारखे ऐकायला आवडतात. सुरेख संध्याकाळ. उदात्त विचारांच्या प्रवचनाला साक्षात महासागराच्या अनाहत नादाचा तंबोरा लाभलेला. बुवाही जमले होते. मीही त्यांचे विचार ऐकण्यात तल्लीन. इतक्यात ते मला म्हणाले —

"आज भेळ खायची!"

मी आडवा! हे म्हणजे 'अथा तो ब्रह्मजिज्ञासा' म्हणून सुरू झालेले प्रवचन 'मुझे बुड्ढा मिल गया—' ह्या गाण्याने संपविण्यापैकी.

"अरे असं बघतोस काय? भेळ खाल्ली नाहीस कधी?"

"मी खाल्ली आहे - पण आपण—"

"पुरुषोत्तमा, कधी तरी नाव, लौकिक, ज्ञान, विद्वत्ता, स्थान, मान ही सारी ओझी फेकून द्यावी. आणि—'

"भेळ खावी—" मी समस्यापूर्ती केली. आम्ही भेळ घेतली.

"गॉड इज ग्रेट..." ते भेळ खाता खाता म्हणाले.

"का?"

"अजून जिभेच्या टोकावर कुठल्या तरी पेशीत बाल्य रेंगाळते आहे. भेळेला तीच चव आहे." त्या भेळेच्या स्वादाबरोबर 'उपनिषदे आणि ब्रह्मसूत्रे' यांचे बोट सोडून गुरुजी

अनेक वर्षांपूर्वी हरवलेल्या बाल्यात शिरले होते. मनाच्या महालाला अशी लक्ष लक्ष दारे. कुठले दार केव्हा उघडेल हे सांगणे अशक्य ! माझ्या मनाचे हे बंगाली भाषेच्या प्रेमाचे दार तरी अचानक का उघडावे ? ही भाषा शिकण्याची मला काहीही गरज नव्हती. कसल्याही ऐहिक लाभाची आशा नव्हती. पारलौकिकाची मी फिकीर करीत नाही. पूर्वजन्मी माझा आत्मा कुठल्या कुडीत बिऱ्हाड थाटून होता हे जसे मला ठाऊक नाही, तसेच पुढल्या जन्मी त्याची सोय कुठल्या देहात होणार आहे हेही जाणण्याची मला इच्छा नाही.

तरीही इतक्या उशिरा बंगाली 'ग म भ न' करायचे म्हणजे वयाच्या घड्याळ्याचा काटा पन्नासवरून पुन्हा एकदा शिशुवर्गावर आणायचा होता. बरे वय म्हणजे काही केवळ क्यालेंडरची तीनशेपासष्ट गुणिले पन्नास ही पाने नव्हेत. असंख्य संस्कारांची ओझी पाठीवर. साहित्य-नाट्य इत्यादी क्षेत्रांत 'फ्लूक' लागलेला मी एक पब्लिक माणूस ! नाही म्हटले तरी एका रद्दीवाल्याचा वर्षभर चरितार्थ चालावा इतक्या छापील कागदी वजनाचा मी लेखक आहे. पद्मश्रीबिद्मश्रीचा लबेदांही चिकटलेला आहे. ह्या सगळ्या झुली उतरवून बंगालीचा स्वाध्याय करायला निघालेला एक 'बटू' म्हणून बंगालात जायचे होते. ह्या भूमिकेत मला सगळ्यात अडचण होती ती इतक्या वर्षांच्या संस्कारांतून घडलेल्या माझ्याविषयीच्या माझ्या स्वतःच्याच प्रतिमेची. ती मला माझ्या हातांनी फोडायची होती.

मी बंगाली शिकायचा यापूर्वीही प्रयत्न केला होता. कामशेतला घोषबाबू म्हणून माझे स्नेही राहतात. त्यांच्याबरोबर बसून रवीन्द्रांच्या कवितांची श्रवणभक्ती केली होती. पण हे म्हणजे पिक्निक्मध्ये पोरांच्या बरोबर गमतीने क्रिकेटची मॅच खेळल्यासारखे होते. मी संपूर्णपणे विद्यार्थी होऊन विद्या करीत नव्हतो. ह्या खेपेला मात्र जोरदार निश्चय केला आणि गेली बाराचौदा वर्षे कलकत्त्यात राहणाऱ्या श्री.बा. जोशी ह्या माझ्या ग्रंथप्रेमी स्नेह्याला एक गुप्त खलिता पाठवला. कलकत्त्यातल्या साऱ्या दंगली जाळपोळीत राहूनही 'अवश्य या' असे सांगणारा हा पहिला भिडू निघाला. पण मी मात्र काही काळ तरी कलकत्ता शहरातल्या राजकीय करमणुकीच्या कार्यक्रमापासून दूर राह्यचे ठरवून, शांतिनिकेतनला मुक्काम ठोकायचा बेत पक्का केला. दगडफेक, ॲसिड बल्ब, आगी लावणे वगैरे चढाओढीत प्रत्यक्ष नव्हे तर प्रेक्षक म्हणूनही मला भाग घ्यायचा नव्हता. राजकीय दगडांनी निरपराध माणसांचीच डोकी अधिक फुटतात. पुढाऱ्यांचे काम मते फोडता आली नाहीत तर परस्पर डोकी फोडायला लावणे आणि ती एकदाची फुटली, घरे बिरे नीट जाळून झाली की मग पाहाणी करायला जाणे एवढेच असते. शिवाय

डोक्याला खोक पाडून घेऊन त्यातून बंगाली मुळाक्षरे आत घुसवायची माझी इच्छा नव्हती. म्हणून मी कलकत्त्याला डावी घालून शांतिनिकेतनला परस्पर जायची वाट आहे की काय याची चौकशी सुरू केली आणि माझे मित्र सलिल घोष यांचा सल्ला मागितला. आणि बंगालीतच म्हणायचे म्हणजे 'की आश्चज्जो !' सलीलबाबूंचा जन्म आणि शिक्षण शांतिनिकेतनातच झाल्याचे त्यांनी मला सांगितले. एवढेच नव्हे तर रवीन्द्र-संगीताचे सुप्रसिद्ध गायक शांतिदेव घोष हे त्यांचे सख्खे वडील बंधू हेही कळले. त्यांनी अत्यंत आनंदाने शांतिनिकेतनात माझी व्यवस्था करायचे ठरवले. बंगाली भाषेतली मी जी काही चार अक्षरे मेळविली त्याचे सारे श्रेय सलील घोष ह्यांनाच आहे. गेली वीस पंचवीस वर्षे ते महाराष्ट्रात आहेत. 'आनंद बाजार' पत्रिकेसारख्या मातबर वृत्तपत्राचे ते मुंबईतील प्रतिनिधी आहेत. मराठी साहित्य, संगीत, नाट्य, सामाजिक चळवळी, राजकीय प्रवाह, ह्यांच्याविषयी त्यांना उत्तम माहिती आहे. त्यांना माझा बेत सांगितल्यावर त्यांनी इतक्या उत्साहाने माझा बंगाली भाषा आणि संस्कृतीशी परिचय करून देण्याचे काम अंगावर घेतले की माझ्या बेतात यत्किंचितही फरक झाला असता तर पोत्यात मांजर घालून गावाबाहेर सोडावे तसे त्यांनी मला शांतिनिकेतनात नेऊन सोडले असते. त्यांना तशी शंका आली की काय कोण जाणे, सलीलबाबूंनी स्वतः दोन महिन्यांची रजा काढली आणि माझ्या तिकिटाबरोबर आपले आणि आपल्या पत्नीचेही तिकीट रिझर्व केले.

आणि आम्ही बंगालच्या दिशेने निघालो. अलाहाबादमार्गे बरद्वानला जाणारी गाडी धरायची होती. रिझर्वेशन वगैरे सर्व काही यथासांग होते, तरीही आजवरच्या शिरस्त्याला धरून गाडी सुटायच्या दीड तास आधी येऊन बोरीबंदरला पोहोचलो. फलाटावर त्यावेळी फक्त काही हमाल, पोर्टर, मी, माझी पत्नी आणि आमच्याचबरोबर आलेले आमचे दोन तीन स्नेही यांखेरीज कोणी नव्हते. गाडी फलाटाला लागत होती. त्याअर्थी ड्रायव्हर आला असावा. काही वेळाने स्टेशन आळोखे पिळोखे देऊन उठू लागले. हळूहळू जागे होणारे थिएटर, रेल्वे स्टेशन किंवा मोठे शहर वगैरे पाहायला फार मजा येते. रेल्वे फलाटाचे तर, एरवी गरीब गाईसारख्या दिसणाऱ्या बाया अंगात देवीबिवीचा संचार होऊन घुमू लागल्यावर जशा हांहां म्हणता थयथयाट करतात तसे असते. अजगरासारखे शांतपणाने आडवे पडलेले फलाट गाडी सुटायचा मुहूर्त अतिसमीप आला की घुमायला लागतात. निळ्या कपड्यांतले पोर्टर, लाल डगलेवाले हमाल, खाकी कपड्यांतले रेल्वे कर्मचारी, सफेद कपड्यांतले एस्.एम्., ए.एस्.एम्. असा हा भगतगण ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत चकरा मारायला लागतो. डब्याच्या टपावर चढून पाणी भरायला सुरुवात होते. डब्यातले पंखे, बत्त्या ह्यांची डागडुजी सुरू होते. प्रवासी मंडळी आणि हमाल यांचा

लपंडाव, मग हमालीच्या पैशावरून हुतूतू, असे खेळ सुरू होतात. ऐटबाज पॅसेंजर गावठी पाशिंजराकडे तुच्छतेने पाहू लागतात. आईबापांची बोटे सोडून वांड कारटी आइस्क्रीम-चॉकलेटवाल्यांच्या ढकलगाड्यांमागे धावू लागतात. रिझर्वेशनची यादी बाळगणाऱ्या कंडक्टरचा पाठलाग सुरू असतो.... गाडी सुटायच्या वेळेला तर ही लय इतकी बेहद्द वाढते की, सुनेच्या जाचाला वैतागून सासूने बोचके बांधून पाय आपटीत घर सोडून काशीयात्रेला जावे तशी ती आगगाडी शिट्ट्यांचा आक्रोश करीत फलाट सोडून धुस्फुस् धुस्फुस् करीत निघते. आपल्या देशाची संस्कृती, देशबांधवांचा स्वभाव वगैरे काय दर्जाचा आहे याचे खरे दर्शन भारतीय रेल्वेच्या फलाटावर होते. भारतीय नेत्यांप्रमाणे फलाटावरच्या अनुयायांचा स्थायीभावदेखील 'भांबावून हैराण होणे' हाच आहे. जो बघावा तो हैराण. कुणी हमाल हरवला म्हणून, कुणी तिकीट हरवले म्हणून, कुणी पाकीट मारले म्हणून, कुणी आपल्या रिझर्व जागेवर दुसराच माणूस तळ ठोकून बसलाय म्हणून, कुणी कंडक्टर सापडत नाही म्हणून, कुणी गाडी सुटायची वेळ झाली तरी निरोप देणारी माणसे आली पण जाणारी माणसे आली नाहीत म्हणून, कुणी डब्यातला पंखा चालत नाही म्हणून, कुणी संडासाच्या नळाला पाणी नाही म्हणून - नाना कारणांनी हैराण झालेल्या आपल्या देशाचे रेल्वे फलाट हे आदर्श मॉडेल आहे ! मला तर गाडी वेळेवर सुटली नाही तर बहुधा गार्डाच्या कार्ट्याने बापाच्या खिशातली शिट्टी पळवल्यामुळे तो देखील हैराण झाला असेल अशी शंका येते. बोरीबंदरच्या फलाटावरचा हा देखावा पाहात होतो, तेवढ्यात सिग्नलचे तांबारलेले डोळे हिरवे पडले, गार्डाच्या शिट्टीला इंजिनाच्या शिट्टीचा जबाब मिळाला आणि गाडी हलली. गाडी हालता हालता माझ्या पत्नीने सलीलला सांगितले,

"चांगला कडक बंगाली मास्तर पकडून त्याच्या ताब्यात द्या" उनाड विद्यार्थ्याला बोर्डिंगात घालायला नेतात तसे सलील आणि त्याची पत्नी शार्लट मला शांतिनिकेतनात घालायला घेऊन निघाले.

बोरीबंदर सोडल्यापासून चोवीस पंचवीस तासांत मराठी अमल संपला. अलाहाबाद वगैरेच्या आसपास राष्ट्रभाषा सुरू झाली. तिसऱ्या दिवशी सकाळी दहाच्या सुमाराला बरद्वानला पोहोचलो. बरद्वानचे खरे नाव 'वर्धमान' असे आहे असा एक नवा तपशील सापडला. पौषाची थंडी. सगळ्यांनी उनी कपडे चढवलेले. शाली गुंडाळलेल्या. 'अंगापेक्षा बोंगा मोठा' ही मराठी म्हण बहुधा ढिल्या पोशाखातल्या बोंग-बोंधूमुळेच आली असावी. पोत्यातले बटाटे फुटून चारी दिशांना सांडावे तशी त्या फलाटावर माणसे सांडली होती. भांगांत सिंदूर घातलेल्या ढबकदुबक करीत चालणाऱ्या वपुःश्रीमान वंग महिला, नाकापासून कपाळापर्यंत गोरोचनाच्या गंधाची बोटे ओढलेले वैष्णवांचे तांडे,

हातात बोचकी, मिठायांची मडकी, क्वचित् नारळाच्या करवंट्यांच्या गुडगुड्या धरलेले, किंवा हातात धरायला काहीच नसले तर धोतराचे सोगे धरलेले बंगाली पुरुष, असंख्य पोरे, यांनी फलाट नुसता वाहात होता. त्यात पुन्हा आपल्या मायभूमीच्या कुठल्याही रेल्वे जंक्शनवर येणारी भयानक दुर्गंधी ! दगडी कोळशाचा धूर आणि उतारूंनी मातृभूमीच्या अंकावर मुक्त मनाने केलेले मलमूत्रविसर्जन यातून निर्माण होणारी ती प्रातिनिधिक भारतीय दुर्गंधी. मिरज असो, गुंटकल असो, आग्रा असो की बरद्वान असो सर्वत्र हा एक विशिष्ट भारतीय एकात्मतेचा दुर्गंध दरवळत असतो.

बरद्वानला गाडी बदलून शांतिनिकेतनला जाण्यासाठी बोलपूरला नेणारी गाडी पकडायची होती. ती आमच्या गाडीची तासभर वाट पाहून निघून गेली. सकाळचे दहा वाजले होते. दुसरी गाडी दुपारी चारला होती. तोपर्यंत बरद्वान स्टेशनात बसून राहणे आले. बंगाली भाषेचा अभ्यास मी 'वर्धमान' ही अक्षरे वाचण्यापासूनच सुरू केला. पाट्या वाचून अक्षरओळख करून घ्यायला लागलो. भाषावार प्रान्तरचनेची भांडणे सोडवायचा माझा एक सोपा उपाय होता. गावातल्या दुकानांचे बोर्ड ज्या भाषेत लिहिलेले असतात आणि देवळातली कीर्तने, भजने ज्या भाषेत चालतात ती त्या गावाची भाषा. पण भाषेची भांडणे सोडवायची नसून वाढवायची असतात हे राजकारणी ज्ञान नसल्यामुळे माझा सोपा उपाय अमलात येणे कठीण आहे हे माझ्या ध्यानात फार उशिरा आले. वर्धमानात सगळीकडे बंगाली अक्षरांत पाट्या होत्या. तसे बंगाली आणि देवनागरीत पुष्कळ साम्य आहे. पण बंगाली लिपी अधिक वेलबुट्टीदार ! अक्षरांना कुरळे कुरळे वळण. काही अक्षरे अगदीच निराळी. बंगाली मात्रा अक्षराच्या डोक्यावर न बसता जरासे पोक आलेल्या कान्यासारखी अक्षराच्या आधी येते. जोडाक्षरांचीही भानगड जरा तेढी आहे. तात्पर्य, पाट्या वाचता वाचता मामला जितका सीधा वाटला तितका नाही हे प्राथमिक ज्ञान झाले.


त्या स्टेशनातल्या विश्रामगृहाच्या एका खोलीत सामान टाकले आणि नगर प्रदक्षिणेला निघालो. सलील घोषला चित्रविचित्र पोशाखाची थोडी हौस आहे. त्यात पुन्हा दाढी, डोक्यावर केसांचे वारेमाप जंगल. धोतर आणि बंगाली पैरणवाल्यांच्या घोळक्यात तो काही बंगाली दिसत नव्हता. (आपण ज्याला बंगाली झब्बा म्हणतो त्याला बंगाली लोक 'पंजाबी' म्हणतात. पंजाबी लोक बहुधा 'मराठी-अंगरखा' म्हणत असावेत.)

एका वर्तमानपत्रवाल्यापुढे सलील वर्तमानपत्रे घ्यायला थांबला. तिथे दोन-चार लोक

फुकट वर्तमानपत्रे वाचीत बसले होते. हा देखील अखिल भारतीय गुण आहे, हे पाहून बरे वाटले. त्यांतल्या एका माणसाने सलीलकडे पाहून, "तुम्ही बंगाली, की आणखी कुठले?" असा प्रश्न विचारला. सलील उत्तरादाखल त्याच्याशी बंगालीत बोलला. लगेच तो माणूस म्हणाला, "तुम्हाला कुठे तरी पाहिल्यासारखे वाटते. तुम्ही अंदमानात होता का हो?"

हा टोमणा सलीलच्या चित्रविचित्र वेषभूषेला आणि भरघोस केशसंभाराला उद्देशून होता. बंगाल्यांची विनोदबुद्धी इतकी कोकणी वळणाची असेल याची मला कल्पना नव्हती.

आम्ही निमूटपणाने शहर पाहायला निघालो.





सकाळचे दहा वाजून गेले होते, तरीही वर्धमान शहर अजूनही डोळे चोळीतच होते. कोणालाही कसलीही घाई नव्हती. स्टेशनाबाहेर सायकल-रिक्षावाले होते. त्याखेरीज दुसरे वाहन नव्हते. सायकल-रिक्षात बसणे माझ्या अगदी जिवावर येते. चणेकुरमुरे आणि हातभट्टीची दारू ह्या खुराकावर जगणारे ते रिक्षावाले. थंडी, वारा, ऊन, पाऊस, कसलीही शिस्त न मानणारी रहदारी आणि रस्त्यातले खाचखळगे ह्या अडचणींतून आम्हा बाबूंना खेचीत नेत असतात. अशाच एका सायकल-रिक्षातून आमच्या स्वाऱ्या निघाल्या.

वर्धमानात बंगालचे मला जे पहिले दर्शन घडले ते पाहून मुंबईला परत जाणाऱ्या गाडीची चौकशी करावी असे वाटायला लागले. घरांच्या आणि कुंपणांच्या भिंती, इंचन् इंच काळ्या डांबरी रंगांत कम्युनिस्ट क्रांतीच्या घोषणांनी चितारलेल्या होत्या. निवडणुकांच्या काळात आपल्या देशातल्या सगळ्याच शहरांची अशी दुर्दशा होते. पण इथला हा रोजचा प्रकार. सलामीचीच घोषणा वाचली. 'माओ आमादेर च्यारमान', 'माओ आमचा अध्यक्ष' — 'राज्यसत्ता बंदुकीच्या गोळ्यांनी मिळवावी लागते' — ठिकठिकाणी माओची वाक्ये भिंतींवर रंगवलेली. विळ्या हातोड्याच्या मुद्रा उठवलेल्या. दुकानांतून लेनिनचे फोटो. (त्यांची शतसंवत्सरी म्हणून असेल!) आणि ह्या साऱ्या

लाल वातावरणात ठिकठिकाणी सरस्वतीच्या मूर्ती बनविण्याचे कारखाने. गवताच्या पेंढ्या आणि वस्त्रगाळ मृत्तिकेतून सरस्वती आकार घेत होती. शेकडो वर्षांपासून चालत आलेला सरस्वती-पूजेचा उत्सव आणि त्या सोबत आलेली ही सुन्दर शिल्पपरम्परा. विलक्षण लोभसवाण्या मूर्ती. हंसांचे ते तऱ्हेतऱ्हेचे मुरडणे. कुठे नुकताच पेंढ्यातून आकार घडतो आहे. कुठे मातीचा थर लेऊन सरस्वती देवी 'कुंदेन्दुतुषारहारधवला' होण्याची वाट पाहाते आहे. कुठे श्वेतपद्मासनावर बसवली जाते आहे. कुठे सरस्वतीचे नुसते मुखवटेच रंगवले जात आहेत. पिढ्यान् पिढ्या ज्यांच्या घराण्यांतून ही मूर्तिकला चालत आलेली आहे, असे ते बंगाली 'पटुआ' जातीचे कारागीर शेकडो सरस्वत्या घडवीत होते. भररस्त्यात ही शिल्पनिर्मिती चालली होती. ते दृश्य पाहात तासन् तास उभ्या असलेल्या पोरासोरांना सरस्वती-उत्सवाच्या आनंदाची स्वप्ने पडत असावीत.

आपल्याकडे गणपतीचे कारखाने असतात तसे हे सरस्वतीचे कारखाने. इथे हंस, पद्म आणि स्त्री हे तीन घटक असल्यामुळे मूर्तिकाराच्या कल्पनाशक्तीला खूपच वाव ! त्यातून वीणावादनाचा मोहक थाट. गवत आणि माती ह्यांतून मूर्ती घडवण्याच्या ह्या कलेला जुनी शास्त्रीय बैठक आहे. ह्या मूर्तिकलेच्या शास्त्राने केवळ बाह्य आकाराचीच नव्हे तर वैद्यकाच्या आधाराने अस्थी, मांस, नाड्या ह्यांची देखील चर्चा केली आहे. अस्थींच्या जागी बांबूचे काष्ठ. मग पेंढ्यांचे स्नायू. त्या पेंढ्या बांधताना इडा, पिंगला अशा निरनिराळ्या नाड्यांपासून कुंडलिनी आणि हृद्पद्मापर्यंत सगळ्या नाड्यांचा विचार, त्याच्यावर मेदादी पदार्थांप्रमाणे ओल्या मृत्तिकेचा थर, त्याच्यावर त्वचेसारखे वस्त्र डकवायचे. त्वचेच्या पटावर वर्ण. मस्तकावर केशपाश. अशी फार शास्त्रोक्त घडण असते. एका गोष्टीचे मात्र मला नवल वाटले. सगळ्या सरस्वत्यांचे चेहरे एकसारखेच होते. केवळ वर्धमान्यातल्याच नव्हे, त्यानंतरही इतर गावांतल्या सरस्वतीच्या मूर्ती पाहिल्या त्यादेखील एकाच छापाच्या. स्त्रीसौंदर्याची सर्व शास्त्रोक्त लक्षणे सांभाळून सरस्वतीचे मुखमंडल घडवल्यामुळे हा सारखेपणा आला असावा. आपल्या सौंदर्यशास्त्री मंडळींनी स्त्रियांचे पद्मिनी, शंखिनी वगैरे गट पाडले आहेत. त्यांतही ठराविक सौंदर्यलक्षणे आहेत. ही सरस्वती त्यांपैकी कुठल्या गटात पडत होती हे मला ठाऊक नाही. पण बंगाली स्त्रीसारखी ही सरस्वतीदेखील केस मोकळे सोडलेली आणि हरिणाक्षी होती. असल्या चेहऱ्याच्या बऱ्याच बंगाली युवती आढळतात. फक्त वर्ण मात्र इतका कुन्देन्दुतुषारहारधवल नसतो. वंगरमणी सामान्यतः श्यामला. पण ते सावळेपण गौरवर्णाहून किती तरी आकर्षक. सावळ्या वर्णात नैसर्गिक सौम्यता असते. सावलीसारखी शीतलता असते. गोऱ्यापान बाईच्या नाकाच्या शेंड्यावर बहुधा एक अदृश्य फणकारा असतो.

ही देखणी सरस्वती कशी नजर खिळवून ठेवत होती. नुसत्या ज्ञानाचीच नव्हे तर ज्ञानाधिष्ठित संस्कृतीची ही देवता. हिन्दूंच्या देवतांनी सूचित केलेली रूपके किती सुंदर आहेत. देवदेवतांशी सौदे करण्याच्या गडबडीत त्या रूपामागले रूपक पाहायला सवडच नसते. सरस्वतीइतके संस्कृतीचे सुंदर प्रतीक नसेल. चिखलातून उगवणाऱ्या कमलाचे आसन — साक्षात माती आणि वाहत्या पाण्याचा आधार. संस्कृतात पाण्याला 'जीवन'च म्हणतात. सुखदुःखाने भरलेल्या जीवनाचा आधार. एका हाती ग्रंथ आणि एका हाती मनाचे जाड्य नाहीसे करणारी वीणा. सर्व रंगांचे मीलन झाल्यावर निर्माण होणाऱ्या शुभ्र रंगाचे वसन ल्यालेली. मानवी संस्कृतीला अधांतरात किंवा कृत्रिम रीतीने फुलता येत नाही. तिला मातीचा आणि पाण्याचा आधार लागतो. ती एकाच रंगाच्या जीवनाचा आग्रह धरणारी असूनही भागत नाही. शुभ्रता म्हणजे रंगांचा अभाव नव्हे. सर्व रंगांचे मीलन. नुसते ज्ञान कोरडे. म्हणून त्याला सुरांची साथ असली की ते ज्ञान माणसाला विनाशाकडे न नेता विकासाकडे नेते. सप्तसुरांचा आणि सप्तरंगांचा जिथे आदर होतो तिथेच मानवी संस्कृती फुलते. नुसता लाल रंगाचा उदो नाही की भगव्या आणि हिरव्या रंगाचे थैमानही नाही. ठराविक सुरांची सक्ती नाही. जोडीला नीरक्षीरविवेक करणारे हंस ! शिवाय ही शुभ्रता स्त्रीदेहावर विलसत असल्यामुळे तिला शारदीय चांदण्यांची शीतलताही आहे. शतकाशतकांच्या सांस्कृतिक आघातांतून वाचून राहिलेल्या ह्या चिरंजीव कल्पना. सरस्वतीच्या त्या देखण्या मूर्तीकडे पाहताना मला सारखे वाटत होते — आमचे सत्तापिपासू नेते आणि मानासाठी हपापलेले विद्वद्ज्जन घटकाभर जरी ह्या सरस्वतीचे हे रूपक शांत चित्ताने ध्यानात घेतील तर, मानवी संस्कृतीचा हरवलेला आत्मा पुन्हा सापडेल. जीवनाचे ज्ञान, कलोपासना, विवेक यांच्याशी जेव्हा नाते तुटते, प्रकाशाचा वेध घेत कमलाप्रमाणे सुखदुःख पचवून फुलायची जिद्द जेव्हा संपते त्यावेळी व्यक्तिगत जीवनाप्रमाणे देशाचाही स्वतःवरचा विश्वास उडतो. सर्वत्र दुरवस्था होते. कोणी तरी येऊन आम्हाला सोडवा हो - ह्या लाचार भावनेतून - चीनचा नेता तो आमचा नेता - माओ आमादेर च्यारमन् - असल्या घोषणांचा सुकाळ होतो. कौरवांच्या बाबतीत कृष्णाने जसे अर्जुनाला सांगितले की अरे, ते मेलेलेच आहेत, तू निमित्तमात्र हो ! इंग्रज येण्याच्या वेळेला आम्ही असे मेलेलेच होतो. तो निमित्तमात्र झाला आणि त्याने देश गिळला. जेव्हा देश हितापेक्षा पक्षहीत मोठे होते त्यावेळी देशाला पक्षाघात होतो. मग ज्याचे बूट सबळ अशा कोणीही देशाला तुडवावे ! स्वार्थापायी जेव्हा नेते जनतेला गुंडांच्या हाती सोपवतात ! त्यावेळी गरीब जनता 'अवतारा'ची वाट पाहू लागते आणि अंगात भुते संचारलेल्या 'अवसरां'ना 'अवतार' समजून त्यांच्या भजनपूजनांत दंग होते ! वर्धमानशहरात 'माओ'च्या नावाचा हा असा जयजयकार पाहून चिडावे, कीव करावी की काय करावे

ते मला सुचेना.

बरद्वानच्या बाजारात हिंडताना नाटक कंपनीचे ड्रेस भाड्याने द्यायचे दुकान असते तसले एक लहानसे दुकान दिसले. भिंतीवर मुकुट टांगले होते. जिनगरी काम केलेले भेंडाचे अलंकार होते. हे लग्नसमारंभाचे साहित्य पुरवणारे दुकान. त्याला 'दशकर्म भांडार' म्हणतात. ते मुकुट बंगाली नवरदेवासाठी होते. त्यांना 'टोपर' म्हणतात. 'माओ आमादेर च्यारमन' असो की 'लेनिन आमादेर प्रपितामह' असो, बंगाली विवाहसमारंभ मात्र आजही रूढींना घट्ट धरूनच साजरे केले जातात. वधूवरांचे वेष ठरलेले. वधू लाल रंगाचा बुट्टीचा भरजरी शालू नेसते. आपल्याकडे पिवळी साडी असते. पण बंगाली वधू कालीच्या कुंकवाच्या रंगाचा शालू नेसते. बाशिंग असते. शंखांची कंकणं असतात. नवरदेवालाही धोतर नेसून, उघड्या अंगावर उत्तरीय घेऊन डोक्यावर टोपर ठेवूनच बसावे लागते. सुटावर भोटम्सारखी टोपी आणि त्या टोपीला येडबंबूसारख्या मुंडावळ्या, पायात मोजे, गळ्यात टाय आणि मनगटाला हळकुंड बांधून होमापुढे बसलेला मुंबईतला मराठी नवरदेव पाहिला की मला हिंदू धर्माचीच दया येते. असल्या तरुणांना सरळ रजिस्टर लग्न करण्याची ताकद नसते. कारण मग त्यात मानपानाची लूट साधता येत नाही. धोतर नेसून उघड्या अंगाने बसायला आमचे जवान लाजतात. तरीही पण होम, देवक, भटजी वगैरे प्रकरणे हवीतच. तिथे देवाच्या डोळ्यात धूळ नसली तरी धूर फेकता येतो आणि कुटुंबियांकडल्या अहेराला आधार मिळतो. संध्याकाळी सासऱ्याकडून फुकटात उपटलेला सूट चढवून नवरदेव आणि बायकांच्या देशीविदेशी मासिकांतून स्फूर्ती घेऊन केशभूषा आणि वेषभूषा करून नवरी पुन्हा 'रिसेप्शन नामक सक्तीचा बक्षिससमारंभ साजरा करतातच ! मी त्या दशकर्म भांडारातल्या कलाकुसरीच्या वस्तू पाहात होतो. इतक्यात टेरिलिनची पॅण्ट, बुशशर्ट वगैरे चढवलेले, कडक इस्त्रीचा कुडता पायजमा घातलेले, चांगले शिकलेले असावेत असे दिसणारे पाचसात तरुण त्या दुकानात शिरले आणि हातातला डबा खळखळवीत त्यांतल्या एकाने 'चांदा दाव —' वर्गणी द्या अशी मागणी केली. त्या मागणीच्या मागे 'नाही दिलीत तर पाहून घेऊ' असा सूर होता. दुकानदाराने निमूटपणानं त्यांच्या डब्यात चार आणे टाकले. युवकगण पुढल्या दुकानात गेला. आम्ही विचारले, 'कसली वर्गणी ?'

"आमच्या हतभाग्याची—" दुकानदार म्हणाला. "दिवसातून असे चार पाच रुपये जातात. हे राजकीय पक्षांतले, कॉलेजांत शिकणारे सुशिक्षित गुंड. आमची दुकाने जाळू नयेत म्हणून हा दंड आहे."

जबरदस्तीने वर्गणी गोळा करणारे राजकीय गुंड हे काही मी आजच पाहात नव्हतो. आधुनिक सत्ताधीशांच्या खुर्च्यांचे तेच आधार आहेत. वर्धमानात म्हणे मार्क्सिस्ट कम्युनिस्टांचा जोर आहे. त्यामुळे हे सी.पी.एम. पुरस्कृत गुंड असतील. असोत बापडे. त्या दुकानदाराचा केविलवाणा चेहरा मात्र माझ्या डोळ्यापुढून हलत नाही. वर्धमानाने मला क्षणोक्षणी निराश केले. एकेकाळची ही वर्धमानच्या राज्याची राजधानी. गावाच्या मध्यभागी राजवाडा आहे. वर्धमानला स्वतंत्र विद्यापीठ आहे. गावाबाहेर सुरेख आमराया आहेत. विस्तीर्ण तलाव आहे. पण तलावावर शेवाळ आहे. हायसिंथची भयानक वाढ आहे. विद्यार्थी-वसतिगृहाच्या सुंदर इमारती लाल क्रांतीच्या डांबरी रंगातल्या घोषणांनी चिताडून घाण घाण करून टाकल्या आहेत. खिडक्यांच्या फुटलेल्या काचा विद्यार्थ्यांच्या आणि अध्यापकांच्या कर्तव्यशून्यतेची साक्ष देताहेत. सगळ्यांनाच विध्वंसाची घाई आहे. नव्या रचनेचे चित्र मात्र कोणाच्याच डोळ्यापुढे नाही.

बंगालात आपण राजकीय चर्चेच्या भानगडीत पडायचे नाही असे मनाशी कितीही ठरवले तरी क्षणाक्षणाला अशी भयंकर दृश्ये दिसतात, अशा भयंकर बातम्या वाचायला मिळतात की ह्या ज्वालांचे चटके बसल्यावाचून राहात नाहीत. माझ्या आयुष्यात मी कधी पाहिल्या नसतील इतक्या राजकीय मिरवणुका, आणि सशस्त्र लोकांचे मोर्चे मी बंगालातल्या माझ्या तीन महिन्यांच्या वास्तव्यात पाहिले. हॉटेलात, बसच्या थांब्यावर, दुकानात, जिथे जावे तिथे राजकारणाची वटवट. त्यातून संताप, भांडणे व जाळपोळ. क्रांतीची ज्वाळा भडकवायची म्हणजे दूधवाटप-केन्द्रे जाळायची. बसेस, आगगाड्या, इथपासून ते शाळा आणि वाचनालयापर्यंत जे दिसेल ते जाळायचे. एकदा सारे काही जाळू या. मग पुढचे पुढे पाहता येईल हाच फक्त विचार. मोर्चा यशस्वी होणे म्हणजे मोर्चाची हाक घालणारे पुढारी सोडून इतरांपैकी कुणाचा तरी गोळीबारात मृत्यू. लहानसहान दुकानांची जाळपोळ. मग बस-ट्राम वगैरेंचे दहन.

साडेबाराच्या सुमाराला स्टेशनात परतलो. रेल्वे रेस्टॉरंटमध्ये जेवण मागवून ते येण्याची वाट पाहात होतो. तेवढ्यात शांतिनिकेतनच्या दिशेने आलेल्या गाडीतून सलीलचा धाकटा भाऊ मंटू आणि त्याचे दुसरे स्नेही पूर्णानन्द बाबू चतर्जी हे रेस्टॉरंटमध्ये आले. उंच सडपातळ बांध्याचे चाळीशी पलीकडले मंटू बाबू उत्तम खेळाडू असले पाहिजेत, हे प्रथमदर्शनीच ध्यानात आले. पूर्णानन्द बाबू मात्र स्थूल, ठेंगणेठुसके, उजळ वर्णाचे, बंगाली थाटाचे, बैठ्या प्रकृतीचे गृहस्थ. पहिल्या भेटीत दोस्ती जमावी असे मंटू बाबू विश्वभारतीत वॉच ॲण्ड वॉर्ड विभाग सांभाळतात. शांतिनिकेतनात वॉच

ॲण्ड वॉर्ड आहे हे ऐकून मला सौम्यसा धक्काच बसला. पूर्णानन्द बाबू शांतिनिकेतनातल्या हायस्कूलमध्ये शिक्षक आहेत. गोल गुबगुबीत पूर्णानन्दबाबूंना 'लेबू-दा' म्हणतात. 'लेबू-दा' म्हणजे लिंबूदादा. लिंबासारखी कांती आणि गोलाई असलेल्या पूर्णानंदांना हे नाव शोभतेही. बंगाल्यांना एक पाळण्यातले नाव असते आणि हाक मारण्याचे एक डाकनाम असते. डाक म्हणजे हाक ! पोस्टमन पूर्वी नाव पुकारून पत्रे टाकीत म्हणून पोस्टाचीही 'डाक' झाली असावी. आपल्याकडे आपण नावाची मोडतोड करून हाक-नाव तयार करतो. बळवन्ताचा बाळू, सदाशिवाचा सदू वगैरे वगैरे. पण बंगाली लोकांच्या मूळ नावाशी डाकनामाचा संबंध असतोच असे नाही. पूर्णानन्दबाबूंच्या घरात तर मुलांची डाक-नामे भाजीपाल्याची आहेत. पूर्णानन्द लेबू तर त्यांचा भाऊ 'आलू' म्हणजे बटाटा आणि बहीण कोपी म्हणजे कोबी. चित्रा, नंदिता, सुजाता, अमिता, अल्पना असल्या सुन्दर नावांच्या पोरींना टुकी, खुकी, च्युलबुली, टुणटुण, भोंडूळ असल्या डाकनामांनी हाका मारलेले ऐकताना चमत्कारिक वाटायचे. पण इथे ह्या डाकनामाची इतकी सवय आहे की पूर्णानन्दबाबूंचे विद्यार्थी विद्यार्थिनी देखील त्यांना लेबू-दाच म्हणतात. माझे डाकनाम काय आहे हे विचारल्यावर मी पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे असे सांगून एका बंगाल्याला भोवळ आणली होती. एकदा एका आईने आपल्या मुलीला 'नायलॉऽऽन्' ह्या डाकनामाने हाक मारलेली ऐकून मी थंड झालो. पोरीचे नाव नायलॉन म्हणजे आईचे 'जॉर्जेट' असावे आणि आजी कदाचित 'खा-दी' असेल ! बंगाल्यांना डाकनामाची हौस तर द्राविडी लोकांना इंग्रजी मुळाक्षरांची. आपल्याकडे बायकांना तरी इंग्रजी आद्याक्षरांनी ओळखायची आपल्याला सवय नाही. ज्योत्स्नाबाईचा उल्लेख कुणी जे.के. भोळे असा करणार नाही. पण मद्रासकडे सुब्बुलक्ष्मीचा देखील लोक यम्.यस्. असा उल्लेख करतात. बंगाली नावांची आणखी एक मजा आहे. बंगालीतून लिहिताना चतर्जी-मुखर्जी असे नाही लिहीत. तिथे हे सगळे चट्टोपाध्याय मुखोपाध्याय होतात. पण इंग्रजीतून मात्र तेच चट्टोपाध्याय चटर्जी होतात. आपले ठाकूर मराठी-इंग्रजीत ठाकूरच. पण बंगाली ठाकूर इंग्रजीत टागोर ! बंगाली बसू, इंग्रजीत बोस. पुन्हा लेखी एक आणि उच्चारी दुसरे. म्हणजे 'बसू' लिहिले तरी म्हणायचे 'बोशू' ! 'स श ष'चा महान घोटाळा. ह्या शकारावरून मोंटुबाबूशी पहिल्या भेटीतच थट्टा मस्करी सुरू झाली. त्याला मी एक चुटका सांगितला. लंडनला एका इंग्रजाने एका बंगाली मित्राला 'हॅपी न्यू इअर' म्हणून नूतन वर्षाचे अभीष्टचिंतन केले. लगेच बंगाली बाबू त्याच्याशी जोराजोरात हस्तांदोलन करीत म्हणाले, 'शेम, शेम, शेम टु यू —' गोष्ट सांगितली आणि वाटले बहुधा माझ्या डोक्यावर हातबॉम्ब फुटणार. पण नाही. बंगाली लोकांनाही स्वतःची थट्टा सहन होते. लंडनमध्ये एका दुकानात पायमोजे

विकत घ्यायला गेलेल्या बंगाल्याने दुकानातल्या फटाकड्या पोरीकडे 'पेअर ऑफ् शॉक्स् दे' अशी मागणी केल्याची कथा मग मला एका बंगाल्यानेच सांगितली. जे अपरिचित ते कॉमिक असे मला वाटायला लागले आहे. एका गुजराती मित्राने शैलबाला नावाच्या स्त्रीच्या नावाचा उच्चार सैलबाला असा केला होता. तेव्हा त्या गुजराती मित्रांच्या मेळाव्यात फक्त मलाच हसू आले होते. त्यावरून त्या गुजराती मित्राने एक गोष्ट सांगितली. तो एका मराठी गृहस्थाच्या घरी पाहुणा गेला असताना तो गृहस्थ कोणाला तरी आपल्या घरी 'गेस्ट-बिस्ट' आले आहेत असे सांगताना त्यांनी ऐकले. 'महाराष्ट्रात गेस्ट हा बीस्ट मानतात का हो ?' असाही प्रश्न गंभीर चेहरा करून त्याने विचारला होता. तात्पर्य विनोदाचा मक्ता कुणीही आपल्याच प्रांताकडे आहे असा गर्व बाळगू नये. एखादेवेळी गुरखेसुद्धा रात्री दोन अडीचच्या सुमाराला विनोद करीत असतील. आपल्याला कसे कळणार ?

आमच्या गप्पागोष्टी चालल्या होत्या, तेवढ्यात बोलपूरला जाणारी गाडी फलाटाला येऊन लागली. आमची तिकिटे फर्स्ट क्लासची आहेत हे ऐकून मोंटू म्हणाला,

"सर्बोनाश !" 'सर्वनाश' हा बंगाल्यांचा आवडता शब्द आहे.

"काय झाले ?"

"फर्स्ट क्लास बघा म्हणजे कळेल."

डब्याची अवस्था पाहून मला हादराच बसला. डब्यातल्या एकूण एक गाद्या फाडून चिंध्या केल्या होत्या. स्प्रिंगादेखील तोडल्या होत्या. पंखे गायब. दिवे फोडलेले. वर्गविहीन समाजरचनेच्या क्रांतीची सुरुवात पहिल्या वर्गाचे रेल्वेचे डबे मोडण्या-तोडण्यापासून करा असा लाल आदेश असावा. बरद्वान ते बोलपूर हा आगगाडीचा प्रवास खिशात फर्स्ट क्लासची तिकिटे असून स्वतःच्या होल्डॉलवर बसूनच केला. बाहेर वीरभूम जिल्ह्यातली ती हिरवीगार शेते, गर्द आमराया, तळ्याच्या काठाला वसलेली ती टुमदार खेडी, तालवृक्षांची बने अशी डोळ्यांना गारवा आणणारी दृश्ये दिसत होती. तालित, थाना, गुशकरा अशा नावांची चिमुकली सुंदर स्टेशने लागत होती. मिरज ते कोल्हापूर फाट्यावरच्या स्टेशनांसारखी. आदिवासी स्त्री-पुरुषांचे थवे गाडीत शिरत होते. पांढरी शुभ्र आणि लाल किंवा निळ्या रुंद काठाची लुगडी नेसलेल्या, डोक्यांत फुलांचे गुच्छच्या गुच्छ घातलेल्या, कुशल शिल्पकाराने घडवलेल्या पाषाणमूर्तीसारख्या सावताळ स्त्रिया, आणि फावड्या, कुऱ्हाडी बरोबरच ढोल, झांजा आणि बासऱ्या घेऊन चाललेले सावताळ तरुण. गळ्यात फुलांच्या माळा घातलेले. कानावर गुच्छ खोचलेले. तेवढ्यात

कुणी बासरीही वाजवीत होते.

तसे कोणीही क्रांतीने पेटलेले दिसत नव्हते. फक्त त्या क्रांतीने राष्ट्रीय रेल्वेचा डबा उद्ध्वस्त केला होता. ही सारी चित्रविचित्रे पाहता पाहता दीड-दोन तासानन्तर बोलपूर दिसायला लागले.

तालुक्याच्या गावासारखे गाव. कसल्याशा गिरणीची चिमणीही दिसली. एव्हाना मला 'डाबर' ही ओषधांच्या जाहिरातीची अक्षरे बंगालीतून वाचता येऊ लागली होती. डोंगरे बालामृत, वैद्यनाथ, डाबर, ब्रुक बाँड चाय. . हळूहळू बंगाली वाचन चालू होते. बोलपूरच्या फलाटाला गाडी लागली. डब्यातून उतरायला लागल्याबरोबर मोंटूबाबू म्हणाले, "थांबा थांबा—" मी काय झाले म्हणून पाहतो तो सलीलमधला पत्रकार जागा झाला होता आणि त्याने कॅमेरा काढला होता. लगेच त्याने फोटो काढायला सुरुवात केली. गेले अठ्ठेचाळीस तास चांगला माणसासारखा वागणारा हा माणूस जातीवर गेला. त्या गर्दीचे लक्ष निष्कारण माझ्याकडे गेले. मला प्रमुख पाहुण्याचा मुखवटा चढवणे प्राप्त होते. तेवढ्यात त्या गर्दीतून वाट काढीत विश्वभारतीत शिकणारे काही विद्यार्थी आणि विद्यार्थिनी पुढे आल्या आणि एका विद्यार्थिनीने सुंदर पुष्पहार घालून माझे स्वागत केले. पुन्हा फोटो. गळ्यातला हार, फोटो, वगैरे प्रकरणामुळे स्टेशनातली ती अनोळखी गर्दी 'होगा साला कोई लीडरका बच्चा—' हा भाव चेहऱ्यावर आणून माझ्याकडे पाह्यला लागली. लोक हे असे भलत्यात आपली जिम्मा करायला लागले म्हणजे कठीण अवस्था होते. मी बापडा बंगाली भाषेतली चार अक्षरे शिकावी एवढा साधा हेतू मनात बाळगून आलेला इसम होतो. पण त्या हार, फोटो वगैरेमुळे बहुतेक लोक 'काय साला फुकट खाऊन माजलाय पाहा' असा चेहरा करून माझ्याकडे पाहताहेत असे मला वाटायला लागले. बाकी माणसाचा मोरू करायचा हमखास उपाय म्हणजे रेल्वेच्या फलाटाच्या अनोळखी गर्दीत त्याला हार घालणे. ते सारे अनोळखी डोळे इतक्या चावटपणाने आणि 'चरा लेको फुकटचे लोकांच्या जिवावर' असे म्हटल्यासारखे पाहात असतात की कधी एकदा तिथून निसटून जाऊ असे होते. पण काही सराईत मात्र पाण्यात बसलेल्या रेड्याच्या प्रसन्नतेने असे हारतुरे चढवून घेतात. विशेषतः हे नाना तऱ्हेचे आनंद आणि बाबा वगैरे बुवा लोक. मला तर वाटते जे काय हारबीर घालायचे असतील ते घरी पोहोचल्यावर घालावेत. इथे गर्दीत काय उगीचच बळीच्या बोकडासारखा हार घालून घ्यायचा ! खरे तर बायका जशा केसात वेण्या माळतात तशी पुरुषांनीही आता गळ्यात


पूर्वीच्या काळांतल्या पुरुषांसारखी हार घालून हिंडायची फ्याशन पाडायला हवी. चार माळी तरी जगतील. वास्तविक मी हारून अल् रशीदसारखा गुपचुप त्या नगरात शिरायचे म्हणत होतो. अशा वेळी हे जाहीर स्वागत कसे काय झाले ते कळेना. मला भीती वाटायला लागली की स्टेशनाबाहेर ब्यांड बिंड तर नाही? आणि लाठ्यांची कमान धरलेली पोरे. एका प्राथमिक शाळेत त्या चिमुकल्या पोरांनी धरलेल्या लाठ्यांतून मी जवळ जवळ सरपटत गेलो होतो. मला अमलदार नाटकातल्यासारखा काहीतरी घोटाळा तर झाला नाही ना अशी शंका आली आणि मी हळूच सलीलला विचारले—

"त्या पोरीला विचार हा हार नक्की माझ्याचसाठी होता ना?"

"वा! तुम्ही विश्वभारतीचे पाहुणे. त्यांचे स्वागत इथले छात्र-छात्री असेच करतात." सलील. पुन्हा एक फोटो.

म्हणजे ज्या मरणाला मी भीत होतो तेच नेमके झाले. गोव्यात पोर्तुगीज अमल होता त्यावेळी गुप्त चौकशीला गेलेला सी.आय.डी. म्हणे ज्याला त्याला दम भरीत जायचा "हांव् शी. आय. डी. सांगतां तुका. चड उलौ नाका — मी गुप्त पोलिस आहे - समजलात!' त्या गुप्त पोलिसाच्या स्वागतार्थ गावजेवण व्हायचे म्हणतात. खरे खोटे ते देवा मंगेशाला ठाऊक! माझे शांतिनिकेतनातले गुपचूप येणे मात्र त्या गुप्त पोलिसासारखेच झाले.

एक गोष्ट मात्र खरी, तो पुष्पहार आणि तो हार घालणारी मुलगी ह्यांत अधिक सुंदर काय होते ते सांगणे कठीण होते.





बोलपूर स्टेशनात आम्हाला उतरून घ्यायला सलीलची इतर कुटुंबीय मंडळीही आली होती. चारी बाजूंनी बंगाली भाषेचा वर्षाव होत होता. माझ्या मनात विचार आला की, ही भाषा विद्यापीठात जाऊन शिकण्याऐवजी तीन महिने ह्या फलाटावरच मुक्काम ठेवावा आणि श्रवणभक्तीने भाषा वश करून घ्यावी.

फलाट, बाजार, नाटकाची थिएटरे, हॉटेले, सलून्स — भाषा शिकायच्या ह्या खऱ्या शाळा. पुस्तकी भाषा रक्तात मिसळत नाही. पुस्तकातून शिकलेला माणूस हॉटेलात गेल्यावर "आपल्या उपाहारगृहात उष्ण खाद्यपदार्थ कोणते आहेत ?" असले काहीतरी विचारील. 'गरम काय ?' हे त्याला सुचणार नाही. (ह्या प्रश्नाला एका मराठी हॉटेलात 'सोडा' असे उत्तर मिळाल्याची दुःखद स्मृती एकदम जागी झाली !) भाषा गर्दीचे धक्केबुक्के खात शिकायला हवी. एरवी 'जरा सरकून घ्या' ह्याचे बंगाली स्वरूप कसे कळणार ? त्यासाठी धक्के खाल्ले पाहिजेत आणि जमल्यास दिलेही पाहिजेत. इथे तर ह्या लोकांनी माझा 'व्ही.आय.पी.' करून टाकला होता. विशेषतः कला, साहित्य ह्यांसारख्या क्षेत्रातल्या माणसाला मारण्याचा सोपा उपाय म्हणजे त्याची उत्सवमूर्ती करून टाकणे हाच होय ! आयुष्याच्या सुरवातीला गुदगुल्या करणाऱ्या ह्या

पालख्या, मिरवणुका, जयनाद, पुष्पवृष्टी पुढे अस्वलीच्या गुदगुल्यांसारखे प्राण कासाविस करून टाकतात. ही प्रेमाची सक्ती भयंकर आहे. उपेक्षेपेक्षाही भयंकर. कलावन्ताच्या मार्गातल्या काट्यांनी तो रक्तबंबाळ होत असेल, पण फुलांच्या पाकळ्या त्याला पांगळा करून टाकतात. यश आणि अपयश ह्या दोन्ही शब्दांना तसे पाहिले तर किती मर्यादित अर्थ आहे! बोलपूर स्टेशनात माझे स्वागत करणारे हे दोन विद्यार्थी प्रतिनिधी — प्रियव्रत आणि अनुराधा. मी लिहिलेली एक ओळही त्यांनी वाचली नव्हती. माझे नाटक पाहिले नव्हते. त्यांच्या जीवनात मी कसलाही तरंग उठवला नव्हता. मी त्यांना विचारले, "तुम्ही हा इतका सुंदर हार कशासाठी मला घातलात?"

"तुम्ही आमच्या विद्यापीठात आल्याचा आनंद व्यक्त करायला—"

"माझ्या येण्याने तुम्हाला आनंद कसा काय झाला?"

माझा हा प्रश्न त्या दोन्ही विद्यार्थ्यांनी हसून 'ऑप्शन्'मध्ये टाकून दिला. मग मीच त्यांना एक 'किंवा'चा प्रश्न टाकला.

"तुमच्यासारखाच एक विद्यार्थी म्हणून मी इथे आलो आहे. तुम्ही मला यापुढे तुमच्यातलाच एक म्हणून स्वीकाराल का? की प्रतिष्ठित पाहुणा म्हणून नमस्कारावर भागवाल?"

"छे छे — आपल्याला हवी ती मदत करू." अनुराधा म्हणाली.

ही पोरगी मोठी चुणचुणीत होती. प्रियव्रत मात्र भरपूर दाढी वगैरे राखणारा गंभीर तरुण होता. अनुराधा सामान्य बंगाली मुलीसारखी लाजरीबुजरी नव्हती. धीट होती. इंग्रजीही सफाईने बोलत होती.

"यापूर्वी आपण शांतिनिकेतनात आला होता?" अनुराधेने विचारले.

"हो."

"केव्हा?"

"जवळजवळ पंधरा वर्षांपूर्वी—"

पंधरा वर्षांपूर्वी त्या बोलपूर स्टेशनावर मी आणि माझी पत्नी अशाच एका संध्याकाळी उतरलो होतो. रवीन्द्रांच्या श्रीनिकेतन, शांतिनिकेतनसारखी एखादी संस्था महाराष्ट्रात उभी करावी असा एक वेडा विचार डोक्यात होता. मॅकेरेंको नावाच्या एका रशियन शिक्षणतज्ज्ञाने लिहिलेले 'रोड टू लाइफ' नावाचे सुंदर पुस्तक वाचले होते. एका उजाड माळावर गुन्हेगार पोरांची वसाहत उभी करून त्या ठिकाणी त्याने जीवनावर

अपरंपार प्रेम करणारा नवा समाज कसा निर्माण केला त्याची ती कहाणी होती. एखाद्या माळावर आपणही असे विश्व उभारावे असे वेड डोक्याने घेतले होते. मद्रास, बिहार, गुजरात अशा निरनिराळ्या प्रांतांतून आम्ही दोघेही हिंडत होतो. अशा ह्या भ्रमंतीत शांतिनिकेतनात आलो होतो. पण पावसामुळे फारसे कुठे हिंडता आले नव्हते आणि काही पाहताही आले नव्हते. किंबहुना तिथून आम्ही अतिशय निराश होऊन परतलो होतो. पुढे तशी संस्था उभारण्याचे आमचे स्वप्न भंगले. शिक्षणसंस्था ही ज्ञानाची केन्द्रे न राहता राजकीय सत्ता टिकवण्यासाठी लागणारे आणि मते गोळा करायला मदत करणारे 'राजकीय दलाल' पोसण्याची केन्द्रे होऊ लागल्याचे ज्ञान मात्र पंधरा वर्षांपूर्वीच मिळाले होते. फार मोठी निराशा पदरात घेऊन काही काळ काढावा लागला होता. बोलपूर स्टेशनातून आता शांतिनिकेतनाकडे जाणाऱ्या त्या सरळसोट रस्त्याने विश्वभारतीच्या मोटारीतून निघालो आणि क्षणभर ती मोटार; ते स्वागत सगळे विसरून गेलो आणि पंधरा वर्षांपूर्वीचे ते वेड आठवले. ती निराशा आठवली. नियतीने बदलायला लावलेल्या रुळांचीही मौज वाटत होती. पंधरा वर्षांत बोलपूरही खूप बदलले होते. पूर्वी इतक्या इमारती दिसल्या नव्हत्या. एका खेड्यात शिरल्यासारखे वाटत होते. वीजही नसावी. बोलपूरसारखा मीही बदललो असेन. मला एकच समाधान होते की गेल्या पंधरा वर्षांत सुखदु:खांचे अनेक कडू-गोड अनुभव घेऊनही त्यावेळी जसा मी इथे एक स्वप्न घेऊन आलो होतो तसाच आताही एक निराळे स्वप्न घेऊन आलो होतो. ते स्वप्न भंगल्याच्या पापाचा धनी मी नव्हतो. हे स्वप्न मात्र जिद्दीने सत्यात आणीनच अशी ईर्षा घेऊन येत होतो. कारण ह्या अपयशाचा धनी मात्र मी एकटाच ठरणार होतो. ठरवलेली गोष्ट मी करू शकेन की नाही याची मला परीक्षा घ्यायची होती. विद्यार्थीही मीच आणि परीक्षकही मीच. दुसऱ्या कुणीही हा धोंडा माझ्या डोक्यावर दिला नव्हता.

गाडी चालली होती. भुवनडांगा नावाच्या छोट्याशा खेड्याजवळ रस्त्याला फाटा फुटतो. एक रस्ता थेट शांतिनिकेतनाकडे जातो आणि दुसरा पूर्वपल्लीकडे. गाडी पूर्वपल्लीच्या दिशेने निघाली. शांतिनिकेतनातल्या ह्या निरनिराळ्या पेठांना गुरुदेवांनी काय सुन्दर नावे दिली आहेत. पूर्वपल्ली, गुरुपल्ली, सेवापल्ली, रतनपल्ली. पूर्वपल्ली जवळ आली. डाव्या बाजूच्या विस्तीर्ण क्रीडांगणापलीकडे शांतिनिकेतनातले उंच उंच वृक्ष दिसायला लागले. पंधरा वर्षांपूर्वी चौफेर माळ होते. आणि मधेच हे तपोवन होते. आता चारी बाजूला सुंदर छोटे छोटे बंगले आले. टुमदार बगीचे आले. रस्त्याकाठची झाडेही वाढायला लागली आहेत. अत्याधुनिक पद्धतीने बांधलेल्या सिमेंट कॉंक्रीटच्या भल्या मोठ्या इमारती आणि वसतिगृहे वृक्षराजीत दडलेल्या शांतिनिकेतनाकडे हॅंगरवरच्या सुटाने, आजोबांच्या, खुंटीवरच्या जुन्या धाबळीकडे पाहावे तशा ऐटीने पाहताहेत.

विश्वभारतीने पाहुण्यांसाठी बांधलेल्या 'इंटरनॅशनल गेस्टहाऊस' पुढे मोटार येऊन उभी राहिली. विश्वभारती, शांतिनिकेतन किंवा रवीन्द्रनाथ टागोर ह्यांपैकी कुठल्याही नावाने मनात उभ्या राहणाऱ्या चित्राशी ह्या गेस्ट हाऊसचे व्यक्तिमत्त्व जुळत नाही. सरकारात वेठ-बिगारी करणाऱ्या कुठल्या तरी पी.डब्ल्यू.डी.च्या एक्झिक्युटिव्ह इंजिनियराचा निःसत्त्व कलाहीन हात ह्या इमारतीवरून फिरल्याचे पहिल्या दर्शनातच ध्यानात येते. तशी इमारत लांब रुन्द आहे. ज्याला 'सोयी' म्हणतात त्याही ठीक आहेत. पण फर्लांग दीड फर्लांगाच्या अंतरावर असलेल्या तपोवनाशी आपला संबंध नाही असे सांगत ही इमारत आणि ती वसतिगृहे उभी आहेत. एक वाचनालयाची आणि दुसरी त्याहूनही भव्य अशी इमारत आहे. किंबहुना विश्वभारतीतली ही सर्वांत मोठी इमारत आहे. तिला 'अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ब्लॉक' म्हणतात—इथे कारकुनी कारवायांतून कागद-बाजी चालते आणि उत्साहाला लाल फितीने आवळले जाते. . विश्वभारतीचा कारभार आपल्यामुळेच चालला आहे असे मानणाऱ्यांचे हे कार्यक्षेत्र ! कवी, कलावन्त, साहित्यकार, शिल्पी, ज्ञानोपासक यांच्या नाकावर टिच्चून ही इमारत उभी आहे.

इंटरनॅशनल गेस्टहाऊसमधल्या वरच्या मजल्यावरच्या एका खोलीचा मी ताबा घेतला. खोलीच्या समोर मुंबईच्या चाळीसारखी सरळसोट गॅलरी. मागल्या बाजूला छानसा व्हरांडा ! पुढल्या गॅलरीतून समोरचे विस्तीर्ण क्रीडांगण आणि क्रीडांगणापलीकडली भुवनडांग्यातली वृक्षराजी दिसत होती. मागल्या बाजूलाही मैदान. मैदानाच्या धारेला उंच उंच वृक्ष आणि टुमदार घरे दिसत होती. क्षितिजरेषेवरही वृक्षांच्या ओळी. दूरवर वनरायांत दडलेल्या सावताळांच्या वस्त्या. त्या सावळ्या रुखावळीतून वस्त्यांची साक्ष पटवणारा धूर. महाराष्ट्राच्या क्षितिजपटावर बहुधा डोंगराचा कशीदा असतो. इथे कुठल्याच दिशेला डोंगर नव्हता. पण जमिनीला धूप लागून झालेल्या दऱ्या मात्र होत्या. त्यांना 'खोवाय्' म्हणतात. मोकळ्या मैदानामुळे सतत भिन्नाट वारे ! मधूनच खुरटलेली बोरवने. माळांच्या बाजूला ताडाची झाडे, शिंदीची झाडे हारीने उभी. शिवाय आम्रवृक्ष, शालवृक्ष, पलाश, कांचन, गुलमोहर, आवळा, अमलताश, मधूनच एखादा पिंपळ, असे वनराज्यातले मातबर वृक्ष. शिवाय इतर अनेक छोटेछोटे मानकरी. वेलीबिलीसारख्या सख्या दासी वगैरे.

चतुर्थीच्या आदल्या दिवशी बाजारातून आणलेला गणपती कुठे तरी तात्पुरता बसवून सार्वजनिक गणेशोत्सवाच्या संयुक्त कार्यवाहांनी आपापल्या घरी निघून जावे तसे अनुराधा आणि प्रियव्रत त्या खोलीत मला सोडून निघून गेले. सलील स्टेशनवरून परस्पर आपल्या घरी गेला होता. मी त्या खोलीत आता अखंड एकटा उरलो होतो.

आयुष्यात बंगाली शिकणे हा प्रसंग जसा नवा होता तसाच स्वतःची खोली लावणे हाही नवाच. खोली लावणे, लिहिण्याचे टेबल लावणे वगैरे बाबतीतले माझे औदासिन्य फार वरच्या दर्जाच्या आध्यात्मिक पातळीवरचे आहे. माझ्या टेबलांवर चहाचा कप, शेंगदाण्याची वाटी, सिगरेटची पाकिटे, दासबोध, ॲश ट्रे, दौत, पेन, डिक्शनऱ्या, पोस्टातून आलेली व जायची पत्रे, लिहिण्याचे कोरे कागद, मासिके, घड्याळ, अगदी गुण्या-गोविन्दाने एकत्र नांदत असतात. लिहायला बसताना टेबलावर कोऱ्या कागदासाठी मोकळी जागा तयार करणे हा माझा नित्याचा कार्यक्रम. निसर्गाला पोकळी मानवत नाही म्हणतात. माझ्या टेबलांनाही मोकळे राहणे मानवत नाही. मुम्बईत रिकाम्या प्लॉटवर जशी हांहां म्हणता झोपडपट्टी तयार होते तशा माझ्या टेबलावर नाना प्रकारच्या विसंवादी वस्तू वस्तीला येतात. कुठलीही वस्तू मला शोधल्याशिवाय सापडत नाही. माझ्या दिवसाची सुरुवात चष्मा शोधण्यापासून सुरू होते. तरी बरे अजून तोंडात कवळी बसली नाही. नाहीतर डोळ्याबरोबर दात शोधत उठावे लागेल. माझ्या गैर-हजेरीत माझी खोली लावली जाते. त्यामुळे पुढले तीन महिने हे खोली लावणे वगैरे काम मला करावे लागणार, साबण कधी संपतो, याचा अंदाज घेऊन नवी वडी आणावी लागणार. धोब्याच्या कपड्यांचा हिशेब मांडावा लागणार... थोडक्यात म्हणजे स्वावलंबन नावाच्या रोगाची लस टोचून घ्यावी लागणार आणि व्यवस्थितपणा नावाच्या कंटाळवाण्या गोष्टीची सवय जडवावी लागणार ह्या विचाराने क्षणभर बेचैन झालो.

त्या खोलीत लिहिण्याचे टेबल होते. दोन कॉटस् होत्या. एका कॉटला खेटून ड्रेसिंग टेबल होते. आरसाही होता. त्याच्यापुढे उभे राहिले की फक्त धड दिसत असे. शिर चौकटीवर जायचे. समोर बसण्याइतकी जागा नव्हती. कारण तिथेच ब्यागा वगैरे ठेवायची घडवंची होती. खोलीला जोडून स्नानगृह. दुर्दैवाने तिथे पाश्चात्य पद्धतीचा शौचकूप ! असल्या खुर्चीछाप शौचकुपाचा मला भयंकर तिटकारा आहे. परंतु गेस्टहाऊस इंटरनॅशनल पडल्यामुळे देशी कोठ्यांपेक्षा विदेशी कोठे साफ राहण्याची अधिक काळजी घेणे प्राप्त असावे. मी त्या अवघड अडचणीमुळे चिन्तेत पडलो, तेवढ्यात खोलीचे दार वाजले. दार उघडून पाहातो तो स्वतः शांतिदेव घोष दारात उभे. त्यांच्याबरोबर अतिशय गोड चेहऱ्याचा सडपातळ बांध्याचा बारा तेरा वर्षांचा एक गोड मुलगा होता. मला डेव्हिड् कॉपरफील्ड सिनेमातल्या फ्रेडी बार्थलोम्यूची आठवण झाली. त्या मुलाने माझ्या पायाला हात लावून मला बंगाली प्रणाम केला.

"हा माझा पुतण्या कुकुल." शांतिदेव म्हणाले. कुकुल हे त्या मुलाचे डाकनाम. त्याचे पाळण्यातले नाव 'शमिक' हे मला नंतर कळले.

"हा कवी आहे बर का —" सलील म्हणाला.

शांतिदेव घोषांची आणि माझी दिल्लीत् असताना ओळख झाली होती. रवीन्द्र जन्मशताब्दी महोत्सवाच्या वेळी रवीन्द्र-संगीताचे कार्यक्रम बसवायला ते काही काळ आकाशवाणीत आले होते. रवीन्द्र-संगीताचे धडे खुद्द गुरुदेवांकडून घेण्याचे भाग्य त्यांना लाभले आहे. स्वतः ते रवीन्द्र-संगीत गातात एवढेच नव्हे तर रवीन्द्र-संगीताचे भाष्यकार म्हणूनही बंगालात त्यांना मान आहे. नृत्य-नाटिकांच्या अभ्यासासाठी गुरुदेवांनी त्यांना जावा, बाली वगैरे देशात पाठवले होते केरळात राहून त्यांनी कथाकलीचाही अभ्यास केला होता. घोष घराण्याचा आणि गुरुदेवांचा जुना ऋणानुबंध. त्यांचे वडील स्वर्गीय कालिमोहन घोष हे गुरुदेवांच्या श्रीनिकेतनातल्या कृषी आणि ग्रामसुधारणा कार्यातले उजवे हात. उत्तम शेतीने पृथिवी सस्यशामला झाल्याखेरीज देश क्षोभरहित होणार नाही - देश टेबलावरच्या ठरावांनी सुधारत नाही — भारताच्या रक्तपेशी त्याच्या खेड्यात आहेत — ही तत्त्वे गुरुदेवांनी महात्मा गांधींच्या उदयाच्या कितीतरी वर्षे आधी सांगितली होती. खुद्द रवीन्द्रांचे तारुण्य शेतकऱ्यांच्या बरोबरीने गेले होते. त्यांचे निसर्गप्रेम पुस्तकांतून आले नव्हते. जमीनदारीच्या खेड्यात वडलांच्या आज्ञेनुसार तिथला कारभार पाहण्यासाठी त्यांना राहावे लागले होते. देहधारणेला कृषी आणि मनोविकासाला कला ह्या जोडीने वाढल्या पाहिजेत हा त्यांच्या विचाराचा मुख्य आधार होता. कालिमोहनांनी गुरुदेवांचे कृषी-सुधारणा कार्य उचलले आणि शांतिदेव घोषांनी कलेच्या उपासनेत आयुष्य सत्कारणी लावले. शांतिनिकेतनाच्या स्थापनेच्या काळापासून जी काही कुटुंबे निष्ठेने गुरुदेवांबरोबर राहिली त्यांतले हे घोष कुटुंब. शांतीबाबूंच्या वयाची साठी नुकतीच उलटली. अजूनही ते संगीत भवनात अध्यापन करतात. रवीन्द्रांची शेकडो गीते त्याना सुरांच्या बारीक सारीक खाचाखोचांसकट मुखोद्गत आहेत. रवीन्द्रांचे प्रत्येक गीत हे ठरलेल्या चालीशी निबद्ध आहे. त्यात स्वरांच्या व्यक्तिगत विलासाला मुभा नाही. सामवेदी ब्राह्मणांना जशी स्वतःची चाल लावायला मुभा नाही तशीच रवीन्द्रांच्या गीतांना इतरांना चाली लावण्याची किंवा हरकती मुरक्या घालून वाढवायची मुभा नाही. शांतिदेव हे पथ्य अत्यंत कटाक्षाने पाळतात. मात्र अभिजात संगीताबाबत त्यांची भूमिका आजही एखाद्या विद्यार्थ्यासारखी आहे.

अस्सल भारतीय वर्णाचे शांति-दा, रुंद हाडापेराचे, चांगले उंच आहेत. कोल्हापुरी फेटा बांधला किंवा तिरकी फर कॅप् वगैरे घातली तर सरदार निंबाळकर किंवा घोरपडे सरकार म्हणून कोल्हापुरात सहज खपून जातील. आपल्या पुतण्याला त्यांनी कविता म्हणायला सांगितले. मग कुकुलने एक स्वरचित् 'भादू' गान म्हटले. 'भादू' हा भादव्यात येणारा, आपल्या वासुदेवासारखा लोकगीते गाणारा भटक्या असतो. चित्रविचित्र पोषाख

करून रात्रीच्या वेळी ही गाणी गात दारोदारी नाचून भिक्षा गोळा करतो. कुकुलने विज्ञानयुगातले भादूगान रचले होते. त्याने टाळी वाजवून ताल धरला आणि माझ्या खोलीत भादूगान सुरू केले. जादूगाराचे रोपटे जसे क्षणात रंगीबेरंगी फुलांनी डवरून येते तसा हा लाजराबुजरा वाटणारा पोरगा शब्द-तालसुरांनी फुलून आला. जुन्या काळच्या शकुन सांगत हिंडणाऱ्या 'भादू'ना विज्ञानयुगातल्या ह्या नव्या भादू बालकवीने आव्हान दिले होते.

"अरे.. अरे. भादू.
तुझ्या त्या चंद्रावर माणूस जाऊन पोहचला -
आहेस कुठे तू ?
बघ माझ्या खोलीत टेलिव्हिजन आला -
दुनियेची वार्ता सचित्र हालतीबोलती होऊन माझ्या खोलीत आली -
अरे भादू आहेस कुठे तू ?
पाहा पाहा नव्या दुनियेकडे पाहा -"

अशा अर्थाचे ते गीत. कुकुलचा तो मुक्त आवेश. विज्ञानावरचा ह्या बालकवीचा शब्दा-शब्दांतून उफाळणारा विश्वास, आणि नाचात रंगलेली त्याची ती देखणी बालमूर्ती पाहिली आणि मनात म्हटले, 'आता मी खऱ्या अर्थाने गुरुदेवांच्या सृष्टीत शिरलो.' प्राचीनकाळी तपोवनातल्या शुक सारिका म्हणे सामवेदातल्या ऋचा गात. शांतिनिकेतनातला एक बारा वर्षांचा कुमार नव्या युगाची ऋचा गात होता.

खिडकीबाहेर पाहिले. वृक्षांचे किरीट मावळत्या सूर्यकिरणांनी उजळले होते. संध्याकाळचे फार तर साडेपाच वाजले असतील. पूर्व देशींच्या सूर्याला उगवायचीही घाई आणि मावळायचीही घाई. पौष मासातल्या संध्यासमयी आकाशातला रवी मावळत होता. पण खाली रवीन्द्रांच्या राज्यात मात्र एका बालकवीची स्वरकिरणे खोली उजळून टाकीत होती. महाप्रभू चैतन्य, चंडिदास ह्यांच्या राधाकृष्ण प्रेमाच्या युगातून वंगदेश रवीन्द्रांनी पूर्वपश्चिम संस्कृतीच्या संगमाच्या युगात आणला होता. आता विज्ञानाने मानवाला अष्ट दिशांच्या पलीकडली नवी ओढ लावली — त्या विक्रमाची जयगीते गाणारा एक बालकवी पहिल्याच दिवशी मला शांतिनिकेतनाच्या उंबरठ्यावरच भेटावा हा योगही अपूर्व होता. "आज रात्रीचे भोजन आमच्या घरी. तासाभरात तुम्हाला न्यायला येतो." असे सांगून शांती-दा, सलील वगैरेंनी माझा निरोप घेतला. बाहेर दिवे लुकलुकायला लागले होते. रस्त्यातून सावताळ स्त्रियांची टोळी झुळझुळत्या सुरांत मला अगम्य असलेल्या भाषेतले गीत गात निघाली होती. सावताळांना गाणे, फुले आणि मद्य

ह्याखेरीज जगताच येणार नाही. रस्त्यातून दोघीदोघींची रांग धरून ह्या वनकन्या सदैव गात गातच जातात. त्या तालात शरीराला हलकासा झोका देतात. त्यांच्या गीताला सावताळ तरुण बासरीची साथ देतात. चमत्कारिक पण जादूने भारून गेल्यासारख्या त्या सुरावटी. पूर्वायुष्याचे सारे बंध सुटल्यासारखा निर्मम होऊन मी हे सारे पाहात आणि ऐकत होतो. स्टेशनावर मिळालेल्या हारातल्या फुलांच्या सुगंधाने खोली भरली होती. लोकविलक्षणच अनुभूती होती. आयुष्यात आजवर तरी मी कुठल्याही साधुसंन्याशाच्या किंवा आध्यात्मिक बुवाच्या मागून गेलो नाही. कुठल्याही साधुबाबाची तसबीर माझ्या घरात नाही की कुणी मला कधी चिमूटभर उदी काढून दिली नाही आणि अंगठीही दिली नाही. मी कधी गुरुमंत्राच्या शोधात गेलो नाही. नाक दाबून ध्यानधारणा केली नाही. कुठल्याही पंथाची दीक्षा घेतली नाही. पण त्या दिवशी संध्याकाळी मात्र पौषातल्या त्या शीतल वाऱ्याने, सावताळ पोरींच्या गायनाने, त्या सावताळ तरुणाच्या बासरीने आणि हळूहळू अंधारात अंतर्धान पावणाऱ्या त्या वातावरणाने मला एका अनिर्वचनीय आनंदाची दीक्षा दिल्यासारखे केले हे निश्चित. ह्या क्षणी देखील त्या घटकेच्या स्मरणाने 'हृष्यामि च पुनः पुनः' अशी माझी अवस्था होते आहे. पुढले तीन महिने मी ज्या आनंदात काढले तो कदाचित त्या क्षणी माझ्या मर्मबंधात साठून राहिलेल्या त्या आनंदाच्या अर्काचाच परिणाम असेल. भान हरपल्यासारखा, त्या खोलीत एका कॉटवर हळूहळू उतरत येणारा अंधार अंगाभोवती लपेटून किती तरी वेळ पडलो होतो. काही वेळाने सलीलची हाक ऐकू आली —

"देशपांडेजी -"

मी स्नानबिन करून तयार झालो आणि सलील आणि लेबू-दाच्या बरोबर शांतिनिकेतनच्या दिशेने निघालो. चांगलीच थंडी होती. संध्याकाळचे पुरते सातही वाजले नव्हते. अंधार गुडुप होता. रस्त्यातले दिवे विजेचे असूनही मिणमिणत होते. इथल्या विजेला लो ब्लडप्रेशरसारखा विकार आहे. विजेच्या दाबात सारखा चढउतार चालू असतो. फर्लांगभर चालल्यावर शांतिनिकेतनचे आवार लागले. इथल्या लोकांच्या तोंडी शांतिनिकेतनऐवजी 'आश्रम' असाच शब्द आहे. आश्रमीय वृक्ष अजूनही पाने बाळगून होते. पानगळ सुरू झाली नव्हती. आम्रकुंजाच्या अलीकडे दोन्ही बाजूला झोपड्यांसारखी टुमदार घरे दिसत होते. झाडांच्या आश्रयाला येणाऱ्या ग्रामीण पांथस्थांनी थंडीत डोक्यावरून घोंगडी ओढून बसावे तशी ही गवताची, घोड्याचा नाल उभा केल्यासारख्या आकाराची गवती छपरे. मातीने स्वच्छ सारवलेली कुटिरे. छोटे छोटे झरोके बहुतेक बंदच होते. हवेत गारठाही फार होता. आम्रकुंजापुढे सुंदर पटांगण. त्याला गौर प्रांगण म्हणतात.

तिथेच एक छोट्या चर्चसारखी इमारत. हे सिंहसदन. त्याच्यावर एक मोठे घड्याळ. खाली चर्चसारखीच मोठी घंटा. बाजूला सिमेंट कॉंक्रीटच्या छत्र्या आणि समोर अर्धचंद्राकार चबुतरे. तेवढ्यात चर्चच्या घंटेसारखेच तासाचे टोले झाले. छात्रछात्रींचे घोळके आश्रमातल्या वसतिस्थानाकडे परत चालले होते. वाचनालयाची टुमदार इमारत ओलांडून पुढे आलो. आणि उजव्या बाजूंच्या वसतिगृहातून पाण्याच्या धारेसारखी निर्मळ अशी एक सुंदर लकेर ऐकू आली.


"क्या बात है—" नकळत दाद गेली.

"हे विद्यार्थिनींचे वसतिगृह." सलील म्हणाला.

आश्रमातल्या रहदारीच्या मुख्य रस्त्याला लागूनच हे विद्यार्थिनींचे वसतिगृह आहे. डाव्या बाजूला आणखी एक विस्तीर्ण क्रीडांगण. इतक्या मोकळ्यावर विद्यार्थिनींचे वसतिगृह ? मला रवीन्द्रनाथांच्या धैर्याचे कौतुक वाटले. विद्यार्थिनींचे वसतिगृह म्हणजे चारी बाजूला उंच दगडी भिंती हव्या. दारात दंडा घेतलेला पहारेदार हवा. थोडक्यात म्हणजे तुरुंग आणि वेड्यांचे इस्पितळ ह्यांच्या जोडीला शोभणारे स्थापत्य हवे. मुलींचे वसतिगृह म्हणजे शीलबंद पेट्या हव्यात ! आणि इथे तरुण छात्रछात्रींचे घोळके गप्पा मारीत उभे होते. त्यांचे राहाणे निराळे असले तरी भोजन एकत्र. एकाच भोजनगृहात. वसतिगृहापुढे दगडी भिंतीऐवजी सुंदर वृक्ष आणि अंगणात रामकिंकर वैज ह्या महान् शिल्पकाराच्या हातचे सुंदर दगडी शिल्प ! काय हे ? अब्रह्मण्यम् ! पुण्यातल्या एका कॉलेजच्या विद्यार्थिनींच्या वसतिगृहाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या तोंडाशी 'पुरुषांना येथून जाण्याची सक्त मनाई आहे' ह्या वाक्याचे भाषान्तर 'ह्यूमन बीइंग्ज् नॉट अलाउड' असे करून पाटी टांगली होती म्हणतात ! एका ख्यातनाम गायिकेचे तिथल्या विद्यार्थिनींनी गाणे ठरविले. तर तबलजी बाप्या होता म्हणून प्रिन्सिपॉलसाहेब त्याला आत सोडीनात. तबलजी असला म्हणून काय झालं ? पोरी बेताल झाल्या तर काय करायचं ? आणि इथे मुक्तस्वरात कोणी विद्यार्थिनी कोकिळेसारखी गात होती. आणि कोकिळेचे गाणे जसे मुद्दाम थांबून कोणी ऐकत नाही, सहज कानी पडलेले सूर घेऊन पुढे जातो, तसे रस्त्याने येणारे जाणारे आपल्या वाटेने जात येत होते. संपूर्ण निर्भय अंतःकरण असले तरच गळ्यातून गाणे फुटते. भयभीत माणूस दुसऱ्याचा खून करू शकेल पण मोकळेपणाने गाऊ शकणार नाही. त्या अज्ञात तरुणीच्या सुरांनी नकळत एक संदेश दिला. ह्या आश्रमात मुली निर्भयपणाने वावरू शकतात.

शिल्पसदन ओलांडून संगीतभवनाच्या परिसरात गेल्यावर नाना वाद्यातले आणि

कंठातले सूर ऐकू येऊ लागले. कुणी तंबोऱ्यावर गळा साफ करीत होते तर कुणी सतारीवर बोटे साफ करीत होते. कुठे रवीन्द्रांच्या गीतांची आवृत्ती चालली होती. चारी बाजूला उंच उंच वृक्ष होते. त्यांतून जाणाऱ्या नागमोडी वाटा. थंडीमुळे दारे खिडक्या बंद. भोवती अंधार. क्वचित् एखाद्या खिडकीतून अंधाराला गेलेला प्रकाशाचा तडा. आणि तपोवनात अंतराळातून आल्यासारखे ते सूर. एका रागाचा दुसऱ्या रागाशी संबंध नव्हता. वाद्ये वेगवेगळी. त्यातच कथाकलीच्या साथीला असणाऱ्या त्या चारी दिशा दुमदुमून टाकणाऱ्या 'चंडा'सारख्या तालवाद्यावर टिपऱ्या कडाडत होत्या. नूपुरांचे झंकार ऐकू येत होते. त्या सुरेल वातावरणाशी नकळत माझ्या मनाची तार जुळली आणि आत तंबोरे सुरू झाले. तिथून पुढला रोजचा दिवस नवे सूर आणि नवी गीते घेऊन आला. शांतिनिकेतनातले तीन महिने ही माझ्या आयुष्यातली एक रात्रंदिवस चाललेली सुरेल मैफिल झाली.





कोकणी हिशेबाने ज्याला सुखवस्तू म्हणावे .अशा गृहस्थाच्या घरासारखी शांती-दांची वाडी आहे. दारात ओसरी बाजूला लांबलचक पडवी. बुटके उतरते छत. उजव्या डाव्या बाजूला छोट्या छोट्या खोल्या. मधली बैठकीची खोली. खिशाला झेपत जाईल तशा वाढवलेल्या इकडल्या तिकडल्या खोल्या.

बैठकीच्या खोलीतच एक मोठासा पलंग. फडताळात जुन्या शिल्पांचे काही नमुने. भिंतीवर गुरुदेवांची तसबीर आणि त्यांच्याच हातची दोन सुंदर चित्रे. काचेच्या कपाटात खेळात मिळालेले बक्षिसांचे रौप्यचषक, मानपत्रे, एकदोन करंडक आणि कोपऱ्यात एका अतिशय देखण्या तरुणाची सुंदर तसबीर. ही शांती-दांच्या धाकट्या भावाची-शुभमयची तसबीर. कुकुलच्या वडलांची. त्यांना भुलू म्हणत. साहित्य, संगीत, नृत्य अशा अनेक क्षेत्रांत मान्यता पावलेला भुलू-दा, रशियन भाषा कोविद. जाईल तिथे आनंद वाटीत जाणारा. हसणारा आणि हसवणारा. किंबहुना 'ए जोक इज ए शॉर्टेस्ट डिस्टन्स बिट्विन टू ऑपोझिट पॉइंट ऑफ व्ह्यू' हे त्याचे जीवनसूत्र होते. तान्ह्या कुकुलला घेऊन शुभमय, त्याची पत्नी सुप्रिया हे चिमुकले सुखी कुटुंब सुटीसाठी भारतात आले आणि अवघ्या चार दिवसांचा

कंसलासा जीवघेणा आंजार होऊन भुलू-दा निधन पावले. त्या देखण्या पोर्ट्रेटवरून माझी नजर हालत नव्हती. शांतिदेव घोषांच्या त्या साहित्य-संगीत-नृत्य-चित्रकला प्रेमी कुटुंबात भुलू-दाचे अकाली निधन ही एक सर्वांच्या अंतःकरणात दडलेली सूक्ष्म वेदना आहे. एखाद्या गाण्याची ओळ कानी पडते, एखादा उत्सव आठवतो, त्यात झालेले नाटक आठवते आणि भुलू-दाच्या गायनाची, अभिनयाची, एखाद्या खट्याळ विनोदाची आठवण होते आणि हे कुटुंब अश्रू लपवायला लागते.

आम्ही घरात शिरल्याची छोट्या डॉइशहुंड कुत्र्याने वर्दी दिली होती. घराच्या उजव्या बाजूला एक छोटेसे आऊट-हाऊस आहे. त्या झोपडीत शांतिदेवांचे लेखन वाचन चालते. एका लाकडी तक्तपोसावर डेस्क मांडून देशी थाटाची लेखन वाचनाची बैठक. चारी बाजूला जागा सापडेल तिथे संगीत, नृत्य, शिल्प विषयावरच्या पुस्तकांचे ढीग रचलेले. झोपडीतल्या त्या अभ्यासिकेत शांतपणाने तासन् तास संगीतविषयक व्यासंग चालत असतो. शांतिदेव तसे अबोल आहेत. शिवाय तोंडात तंबाखूचे पान जमलेले असते.

आम्ही आल्याची वर्दी ऐकल्यावर अभ्यासिकेतून बाहेर आले. आंबा, शेवगा, पेरू, चाफा अशा गृहस्थाश्रमी झाडांनी सावली धरलेल्या घरात त्यांनी 'आशून आशून देशपांडेजी' म्हणून स्वागत केले. त्या छोट्याशा दिवाणखान्यात सारे कुटुंब जमले होते. सगळीच कलावंत मंडळी. स्वतः शांती-दा गायक, त्यांची पत्नी बौ-दी हॅण्डीक्रॅफ्टस्‌मध्ये तज्ज्ञ, बंगालातले ख्यातनाम नट कै. शिशिर भादुडी त्यांचे मामा, म्हणजे तीही आवड, बहीण सुजाता उर्फ बुडी-दी बाटिक कलेत प्रवीण आणि एके काळी गुरुदेवांच्या नृत्य नाटिकांतली प्रमुख कलाकार, तिचे यजमान सुखमय मित्र कलाभवनात चित्रकलेचे अध्यापक, त्यांची नवविवाहित कन्या आँखी साहित्यप्रेमी, कुकुल बालकवी, त्याची आई सुप्रिया-दी उत्तम शिक्षिका आणि रशियन भाषा तज्ज्ञ, मंटू नट आणि स्पोर्टसमन् आणि दारामागे बसून त्या कौटुंबिक मेळाव्यात भाग घेणारी आणि गुरुदेवांच्या काळात त्यांच्या नेतृत्वाखाली विकसणाऱ्या साऱ्या कलांचा आस्वाद घेत घेत फुललेल्या परिपक्व व्यक्तिमत्त्वाची साक्ष पटवणारे एखादेच मार्मिक वाक्य दाराआडून हळूच बोलणारी शांती-दा, सलील यांची ऐंशीच्या घरातली वृद्ध माता. सुविद्य, कलाप्रिय, साहित्यप्रेमी असा तो कौटुंबिक मेळावा. आज ह्या कुटुम्बाची तिसरी पिढी शांतिनिकेतनात वाढते आहे. मी मराठी पाहुणा. तसा अपरिचित. पण एका क्षणात ह्या कुटुम्बाने मला आपणासारिखे केले. संगीत हा सगळ्यांच्या प्रेमाचा विषय होता. साहजिकच गाण्यांच्या आणि गाणाऱ्यांसंबंधीच्या गप्पा सुरू झाल्या. शान्तिनिकेतनातल्या माझ्या इनिंग्ज गाण्यापासून सुरू झाल्यामुळे पुढले तीन महिने माझा ताबा संगीत भवनातल्या छात्रछात्रींनीच घेतला होता. पहिल्या दिवशी जणू काय जन्मजन्मांतरीचे ऋणानुबंध असावे

इतक्या सहजतेने मी घोष कुटुम्बात सामावलो गेलो, तो केवळ ह्या सुरांच्या भावबंधनामुळे. वास्तविक संगीताशी माझा 'गाणारा' म्हणून संबंध सुटल्याला अनेक वर्षे झाली. 'माझे गाणे' हा विषय आता भारत इतिहास संशोधक मंडळालाच द्यायला हवा. पण त्या शांतिनिकेतनाच्या वातावरणाने काय चमत्कार केला देव जाणे. राजापूरची गंगा एकदम उपटावी तसे अनेक वर्षे गडप झालेले गाणे माझ्या गळ्यात जागे झाले. गप्पा आणि गाणी रंगात आली होती. तेवढ्यात बौ-दी म्हणाल्या, 'तुम्ही बंगाली भाषा शिकायला आला आहात ना ? यापुढे आम्ही तुमच्याशी इंग्लिश न बोलता बंगालीतच बोलणार.' सगळ्या स्त्रीवर्गाने होकार भरला. मनात म्हटले इतक्या वंग रमणी माझ्याशी बंगाली बोलायला लागल्यावर आठ दिवसांत सारा बंगाली शब्दकोश हां हां म्हणता कानावरून जाईल.

बाकी बंगाली ही स्त्रियांनीच बोलायची भाषा आहे. ओठांचे चंबू करून नाना तऱ्हेच्या मोहक हेलकाव्यांनी, ह्या वंग स्त्रिया बोलायला लागल्या की शब्दांचा फुलसडा पडल्यासारखे वाटते. बंगालात देवापेक्षा देवीचे माहात्म्य मोठे. काली, सरस्वती ह्यांचे उत्सव. शंकर, राम, मारुती वगैरे देवबाप्पांना एवढे महत्त्व नाही. बंगाली वाङ्मयदेखील नायिकाप्रधान. शरदबाबूंच्या कादंबऱ्यांतल्या नायिकांची सर नायकांना नाही. गुरुदेवांच्या नाटकांतसुद्धा मालिनी, श्यामा, नंदिनी, चंडालिका... सगळ्या नायिकांच्या कहाण्या. नायक नुसते ग्रंथाच्या बाहेरच्या वेष्टणासारखे. स्त्री जन्माच्या करुण कहाण्यांची बंगाली वाचकांना अधिक ओढ. बंगाली घरात पुरुष हा लाडावलेल्या पाळीव प्राण्यासारखा. पोपटाचे किंवा कुत्र्यांचे करावेत तसे ह्या बंगाली बायका आपल्या नवऱ्यांचे लाड करीत असतात. त्याला दिवसभर खा खा खाऊ घालतात. त्याला दर दहा मिनिटांनी पानांचा विडा करून देतील, जेवताना पंख्याने वारा घालतील, नाना तऱ्हेने त्याची सेवा करून त्याला ऐदी करून ठेवतील. बंगाली घरातले लहान मुलगे तर अति लाडावलेले. चांगल्या तेरा तेरा, चौदा चौदा वर्षांच्या टोणग्यांना आया मुलीसारख्या नटवीत असतात. त्याची शाळेची पुस्तके आईने किंवा बहिणीने गोळा करायची. पण वरपांगी पुरुषांच्या गुलामीत असल्यासारखे दाखवणाऱ्या ह्या बायकांची घरात तशी फार मोठी सत्ता असते. एकेकाळी बंगाली सौभाग्यवती आपला उल्लेख 'अमुक-अमुक-दासी' असा करायची. नवऱ्याला अजूनही 'स्वामी' म्हणतात. (बंगालीत ह्याचा 'शामी' होतो !) बंगालातच कशाला ? एकूण भारतीय कुटुम्बातच गृहिणी अशी पायाची दासी होऊन येते आणि काही काळानंतर स्वामीला ह्या दासीचे पाय धरल्याखेरीज स्वतःचे पाऊल सरकवणे मुष्किल होऊन जाते. पण सेवेने, श्रद्धेने आणि प्रेमाने नवऱ्याला बंदिवान करण्यात मधुरभाषी वंग ललनांचा क्रमांक पहिला लागावा. 'फीड द ब्रूट' हे सुखी संसाराचे मुख्य

सूत्र ह्या बायकांनी घट्ट पकडले आहे. लहानपणापासून आयाबहिणींच्या अति लाडात वाढणारा बंगाली पुरुष म्हणूनच अधिक भावनाप्रधान होत असावा. अतिशयोक्ती हे बंगाली भाषेचे फार मोठे वैशिष्ट्य, ह्या आत्यंतिक भावनाप्रधानतेतूनच आले असावे. अतिशयोक्ती हे स्त्रीस्वभावातले फार महत्त्वाचे अंग आहे. दागिन्यांसारखा विशेषणांचा सोस बंगालीइतक्या प्रमाणात इतर भारतीय भाषांना नसावा. राग आणि लोभ दोन्हीही 'तर' भावापेक्षा 'तम' भावानेच करायची दांडगी हौस. मराठीला सदैव सुडक्याप्रमाणे वावरायची खोड आहे. मराठीत जे 'बरे' ह्या पलीकडे कुठल्याही विशेषणाने भूषविले जाणार नाही ते बंगालीत दारूण शुंदर ! शांघातिक ! अपूर्बो ! ओद्‌भूत ! चोमोत्कार ! असली लेणी लेऊन उमटते. आणि हे सारे जेव्हा ओठांचे चंबू करून, भुवया उडवून, थुलथुलीत देह जमेल तितका घुसळून, पंख्याने जोराजोरात वारा घेतल्यासारखा हाताचा पंजा तोंडापुढून हालवीत म्हटले जाते तेव्हा एखाद्या भाबड्या मनाच्या गांडुळाला आपण 'वासुकी' आहोत असे वाटावे. बऱ्याचशा अतिसामान्य बंगाली कलावंतांचा आपण रवीन्द्रनाथांचे प्रपितामह आहोत असा गैरसमज होण्याचे मुख्य कारण त्यांच्यावर केली जाणारी ही विशेषणांची उधळपट्टीच असावी. अर्थात गौरवाप्रमाणे धिक्कारही आत्यंतिक. कसल्या तरी आवेशाखेरीज बंगाल्यांना बोलताच येत नाही. गोयकारांचेही असेच. हा पोर्तुगीज-फ्रेंच राजवटींचा संस्कार असावा. तेही तसेच. मराठी लोक ह्या बाबतीत इंग्रजांच्या जातीवर गेले आहेत. आम्ही कौतुकाच्या बाबतीत मुलखाचे कंजूष ! 'चांगले' म्हणायला आम्ही 'वाईट नाही' म्हणतो. अगदी थेट साहेबांच्या 'नॉट बॅड'चे वळण ! पण बंगाली माणूस आनंदानेही पेटतो आणि संतापानेही पेटतो. त्याला मध्यममार्ग मंजूर नाही. एक गोष्ट मात्र निर्विवाद आहे. कशाने तरी पेटून निघाल्याखेरीज मोठी वेडे घेऊन जगायची ताकद येत नसते. रवीन्द्रांचे शांतिनिकेतन हे असेच एक उदात्त वेड होते. न्यायमूर्ती रानड्यांपूर्वी महाराष्ट्र हा थंड गोळा होऊन पडला होता असे टिळकांनी म्हटले आहे. रवीन्द्रांच्या आधी बंगालही मैंदच होता. राजा राम मोहनराय, ईश्वरचंद्र विद्यासागर, हे त्या मैंदाला उठवीत होते. पण टागोरांचा झपाटा भला मोठा ! मैंद समाज कुत्सितपणाच्या वेळी मात्र खूप कार्यक्षम होतो. टागोरांना ह्या गतानुगतिक समाजाच्या खूप शिव्या खाव्या लागल्या. फार मोठ्या काटेरी मार्गातून त्यांना जीवनयात्रा करावी लागली. भावनाप्रधान बंगालात रवीन्द्रनाथांना विश्वकवी मानणारे लोक होते, तसेच त्यांना धड शुद्ध बंगाली लिहिता येत नाही असे मानणारे सनातनी पंडितही होते. 'खालील अशुद्ध बंगालीतला उतारा शुद्ध बंगालीत लिहा', असे म्हणून परीक्षेत टागोरांचा उतारा घालून त्यांचा पाणउतारा करण्याचाही प्रकार झाला होता. टागोरांना कविता लिहिता येत नाही आणि टागोरांनाच येते, टागोरांना संगीत कळत नाही आणि टागोरांनाच कळते, टागोरांची

नाटके ही नाटकेच नव्हेत आणि तीच खरी नाटके — अशी आत्यंतिक टोके धरूनच टागोरांचे मित्र आणि शत्रू बंगालात कडाडून भांडत होते. शरदबाबू हे टागोरांपेक्षा फार मोठे कादंबरीकार आहेत असे मानणारा एक समीक्षकांचा पक्ष आहे. शरदबाबू आणि टागोर यांचे साहित्यविषयक काही मतभेदही होते. एक येरू शरदबाबूंना खूष करण्यासाठी म्हणाले, "टागोरांच्या कादंबऱ्यांत आपल्याला तर बुवा काहीच मोठेपण दिसत नाही. त्या मानाने तुमच्या कादंबऱ्या फार श्रेष्ठ." ह्याच्यावर शरदबाबूंनी फार सुरेख उत्तर दिले. ते म्हणाले,

"मी तुमच्यासाठी लिहितो आणि टागोर हे माझ्यासाठी लिहितात."

अनेक वादळवाऱ्यांना तोंड देत गुरुदेवांच्या आश्रमाच्या भिंती उभ्या राहिल्या होत्या. अंगावरचे सारे दागिने उतरून गुरुदेवांच्या पत्नीने आश्रमावरची आर्थिक संकटे निवारली आहेत. शांतीदांच्या कुटुंबियांबरोबर गप्पागोष्टी करताना गुरुदेव आणि शांतिनिकेतन ह्यांच्याविषयींच्या माहितीचे, माझी उत्सुकता आणि आनंद वाढवणारे अनेक किस्से कानी पडत होते. संगीताप्रमाणे माझ्या मत्स्यगोत्राचाही सर्वांना आनंद झाला होता. ज्या घराच्या दारात कोणत्याही वेळी अवेळी जाऊन 'वहिनी भूक लागली आहे, गिळायला मिळेल का काही ?' असा मुक्त मनाने पुकारा करावा असे घर आणि बौ-दीसारखी थेट शरदबाबूंच्या कादंबरीतून उतरल्यासारखी वाटणारी थोरली वहिनी सापडल्याच्या आनंदात शांती-दांच्या घरून निघालो त्यावेळी मध्यरात्र उलटून गेली होती.

लेबू-दा आणि मी माझ्या वसतिगृहाकडे निघालो. लेबू-दांनी माझ्या बंगाली शिक्षणाची जिम्मेदारी घेतली होती. "उद्या तुमच्या खोलीत उत्तम शिक्षक आणून हजर करतो." अशी मास्तरी आवाजात त्यांनी मला धमकी दिली, आणि मी एकटाच गेस्ट हाऊसच्या दिशेने निघालो.

काळोखी रात्र होती. आकाशात नक्षत्रांचा धिंगाणा चालला होता. किती वर्षांनी हा असा नक्षत्रदर्शनाचा योग आला. मुम्बईत इतके मोकळे आकाशसुद्धा बघायला मिळत नाही. तंबोरे गवसणीत गेले होते. मुलींच्या वसतिगृहापुढली जलपरीची शिल्पाकृती निःसंकोच मनाने एकटीच उभी होती. संगीताचे विसावलेले सूर आता रातकिड्यांनी उचलून धरले होते. रात्र काळी - त्या जलपरीची घागर काळी. तृप्त मनाला अमावास्येची रात्रदेखील किती शुभ आणि सुन्दर वाटते. मी आम्रकुंजाजवळून जाताना मला एकदम आठवले. रवीन्द्रांचे तीर्थरूप महर्षी देवेन्द्रनाथ ह्यांना इथेच कुठे तरी सप्तपर्णींच्या वृक्षाखाली विलक्षण मनःशान्तीची अनुभूती लाभली होती आणि ह्या माळावरच तपोवन उभे करावे असा आदेश मिळाल्यासारखे वाटले होते. म्हणून त्यांनी तिथे जो बंगला

बांधला त्याला शांतिनिकेतन असे नाव दिले होते. तो सप्तपर्णीचा वृक्ष त्या आम्रकुंजापाशीच कुठेसा होता. त्या मध्यरात्री त्या तपोवनातून वाट वाकडी करून मी वळलो. डाव्या बाजूला एक सुरेख कुंपण होते आणि तिथेच तो विशाल वृक्ष होता. वृक्षाभोवती चांगली शे-दीडशे माणसे बसतील असा भला लांब रुंद चौकोनी पार होता. हाच तो सप्तपर्णीचा वृक्ष. बंगालीत त्याला 'छातीम' वृक्ष म्हणतात. त्या अंधारात त्या विस्तीर्ण वृक्षाच्या आकाराकडे पाहात मी एकटाच उभा होतो. तसा मी एकट्याने वावरणारातला मुळीच नाही. साधी गाण्याची ध्वनिमुद्रिका ऐकतानादेखील मला एकट्याला बसून ऐकायची हौस नाही. कुठल्याही आनंदाच्या क्षणी जोडीला कुणीतरी समानशील असावे असे मला वाटते. पण त्याक्षणी मात्र त्या एकटेपणातच मी मस्त होतो. ह्या अलौकिक एकटेपणातून पुन्हा कधीही अनेकतेत जाऊच नये. विसर्जनाच्या दिवशी उत्सव गाजवणारा गणपती तळ्यात जसा एकटाच त्या पाण्यात विरून जातो तसे त्या अंधारात विसर्जित व्हावे असे वाटायला लागले. माणूस आगीत जसा जळून जातो तसे अंधाराच्या शीतलतेतही भस्मभूत होता यायला हवे. आगीतून उरणाऱ्या पांढऱ्या राखेसारखे त्याने अंधारात विरता विरता चिमूटभर अबीर बुक्का होऊन मातीत मिळावे. आत्यंतिक आनंदाच्या अनुभूतीबरोबर आणखी जगावे - ह्याऐवजी - ह्या क्षणी संपावे असे का वाटते कोण जाणे. देवेन्द्रनाथ थोर आध्यात्मिक होते. मी सामान्य संसारी. पण त्या सुन्दर अमावास्येच्या अंधारात माझेही मन कुठल्या आनंदाने भरून आले आणि माझे हात कुणापुढे जोडले गेले ते माझे मलाच कळले नाही.

सकाळी जाग आली त्यावेळी जेमतेम पाच वाजले होते. हवा अशी मस्त की रात्रीच्या जागरणाचा आणि दोन दिवस केलेल्या आगगाडीच्या प्रवासाचा अजिबात शीण नव्हता. दार उघडून बाहेर पाहिले. समोरच्या वृक्षराजीतून कुंकवासारख्या लाल रंगाचा सूर्य वर येत होता. काल रात्री त्या सप्तपर्णी वृक्षापाशी, एखाद्या युवतीशी पहिली ओळख गोडीची होऊन प्रथमदर्शनी प्रेमात पडावे तसे शांतिनिकेतनाच्याच प्रेमात पडल्यामुळे की काय कोण जाणे मला ती रक्ताभरणभूषित पूर्व दिशादेखील कालची रात्रच नवी वेशभूषा करून दाराशी आल्यासारखी वाटली. निसर्गप्रेम हा काही माझा खास वीक पॉइंट आहे असे नाही. वाटले, कोणी आपल्यावर 'जय काली कलकत्तेवाली' म्हणून बंगाली जादूटोणा तर केला नाही ना ? मराठी साहित्य आणि संस्कारांवर पोसलेला माझा पिंड. आम्ही तसे सारे निसर्गप्रेम बालकवी ठोमऱ्यांवर सोपवून मोकळे झालेले लोक ! शिवाय मी मुम्बईत वाढलेला. आम्ही पाहिलेली बाग म्हणजे राणीची बाग वगैरे. तिथे मोकळ्या झाडांपेक्षा पिंजऱ्यांतल्या प्राण्यांकडे पाहण्याचीच हौस मोठी. तशी पुण्याला जाताना खंडाळ्याच्या

घाटातली शोभा वगैरे पाहतो. पण इथे जणू सारा निसर्गच आपले सारे वैभव घेऊन एखाद्या खेळणीवाल्याने एखाद्या पोरांच्या दारात यावे तसा माझ्या पुढे येत होता. हे बघ, हे बघ करीत बोलावीत होता. तेवढ्यात गेस्ट हाऊसच्या मागल्या माळावरून गाढवांचे संघगायन कानावर पडले आणि माझी समाधी भंगली. सूर्यदर्शनाने गाढवही गायला लागले होते. मी मागल्या बाजूच्या गॅलरीतून पाहू लागलो. चांगली डझनभर लहानथोर गाढवे माळावर चरत होती. एकमेकांचा पाठलाग करीत होती. दुगाण्या झाडत होती. मधूनच एखादे गाढंव गळा काढून गाऊन घेत होते. नव्या नव्या इमारतींचे बांधकाम चालले असल्यामुळे तिथे गर्दभसेनाही जमली होती. जग काय फक्त कोकिळांचेच आहे ? गाढवांनाही गायचा हक्क आहे. आणि कोणास ठाऊक, गाढवे कोकिळांच्या गायकीची आपापसात थट्टाही करीत असतील. शिवाय बालगर्दभ तसे मोहक दिसते. वाढत्या वयाबरोबर त्याचा गाढवपणा वाढत जातो त्याला ते तरी काय करणार बापडे ? माणसाचाही असा फक्त माणूसपणाच वाढता तर किती चांगले झाले असते ! एक गोष्ट मात्र निश्चित. गाढवांची गायनपद्धती अखिल भारतात सारखीच आहे. मागे इंग्लंडला जसा इंग्लिश कावळा मराठी कावळ्यासारखाच काव काव करताना ऐकून मला बारीकसा धक्का बसला होता - तसा ह्या बंगाली गाढवांच्या गायनाने मिळाला. थेट आमच्या फर्ग्यसन् कॉलेजच्या होस्टेलमागल्या वडारवाडीतल्या मराठी गाढवांसारखीच ती ओरडत होती. फक्त गर्दभसंगीतात इतक्या पहाटेचेही राग आहेत हे मला ठाऊक नव्हते.

थंडी भलतीच कडक होती. काल संध्याकाळी गरम पाणी मिळायची सोय नसल्यामुळे थंड पाण्यानेच भुश्श केली होती. मी गेस्ट हाऊसमधल्या नोकराला अंघोळीसाठी 'गरम पाणी ल़ाव' असे सांगितल्यावर त्याने, एखाद्या दुग्धमंदिरातल्या गिऱ्हाइकाने 'व्हिस्की लाव - सरदारजी पेग् !' म्हटल्यावर तिथला पोऱ्या जसा पाहील तसे माझ्याकडे पाहिले. (फार प्राचीन काळी गिरगावातल्या एका दुग्धमंदिराच्या मालकाने मी सिंगल चहा मागितल्याचे ऐकल्यावर काउंटरवरून 'खाल़ी उतरा - हे काय हॉटेल समजला ?' म्हणून बटाटापुरीच्या भरल्या बशीवरून मला उठवले होते.)

सकाळी उठल्याबरोबर अंघोळ करणारा मी पहिलाच गेस्ट त्या इंटरनॅशनल गेस्ट हाऊसमध्ये उतरलो होतो की काय काली जाणे. पुढे माझ्या लक्षात आले की बंगाली पुरुष पुढ्यातले काम आणि अंघोळ जितकी पुढे ढकलता येईल तितकी पुढे ढकलीत असतो. बंगाली घराघरातून जेवणापूर्वी स्वयंपाकघराच्या दिशेने 'च्यान कोरबेन — अंघोळीला चला ऽऽ' अशा आरोळ्या सुरू होतात आणि मग हाडाचा बंगाली स्वामी - (खरे तर चरबीचा बंगाली -) अंगाला सरसूचे तेल फासून उन्हात बसायच्या तयारीला

लागतो. आमच्या गेस्ट हाऊसमध्ये उतरणारे बहुतेक बंगाली गेस्ट दहा अकराच्या सुमाराला अंगभर तेल फासून उन्हात बसलेले असायचे. माझ्या नोकराने मलाही इथल्या थंडीत इतक्या लवकर स्नान करू नका असा इशारा दिला आणि एका फुटक्या कपातून सरसूचे तेलही आणून दिले. सरसूचे तेल अंगाला लावण्याचे धैर्य मला झाले नाही. एक तर मी खोबरेलवाला आणि दुसरे म्हणजे दुसरे कोणी आपले अंग रगडीत असेल तर ठीक. मी त्या नोकराला सकाळी सहाला चहा आणि साडेसहाला अंघोळीला गरम पाणी एवढ्या गोष्टी न चुकता आणून द्यायला सांगितले. तो देखील 'कुठली ही सकाळी उठून अंघोळी बिंघोळी करणारी जंगली माणसे आताशा शांतिनिकेतनात राहायला यायला लागली आहेत कळत नाही -' एवढे न म्हणता त्या वाक्याचा मूकाभिनय करून गेला. तासाभरात चहाची किटली घेऊन आला. मी म्हणालो, 'चहा नको - अंघोळीचे पाणी -'

"तेच आणले आहे-" म्हणून त्याने ती पत्र्याची किटली नेऊन बाथरूममध्ये ठेवली. बादलीत किटलीतले पाणी ओतून पाहिले. एक अष्टमांश बादली भरली नाही. मी म्हटले, "एवढ्या पाण्यात अंघोळ कशी करणार ?" - त्याने गार पाण्याचा नळ सोडून बादली कशी भरता येईल ते दाखवले. माझ्या करुण अवस्थेला आता फक्त मागल्या माळावर हंबरडा फोडून ओरडणाऱ्या गाढवांचेच पार्श्वसंगीत शोभले असते.

बंगाल्यांनी स्नानाची सारी जबाबदारी बायकांच्यावर सोपवलेली दिसते. त्या बिचाऱ्या रोज न्हाऊन आपले लांब केस वाळवीत बसलेल्या असतात. बाबू मात्र किटलीतल्या गरम पाण्यात अंग विसळतो. आणि भाताचे ढिगारे माशाच्या 'झोला'त भिजवून ताटासपाट करीत असतो. शेवटी गेस्ट हाऊसमधल्या सेवकवर्गाशी सलगीचे संबंध प्रस्थापित करून मला पाणी-तंटा सोडवावा लागला. आपल्याकडे 'रविवार' हा एकमेव अंघोळ पुढे ढकलण्याचा वार. वास्तविक बुधवार हा शांतिनिकेतनातला सुटीचा दिवस असल्यामुळे मीही अंघोळ पुढे ढकलू शकलो असतो.

गुरुदेवांनी रविवार हा सुटीचा दिवस न ठेवता 'बुधवार'ला तो मान दिला आहे. तसा बिचारा उपेक्षित वार. रविवार ख्रिस्ती लोकांचा साबाथ. यहुद्यांचा शनिवार. इस्लामचा शुक्रवार. हिन्दू लोक अमावास्येला सुटी घेत असावेत. गुरुदेवांनी हा निधर्मी बुधवार बरा शोधून काढला. त्यामागे इंग्रजांनी सत्तीने लादलेल्या त्यांच्या धर्मातल्या 'रविवार'चा एक सुप्त निषेधही असावा.

बुधवारी सकाळी शांतिनिकेतनातल्या मंदिरात ब्राह्म पद्धतीची उपासना होते. गुरुदेवांचे तीर्थरूप देवेन्द्रनाथ हे ब्राह्म समाजाच्या सुरुवातीच्या अनुयायांपैकी होते. त्यांनी ब्राह्मपंथाची दीक्षा घेतली होती. आजही बावीस डिसेम्बर हा महर्षी देवेन्द्रनाथांच्या दीक्षाग्रहणाचा दिवस म्हणून शांतिनिकेतनात पाळला जातो. देवेन्द्रनाथांचे तीर्थरूप राजा

द्वारकानाथ हे रूढीप्रिय हिन्दू. कुठल्याशा पीर अली नावाच्या नबाबाच्या वाड्यात शिजवलेल्या भोजनाचा वास त्यांच्या कुठल्याशा पूर्वजाच्या नाकात शिरला म्हणून बाकीच्या ब्राह्मणांनी त्यांना वाळीत टाकले. म्हणून टागोर हे पिराली-ब्राह्मण. छोट्या संस्थानिकासारखे ऐश्वर्यसंपन्न पण जातिबाह्य. पिराली ब्राह्मणाची फार थोडी कुटुम्बे होती. जातिबाह्य असले तरी कट्टर ब्राह्मण. हे राजा द्वारकानाथ अतिशय विलासी होते. थेट व्हिक्टोरिया महाराणीच्या पंक्तीला जेवण्याचा लाभ मिळालेले. अत्यंत देखणे असल्यामुळे ब्रिटिश महाराणीच्या दरबारातल्या अमीर उमरावांच्या स्त्रियादेखील त्यांच्यावर लुब्ध होत असत म्हणतात. त्यांनी आपली संपत्ती षौकात उधळली. इंग्लंडात त्यांचा काहीसा रहस्यमय असा मृत्यू झाला. त्यांनी त्यांचे पुत्र देवेन्द्रनाथ ह्यांच्या डोक्यावर लक्षावधी रुपायांच्या कर्जाचा बोजा ठेवला होता. देवेन्द्रांचा पहिल्यापासून आध्यात्मिकतेकडे, ईश्वरचिंतनाकडे ओढा. देवेन्द्रांनी ब्राह्मपंथाची दीक्षा घेतली हे त्यांना रुचले नाही. चिन्तन, प्रार्थना, धर्मचर्चा असल्या नादांनी पोरगा बिघडला असे त्यांना वाटले असावे. मुसलमानी अमलातली नबाबी, ऐय्याषी द्वारकानाथांच्या नसानसात भिनली होती.


देवेन्द्रनाथांनी मात्र तीर्थरूपांनी केलेल्या कर्जातली पैन् पै फेडली. पुढे उत्तम वेव्हाराने धन जोडले आणि उदास विचाराने वेचले. ब्राह्मपंथात उपासनेला फार महत्त्व. पण ही उपासना निर्गुणाची, निराकाराची. त्यामुळे शांतिनिकेतनातल्या त्या मंदिरात मूर्ती नाही. एखादे सुंदर उद्यानमंदिर असावे तसे हे रंगीबेरंगी काचांच्या तावदानांचेच मंदिर आहे. छताला देखील काचेची कौलं असावी. उपासनेत संगीताला फार महत्त्व. स्वतः गुरुदेवांनी ब्रह्मसंगीताची रचना केली आहे. सुरेल तंबोरे जुळवलेले, खोल मृदुंगाची नाजूक साथ, सुस्वर कंठाने गायिलेली ती उपासना गीते. वेदोपनिषदातल्या ऋचांचे धीरगंभीर स्वरात केलेले पठण. लगेच त्या प्रत्येक ऋचेच गुरुदेवांनी केलेल्या बंगाली अनुवादाचे वाचन. अध्यात्मविषयात पारंगत असलेल्या एखाद्या पंडिताचे छोटेसे निरूपण. असा हा तासाभराचा उपासनेचा कार्यक्रम असतो. ख्रिश्चनांचा रविवार तसा ब्राह्मसमाजी लोकांचा बुधवार. उपासनेचा कार्यक्रम ख्रिस्ती पद्धतीवरच बेतलेला. पण त्या तपोवनातले ते प्रार्थनामंदिर, तिथली ती सुरेल प्रार्थनागीते अतिशय आल्हाददायक. मी कधी ब्रह्माच्या चिन्तेत पडत नाही. मी ब्रह्म असेन तर उत्तमच आहे. नसलो म्हणूनही दुःख नाही. त्यामुळे मंदिरातली ती उपासना पाहायला जाताना माझी भूमिका प्रेक्षकाची होती. शिवाय चारचौघांत डोळे मिटून बसण्यापेक्षा ही मंडळी ध्यानस्थ बसतात की हळूच इतरांचे डोळे मिटल्याच्या संधीचा फायदा घेऊन आणखी एखाद्या ध्यानाकडे डोळे लावून पाहातात हे बघायची उबळच मला अधिक येते. शिवाय अध्यात्म नेहमी इतके गंभीरच असायला हवे असेही मला वाटत नाही. 'ठलविठ्ठलविठ्' करीत हजारो टाळ आणि शेकडो

मृदुंगांच्या गजरात, नाचत खेळत जाणारी ग्यानबाची पालखी अध्यात्मात देखील भलती मजा आणते. शांतिनिकेतनातल्या मंदिरातली ती सुविहित उपासना ऐकताना सुसज्ज स्नानगृहात सुवासिक साबण, शॅम्पू, बाथक्रिस्टल्स वगैरे वापरून आत्म्याला अंघोळ घातल्यासारखे वाटते. 'ग्यानबा तुकाराम'च्या जयघोषात आत्मा कसा नदीच्या घाटावरून उड्याबिड्या मारून पोहण्याचा आनंद घेत असतो. साबणाऐवजी नदीतलाच गोटा घेऊन अंग घासून पुसून लख्ख करतो. पहिल्या स्थानी सुंदर स्नानगृहात मिळणारी निर्मळता तर दुसरीकडे निर्मळतेच्या जोडीला मुक्ततेचाही आनंद. ह्यातला कुठला घ्यायचा ते प्रत्येक देहातल्या आत्मारामपंतांनी ठरवावे. नित्यनेमाने करायच्या उपासना मला ड्रिलच्या तासासारख्या वाटतात. मोकळ्या मैदानातला ड्रिलचा देखावा चांगला असला तरी त्याला तसल्याच मैदानात मुक्तपणाने धावण्या बागडण्याच्या किंवा मनाला येईल तेव्हा कोंडाळे करून गप्पा मारीत बसण्याच्या आनंदाची सर नाही. मला शारीरिक ड्रिलही आवडत नाही आणि आध्यात्मिकही. नेमधर्माचे महत्त्व असेल. पण नेमधर्मी माणसे नकळत असहिष्णू होऊन जातात. चित्रापेक्षा चौकटीला जास्त महत्त्व देतात. त्या दिवशी त्या ब्राह्म-मंदिरात नित्यनेमाने बुधवारी जमणारा तो मेळावा पाहताना माझ्या मनात एकच विचार येत होता. गुरुवारी दत्ताच्या, सोमवारी शंकराच्या, मंगळवारी गणपतीच्या, शनिवारी मारुतीच्या मंदिरात नेमाने जाणारे भक्त आणि दर बुधवारी कसलीही मूर्ती पुढे न ठेवता उपासनेला जमणारे हे भक्त. ह्यातले किती लोक 'कोऽहम्' ह्या प्रश्नाचे उत्तर शोधायला आणि सर्वत्र वास करणाऱ्या ब्रह्मरूपाचा शोध घ्यायला जीवनात इतर वेळी धडपडत असतील ? आपण सारेच ब्रह्म आहोत ह्या भावनेने ह्यातला एक तरी भद्रपुरुष आपल्या नोकराला तू आज माझ्या ताटात तुझ्या ताटातल्या भाकरीची आहुती माझ्या ब्रह्माला देतो असं म्हणत असेल का ? कम्युनिस्टांच्या समानतेबद्दल ऑर्वेलने जसे तिथे सगळी माणसे समान परंतु काही जरा अधिक समान - 'सम आर मोअर इक्वल' असे म्हटले आहे त्याचप्रमाणे ब्रह्ममय जगातही काही श्रीमंत ब्रह्म, काही गरीब ब्रह्म हे आहेच !

मी त्या मेळाव्याकडे पाहात होतो. पाठभवनातली आणि शिशुभवनातली मुले आणि मुलीही आल्या होत्या. त्यांना बहुधा शालेय शिस्तीतला एक भाग म्हणून सक्तीची हजेरी असेल. त्यांतली काही मुले बंगाली पद्धतीचे धोतर, पंजाबी, अंगावर शाल अशा थाटात होती. बंगालने धोतर फेकले नाही. कॉलेजमधील मुलेदेखील विशेष प्रसंगी जाडसर काळ्या निळ्या किंवा वेलबुट्टीदार काठाचे धोतर नेसतात. अंगावरून उत्तरीय घेतात. लहान मुले तर धोतर, उत्तरीय वगैरे वेषात मोठी डौलदार दिसतात. गायन सुरू झाले की मुले शान्तपणाने ते ऐकत. प्रवचनाच्या वेळी मात्र ही ब्रह्मसानुली एकमेकांची खोडी काढणे वगैरे कार्यक्रम सुरू करीत असत. मुली बिचाऱ्या इथून तिथून सगळ्या अगदी

आजीबाईचा आव आणून गंभीरपणाने बसल्या होत्या. कॉलेजातले तरुण कुठे दिसले नाहीत. इतर प्रौढ स्त्रीपुरुष होते. उदबत्त्यांचा सुगंध होता. फुले होती. सुरेल संगीत, सुवसना युवती, सुप्रसन्न निरोगी मुले. हवा शीतल. भोवताली लता पल्लवांची शोभा आणि उंच उंच वृक्षांचे वैभव. पंचेन्द्रियांना मिळणाऱ्या ह्या सौख्यातून ब्रह्मानंद मिळत होता. नव्हे जो आनंद मिळत होता, त्यालाच ब्रह्मानंद म्हणायला माझी हरकत नाही. पण दर बुधवारी येत गेल्यावर अतिपरिचयाने त्या ब्रह्मानंदाची देखील चव तितकीच राहात नसावी. आनंद आणि आशंका असे दोन्ही भाव घेऊन मी त्या मंदिराच्या परिसरातून निघालो आणि खोलीवर परतलो.





मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा

विश्वभारतीत बंगाली भाषेचा आणि टागोरांच्या वाङ्‌मयाचा अभ्यास करण्यासाठी माझ्या खर्चाने का होईना परंतु तीन महिने वसतिगृहात राहाण्याची मी विश्वभारतीचे व्हाइस चान्सेलर (उपाचार्य) डॉ. कालिदास भट्टाचार्य यांना पत्र पाठवून विनंती केली होती. त्यांचे मला अतिशय सुंदर उत्तरही आले होते. 'अवश्य या' असे मोठ्या अगत्याने त्यांनी लिहिले होते. मी तिथे आल्याची रीतसर वर्दी द्यायला त्यांच्या बंगल्यावर गेलो. सोबत सलील आणि मंटूही होते. विश्वभारतीने व्हाइस चान्सेलरसाठी प्रशस्त बंगला बांधला आहे. पण कालिदास बाबू त्या बंगल्यात न राहाता छोट्याशाच एका बंगलीत राहात होते. आम्ही बंगल्याच्या आवारात शिरलो. ओसरीतच एका खुर्चीवर ठेंगण्या ठुसक्या बांध्याचे साधारणतः रेल्वेपार्सल हापीस किंवा तत्सम एखाद्या बेचव सरकारी कचेरीत चढत चढत हेडक्लार्कच्या जागेवर पोहोचलेले हरिभाऊ असावेत तसे दिसणारे एक गृहस्थ बसले होते. धोतर आणि अर्ध्या बाहीची पैरण घालून अंगावर शाल ओढून बसलेले ते गृहस्थ म्हणजेच तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातले विख्यात पंडित कालिदास बाबू आहेत हे पाहून मी चकित झालो. अत्यंत साधे, निरहंकारी, प्रेमळ असे कालिदास बाबू आम्हाला पाहून ओसरीवरून आमच्या

स्वागतासाठी पुढे आले. आणि "आशून, आशून" म्हणत त्यांनी आमचे स्वागत केले. भट्टाचार्यांचे घराणेच मुळी महापंडितांचे. त्यांचे तीर्थरूप, वडील बंधू तत्त्वज्ञानाचे गाढे विद्वान. ही सगळी ख्याती मी सलीलकडून ऐकल्यामुळे जरासा बुजलो होतो. इंटरला लॉजिक शिकताना 'सॉक्रेटीस हा मर्त्य आहे' हे शिकलो होतो. त्यापलीकडे प्लेटो, सॉक्रेटीस, ॲरिस्टॉटल वगैरे मंडळींशी कधीही स्नेह जडला नाही. त्यामुळे पटकन त्या महापंडिताने भलता सलता प्रश्न विचारला तर सॉक्रेटीससारखा मीही मर्त्य आहे हे सलील, मंटू वगैरे मंडळींना लगेच कळले असते. पण ऑक्सफर्डच्या प्रो. राईल या महापंडितासारखे कालिदास बाबूदेखील इतक्या मोहक साधेपणाने वागले की, एखाद्या नवीन माणसाला, कालिदास बाबू माझ्याकडे नोकरी मागायला आले आहेत असे वाटले असते. आपली सारी विद्वत्ता कालिदास बाबू किती सहजतेने अंगावर वागवित होते! मी तेवढ्यात आर.डी. रानडे, डी.डी. वाडेकर, मे.पुं. रेगे वगैरे तत्त्वज्ञान विषयातली मराठीतली जुन्या नव्या स्टार-कास्टची नामावली हळूच त्यांच्यापुढे म्हणून टाकली. कालिदास बाबूंनी काय ओळखायचे ते ओळखले असेल. पण मंटू मात्र त्यानंतर अनेक लोकांना "देशपांडेजी फिलासाफी का बहुत बडा स्कालर है?" असे सांगत होता. नट नृप होत नसतो. पण नृपाची ऐट आणून दोन तीन तास जनतेला गुलवतो. पाच-दहा मिनिटांतच कुठल्याही बंगाली घरात गेल्यावर अपरिहार्यपणे येणारा चहा आणि मिठाई आली. कालिदास बाबूंनी विश्वभारतीत माझी गैरसोय होऊ नये व अभ्यासाची नीट व्यवस्था व्हावी म्हणून जातीने लक्ष घालून सर्व संबंधित खात्यांना आधीच पत्रे पाठवून कळवले होते. ग्रंथालयातून हवी ती पुस्तके मिळण्याची व्यवस्था केली होती. त्यांच्या वागण्यात आणि बोलण्यात कमालीची सहजता होती. चेहेऱ्यावर लहान मुलासारखे मिस्किल हास्य होते. जाता जाता कालिदास बाबू मला म्हणाले, "काही गैरसोय झाली तर मनावर घेऊ नका. विशेषतः बारीक सारीक पिन प्रिक्स सहन करायची तयारी ठेवा" हसत हसत त्यांनी मला हा सल्ला दिला खरा. पण त्यामागे विश्वभारतीसारख्या ज्ञानपीठाच्या उपाचार्यांच्या मनात कसली तरी वेदना सलते आहे असे मला वाटले. मीही त्यांना आश्वासन दिले.

"आपण अजिबात काळजी करू नका. गेली पंचवीस वर्षे साहित्य, रंगभूमी अशा सार्वजनिक क्षेत्रातच आहे. एव्हाना अंगावरचे कातडे चांगलेच कमावले गेले आहे. एखादी व्यक्ती नीट नाही वागली म्हणून साऱ्या विश्वभारतीविषयी माझं मत बिघडणार नाही." कालीदास बाबूंना प्रणाम करून एका फार निर्मळ मनाच्या माणसाला भेटल्याच्या आनंदात मी निघालो.

सलील मला बँक, पोस्ट-ऑफिस, दुकाने वगैरे दाखवीत होता. अनेक लोकांशी परिचय करून देत होता, "...मराठीतले सुप्रसिद्ध नाटककार" वगैरे बिरुदे लावली की माझ्या छातीचा ठोका चुकायचा. मी पुन्हा पुन्हा सलीलला सांगत होतो, "असली तारीफ करू नकोस." विनय वगैरे म्हणून नव्हे तर माझ्या वागण्या-सवरण्यावर निर्बंध येतील म्हणून. मला विद्यार्थ्याखेरीज दुसरी कसलीही भूमिका नको होती.

सुटीचा दिवस असल्याने लायब्ररी बंद होती. मी खोलीत परत आलो त्यावेळी दुपारच्या जेवणाची वेळ झाली होती. डायनिंग हॉलमधील स्वच्छता कुठल्याही भारतीय खानावळीला उगीच ओशाळे वाटू नये अशाच स्वरूपाची होती. माझ्यापुढे ताट वाढून आले. त्यातला भाताचा ढीग पाहून मी चुकून एखाद्या मद्राशाच्या हॉटेलात तर शिरलो नाही ना अशी मला शंका आली. मी वाढप्याला भात कमी करायला सांगितले. सकाळी खोलीवर अंघोळीच्या पाण्याची किटली आणणारा मुलगाच आता वाढप्याच्या भूमिकेत उभा होता. पानात मूठभर भात ठेवून बाकीचा ढिगारा साभार परत केलेला पाहून मी बहुधा अंघोळीसाठी म्हणून सांगून ते गरम पाणी पिऊनच जगत असेन असा त्याने अंदाज केला असावा. बंगाली माणूस हा भात आणि मासे खाऊन जगतो हे ज्ञान लहानपणी भूगोलाच्या पुस्तकात मिळाले होते. कोकण्याही भात-बोकाण्या असतो. पण बंगाली माणसाला वेळेला दीड वीत उंचीचा भात लागतो, हे मी प्रथमच पाहात होतो. विश्वभारतीत प्रवासी पाहुण्यांची सतत ये-जा असल्यामुळे डायनिंग हॉलमध्ये कुटुंबेच्या कुटुंबे भोजनाला येत. पुरुषांचे जाऊ दे. पण इतक्या सुबक वंग रमणी देखील भाताच्या ढिगात आपले गोंडस हात खुपसून बोटांच्या फटीतून चिळकांड्या उडवीत, माशांच्या आमटीबरोबर भात कालवताना पाहून मला जेवण जाईना. शिवाय उष्ट्या हातानेच पिण्याच्या पाण्याचा ग्लास उचलणे वगैरे प्रकार त्रासदायकच होते. अगदी मद्रासी ढंगाचे नसले तरी जवळ जवळ त्याच आकाराचे भाताचे गोळे करून पोटात ढकलण्याची बंगाल्यांनाही सवय आहे. दक्षिणेत ही पद्धत गोव्यापासून सुरू होते. त्या गोळ्याचा आकार वाढत वाढत केरळात तो गोळा टेनिसच्या चेंडूएवढा होतो. बंगाली लोकांना मद्राशांसारखे हे गोळे उडवून मटकावता येत नाहीत. तसेच त्यांना मराठी ढंगाचा भुरकाही मारता येत नाही. ही अस्सल मराठी परंपरा असावी. पण महाराष्ट्रातही मी फार वर्षांत चांगलासा तयार भुरका ऐकला नाही. असो. मी ताटात काय वाढून आले आहे ते पाहू लागलो. काल रात्री बौदीने रुचकर स्वयंपाक केला होता. पण घरचे रांधप आणि खानावळीतले यात फरक असायचाच. आपल्या देशात तर फारच. काल कुठे परक्या ठिकाणी जेवलो असे वाटले नव्हते. इथे मात्र भात आणि माशाची आमटी

(माछेरझोल), बटाट्याची भाजी (म्हणजे मरण), 'बेगून भाज्या' नामक वांग्याचे भजे. हे म्हणजे स्वयंपाक्याच्या हाती जे काही लागले ते फासून सरसूच्या तेलात तसेच तळलेले उभे चिरलेले अर्धे वांगे होते. आणखी एक भाजीचा लगदा होता. त्याची कृती येणेप्रमाणे असावी.

मंडईत ज्या ज्या भाज्या स्वस्त्या लावल्या असतील त्या आणाव्यात. अमुक भाजीचे तमुक भाजीशी गोत्र जमते की नाही याचा विचार करू नये. उदा. सुरण, कार्ली, फरसबी, रताळी, लाल भोपळा, कच्ची केळी, बटाटे, पालक, अळू, वालपापडी, वांगी, पडवळ वगैरे. बाजारातून आणल्यावर त्या धुण्याच्या किंवा त्यांच्या साली, शिरा वगैरे काढण्याच्या लफड्यात पडू नये. त्या भाज्या मनाला येतील त्या आकाराच्या चिराव्यात. शेवग्यांच्या शेंगा पातेल्यात अखंड बसणार नाहीत हे ध्यानात घेऊन (बरं का भगिनींनो) जराशा तोकड्या कराव्यात. अळू, सुरण वगैरे गळ्याशी खाजतात. परंतु खाणाऱ्याच्या गळ्याची आपण कधी चिंता करू नये. हे सारे चिरून पाण्यात उकळत ठेवावे. मग त्यात मीठ, मिरची, गूळ, धने बांधून आणलेल्या पुडीचा दोरा, जमल्यास कागद, चार नवऱ्या रंगतील इतकी हळद आणि पातेल्याच्या (आणि खाणाऱ्याच्या) गळ्याशी येईल इतके सरसूचे तेल घालावे. आणि सगळ्याचा शिजून लगदा होईपर्यंत हे सारे शिजवावे. हे शिजायला टाकले असताना हवे तर सिनेमाचा मॉर्निंग-शो पाहून यावे. गावातून चक्कर मारून यावे किंवा उरलेले सरसूचे तेल अंगाला लावून उन्हात बसावे. प्रत्येक भाजीला शिजायला निरनिराळा वेळ लागत असल्यामुळे हुं का चूं न करता साऱ्या भाज्या राजकीय कटासारख्या गुप्तपणाने शिजत राहतात. आणि कालांतराने कम्युनिस्ट राजवटीसारखे प्रत्येक भाजीचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट होऊन बटाटे, सुरण यांचेच काय पण ढवळताना स्वयंपाकाच्या कडोसरीची अधेली आत पडली तरी तिचेही पार पिठले होऊन जाते. सरसू वगैरे बेरकी भाज्या तरीही स्वतंत्रपणे जगण्याचा प्रयत्न करतात. तुरीसारखी कणखर डाळ मुगासारखी अपमान गिळून उगी राहात नाही. टणकच राहाते. ते फारसे मनावर घेऊ नये. हा पदार्थदेखील खानावळीचे मेंबर भरपूर खातात. त्याअर्थी तो रुचकर असावा.

मी मात्र एकदा ती भाजी खाण्याचा प्रयत्न केला तेव्हा शेवग्याच्या शेंगेबरोबर एक आगपेटीची जळकी काडी आली. दोन चारदा माशाचे खवले आले. मासे साफ केल्यावर जे खवले, डोकी वगैरे उरतात तेही या भाजीत ढकलले जातात. फक्त ज्या टोपल्या भरून ही भाजी आणतात त्या टोपल्यांचे वेत ताटात शिजून पडले नव्हते. किंवा! तेही इतके शिजवले असतील की मी ते शेवग्याच्या शेंगा म्हणून चावलेही असतील. शेवग्याच्या शेंगेला बंगालीत सजनी म्हणतात. अनेक भाज्यांच्या मदतीला येणारी शेवग्याची शेंग ही सजणीच आहे.

पुढले तीन महिने या अन्नब्रह्माशी गाठ आहे, या विचाराने मी हैराण झालो. तेवढ्यात वाढप्याने मला 'च्याटणी' पाहिजे की काय विचारले. जेवण संपल्यावर चटणी कुठली हे मला कळेना. एकदा मारवाड्याच्या लग्नात जेवण आटोपल्यावर माझे ताट पापडाने झाकले होते. कोण कशाने जेवण संपवतील, काय सांगावे? आपण ताक किंवा कढी-भातावर. चिनी लोक जेवणाच्या शेवटी सूप पितात. साहेब सूपाने सुरुवात करून कॉफीने संपवतो. तशीच ही मराठी ताटात प्रथम वाढली जाणारी चटणी बंगालात शेवटी कशी काय येते ते पाहावे म्हणून म्हटले, 'च्याटनी लाव.' पण ही चटणी म्हणजे शिजवलेल्या टोमॅटोत गूळ आणि चिंच घालून केलेले चाटण निघाले. मिरचीशिवाय चटणी. ती देखील जेवण संपल्यावर मुखशुद्धी म्हणून. हे म्हणजे समारंभ आटपून मुख्य पाहुणे परत जायला टॅक्सीत बसल्यावर इकडे स्वागतपर पद्य सुरू करण्यासारखे होते. कधी कधी या 'च्याटणी'त फणसाच्या उकडलेल्या आठल्याही असतात. हा पदार्थ तसा चवीला वाईट नसतो. पण ज्या चटणीने डोळ्यात पाणी येत नाही ती कसली चटणी? वास्तविक प्रत्येक वस्तूला इतकी सुंदर नावे ठेवणारे बंगाली ह्या चटणीतच कसे चुकले कोण जाणे! भात, मासे, बटाटा, वांगी आणि सरसूचे तेल, बंगाली भोजनाचे हे पाच आधार. मिरचीचे प्रमाण फार कमी. बंगालीत मिरचीला लंका म्हणतात हे मला आवडले. बहुधा मिरची हा प्रकार त्याच बेटातून आला असेल. लंका किंवा लंका-मरीच हे ऐकल्यावर 'मारीच' राक्षसाशीही संबंध जुळला. पण बंगाली लोकांतही तिखट खाणारे लोक असावेत. कारण काही बाबू तळलेल्या मिरच्या मागवायचे. मीही मागविली. आणि त्या तळलेल्या लंकेने माझी जीभ जाळली. बंगाल्यांचा प्रत्येक बाबतीत अतिरेक. अतिनरम आणि अतिगरम, दोनच पंथ. साखरेच्या पाकात घोळव घोळव घोळवलेली रसगुल्ल्यासारखी मिठाई आणि जीभांना आगी लावणाऱ्या लंका एकाच बंगाली ताटात सुखाने नांदतात.

दुपारी तीनच्या सुमाराला दारावर टकटक झाली. दार उघडून पाहातो तो विश्वभारतीतले बंगाली साहित्य विभागातले प्रमुख प्राध्यापक डॉ. भूदेव चौधरी उभे. काही तासांपूर्वीच त्यांचा व माझा परिचय झाला होता. अत्यंत सौम्य आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व. बंगाली साहित्याच्या इतिहासाचे लेखक म्हणून त्यांच्याविषयी सर्वांना आदर आहे. भूदेव बाबू उत्तम शिक्षक आहेत. उत्तम समीक्षक आहेत. विश्वभारतीत ते वर्षा-दीड वर्षापूर्वीच आले. पूर्वी बरीच वर्षे कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये शिकवत होते. अत्यंत बुद्धिमान विद्यार्थ्यांचे कॉलेज म्हणून प्रसिद्ध असलेल्या या शिक्षणसंस्थेचा कलकत्त्याच्या विद्यार्थ्यांच्या दंगलीचे उगमस्थान म्हणून लौकिक झाला आहे. जादवपूर

विद्यापीठ आणि प्रेसिडेन्सी कॉलेज ही डाव्या, अतिडाव्या आणि अतिअतिडाव्या कम्युनिस्ट चळवळींची पीठे झाली आहेत. डॉ. भूदेव चौधरींनी विद्यार्थ्यांमधल्या असंतोषाचा बऱ्याच सहृदयतेने अभ्यास केला आहे. त्यांच्या मताने राज्यकर्ते, पालक आणि शिक्षक या तिघांनीही तरुण पिढीला वाऱ्यावर सोडून दिले आहे. आपण अनाथ आहोत, आपल्या भवितव्याची यापैकी कोणालाच पर्वा नाही अशी अत्यंत निराशेची भावना या विद्यार्थ्यांमध्ये आली आहे. शिवाय पूर्व पाकिस्तानातून घराघरावर तुळशीपत्र ठेवून आलेली लक्षावधी बंगाली कुटुंबे आजही निराश्रिताचे जीवन कंठीत आहेत. आज जी अठरा वीस वर्षांची त्यांची मुले आहेत ती झोपडपट्ट्यांतून वाढली. त्यांचे आईवडील एकेकाळी स्वतःच्या मालकीच्या छोट्या मोठ्या घरातून राहात होते. त्यांच्या नशिबी हे जिणे आल्यामुळे तेही त्रस्त. वैतागाच्या भरात 'तुम्ही आणि तुमचे नशीब' म्हणून पोटच्या पोरांना वाऱ्यावर सोडून दिलेले. असल्या मुलांमध्ये कितीतरी बुद्धिमान मुले आहेत. कलावंत आहेत. पण दारिद्र्याच्या आणि सरकारी भ्रष्टाचाराच्या भिंतीशी शालेय वयापासून त्यांची डोकी आपटून रक्तबंबाळ होत आहेत. त्यांना समाजातल्या कुठल्या व्यक्तीविषयी आणि संस्थेविषयी आस्था वाटावी ? 'त्राहि भगवान्' म्हणताना तो भगवान त्यांना माओच्या स्वरूपात दिसतो, लेनिनच्या किंवा मार्क्सच्या. हे परदेशी कम्युनिस्ट भगवान् त्यांना स्वर्ग उभारून देणार आहेत की नाही याची त्यांनाही खात्री आहे असे नाही. परंतु देशी भगवान् नालायक आहेत, स्वार्थी आहेत याची मात्र त्यांना खात्री पटली आहे. त्यांनी तरी काय करावे ? या पिढीच्या संतापाची कारणे शोधायला गेले तर त्यांचा उगम आपली सत्ता यापलीकडे कसलाही विचार न करणाऱ्या कॉंग्रेस पुढाऱ्यांतच सापडतो. "तुम्ही एकदा डोळ्यापुढून नाहीसे व्हा !" हेच उद्‌गार ऐकायला मिळतात. चिडलेले पोर आपले खेळणेसुद्धा मोडते. तिथल्या कॉंग्रेसच्या नेत्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी आणि सत्तेच्या लोभापायी राष्ट्राची नस न् नस क्षीण करणाऱ्या इतक्या गोष्टी केल्या आहेत की त्यांच्या दर्शनाची सुद्धा या मुलांना किळस येऊ लागली आहे.

भूदेव बाबू अजिबात आवाज न चढविता शांतपणाने ही सारी स्फोटक परिस्थिती समजावून सांगत होते. मला लोकमान्य टिळकांचा 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का ?' हा अग्रलेख आठवला. बंगालमधल्या क्रांतिकारकांनी केलेल्या बॉंबफेकीबद्दल लिहिताना लोकमान्यांनी म्हटले होते, "ज्या तरुणांनी हे हिंसाचार केले ते कोणी अशिक्षित गुंड नाहीत. चांगले सुशिक्षित बुद्धिमान आहेत. त्यांना देखील आत्यंतिक हिंसाचार करावा अशी तिडीक येण्यासारखी परिस्थिती आपण कशी निर्माण केली याचा सरकार विचार करते आहे का ?"

आजदेखील लोकमान्यांचा तोच प्रश्न पुन्हा विचारावा असे वाटते. या देशावर नितांत प्रेम करावे असे किती उदात्त अनुभव या तरुणांना मिळाले ? कृत्रिम रीतीने चालू ठेवलेली महागाई, अन्नटंचाई, पुढाऱ्यांनी केलेल्या इस्टेटी, गलिच्छ पातळीवरील त्यांची भांडणे, स्वार्थासाठी हाती धरलेले गुंड, प्रत्येक निवडणुकीतली निर्लज्ज तत्त्वच्युती, कुलगुरूपासून प्राध्यापकांपर्यंत सर्वांच्या चारित्र्याची वृत्तपत्रातून धुतली जाणारी लक्तरे, भ्रष्ट माणसांना कधी आपल्या जातीचा म्हणून, कधी नात्याचा म्हणून, कधी पंथाचा म्हणून पाठीशी घालण्याचे प्रकार. ही काय तरुणांना देशावर प्रेम करायला स्फूर्ती देणारी दृश्ये आहेत ? बंगाली विद्यार्थ्यांच्या संतापाबद्दल भूदेव बाबू सांगत होते, तेच या देशातल्या सगळ्या तरुणांच्या बाबतीत खरे आहे. ज्योतिषी, साधुबाबा यांच्या सल्ल्याने आणि भवानीमातेपुढे नारळ फोडून निधर्मी राज्यात समाजवादी राजवट आणायला निवडणुकांचे जुगार खेळणारे आमचे नेते ! कुठल्या तोंडाने दैववादी विचार सोडा आणि स्वतःवर विश्वास ठेवा हे त्यांनी तरुणांना सांगावे ? तरीही कोरडेपणाने भाषणे ठोकायला जातात. आणि मग मुले मांडव जाळतात. बराच वेळ आम्ही बोलत बसलो होतो. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यागी जीवनाची चढाओढ करणारे पुढारी पाहिलेली आम्ही माणसं ! दोघांचेही सुत जमले. आजच्या सार्वजनिक जीवनात आपण मिसफिट आहोत की काय हा विचार सदैव सतावीत असतो. शेवटी त्यांनी मला विचारले, "कुठल्या हेतूनं तुम्ही बंगाली शिकायला आला आहात ?" हा प्रश्न त्यानंतर अनेक लोकांनी मला विचारला. अजूनही विचारतात.

कुठल्याही विशिष्ट हेतूने नाही. केवळ आनंदासाठी. एखादे सुंदर ठिकाण पाहायला आपण जात नाही का ? बंगाली वाङ्मयात अशी कितीतरी रम्य ठिकाणे असतील. कथा, कादंबऱ्या, नाटके, कविता यांच्यात दडलेली. त्यातून फिरता यावे एवढाच हेतू !

"पण बंगालीच का ?"

"कारण रवीन्द्र आणि शरद्चंद्रांची ती भाषा आहे म्हणून. आधुनिक भारतीय साहित्यातले रवी आणि चंद्र दोन्ही बंगालीच निघाले, तेव्हा बंगाली शिकणं आलंच. शिवाय मराठी कळणाऱ्याला बंगाली काही फार परकी भाषा नाही. बंगाली माणसालासुद्धा मराठी शिकणं अवघड नाही."

"अहो ज्या भाषांशी आपले कसलेही नातेगोते नाही असल्या फ्रेंच, जर्मन वगैरे भाषा शिकतो आपण. काहीही अवघड नसते. आणि काहीही सोपे नसते. ठीक आहे. तुम्ही बंगालीशी मैत्री करायला आला आहात."

"मित्र जोडायचा सोपा उपाय म्हणजे आपण जाऊन मित्र होणे" मी एक सुभाषित फेकले.

"चांगलं आहे. मग गुरुदेवांच्या मैत्रीपासून सुरुवात करू या." असं म्हणून भूदेव बाबूंनी आपल्या बरोबर आणलेल्या गुरुदेवांच्या रचनावलीचा खंड उघडला आणि कविता वाचायला सुरुवात केली.

"शूरेर गुरु दाव गो शूरेर दिख्खा"

डॉ. भूदेव चौधरींनी जणू काय माझ्या मनीचे हितगुज ओळखून कवितेची निवड केली होती.

*'सुरांच्या गुरुराया मला दीक्षा द्या सुरांची*
*मी भिकारी सुरांचा -*
*भिक्षा वाढा सुरांची -*
*शिकवलेत जे सूर मंदाकिनीच्या धारेला*
*शिकवलेत जे गाणे पहाटेच्या शुक्र ताऱ्याला*
*सोनचाफ्याच्या कानाकानात भरलेत जे सूर*
*ते मला शिकवा.*

*तुमच्या सुरांनी भरून घेऊन मन*
*जाईन जिथे असेल बेसूरेपण*
*जिथे माजला असेल कोलाहल*
*जिथे असतील उठले भोवरे*
*घेऊन जा तिथे हवे तर*
*वीणेची घ्यावया परीक्षा*
*पण सुरांच्या गुरुराया*
*पदरात सुरांची वाढा भिक्षा*


भूदेव बाबूंनी मला बंगालीची दीक्षा गुरुदेवांच्या या कवितेने दिली. मी मनात म्हणत होतो, मी तरी आयुष्यात सुरांखेरीज आणखी कसली भिक्षा मागितली आहे ? वास्तविक भूदेव बाबूंना एवढे अगत्य दाखवून स्वतः मला उपयोगी पडतील अशी पुस्तके घेऊन माझ्या खोलीवर येण्याची आवश्यकता नव्हती. पण मराठी भाषेत काही ग्रंथरचना केलेला एक साहित्यिक बंगाली शिकायला आला याचाच त्यांना आनंद झाला होता. त्या प्रेमाने ते आले होते. मंगल कलश ठेवून शुभकार्याचा प्रारंभ करावा या भावनेने त्यांनी रवीन्द्रांच्या कवितेचा कलश ठेवला. हे म्हणजे पायथ्याकडून डोंगराचे शिखर दाखवून 'किती सुंदर आहे पाहा' म्हणण्यासारखे होते. त्या शिखरापर्यंत पायथ्यापासून मुळाक्षरे,

व्याकरण वगैरे काटेकुटे तुडवीत मला स्वतःलाच चढण चढणे प्राप्त होते. त्या कामात डॉ. भूदेवबाबूंसारख्या पंडितापेक्षा शाळामास्तरांसारखा शेरपाच हवा होता. भाषेचे शारीरविज्ञान शिकणे हा काही मोठा काव्यमय अनुभव नसतो. पण तो मार्ग देखील किती आनंदाचा असू शकतो याचे प्रत्यंतर रवीन्द्रनाथांनी प्राथमिक शाळेतल्या मुलांसाठी लिहिलेल्या सहज पाठांनी आणून दिले. भूदेव जायला निघाले. "माझ्या वर्गात केव्हाही येऊन बसा. सकाळी साडेसात ते अकरापर्यंत वर्ग चालतात."

"पण तुमचा वर्ग मला सापडणार कसा ?"

"सकाळी शांतिनिकेतनात आलात की चारी बाजूला नजर टाका, सहज दिसेल."

मग माझ्या लक्षात आले की विश्वभारतीतल्या वर्गांना भिंती नसतात. पाखरांच्या शाळा झाडावर आणि इथल्या छात्र-छात्रींच्या शाळा झाडाखाली !





डॉ. भूदेवबाबूंशी ठरवल्याप्रमाणे त्यांचे झाड शोधीत निघालो. थंडी चांगलीच होती. असल्या थंडीत झाडाखाली बसण्यापेक्षा शेकोटीभोवती वर्ग भरवले पाहिजेत. मी आश्रमाच्या त्या तपोवनात शिरलो. आम्रकुंजातल्या झाडा झाडाखाली वर्ग भरले होते. गुरुजन जटाजूटधारी नव्हते आणि छात्र-छात्री वल्कले नेसले नव्हते एवढाच काय तो फरक. एरवी मला तिथे सगळ्या शकुंतला, प्रियंवदा, महाश्वेता, निपुणिका, मालविका, चित्रलेखाच दिसत होत्या. कण्व, शार्ङ्‌रव आणि एखादी वृद्ध गौतमीही दिसत होती. हल्ली शांतिनिकेतनच्या आश्रमात आश्रमहरिणींचीच संख्या अधिक आहे. इतके वर्ग चालले होते, परंतु कुठे कोलाहल वाटत नव्हता. हिरवळीवर गुरुजींपुढे अर्धचंद्राकार पंगत करून बसलेला छात्रगण. सकाळच्या कोवळ्या उ हात हिरवळीवरचे दंवबिंदू चमकत होते. मुलामुलींच्या अंगावरील रंगीबेरंगी लोकरी स्वेटर्सशी स्पर्धा करणारे डेलियाचे ताटवे. डेलियाच्या इतक्या विविध जाती यापूर्वी मी कधीही पाहिल्या नव्हत्या. आयुष्याची पहिली अकरा बारा वर्षे निसर्गाच्या साऱ्या लीला पाहात पाहात विद्या संपादन करणाऱ्या त्या मुलांचा मला हेवा वाटला.

एरवी शाळा म्हणजे कोंडवाडे, अंधारकोठड्या.

गुरुदेवांच्या बालपणी त्यांनीही असल्याच अंधारकोठड्या पाहिल्या. तसल्या त्या शाळा आणि तिथे मिळणारे ते घोकंपट्टीचे शिक्षण ह्याची त्यांना बालपणापासून घृणा होती. शांतिनिकेतनची उघड्यावरची शाळा ही लहानपणापासून मनात धरलेल्या शाळानामक तुरुंगाविरुद्ध त्यांनी केलेली 'प्रोटेस्ट' होती. एकोणिसशेएक सालच्या डिसेंबर महिन्यात त्यांनी ह्या माळावर ही उघड्यावरची शाळा काढली. त्या पाठशाळेचे नाव 'ब्रह्मचर्याश्रम' असे होते. त्या शाळेतल्या पहिल्या विद्यार्थ्यांमध्ये त्यांचा मुलगा रथीन्द्रनाथ होता. स्वतःच्या पोरांना कॉन्व्हेन्ट्स् किंवा अशाच श्रीमंत शाळांत घालून इतरांच्या पोरांना देशी भाषेत ढकलणाऱ्या पुढाऱ्यांच्या ह्या काळात बंगाली भाषेतून शिक्षण देणाऱ्या ग्रामीण शाळेत स्वतःच्या मुलाला घालणारे रवीन्द्रनाथ अव्यवहारी ठरले असते. ज्या टागोर कुटुंबातील मुले सोन्याच्या बोंडल्याने दूध पीत, त्यांना इथे ह्या अरण्यात आणून गावंढळ पोरांत बसवायचे, बंगाली असून शाकाहार द्यायचा, मास्तरांच्या हातातल्या छड्या काढून त्यांना पोरांच्या जोडीने नाचायला, गायला, नाटकात सोंगे घ्यायला लावायचे — सत्तर वर्षांपूर्वी बंगालात 'साहेब' व्हायची चढाओढ चालली होती. त्या काळात हा देशीपणा म्हणजे खूळच मानण्यात आले. ब्राह्मसमाजी टागोर मुलांना नाही ती वेडे शिकवतात म्हणून सनातनी बंगाल रुष्ट आणि आश्रमाच्या नावाखाली राजद्रोही क्रांतिकारक बनविण्याचा कट चालवलाय् म्हणून इंग्रज सरकारचा रोष. सुरुवातीला कलकत्त्यातल्या पालकांनी पूर्वी बोर्डीच्या शाळेत मुंबईचे पालक पाठवीत तशी आपली उनाड कार्टी 'बघ काही वळणावर आली तर' म्हणून इथे पाठवली. आणि ही मुले सुटीत घरी गेल्यावर चित्रे काढताना, गाणी गाताना, रात्री नक्षत्रांविषयी माहिती सांगताना आणि पदार्थविज्ञानशास्त्राच्या मौजांत रंगलेली पाहून त्यांना धक्काच बसला. हळूहळू बंगालची खात्री पटायला लागली की हा कवी अगदीच काही ढगांवर स्वार होऊन हिंडणारा नाही. पण ब्रिटिश सरकारला मात्र निराळा संशय होताच. टागोरांच्या शाळेत सरकारी नोकरांनी आपली मुले पाठवू नयेत असा सरकारचा गुप्त फतवा निघाला.

तपोवनाच्या कल्पनेने रवीन्द्रांना लहानपणापासून वेड लावले होते. जुन्या आश्रमीय शिक्षणपद्धतीवर त्यांची केवळ एक कल्पनारम्य वातावरण एवढ्याचसाठी श्रद्धा नव्हती. त्यांनी त्या शिक्षणपद्धतीचा खूप बारकाईने अभ्यास केला होता. यंत्रयुगाची चाहूलही ह्या कवीला वसंतऋतूच्या चाहुलीसारखी फार आधी लागली होती. माणूस निसर्गापासून दूर जाईल. त्याची उदात्ताची ओढ कमी होईल. कारकून बनवायच्या इंग्रजांनी काढलेल्या शाळा-कॉलेज नामक फ्याक्टऱ्यांमध्ये त्याचा आत्मा केवळ पोटभरू वृत्तीतच रंगेल. हा

धोक्याचा इशारा ह्या द्रष्ट्या कवीने पाऊणशे वर्षांपूर्वीच दिला आहे. वृक्षझऱ्यांचे गूढ मधुर गुज ऐकण्याची इच्छाच संपली की जीवनातल्या सौंदर्याला पूर्णविराम मिळतो. आणि फक्त कोरडा पाशवी उपयुक्ततावाद तेवढा उरतो. जीवनातले गाणे संपते. सुंदर स्वप्ने पाहून ती सत्यात आणण्याची जिद्दच नाहीशी होते. निसर्गाची नाना तऱ्हेची स्वरूपे, त्याची गूढ अनुभवण्याची आणि मानवी व्यवहाराचा अन्वयार्थ लावण्याची उत्कंठा निर्माण करणे हे शिक्षणाचे ध्येय. नाना अनुभवांनी समृद्ध होत आणि त्या समृद्धीत आपल्या कर्तृत्वाने भर घालीत जगण्याविषयी उत्साह निर्माण करायला, अंधेऱ्या खोल्यांतून मास्तरांच्या छडीच्या किंवा परीक्षांच्या धाकाने जिथे शिक्षण देण्याचे ढोंग चालते, असले वातावरण काय कामाचे ? टागोरांचे खेड्यांवर अतोनात प्रेम. खेड्याला बंगालीत पल्ली म्हणतात. 'पल्ली-संस्कृतीवर' त्यांनी कितीतरी सुंदर लेख लिहिले आहेत. कृषिप्रधान देशात, ही निसर्गाशी झुंजत, खेळत, त्याची भाबड्या मनाने मनधरणी आणि प्रार्थनाही करीत वाढलेली ऋषिप्रणित शिक्षणपद्धती, माणसांची मने मोकळी करू शकेल असा त्यांचा विश्वास होता. बाबू-संस्कृतीतला रोगटपणा ओळखणारा रवीन्द्रनाथ हा पहिला बंगालीबाबू निघाला. बाबू-संस्कृतीचा प्रभाव इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच ह्यांच्या आक्रमणामुळे सर्वांत आधी पडला तो बंगालवर. त्यामुळे सामान्य भारतीय म्हणजे कोणी तरी मागासलेला, असंस्कृत असे मानणारा आणि त्याच्यापासून दूर दूर जाणारा असा आंग्लभारतीयांचा वर्ग प्रथम बंगालात निर्माण झाला. जेत्या राज्यकर्त्यांचे अंधानुकरण हे जित गुलामांचे धोरणच असते. गोऱ्या साहेबाची कातडी मिळू शकत नव्हती त्यामुळे ती आणि त्याची सत्ता एवढे सोडून त्याच्या दैनंदिन वापरात येणाऱ्या आणि बाजारात मिळणाऱ्या साऱ्या वस्तूंचा स्वीकार करून 'काळा साहेब' तयार होत होता. बंगालने ह्या बाबतीत आघाडी मारली होती. बंगालने म्हणण्यापेक्षा कलकत्त्याने. तिथे ही लागण प्रथम झाली. वास्तविक टागोर कुटुम्ब हे एखाद्या राजघराण्यासारखे. इंग्रज गव्हर्नरापासून ते इतर लहानमोठ्या गोऱ्या लोकांशी त्यांचा घनिष्ठ संबंध. कुटुंबातले सर्वजण आंग्लविद्याविभूषित. कुटुम्बही चांगले भरघोस. रवीन्द्रनाथ हे देवेन्द्रनाथांचे चौदावे अपत्य. दोन नंबरचे बंधू सत्येन्द्रनाथ हे भारतातले पहिले आय्.सी.एस्. कुणी फ्रेंच भाषापंडित, कुणी संगीतज्ञ, कुणी चित्रकार. सगळे देखणे. युरोपच्या यात्रा आजोबांच्या काळीच सुरू झालेल्या. असे असूनही देवेन्द्रांच्या उपनिषदावरील नितान्त श्रद्धेने म्हणा, ऋषितुल्य आचरणाने म्हणा, कशामुळे कोण जाणे, पण साऱ्या कुटुम्बाचा आत्मा भारतीय संस्कृतीतल्या सौंदर्यशोधात रमलेला. भारतीय ऋषींनी जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रासंबंधी केलेल्या विचाराविषयी नितान्त आदर. संस्कृत भाषेवर अतोनात प्रेम. प्राचीन साहित्य, तत्त्वज्ञान, संगीत, नृत्य, नाटक, शिल्प

ही सुन्दर भारतीय कलापरंपरा इंग्रजांच्या आक्रमणामुळे आपण गमावून बसतो आहो, म्हणजे पर्यायाने 'स्वत्व'च गमावून बसतो आहो याविषयी फार मोठी खंत. ह्या साऱ्या रोगटपणाचे कारण आंधळेपणाने उचललेली मेकॉलेसाहेबाची लहान मोठे कारकून तयार करण्याच्या उद्देशाने बनवलेली शिक्षणपद्धती, असे रवीन्द्रांचे वयाच्या वीस बावीस वर्षांपासूनच मत होते. बंगालीत बाबूवर्गाला 'मसीजीवी' म्हणजे 'शाई-जीवी' असा अत्यंत समर्पक शब्द आहे. असले 'मसी-जीवी' तयार करणाऱ्या शिक्षणानेच भारतीयांच्यात न्यूनगंड निर्माण केला. इंग्रजी भाषा येणे हीच जीवनाची इतिकर्तव्यता आहे हे मानणाऱ्या ह्या वर्गाला आपल्या स्वत्वाचाच विसर पडला होता. साहित्य असो, संगीत असो, की विज्ञान असो. त्याच्या उपासकाची रवीन्द्रांच्या मनःचक्षूंपुढली मूर्ती ही युरोपीय वेषातल्या गावठी साहेबाची नव्हती. कामशास्त्रापासून ते अध्यात्मविषयापर्यन्त प्रत्येक विषयाचा अंत पाहण्यासाठी सर्वसंग परित्याग करून ज्ञानसाधना करणाऱ्या तपोवनवासी ऋषीची होती. मला तरी टागोरांच्या स्वतःच्या वेषभूषेचे रहस्य त्यांच्या त्या ऋषि-प्रतिमेच्या आदर्शातच आढळते. 'कवी' म्हटल्याबरोबर त्यांच्या डोळ्यापुढे व्यास आणि वाल्मिकीच उभे राहात असले पाहिजेत.

•

शांतिनिकेतनातल्या तपोवनात त्यांनी हा प्राचीन आदर्श डोळ्यापुढे ठेवूनच ब्रह्मचर्याश्रमाची स्थापना केली. मात्र इथे ब्रह्मचारी याचा संकुचित अर्थ नव्हता. सुन्दर गृहस्थाश्रमाची पूर्वतयारी करणारे आणि जीवनातले सारे आनंद आणि चारी अर्थ समर्थपणाने भोगायला सिद्ध करणारे ब्रह्मचर्यच त्यांना अभिप्रेत होते. आपल्या प्राचीन आश्रमांत पहिल्यापासूनच 'को-एज्युकेशन' असावे. कण्वांच्या आश्रमात स्त्रियांना मज्जाव नव्हता. परंतु कण्वांच्या काळानंतर गंगेचे बरेच पाणी वाहून गेले होते. मुसलमानी आक्रमणानंतर बायका गोषांत गेल्या. बंगालात बायकांचे सारे आयुष्य माजघर आणि स्वयंपाकघरात. आजदेखील पदर तोंडाआड धरून बोलणाऱ्या बंगाली स्त्रियांची संख्या कमी नाही. ह्या शतकाच्या सुरुवातीला तर मुसलमानी सरंजामशाहीने लादलेला गोषाही होता. अशा काळात टागोरांनी सहशिक्षण सुरू केले.

'साहेब' आणि 'साहेबी' हा आदर्श असल्याने निसर्गाच्या सान्निध्यात माणसांची मने मुक्त करणारे भारतीय ऋषिप्रणित शिक्षण देण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्यांना परदेशी राज्यकर्ते आणि त्या राज्यकर्त्यांचे देशी दास ह्या दोघांकडून थपडाच मिळत होत्या. तरुण रवीन्द्रांच्या जीवनातली एक लक्षणीय घटना आहे. बिहारीलाल गुप्त नावाच्या आपल्या एका मित्राकडे ते सुटीत राहायला गेले होते. एके दिवशी त्या मित्राने एका इंग्रज प्रिन्सिपालला जेवायला बोलावले होते. गुप्त मंडळी 'साहेबी' मानणारी होती. त्या काळी

कोर्टातल्या ज्यूरीत भारतीय लोकांना घ्यावे की नाही याविषयी ब्रिटिश सरकारचा विचार चालला होता. लोकांतही आन्दोलन सुरू झाले होते. ह्या इंग्रज प्रिन्सिपालसाहेबचे मत होते, "—भारतीयांचा नैतिक दर्जा अगदी नीच. त्यांना जीवनातले पावित्र्य म्हणजे काय तेच कळले नाही. त्यामुळे ज्यूरीतले सदस्य होण्याची भारतीयांची लायकीच नाही.—" रवीन्द्रांनी ह्या प्रसंगाचा उल्लेख करताना लिहिले आहे, " ..एका बंगाली घरात आमंत्रित पाहुणा म्हणून येऊन बंगाल्यांच्यात बसून, असले उद्‌गार काढायला ज्याला यत्किंचितही संकोच वाटला नाही — त्या माणसाकडे आम्ही कसल्या नजरेने पाहावे ? — हा शिक्षण देणारा गुरू ? - हातात हातकड्या घालून तुरुंगातले कैदी अन्न खायला बसतात त्याला यज्ञीय भोजनाची पंगत म्हणणे ही जशी विटंबना आहे, तशीच कारकुनीला लागणारे गुलाम करण्यासाठी शिक्षणाचे जे तुकडे टाकण्यात येतात त्याला ज्ञानाची साधना म्हणणे ही एंक विटंबनाच आहे. आमच्या शाळा म्हणजे परीक्षा नावाच्या राक्षसीपुढे बालकांचे बळी देण्याच्या जागा. 'भीती' हा तिथला स्थायीभाव, आनंद हा नाही. भयभीत शिष्य आणि भयग्रस्त गुरु. ज्ञान देण्याचा आनंद नाही आणि घेण्याचा नाही.

गुरुदेव 'कवी' असल्यामुळे त्यांना मुख्य वेड होते ते आनंदाचे, मुक्ततेचे, विशालतेचे ! 'ब्रह्मचर्याश्रम' ही जीवनातल्या आनंदाचा शोध घेणाऱ्या कवीने स्थापन केलेली जागा होती. इथल्या प्रत्येक कृतीमागे कविप्रतिभेचा सुवर्णस्पर्श आहे. गुरुदेवांनी बांधलेले छात्रावास, ती टुमदार कुटिरे, मातीने सारवलेल्या भिंती, ती गवतांची छपरे, - प्रत्येक वास्तूला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. उन्हा-पावसापासून आवश्यक तेवढे संरक्षण असले तरी विद्यार्थ्यांनी ते ऊन आणि ती वृष्टी भरपूर भोगलीही पाहिजे याकडे त्यांचे लक्ष होते. ऋतूंचे खेळ हे भूगोलाच्या पुस्तकातून पाठ करायचे नसून वसंतापासून शिशिरापर्यंतचे हे ऋतुचक्र कसे गमतीने फिरते ते त्यांना प्रत्यक्ष दिसले पाहिजे. शांतिनिकेतनातल्या तीन महिन्यात मी देखील हेमंताला निरोप देण्यापासून वसंताचे स्वागत होईपर्यंत होणारे ऋतुपरिवर्तन आयुष्यात प्रथमच पाहात होतो. बदलणारे वारे, अकस्मात दरवळणारे नवे सुगंध, टपटप गळणारी पाने, उन्हाचे बदलत जाणारे पिवळेपण हे सारे सृष्टिचमत्कार पहिली ते मॅट्रिकपर्यंतच्या एकाही भूगोलाच्या पुस्तकातून मला दिसले नव्हते. '- नेमेचि येतो मग पावसाळा - हे सृष्टिचे कौतुक जाण बाळा' ही कविता मास्तरांच्या छडीच्या धाकाने पाठ केली होती. ते कौतुक बाळाने नीट जाणावे यासाठी आमच्या कुठल्याही शिक्षकाने 'जरा खिडकीबाहेर पाहा' एवढे देखील सांगितले नव्हते. इथे मात्र रोज त्या हिरवळीवर बसताना गवताच्या पात्यांची बदलत जाणारी स्वरूपे पाहून सारा भूगोल इथल्या छात्रांच्या मनात हळूहळू झिरपत होता.

इथे विद्याभ्यासाचा हा सुन्दर खुला रंगमंच होता. कितीतरी पत्रे आणि ती घडविणारे ते 'कुंभार.' नामदेवाचे डोके थोपटून गोरोबांनी ते कच्चे आहे म्हटल्याची कथा मला फार आवडते. गुरूंनी ती चिमुकली मने प्रेमाने भिजवावी, चांगल्या संस्कारांनी हळुवारपणाने थापटाथोपटावी आणि ज्या क्षेत्रात ती कामी लावण्यात येणार आहेत त्या क्षेत्राला आवश्यक अशा साधनेच्या तपात ती भाजली जावी, तेव्हाच ती इष्ट आकार असलेली 'सत्पात्रें' होणार. खुल्या वातावरणातल्या त्या शाळेत, नुसती मजा करावी हा गुरुदेवांचा हेतू नव्हता, तिथे अभ्यासाची तपःसाधना होती. फक्त घाऊक प्रमाणात एकाच छापाच्या विटा भाजून काढायचा तो 'शाळा'नामक कारखाना होऊ नये यासाठी त्यांची धडपड होती. प्रत्येक शिल्प होता होईल तितके स्वतंत्र रीतीने घडावे या हेतूने त्यांनी ही आश्रमीय शिक्षणपद्धती स्वीकारली होती. मुकुल दे यांच्यासारखा आज जागतिक कीर्ती मिळविलेला चित्रकार शाळेतल्या गणित, व्याकरण वगैरे विषयांत अजिबात रमत नसे. गुरुदेवांनी त्याच्या हाती रंग, कागद आणि ब्रश दिले आणि सांगितले — "ह्यात तुला मुक्ती लाभतेय ना, मग चित्रे काढ." शांतिदेव घोषाना सुरांचे आणि नृत्याचे प्रेम. त्यांना तंबोरा आणि घुंगूर दिले. निसर्गात वृक्ष वल्ली जशा स्वधर्माने वाढतात तसे मानवी जीवन *वाढले पाहिजे. नारळाच्या* झाडाकडून आंब्याची अपेक्षा केली नाही, आणि भेंडीच्या रोपाला केळी का लटकत नाहीत याची चिंता केली नाही. एकदा रोप कसले आहे हे ओळखल्यावर मग त्याला योग्य ते खतपाणी देऊन ते कसे फुलेल आणि फळ धरील ते मात्र पाहिले. त्याप्रमाणे जोपासले. सगळ्या झाडांना पाणी, ऊन आणि माती हवीच त्याप्रमाणे किमान आवश्यक शिक्षण देऊन ज्याची जिथे गती त्या क्षेत्रात त्याची मूळ बीजधर्माप्रमाणे वाढ कशी होईल ते पाहिले. म्हणूनच शांतिनिकेतनात मुलामुलींची भरती प्राथमिक शाळेपासून करण्याचा त्यांचा आग्रह असे. एकदा ते बालक किंवा बालिका शांतिनिकेतनच्या शिशुभवनात दाखल झाले की मॅट्रिक होईपर्यन्त आश्रम सोडायला तयार होत नसे. आजही होत नाही.

परक्यांच्या राजवटीत गुरुदेवांनी हे कार्य उभे केले. अनेक निष्ठावंत सहकारी जोडले. शिवाजीमहाराजांनी रांगड्या मावळ्यांमधून महान योद्धे उभे केले, तसे टागोरांनी आपल्या जमीनदारीत साधी कारकुनी करणाऱ्या सेवकांमधून जगदानन्दबाबूंसारखे तपोधन गुरु तयार केले. गांधी आणि टागोर ह्यांनी आपल्या कार्यासाठी केवळ हिंदुस्थानातूनच नव्हे तर साऱ्या जगातून जी माणसे जोडली, ते पाहिल्यावर थक्क व्हायला होते. गुरुदेवांच्या शिक्षणकार्यात आलेल्या ह्या साध्यासुध्या शिक्षकांनी बंगाली भाषेला अमोल ग्रंथांची लेणी चढवली आहेत. लहान मुलांसाठी ज्ञानविज्ञानाचे, मनोरंजक कहाण्यांचे, थोरामोठ्यांच्या चरित्रांचे, भारतीयांच्या वीरकथांचे, नाटकांचे, गाण्यांचे, निबंधांचे स्वतः

गुरुदेवांनी तर ग्रंथभांडार लिहिलेच, पण त्यांच्या प्रेरणेने ह्या जोडीच्या शिक्षकांनीही आज बंगालीत ज्यांना 'क्लासिक्स' म्हणता येईल अशी असंख्य पुस्तके लिहिली आहेत. 'माझ्या छात्र-छात्रींचे कल्याण' हा एवढा एकच ध्यास घेऊन ही माणसे आयुष्याची चाळीस-चाळीस पन्नास पन्नास वर्षे आश्रमात कार्य करीत राहिली.

'यत्र विश्वम् भवत्येकनीडम्' जिथं विश्व हेच एक घर होईल असा संकल्प सोडून गुरुदेवांनी हा ज्ञानयज्ञ सुरू केला होता. त्या यज्ञभूमीत सकाळच्या त्या प्रसन्न वेळी मी भोवती फुललेले शैशव आणि यौवन पाहात होतो. जाणत्या स्नेहशील वृद्ध वृक्षासारखे अध्यापक. लहानग्या फुलांच्या रोपट्यांना पाय फुटून ती धावत सुटावी अशी शिशुसेना. मोहर फुटल्यासारखे कौमार्य. मधूनमधून भारतीय पोशाखात युरोपीय आणि अमेरिकन छात्र-छात्री. एक जपानी गृहस्थ गळ्यात पिशवी लटकावून चालला होता. सयामकडले तरुण बुद्धभिक्षू नारिंगी वस्त्रे परिधान करून निघालेले. तेवढ्यात मला दोघा तरुणांनी नमस्कार केला. आणि एकदम मराठीत बोलायला सुरुवात केली. एकाचे नाव समर्थ. दुसरे माझ्यासारखे देशपांडे निघाले. समर्थ राज्यशास्त्रावर प्रबंध लिहिताहेत आणि देशपांडे तत्त्वज्ञानावर. त्या दोघांच्याही तोंडून विश्वभारती, तिथले अध्यापक, त्यांचे ग्रंथसंग्रहालय याची इतकी प्रशंसा चालली होती की पुन्हा एकदा ते खरोखरीच मराठी आहेत की बंगाली असून मराठी बोलताहेत याची खात्री करून घ्यावी असे मला वाटायला लागले. दुसऱ्या प्रांतातल्या लोकांबद्दल इतके चांगले बोलायची आपल्या देशात कुठल्याच प्रांतातल्या लोकांना सवय नाही. मी महाराष्ट्राबाहेरच्या अनेक महाराष्ट्र मंडळात गेलो आहे. बहुतेक ठिकाणी 'इथले लोक अजिबात आमच्याशी मिसळायला तयार नाहीत' हाच सूर. विशेषतः बंगाली आणि मराठी ह्यांच्यावर तर प्रांतीयतेचा आरोप जवळजवळ सगळेच करतात. अशा परिस्थितीत हे दोन मराठी तरुण बंगाली लोकांची आणि विशेष म्हणजे त्यांच्या गुरुजनांची आणि विद्यापीठाची तारीफ करताना ऐकल्यावर त्या सप्तपर्णीच्या छायेत हेही बिघडलेले दिसताहेत असे मला वाटले. मी कॉलेजात शिकवत नसल्यामुळे तरुण पिढीशी माझा घाऊक संबंध फार कमी येतो. पण एक चमत्कार मात्र मी पाहिला आहे. ज्या ज्या तरुण-तरुणींशी माझा परिचय झाला आहे त्यांतल्या अगदी संतप्त तरुणांचीदेखील माणुसकी सुटली आहे असे मला वाटत नाही. इतकेच नव्हे तर जुन्या पिढीतल्या जात, धर्म, प्रांत, भाषा वगैरे क्षुद्रतेचाही त्यांच्यावर बराच कमी पगडा दिसतो. स्वार्थ आणि क्षुद्रता ही वाढत्या वयाबरोबर वाढत असावी.

रवीन्द्रांचे वाङ्मय हा अभ्यासाचा विषय नसूनही त्या दोघांनी चांगले वाचलेले दिसले. वर्षा दीड वर्षाच्या मुक्कामात सफाईदार बंगाली बोलणेही उचलले होते. दोघेही पहिल्या

वर्गात उत्तीर्ण होणारे विद्यार्थी होते. शांतिनिकेतनात आणखी कोणी मराठी विद्यार्थी आहेत की काय याची मी चौकशी केली. हिंदी भवनात वाईचा एक विद्यार्थी होता. संगीत भवनात अभिजात भारतीय संगीताचे अध्यापक नागपूरचे वझलवारजी गेली तीस वर्षे असल्याचे कळले. मनात म्हटले, हे बरं झालं. कारण रोज जरी पंचपक्वान्नं मिळाली (उदाहरणार्थ !) तरी मला पंधरावीस दिवसांतून भाकरी आणि पिठल्याशिवाय इतर कशानेही न भागणारी भूक लागते. लसूण हा माझा अत्यंत आवडीचा पदार्थ आहे. बंगाली रांधपात लसूण आणि हिंग वर्ज्य. एकदा मी कॅण्टीनमध्ये लसणीच्या फोडणीची मागणी केली. आधी डिक्शनरीत लसूण ह्याला बंगालीत 'रशून' म्हणतात हे पाहून घेतले होते. मी 'रशून' मागवल्यावर त्या वेटरने असा चेहरा केला की बंगालीत रशून याचा अर्थ बंगाली इण्टू इंग्लिशमध्ये गार्लिक-बल्ब् याच्या जोडीला ॲसिड बल्ब् असाही आहे की काय ते पाहायला हवे असे मला वाटले. बंगालीत तो असे काही बोलला की, मला त्यावेळी बंगाली अजिबात समजत नसले तरी त्या वाक्याचा, शीः असली घाण आम्ही खात नाही - असा अर्थ असावा एवढे समजले. असो. वझलवारजींची ओळख झाल्यावर हळूच झुणका-भाकर सहभोजनाची योजना मांडायचे ठरवले. त्या निसर्गरम्य वातावरणात लसणीची फोडणी आठवावी हे काही फारसे काव्यमय नव्हते, पण मन हे ओढाळ गुरू—

"डॉ. भूदेव चौधरींचा वर्ग कुठल्या झाडाखाली भरतो हो ?" मी माझ्या तरुण मित्रांना विचारले.


"तो काय—" गौरप्रांगणातल्या सिंहसदनासमोर उघड्यावर बसलेल्या एका कोंडाळ्याकडे बोट दाखवीत माझे तरुण मित्र म्हणाले. मी त्यांचा निरोप घेऊन तिथे गेलो. आठ दहा जणांचाच तो वर्ग होता. चार पाच छात्री आणि चार पाच छात्र. बंगालीत विद्यार्थ्यांना 'छात्र'च म्हणतात. कोवळी उन्हे अंगावर घेत बंगाली नाट्येतिहासाचा बी.ए.चा अभ्यास चालला होता. भूदेवबाबूंनी आपल्या विद्यार्थ्यांशी परिचय करून दिला. बंगालीत एखाद्याशी परिचय करण्याला 'आलाप' करणे म्हणतात. अमक्या अमक्याबरोबर तुमचा 'आलाप' झाला आहे की नाही असे विचारतात. स्नेह हा जोडीने बोलण्यापेक्षा जोडीने गाण्यातूनच अधिक घनिष्ठ व्हावा हे योग्यच आहे ! मला हे परिचयाऐवजी 'आलाप' होणे फार आवडले. संभाषणालाही बंगालीत आलापच म्हणतात. अर्थात सगळीच बंगाली संभाषणे 'आलाप' म्हणायच्या योग्यतेची असतात असे नाही. संगीतातही आलापाप्रमाणे, खटके असतात, हरकती असतात. शेवटी माणसेच ती. त्यांच्याही संभाषणात आलाप, प्रलाप, विलाप, अपलाप सगळे आहे ! डॉ. भूदेवबाबूंनी मी महाराष्ट्रातला स्वनामधन्य शिल्पी आहे असा 'आलाप' केल्यामुळे मी

दचकलो. ह्या बंगालीने तसे मला अनेक बारीक सारीक धक्के दिले. मी माझ्या बंगालीतून त्याची हळूहळू परतफेड केली हा भाग निराळा. पण मी 'शिल्पी' कसा ? पण बंगालीत कलावंताला शिल्पी हाच शब्द आहे. लेखकाचे शब्दशिल्प, नाट्यशिल्प, छबीशिल्प, संगीतशिल्प वगैरे वगैरे ! आमचा मराठी शिल्पकार फक्त दगडातून शिल्प करीत असतो.

[illegible] औपचारिकपणा नव्हता. एका प्लॅटफॉर्मवर उभे राहून पुढीलांच्या डोक्यात काही शिरते आहे की नाही याची तमा न बाळगता एका घंटेपासून दुसऱ्या घंटेपर्यन्त नॉनस्टॉप बोलत राहणारे आमचे प्राध्यापक आणि समोरच्या छात्रांना विश्वासात घेऊन माहिती देणारे भूदेवबाबू. किती परस्परविरोधी होती ही दोन चित्रे. शांतिनिकेतनासारखा अपवाद सोडला तर हल्ली आपल्या देशात सगळीकडे वर्ग म्हणजे कंटाळलेल्या चेहऱ्यांची एक सभा असते. मी विद्यार्थी होतो त्या काळी वर्गात इतकी मोठी भरती नसे. वर्ष सहा महिन्यात प्राध्यापकांना सगळ्यांची नावेदेखील ठाऊक व्हायची. हल्ली घाऊक उत्पादनाचे दिवस. विद्यार्थ्यांची कुठली ? विद्यार्थ्यांना प्राध्यापकांचीही नावे ठाऊक नसतात. हे उभयपक्षी सोयीचे असते हा भाग निराळा म्हणा !

तास संपला. झाडाखालची पाखरे चारी दिशांना भिरभिरायला लागली. मी लायब्ररीकडे गेलो. लायब्ररीची सध्याची ही टुमदार इमारत खूप जुनी आहे. भिंतीवर अवनीन्द्रनाथांची काढलेली अजिंठ्यासारखी प्राचीन चित्रे आहेत. अवनीन्द्रनाथ टागोर आणि नन्दलाल बसू हे चित्रकलेतले महान दिग्गज. गुरुदेवांनी हजारो कविता लिहिल्या. नंदलालबाबूंनी हजारो चित्रे काढली. खुद्द रवीन्द्रांनी वयाच्या पन्नासाव्या वर्षी चित्रकलेची आराधना सुरू केली आणि दीड दोन हजार चित्रे काढली. किंबहुना जगाच्या चित्रकलेच्या इतिहासात टागोरांच्या चित्रकलेसाठी स्वतंत्र प्रकरण लिहावे लागेल. आनंदकुमार स्वामींसारख्या जागतिक कीर्तीच्या कलाशास्त्रज्ञाने रवीन्द्रांच्या चित्रकलेवर भाष्ये लिहिली आहेत. चित्र, संगीत, साहित्य, कृषी एवढेच नव्हे तर वैद्यकातही रवीन्द्रनाथांना विलक्षण रस ! ते स्वतः हौशी डॉक्टर होते. बाराक्षार चिकित्सा, होमिओपाथी वगैरे वैद्यकांचा त्यांचा दांडगा अभ्यास. बंगाली जीवनात मासे, मिठाई, संगीत, बस जाळणे, आणि होमिओपाथी हे महत्त्वाचे पंचरंग आहेत. टागोरांना बस जाळणे वगैरे जमले नाही पण डॉक्टरची मोठी हौस. गांधींनाही वैद्यकीचा रोग होता. गांधीप्रमाणे टागोरांनीही स्वतःवर आहाराचे अनेक प्रयोग केले. गांधींचे तर सत्याचे आणि पथ्याचे दोन्ही प्रयोग चालत. पण टागोर कवी असूनही ह्या बाबतीत अंतःप्रेरणावादी नव्हते. वैद्यक विषयावरचा फार मोठा ग्रंथसंग्रह त्यांच्यापाशी होता. त्या ग्रंथांत ठिकठिकाणी शाळकरी विद्यार्थ्यांप्रमाणे टागोरांनी अधोरेखा

काढल्या आहेत, समासात टिपणे केली आहेत. त्यांच्या अड्ड्यावर साहित्यिक, तत्त्वज्ञ, संगीतकार, चित्रकार ह्यांच्याप्रमाणे 'पेशंट' लोकांचाही राबता असे. एकतर काव्याचा आणि वैद्यकाचा काहीतरी संबंध असला पाहिजे. बंगालीत वैद्याला 'कविराज' म्हणतात. टागोर असलेही कविराज होते. हा 'रवि' पोहोचला नाही असे एकही क्षेत्र नव्हते. जपानी 'जुजुत्सू'मध्ये टागोरांना इतकी गती होती की शांतिनिकेतनातल्या छात्रांना जुजुत्सू शिकवायला त्यांनी जपानी मल्ल आणून ठेवले होते. इतकेच नव्हे तर कलकत्त्यातल्या नृत्य, संगीताच्या कार्यक्रमांत विश्वभारतीतल्या जुजुत्सू मल्लविद्येचेही खेळ करून दाखवीत! रवीन्द्रनाथ जमीनदारीचे हिशेबठिशेब तपाशीत. फार कशाला, भारतीय उद्योगधंद्याची प्रगती व्हावी. म्हणून ते व्यापारातही पडले होते. त्यांच्या बंधूंनी स्वदेशी आगबोट कंपनी काढली होती. ती स्वदेशी आगबोट आणि कंपनी एकदमच बुडाली. व्यापारात बंगाली आणि मराठी लोकांना तितकेच समजते. व्यापाराचा मुख्य उद्देश येन केन प्रकारेण नफा मिळविणे हा असतो हे मूलतत्त्व ह्या अती बुद्धिमान प्रांतांतल्या लोकांच्या ध्यानात आलेले नाही. बंगाली भाषा गोड असली तरी बंगाली दुकानदार आणि कारकून ह्यांच्या भाषेला एकच वळण आहे. ह्या कारकुनी भाषेचा दणका मला खुद्द शांतिनिकेतनातल्या ह्या ग्रंथालयात मिळाला. टागोरांनी बंगाली भाषेत कितीही सुधारणा केल्या तरी दुकानदार आणि कारकून ह्यांची भाषा ते सुधारू शकले नाहीत.





तपोवन, आश्रम, गुरु-शिष्यांचे प्रेम, संगीत, चित्र अशा सुन्दर कल्पना डोक्यात घेऊन मी लायब्ररीत शिरलो. भिंतीवरच्या म्यूरल्सकडे मी अनिमिष डोळ्यांनी घटकेपूर्वीच पाहिले होते. ग्रंथालयातून मला पुस्तके मिळण्याचीही व्यवस्था झाली होती. मी तिथे जाऊन चौकशी केली. तिथल्या एका माणसाने मला मुख्य ग्रंथपालांना भेटायला सांगितले. मी आपला 'धू' म्हटले की धुणारा. ग्रंथपालांच्या खोलीत गेलो. जोडीच्या गृहस्थांनी मी कोण, काय, वगैरे सांगितले. ग्रंथपालावर काहीही परिणाम झाला नाही. त्यांनी शांतपणाने मला पंचवीस रुपये डिपॉझिट भरायला सांगितले. मी खिशात हात घातल्यावर, 'पैसे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ब्लॉकमध्ये जाऊन भरा. इथे पैसे घेतले जात नाहीत' अशी दोन वाक्ये लाकडी पुतळ्याच्या तोंडून पडल्यासारखी पडली. तरीही चेंगटपणाने मी माझ्या अभ्यासाच्या दृष्टीने सुरुवातीला कुठली पुस्तके वाचावी ह्याबद्दल सल्ला विचारला. 'ही माहिती उपग्रंथपालाकडे मिळेल' — असे आणखी एक वाक्य त्यांनी टाकले. मी उपग्रंथपालाच्या शोधात निघालो. भोवती हजारो ग्रंथ दिसत होते. पण पंचवीस रुपये डिपॉझिट आणि फी भरून कार्ड घेतल्याखेरीज त्या ज्ञानकुंभांना स्पर्श करण्याचा मला अधिकार नव्हता. 'मराठी

लेखककबिखक असलात तर घरचे - इथे आधी वर्गणी भरा—' असे ती पुस्तके मला सांगताहेत, असे मला वाटले. मला हे सारे अपमानास्पद वाटत होते. पण मी देखील 'मना शांत हो' असे म्हणत उपग्रंथपालापुढे हस्तिदंती केली. त्यांनीही सुरुवातीला नियम सांगितला. माझ्या कुंडलीत ग्रंथपालांचे आणि माझे प्रथमदर्शनी प्रेम जमू नये असा योग असावा. माझ्याकडे पाहून 'हा इसम पुस्तके वाचणाऱ्यांतला नसावा' असे वाटावे असेच काहीतरी माझ्या चेहऱ्यात असावे. हल्ली अनेक ग्रंथपाल माझे स्नेही आहेत. किंबहुना मी काय वाचावे हे तेच ठरवतात. शांतिनिकेतनातले उपग्रंथपाल वीरेन-दा तर माझे चांगले मित्र आहेत. पण एकूण प्रकारावरून लक्षात आले की विश्वभारतीला आता लाल फितीची वाळवी लागली आहे. हे लाल जंत संस्थेच्या पोटात शिरले की तिला नाना व्याधी होतात.

मग मी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ब्लॉक शोधत गेलो. प्रचंड इमारत. विश्वभारतीचे राष्ट्रीयीकरण झाल्यामुळे कवी-साहित्यिकांच्या लेखण्यांपेक्षा निम्नस्तर ते उच्चस्तर कारकुनांच्या लेखण्यांनाच तिथे अधिक शाई लागते. त्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ब्लॉकमध्ये कारकुनी बोरूंचे बेट माजले होते. "लायब्ररीला लागणारे पंचवीस रुपये कुठे भरायचे हो?" हा प्रश्न घेऊन मी मेजयात्रा सुरू केली. कॅरममधल्या चकतीसारखे मला तिथले कर्मचारी मेजाकडून मेजाकडे उडवीत होते. मी मनात एकापासून हजारापर्यंत अंक मोजीत ही परिक्रमा करीत होतो. मुम्बईच्या कचेऱ्यांतून एखादा तरी वाचक किंवा प्रेक्षक भेटतो. इथे कुणाची ओळख ना देख. शेवटी पैसे घेणाऱ्या कारकुनाच्या खिडकीपुढे गेलो. तिथे मला लांबलचक क्यू लागला होता. त्यात जाऊन जागा धरली. क्यूमध्ये छात्र-छात्रींची संख्याच फार होती. फिया भरायला आले असावेत. पैसे जमा करणाऱ्या माणसाची कार्यक्षमता पाहून तास दीड तासाची निश्चिन्ती झाली असे वाटायला लागले.

महाराष्ट्रात मी गल्लीतला ब्रॅडमन असल्यामुळे रांग वगैरे धरावी लागत नाही. अरुंद बोळकांडीसारखी जागा. इकडे तिकडे पाहायची सोय नाही. तरुण विद्यार्थी-विद्यार्थिनींचे हास्यविनोद चालले होते त्यामुळे त्यांचा वेळ बरा जात होता. मी मात्र घड्याळाचा तो न सरकणारा काटा पाहात उभा होतो. अशा वेळी आपली जपजाप्यावर श्रद्धा असायला हवी असे वाटते. म्हणजे जपमाळ काढून 'नमःशिवाय' म्हणत लक्ष शिवनामाचा जप केला असता. कंटाळा घालवण्यावर 'जप' हा एक चांगला तोडगा असावा. तेवढ्यात मंटूबाबू दिसले. त्या 'क्यू'मध्ये 'रडवे माझे वदन बघोनी' त्यांना कीव आली असावी. 'महाराष्ट्रदेशेर देशबोरेन्यो शाहित्य शिल्पी एम् पोद्‌मोश्री पी.एल्. देशपांडेदा' हातात लायब्ररी डिपॉझिटच्या पंचवीस रुपयांच्या नोटा घट्ट धरून क्यूमध्ये उभे राहिलेले पाहून

त्यांना वाईट वाटले. त्यांनी त्या क्याशरजवळ जाऊन बहुधा ज्योती बसू किंवा नक्षलवाडीचे चारू मुझुमदार पु. ल. देशपांडे असे नाव घेऊन गुप्त वेषाने इथे आले आहेत असे काहीतरी सांगितले असावे. कारण क्यू मोडून पैसे घेतले म्हणून त्या मुला-मुलींनीही तक्रार केली नाही. मी रिसीट घेऊन निघाल्यावर मंटूबाबू म्हणाले, ''एवढ्याने झाले नाही. ही पावती दाखवून आणखी एक पावती घ्यावी लागेल.'' मग त्यांनी मला आणखी एका बाबूच्या पायावर नेऊन घातले. त्यानी माझा चेहरा आणि पावती नीट न्याहाळली आणि दुसऱ्या टेबलाकडे बोट दाखवले. त्यानेही ती पावती आणि 'मी' ह्यांची पुन्हा न्याहाळणी केली आणि चक्क पुढल्या खुर्चीवर 'बोशून' म्हणाला. गळ्याशी हुंदका दाटल्याचे अंधुक स्मरते. मग त्याने मला आणखी एक पावती घेतल्याची पावती दिली. आठ आणे घेऊन पुस्तके नेल्या-परत केल्याची एक नोंद-पुस्तिका दिली.

''ही पावती आणि पुस्तक लायब्रेरियनकडे द्या म्हणजे तो तुम्हाला नोंदवून घेईल.''

''आणि ही पावती ?''

''ती जपून ठेवा. पंचवीस रुपये परत नेताना ती दाखवावी लागेल.''

मी नोंदवून घ्यायला पुन्हा लायब्ररीत गेलो. लायब्ररी बंद झाली होती. प्रवेशद्वार बंद करणाऱ्या माणसाला विचारले —

''लायब्ररी पुन्हा केव्हा उघडणार ?''

''दुपारी चार वाजता—''

आता बंगाली मुळाक्षरांशी माझी झटापट सुरू झाली होती. देवनागरी लिपीशी बंगालीचे खूप साम्य असले तरी बंगाली लिपी अधिक देखणी आहे. तिच्या डोक्यावर वेलांटी असली तरी मात्रा नाही. मात्रा थोडीशी कमरेत लचकून अक्षराआधी येऊन उभी राहते. बंगाली भाषेपुढे आपली मात्रा चालत नाही. के खे गे काढायचे तर आधी एकाराची मात्रा आणि तिच्यापुढे क-ख-ग ! माझ्यापाशी बंगाली मुळाक्षरांचे पुस्तक होते. त्यावरून मी पुस्ती काढायला सुरुवात केली. बाजारातून चक्क स्लेट पाटी आणली. प्राथमिक शाळा सुटून पाटी फुटल्याला मोजून एकेचाळीस वर्षे झाली होती. जरीची टोपी आणि स्लेट पाटी हल्ली मला क्वचितच पाह्यला मिळते. आमच्या बिगरी ते चौथी ह्या पाच यत्ता पाटीवरच भागल्या. इंग्रजी पहिलीत आल्यावर पाटीशी संबंध सुटला. सलील आणि मी बोलपूरच्या बाजारात 'पाटी' आणायला निघालो. एकजात भिकार पाट्या. पूर्वी त्या काळ्याशार दगडाच्या काय सुंदर पाट्या मिळत. मग कोळशाने घासून ती पाटी लख्ख करायची. वर्गातल्या श्रीमंत मुलांकडे वहीसारख्या उघडणाऱ्या बिजागऱ्यांच्या 'डबल पाट्या' असत. एका पाटीवर शुद्धलेखन आणि दुसरीवर 'गणिते' हा घरचा अभ्यास त्यांच्यावरून अलगद न्यावा लागत असे. श्रीमंत पोरांकडे 'दुधी पेणसिल'

देखील असायची. आम्ही शिंगल पाटी काळी पेणसिलवाले. पाटी पुसायला बहुधा जीभच उपयोगी पडे. फरशीवर पेणसिल घासून झाल्यावर तिथे भुगा जमायचा. तो जिभेच्या टोकाला लावला तर 'विद्या' येते अशीही बालमनात श्रद्धा होती. ती पाटी विकत घेताना मला माझी प्राथमिक शाळा आठवली. त्या काळी अधून मधून शिक्षकांना त्या पाट्यांचा शस्त्र म्हणूनही उपयोग होई. गणित घालून झाल्यावर ते सोडवायला थोडा वेळ देऊन, इतर एक दोन वर्गांपुढे ज्ञानाच्या पेंढ्या सोडून आमचे मास्तर 'पाट्या टाका' असा हुकूम सोडायचे. मग 'फट फट फट' असा पाट्या टाकल्याचा आवाज आणि ज्यांची गणिते सुटलेली नसत त्या मुलांची पुढल्या शिक्षेसाठी मानसिक तयारी. मग वर्गातल्या पहिल्या नंबरच्या मुलाने तो पाट्यांचा ढीग मास्तरांपुढे ठेवायचा आणि पुढली पंधरा मिनिटे छड्यांचा आवाज. 'नुसत्या उठाबशा नाहीत - दोन्ही कान पकडून—' 'ढुंगण कर इकडे—' असली प्रेमळ वाक्ये. दसऱ्याच्या दिवशी पाटीपूजा. एकाच्या आकड्याला वळणदार शेपूट काढून रेखलेली सरस्वती. तिला कुंकू, फूल आणि मास्तरांना दोन आणे दक्षिणा.

मी बंगाली शिकायला अशी रीतसर पाटी घेऊन सुरुवात केली. हातात पाटी घेऊन मी आणि सलील बोलपूरच्या बाजारातून हिंडत होतो. दुकानांची नावे मोठी आकर्षक होती. शिंप्याच्या दुकानाचे नाव 'आभरणी' (उच्चारी आभोरोनी). ध्वनिमुद्रिका आणि रेकॉर्ड प्लेयर्सच्या दुकानाचे नाव 'राधा'! विलायती शराबीच्या दुकानाचे नाव 'आकर्षिणी.' ह्या बाबतीत पुण्याच्या उसाच्या रसवाल्यांनी 'रसवंती' वगैरे नाव ठेवून बरीच आघाडी मारली आहे. सलूनसचीही 'केश कलामंदिरे' झाली आहेत. पण ही सारी सुरुवात बंगालातूनच झाली असावी. अर्थात् इथेही 'दास ॲण्ड सन्स्' - 'बॅनर्जी ॲण्ड कंपनी' वगैरे आहेत. पण बहुतेक नावे भलतीच काव्यमय. 'अद्वैत भांडार' हे मिठाईवाल्याच्या दुकानाचे नाव तर मला फार आवडले. एका अर्थी वरचे आकार बदलले तरी रसगुल्ला काय, रसमलाई काय, संदेश काय - शेवटी सगळे फाटलेले दूध आणि खच्चून घातलेली साखर यांचेच आकारभिन्नत्व! बंगाली मिठायांची फक्त नावे निराळी - चव तीच. अद्वैत भोग, वैकुंठ भोग, राजभोग, हिरामणी, क्षीरकादम्ब असली आध्यात्मिक पातळीवरची नावे! आपल्याला फक्त रसगुल्ला आणि 'संदेश'च ठाऊक आहेत. पण बंगाली मिठाईवाल्यांच्या दुकानी वैकुंठ भोग, राजभोग असलेही भोग आहेत. चांभाराच्या दुकानाला कुठे 'चरण-सेवा' किंवा 'पाद्यपूजा' वगैरे नाव आहे की काय शोधीत होतो. आपण दुकानांच्या नावांच्या बाबतीत संस्कृतात न जाता इंग्रजीत शिरलो. मिरजकर टेलर्सचे मिरजकर 'आभरणपटू' नाही झाले. न्हावी खुंटावरून केशभूषा मंदिरात नाही गेले. 'सलून्स' मध्ये गेले. हल्ली 'हेअर ड्रेसर्स' झाले. बंगाल्यांनी मात्र

दुकानांची नावे मोठी कल्पनारम्य ठेवली आहेत. दुकानांच्या पाट्या वाचणे हा माझा अति आवडता छंद आहे. ह्या इंग्रजी हटावच्या दिवसांतदेखील लहानसहान खेड्यांतूनदेखील देवनागरी लिपी वापरून पाट्या लिहितात त्या — 'धोंडगे अॅण्ड सन्स् — बिडी मर्चंटस् !' 'फाकडे टेलर्स अॅण्ड औटफिटर्स'. करतात कुडत्यांचे आणि लंगोटांचे टेलरिंग अॅण्ड औटफिटिंग् ! रमणलाल स्वीट मार्टवाला कळकट्ट बनियन मिरवीत मिठाईवरच्या माशा हाकलीत असतो. एका पदनामकोशाभिमानी गृहस्थांना मी हा चमत्कार दाखवीत तालुक्याच्या गावातून हिंडवीत होतो. एका देवनागरी-इंग्रजी पाटीवर एक अखंड मराठी वाक्यही होते. '....अमुक अमुक क्याप डेपो- इथे मंत्री-छाप गांधी टोप्या मिळतील' (ईश्वरसाक्ष खरे सांगतो !)

बोलपूरच्या बाजारातून हिंडत असताना एकदम खणखणीत आवाजात गायलेले चरण कानी पडले. चमकून पाहिले. एक वैष्णव दुकानापुढल्या बाकड्यावर बसून गात होता. हातात छोटीशी एकतारी होती. पायात घुंगूर. केसांचा डोक्याच्या मध्यावर अंबाडा बांधलेला. हनुवटीखाली वीतभर दाढी, तेलकट काळा वर्ण, कपाळावर गंधमुद्रा. आम्ही त्याच्यापुढे गेलो आणि गाणे थांबले. सलीलने आणखी एक गाणे म्हणायला सांगितले. आम्ही त्याच्या पुढच्या बाकावर बैठक मारली. लहान गावात परकी माणसे ओळखायला काय वेळ लागतो ? अपरिचित चेहऱ्यामुळेच नव्हे तर त्यांचे वागणे वावरणेही निराळेच असते. आपल्याला इथे कोणी ओळखत नाही या भावनेतून आलेला थोडासा बेफिकिरपणाही असतो. परक्या गावातून रस्त्यात केळीबिळी खात भटकायला संकोचही वाटत नाही. त्या वैष्णव गायकानेही आपल्याला फर्माइश करणारे पाव्हणे परके आहेत हे ओळखले. थोडेसे हसून म्हणाला, "आमचे कसले गाणे—" सलीलने त्याला पुन्हा आग्रह केला. दुबळ्याशा दिसणाऱ्या त्या वैष्णवाने एकतारीवर सुंदर लय पकडून तिहाई घेतली. लयीच्या कणात घुसायचे हे देणे निसर्ग कुणाला देईल सांगता येत नाही. विशेषतः लोकसंगीत गाणाऱ्यांची लयकारी अशी काही अचूक वेध घेणारी असते की मी मी म्हणणाऱ्या गवयांनी विचार करावा. लोकसंगीत लयीचा एक कणही फुकट घालवीत नाही. गरीबाने रुपयाच्या पैशापैशाचा हिशेब करीत संसार चालवावा तसे सहा किंवा चार मात्रांच्या गानसंसारातल्या सूक्ष्मातिसूक्ष्म अंशाचा उपभोग घेत हे लोकसंगीत गायले जाते. धीमे त्रिताल, एकताल लावणारे ख्यालगायक श्रीमंताप्रमाणे लयीच्या क्षणांची नासाडी करतात. ते क्षण खुशाल वाया जाऊ देतात. समेपुरत्या तीन चार मात्राच चाखतात. त्या बंगाली वैष्णव गायकाने सुंदर लय बांधली आणि श्रीहरीची आळवणी सुरू केली.

'आमार हृद्कदंब तरु मूले - दाडाव श्रीहरी —' माझ्या हृदयाच्या कदंबतरूच्या

मुळांशी श्रीहरी तू उभा राहा - चार मात्रांच्या ठेक्यातच दरवेळी तो गायक 'आमार' हा शब्द लयीच्या नाना तऱ्हेच्या गमती करून टाकत होता. श्रीहरीमधल्या 'री'च्या समेवर तऱ्हेतऱ्हेचे झोले घेऊन येत होता. हां हां म्हणता म्हणता दुकानाच्या दाराशी दहापंधरा माणसे जमली. दुकानदारबाबूही मान डोलवू लागले. मधून 'हरि बोऽऽल्' म्हणून तेही रंग भरीत होते. गाणारा तन्मयतेने गात होता. ऐकणारे तन्मय झाले होते. गाणे संपले. वैष्णवाची वाटी अधेल्या पावल्यांनी भरून गेली आणि 'हरि बोऽऽल'चा सार्वजनिक गजर झाला. आपल्या पुंडलीकवरदा - हाऽऽरि विठ्ठल सारखा हा बंगाल्यांचा गजर आहे.

मी आणि सलील बोलपुराहून शांतिनिकेतनापर्यंत्त रिक्षात 'आमार हृद्कदंब तरुमूले दाडाव श्रीहरी —' ही ओळ गात गात आलो. रिक्षावालाही अधून मधून 'हरिबोऽऽल्' टाकायचा. त्या चरणाने आमच्या अंतःकरणाच्या मुळाशी ठिय्या ठोकला होता. आजही ते गीत तिथून हलले नाही.

संध्याकाळी पाचाच्या सुमारास सलीलबाबू 'आमार हृद्कदंब तरु मूले - दाडाव श्रीहरी-' म्हणत दारात उभे.

"चलो ! सांवताळपाड्यावर जाऊ या —"

मी गरम कपडे चढवले आणि सांवताळपाड्याकडे जायला निघालो. हे मूळचे सांवताल - त्याचा साहेबाने 'संथाल' केला. बंगालीत मात्र त्यांना 'शांवताल' म्हणतात. दुर्दैवाने 'शांवताल' ह्या गोड शब्दाऐवजी 'संथाल' हाच शब्द अधिक रूढ आहे. हे सांवताल स्त्री पुरुष म्हणजे चालती बोलती शिसवी शिल्पे आहेत. सडसडीत बांधा, काळाभोर तैलस्निग्ध तुकतुकीत आणि विपुल केशसंभार, तरतरीत नाकडोळे आणि कोयतीच्या धारेसारखे शुभ्र दंतपंक्ती ! पण ह्या सगळ्यापेक्षा ह्या सांवताल बायकांची 'चाल' म्हणजे नृत्य आहे. निसर्गाने वाघ, घोडा, कबूतर, हत्ती, मोर, ह्यांना जशी एक ठराविक 'चाल' दिली आहे तशी ह्या सांवताल कन्यांनाही दिली आहे. दोघी दोघींची रांग धरून ह्या वनकन्यांचा तांडा फुलांचा लांबलचक गजरा पाण्यावरून तरंगत जावा तसा रस्त्यातून वाहात जातो. आम्ही पाड्याच्या दिशेला निघालो. पोहोचलो तेव्हा दिवेलागणी झाली होती. दिवसभराची मोलमजुरी आटपून सांवताळांचे थवे वस्तीकडे परतत होते. इतके काबाडकष्ट करून परततानाही त्यांच्या ओठांवर गाणी होती. पाखरांनी घरट्याकडे झेपावे तशी ही माणसे आपल्या घरकुलांकडे झेपावत होती. थंडीचे दिवस, त्यामुळे अंधार लवकर पडत होता.

शांतिनिकेतनाच्या परिसरात असे खूप सांवतालपाडे आहेत. शांतिनिकेतनाच्या इतक्या जवळ असूनही गुरुदेवांनी त्यांना 'सुधारण्या'चा प्रयत्न केला नाही. त्यांच्या संस्कृतीवर आपली संस्कृती लादली नाही. स्वेच्छेने जी सांवताल मुले आली त्यांना शिकवले. पण

त्यांच्या जगण्याच्या पद्धतीत काही उणे आहे असे त्यांना भासू दिले नाही. जमातीच्या नियमांच्या बंधनात राहून ही माणसे जगण्याचे एक निराळे स्वातंत्र्य भोगत असतात. संथालपाड्याची स्वच्छता संस्कारांनी स्वीकारलेल्या बंधनातूनच आली आहे. घरे, खळी - सारा परिसर कमालीचा स्वच्छ. भिंती आणि आंगणे एका विशिष्ट प्रकारच्या मातीने आरशासारखी लख्ख सारवली होती. चुलीवर भात शिजत होता. भात आणि मासे हेच अन्न आणि तांदळाची दारू आणि मादलाच्या आणि बासरीच्या साथीत झुलत झुलत गाणे हा मुख्य आनंद. सांवताळपाड्यातून मध्यरात्रीपर्यन्त मादलाचे ढुम् ढुम् ऐकू येत असते. लहान मोठ्या जलाशयांतून मासे धरण्याचे काम लहान मुले किंवा वृद्ध मंडळी करतात आणि तरुण स्त्री-पुरुष शेतांतून किंवा बोलपूरच्या कारखान्यातून मोलमजूरी करीत असतात. काही घरकाम करतात. बंगाल्यांच्या घरातली मोलकरीण बहुधा सांवताळच असते. आजवर अनेक साम्राज्ये आली अन् गेली. पण सांवताळपाडे मात्र साऱ्या सांस्कृतिक आक्रमणांपासून लव्हाळ्यासारखे वाचून आपली मुळे आणि हिरवा रंग टिकवून राहिले होते. आता मात्र मुळे उखडली जात आहेत. सांवताळपाडा हा मतांचा 'सॉलिड् ब्लॉक' असल्यामुळे राजकारणी लोकांची तिथे पावले वळली आहेत. सांवताळांनाही बाबू लोकांनी मतांसाठी आपली खुशामत सुरू केली आहे हे कळू लागले आहे. ह्या नव्या ज्ञानवृक्षाचे फळ ह्या वनवासीयांनी आता खाल्ले आणि 'इन्क्विलाब झिंदाबाद', अमुक 'चोलबे ना'- तमूक 'चोलबे ना'— वगैरे नव्या मंत्राचा जागर सुरू झाला. अज्ञानातला आनंद संपला म्हणावे की, असंतोषाची आग पेटल्यामुळे ह्या जंगलच्या पाखरांचे सूर हरवले म्हणावे ते मला तरी कळत नाही. त्यांच्या निरागसतेचा वर्षानुवर्षे फायदा घेणारांना सांवताळ बिघडले असे वाटते आणि त्यांना आजवरच्या फसवणुकीची जाणीव झाली म्हणून आपापल्या राजकीय प्रचारातून त्यांच्यापुढे नंदनवन उभे करणाऱ्या निरनिराळ्या पक्षांच्या कार्यकर्त्यांना स्वतःच्या सामर्थ्यात भर पडते आहे याचा आनंदही होतो आहे.

त्या पाड्यांत अंधार गुडुप. चुलीच्या जाळाच्या प्रकाशात काही चेहरे. मडक्यात खदखदणारा भात. मधूनच अगम्य भाषेतले संवाद. हाँडिया दारूचा उग्र दर्प. मध्येच एखाद्या पोराचे ट्यांहां ! अनादी कालापासून चालत आलेली स्त्री-पुरुषांची ती साखळी. जन्म मरणाच्या वर्तुळात एकाच ढंगाने वाढत आलेली. दिवसा सूर्य आणि रात्री तारका ह्यांच्या गतीबरोबर काळाचा हिशेब मांडत आणि पशुपक्ष्यांच्या सुराशी सूर मिळवीत, काशबन, वंशीबनाकडून नाचाचे झोके शिकत, फुलांकडून रंग घेत, नांगर, विळा, तीरकमठा आणि गळ ह्यांतून लाभेल ते खात — शैशव, तारुण्य, वार्धक्य ह्या अवस्थांतले बरे वाईट भोग मुकाट्याने भोगीत जगणारे सांवताळ हळूहळू आमच्यासारखे

नागरी होतील. जुने भोग जातील. नवे भोग नशिबी येतील.

त्या सांवताळपाड्याच्या तोंडाशीच विश्वभारतीच्या विज्ञानशाखेची एक अद्ययावत् धर्तीची इमारत उभी राहते आहे. एका सांवताळाच्या कुंपणाला लागूनच ही इमारत उठली आहे. न जाणो आज धुळीत खेळणारे सांवताळाचे पोर त्याच प्रयोगशाळेतला महान् वैज्ञानिक म्हणून जागतिक कीर्तीही मिळवील. त्याचे पूर्वज नक्षत्रांच्या लीलांची गाणी गाऊन नाचत होते, हा एखाद्या यानातून नक्षत्रंपर्यंतचा प्रवास करून येईल. इच्छा एकच आहे की, त्या यानातून यात्रा करताना होणाऱ्या आनंदाला वाट फोडून देणारे गीत त्याच्या कंठातून फुटावे. त्याच्यातला युगायुगांचा 'कवी' हरवू नये. सांवताळपाडा जायचा असेल तर जाऊ दे ! पण तिथल्या मादलाचा ताल, घुंगरांतला पदक्षेप आणि गळ्यांतली गाणी हरवू नयेत !

सारखे वाटत होते की, ह्या सांवताळांना भेटावे, त्यांच्याशी बोलावे, त्यांची ह्या नव्या जीवनाविषयींची मते ऐकावी. एखादी डॉक्युमेंटरी प्रेक्षकांच्या खुर्चीतून पाहावी तसे त्यांच्या पाड्यांकडे आणि पाड्यांतल्या माणसांच्या हालचालीकडे पाहणे खरे नव्हे. परंपरेने चालत आलेली ती जीवनपद्धती मला सुंदर वाटत होती, पण ते जीवन आपणही त्यांच्याच पद्धतीने जगावे अशी मला ओढ लागली होती का ? की मुंबईच्या गजबजाटातून आल्यामुळे हे जीवन मला आकर्षक वाटत होते ? परंपरेच्या घाण्याचा अगदी शिंगाला रंग आणि गळ्यात घुंगरू घातलेला बैल होऊन चालण्यात तरी काय मौज आहे ? विश्वविद्यालयाच्या टेनिस कोर्टावर आपल्याच वयाच्या मुलींना खेळताना पाहून एखाद्या सांवताळ कन्येला आपल्याला कां नाही मिळत हा खेळ खेळायला असे नसेलच का वाटत ? किंवा त्या खेळात आनंदच नसतो अशीच जर संस्कारांनी तिच्या मनाची धारणा करून दिली असेल तर तेही चुकीचे नाही का ? नियतीने किंवा जन्मसिद्ध परिस्थितीनेच आखलेल्या मार्गावरची आनंदनिधाने भोगीत जायची ही सक्ती देखील भयंकर नाही का ? भोवतालच्या झपाट्याने बदलत चाललेल्या वातावरणात ह्या आदिवासी जमातींना टूरिस्टांच्या दृष्टिसौख्यासाठी नुसत्या प्रेक्षणीय वस्तू बनवून ठेवणे काय माणुसकीला धरून आहे ?

भोवतालचा अंधार वाढत चालला होता आणि माझ्या डोक्यातलाही. विचारांच्या नादात खोलीवर आलो. बरेच चालणे झाले होते. हवेतल्या मस्त गारव्यामुळे चालण्याचे कष्ट वाटत नव्हते, तरी पण थकवा आला होता. कॅण्टीनमधल्या जेवणाला तोंड देऊन बिछान्याला पाठ लावली. दूरचे सांवताळपाड्यावरचे ढोल ऐकू येऊ लागले होते. हजारो वर्षे चालत आलेला तो ठेका ! त्या ठेक्यातली पावले तोच नाच नाचत असतील. पूर्वापार चढत आलेली तांदळाच्या मद्याची तीच मस्ती डोक्यात चढली असेल. त्या

सांवताळांची शहरात दिवसा कामाला गेल्यावर तुटणारी आदिवासी जीवन-परंपरेची साखळी पुन्हा जोडली जात असेल. पाण्यावर काठी मारल्यावर भंगल्यासारखे ते शहरी संस्कारांनी दिवसा भंगणारे जीवन रात्री रक्ताच्या आज्ञेने चाललेल्या परंपरागत जीवनाशी जुळून येत असेल. आणि झोपताना पुनः पुन्हा पाड्यापलीकडले ते जग निराळे आणि पाड्यातले आपले निराळे हा एकच विचार घेऊन त्यांच्या पाठी भुईला लागत असतील ! माणसांसारखी माणसे असूनही माणसे येवोत, जावोत, मी आपला माझे गाणे गात वाहीन म्हणणाऱ्या त्या पाड्याजवळच्या ओढ्यासारखी ही माणसे आणि ते त्यांचे जीवन !—

ती तिथे माथ्यावरचा चंद्र ढळल्यावर गाढ झोपली असतील. — मी मात्र त्यांच्या जीवनाची गणिते काय आहेत त्याचा विचार करीत झोप गमावून पडलो होतो !





शांतिनिकेतनात आज एक मोठा सुंदर समारंभ पाहिला. सलील मला म्हणाला, "संध्याकाळी मंदिरात रवीन्द्रांची स्नुषा प्रतिमादेवी यांचे पहिले वर्षश्राद्ध आहे. आपण जाऊ या." प्रतिमादेवी ह्या रवीन्द्रनाथांचे चिरंजीव रथीन्द्रनाथ ह्यांच्या पत्नी. पोटची पोर काय करील अशी ह्या सुनेने आपल्या सासऱ्याची सेवा केली होती. रवीन्द्रांचा विश्वसंसार जरी विशाल असला तरी कौटुंबिक जीवनात ते एकले होते. १९०२ साली म्हणजे वयाच्या अवघ्या तिसाव्या वर्षी रवीन्द्रांच्या पत्नी मृणालिनीदेवी वारल्या. रवीन्द्रनाथ त्यावेळी एकेचाळीस वर्षांचे. रथीन्द्र चौदा वर्षांचा, मीराचं वय दहा, धाकटा शमीन्द्र आठ वर्षांचा. मोठी बेला आणि नंतरची राणी ह्यांची लग्ने झाली होती. पण रथी, मीरा आणि शमी ह्यांचे संगोपन करायची जबाबदारी गुरुदेवांच्यावर होती. पत्नीच्या निधनानंतर अवघ्या दहा महिन्यांनी 'राणी'चे निधन झाले.

रवीन्द्रांनी जीवनातले प्रत्येक कर्म कमालीच्या निष्ठेने केले. ते कवी होते, थोर कलावंत होते, पण त्याच्या जोडीला आदर्श गृहस्थाश्रमी होते. नियतीने सूड काढावा तसे

गृहस्थाश्रमातले सारे आघात त्यांना सोसायला लावले. पण ह्या आघातांनी त्यांच्या सार्वजनिक जीवनावर त्यांनी मळभ येऊ दिले नाही. सूर्यकिरणांनी ढगांचे काळे पडदे फाडून बाहेर यावं तसे रवीन्द्रही आपल्या प्रतिभेच्या तेजाने ही दुःखे फोडून बाहेर पडत. प्रत्येक कार्याची जणू त्यांनी ज्योत हाती धरली होती. तिच्यावर वैयक्तिक दुःखाचे मालिन्य येऊ द्यायचे नाही — काजळी चढू द्यायची नाही ह्या निर्धाराने हा कवी जगला. रथीन्द्रांखेरीज त्यांची सारी अपत्ये त्यांच्या डोळ्यादेखत गेली. पत्नी गेली, मुली वारल्या. वयाच्या बारा-तेराव्या वर्षी कॉलऱ्याने त्यांचा अत्यंत लाडका मुलगा शमी निधन पावला. शमीन्द्र हे तर रवीन्द्रांचेच बालस्वरूप होते. एखाद्या मध्यमवर्गीय कारकुनाने पत्नी वारल्यावर मुलाबाळांचे आपल्या हाती करावे तसे रवीन्द्रांनी केले आहे. आजारी मुलांना मांडीवर घेऊन रात्र रात्र ते जागले आहेत. मनाचे जसे काय त्यांनी निरनिराळे लोखंडी कप्पे करून ठेवले होते. इकडल्या कार्याची तिकडे दाद नाही. कौटुंबिक जीवनात वळचणीचे पाणी सतत आढ्यां गेले. त्या दुःखांचे डोंगर छातीवर घेऊन हा महामानव गीते गात होता. लोकांना गायला लावीत होता. नाटके रचीत होता. ती अपेक्षेप्रमाणे उतरली नाहीत तर पुन्हा पुन्हा त्यात बदल करीत होता. त्यांना निरनिराळी रूपे देत होता. कथा लिहीत होता. सामाजिक आणि राजकीय चळवळीत भाग घेत होता. आम्रवृक्षांचे वाढदिवस साजरे करीत होता. डॉक्टर होऊन आजाऱ्यांना औषधे देत होता. पायात घुंगूर बांधून नाचत होता. जणू काय वैयक्तिक जीवनात जे जे घडत होते त्याच्याकडे 'कौतुक तू पाहे संचिताचे' म्हणत सामाजिक जीवनात आनंद वाटण्याची जबाबदारी नियतीने आपल्यावर टाकली आहे अशा भावनेने जगत होता. क्वचित् प्रसंगी एखादी व्यक्तिगत दुःखाची वेदना कवितेच्या रूपाने प्रकटतही असे. आपल्या एकाकी जीवनाविषयी एका कवितेत त्यांनी म्हटले आहे,

*—"घरा दाराला मुकलेला*
*— असा मला वाटेवरचा एकटा वाटसरू केलेस,*
*— शेई भालो, ओगो शेई भालो*
*— तेचि भले गा तेचि भले"*

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः म्हणजे तरी दुसरे काय ?

असल्या ह्या भवती प्रचंड गलबला असूनही एकला असणाऱ्या रवीन्द्रांच्या जीवनात त्यांच्या एकुलत्या एका सुनेचा — प्रतिमादेवीचा त्यांना आधार लाभला. प्रतिमा बालविधवा होती. गुरुदेवांनी रथीन्द्रांशी तिचा पुनर्विवाह केला. तत्कालीन वंग समाजाला पुनर्विवाह वगैरे मान्य नव्हते. त्यामुळे सनातनी हिंदूंचे शिव्याशाप खावे लागले. एकोणिसशे दहा साली छोटी प्रतिमा रवीन्द्रांची सूनबाई होऊन शांतिनिकेतनात आली.

आणि एकूणसाठ वर्षे तिने प्रपंचाचा भार सांभाळला. एकूणसत्तर साली नऊ जानेवारीला तिचे निधन झाले. मागे पुत्रसंतान नव्हते. परंतु वर्षश्राद्धाचा इतका गंभीर आणि असुंदराचा कसलाही स्पर्श नसलेला विधी पुत्रवंतांच्याही नशिबात नसेल.

गुरुदेवांनी जीवनातल्या विविध प्रसंगांना अनुरूप अशी शेकडो गीते लिहिली आहेत. त्यांत दिवंगतांचे पुण्यस्मरण करण्यासाठी रचलेली, गंभीर सुरात गायची गीतेही आहेत. ह्या श्राद्धविधीचा प्रारंभ त्या सुरेल गीतांनी झाला. सर्व मंडळी शुभ्र वस्त्रे परिधान करून आली होती. उदबत्त्यांचा सुगंध दरवळत होता. सुंदर पुष्परचना केली होती. कुणीतरी प्रतिमादेवींच्या कर्तृत्वाविषयीच्या लेखातल्या उताऱ्यांचे वाचन केले. पुन्हा एकदा गंभीर सुरातल्या गीतांचे गायन झाले. त्यानंतर मृत्यूच्या सुंदरतेवर लहानसे प्रवचन झाले. प्रार्थना झाली आणि बरोबर एका तासात हा श्रद्धांजलीचा समारंभ संपला.

माझ्या डोळ्यापुढे आमच्याकडे होणारे, पुण्यतिथ्या आणि शोकसभांचे समारंभ दिसायला लागले. एखाद्या दुमडल्या खुर्चीवर दिवंगताचा फोटो टेकवलेला असतो. मग सर्वांच्या देखत पुडा सोडून कार्यवाह हार काढतात. तो त्या फोटोला वेडावाकडा लटकावतात. अध्यक्ष नावे पुकारतात. आणि वक्ते समोरच्या जिवंत श्रोत्यांचे प्राण कंठाशी आणतात. स्वर, गंध, पुष्प यांचे साहचर्य दुःखाच्या तर जाऊ दे, सुखाच्या क्षणी तरी धड कुठे असते! अध्यक्ष किंवा प्रमुख पाव्हण्याला घालायच्या हाराची टोपली देखील स्टेजवरच ठेवलेली असते. मग ऐन वेळी धावाधाव. मग कुणी तरी टोपलीतून तो हार मेलेल्या सापासारखा खेचून बाहेर काढायचा. त्याला लागून हाराच्या पुड्याची पानेही येतात. मग तो गुंततो. तो गुंता काही सुटत नाही — तसाच अध्यक्षाच्या गळ्यात घालताना अध्यक्षाची टोपी किंवा चष्मा ह्यातले जे काही सोयीचे असेल ते उडवायचे. —आणि मग हशा! आणि सार्थक!!

संध्याकाळचा तो समारंभ संपला त्यावेळी दिवेलागण झाली होती. आश्रमातल्या मुलांची आई होऊन राहिलेल्या अपत्यहीन प्रतिमा-दीच्या आठवणी एकमेकांना सांगत माणसे तिथेच रेंगाळत होती. सलीलचे वडील बंधू सागरमय घोष 'देश' ह्या बंगालीतल्या अत्यंत लोकप्रिय साप्ताहिकाचे संपादक आहेत. त्यांची आपल्या बालपणातली प्रतिमा-दी विषयींची फार मजेदार आठवण आहे.

गुरुदेवांच्या 'उत्तरायण' नावाच्या बंगल्यापाशी त्यांचा एक सुंदर शेतमळा आहे. त्यात मक्याची कणसे धरली होती. सागरबाबू त्या काळी शांतिनिकेतनातले छात्र. ते आणि निशिकांत नावाचा त्यांचा एक उपद्व्यापी मित्र ह्या दोघांनी मिळून मळ्यातली कणसे चोरायचे ठरवले. चार कणसे तोडून निसटत होते. तेवढ्यात समोरून पहारेकरी आला. दोघेही सर्द. पण पहारेकऱ्यानेही शांतपणाने कणसे काढून घेतली आणि तुम्हाला

प्रतिमा-दीनी बोलावले आहे असे सांगितले. दोघेही दिवाणखान्यात जाऊन खाली मान घालून उभे. दहा मिनिटे झाली, पंधरा मिनिटे झाली, कुणाचीही हालचाल नाही. चोरद्वय स्वस्थ उभे. एवढ्यात आवाज आला -

"अरे उभे का ? -बसा -बसा" प्रतिमा-दींनी चोरांचे स्वागत केले.

त्यांच्या हातात दोन थाळ्या. त्यांत मिठाई आणि झकास भाजून तूप मीठ लावलेली कणसे.

"घ्या." दोघेही चूप. "अरे घ्या. भारी लाजरे की रे तुम्ही—"

बोलण्यात कुठे उपरोध नाही. प्रेमळ आग्रह. सागरपेक्षा निशिकांत फार तयार. त्याने जणू काय काहीच झाले नाही अशा थाटात मिठाई उचलली. कणीस संपवले. सागर चूप. तेवढ्यात प्रतिमा-दी म्हणाल्या,

"सागर, तू चूप राहिलास तर तुझ्या वाटणीचे देखील तोच खाईल बरं का—" कणसे खाऊन संपवली.

"कशी वाटली?" तोच स्निग्ध स्वर.

डोळ्यातून पाणी गळायच्या बेतात आले होते. ते आवरून दोघेही म्हणाले, "छान."

"मग असं करा, पुन्हा खावीशी वाटली की मला येऊन सांगत जा. मी स्वतः निवडून आणीन आणि देईन हो—"

"श्यामच्या आई"सारखी ही प्रतिमा-दी. त्या दिवशी तेथे जमलेल्या प्रत्येकाकडे अशा मधुर आठवणी होत्या. प्रतिमा-दी गेली आणि रवीन्द्रांच्या वंशातली शेवटली वेल सुकली. शांतिनिकेतनातले 'उत्तरायण' हे तिथल्या आबालवृद्धांचे आजोळासारखे ममतेचे घर होते. प्रतिमा-दी गेल्या. आता ती म्युझियममधल्या कपाटात बंद केलेल्या वस्तूंसारखी एक थंड वास्तू झाली. उत्तरायणातले उबदार वास्तव्य संपले.

साऱ्या संस्थांचे हे असेच होते. आधी संस्था नसते. कार्य असते. कुणाला तरी परार्थी कार्याचे स्वप्न पडते. ते प्रत्यक्षात आणायची धडपड सुरू होते, पणतीने पणती लावावी तशी माणसे प्रज्वलित होतात. मग 'संस्था' नावाचे एक चैतन्यहीन, पोटार्थी हालचाल करणाऱ्या, त्या श्रेष्ठ माणसाचे आपण निकटवर्ती होतो ह्या अहंकाराच्या भांडवलावर जगणाऱ्या दुय्यमांचे राज्य सुरू होते. कार्य थांबते असे नव्हे. पण त्या कार्याला चेतना नसते. साहसाची शक्ती संपते. जुने कार्यकर्ते शरीराने आणि मनाने थकलेले असतात. नव्यांच्या उत्साहावर विरजण घालणे एवढेच त्यांचे मुख्य धोरण असते. 'ते' आज असते तर त्यांना हे रुचले असते का हा विचार 'हे' आपल्या डोक्याने करतात.

गुरुदेवांनी 'कार्य' उभे केले होते. त्यातून संस्थांची, संस्थांच्या नियमांची चौकट त्यांना उभी करावी लागली. श्रीनिकेतन आणि शांतिनिकेतन ही जीवनाला परिपूर्ण करणारी दोन

महान् कार्ये. एका कार्याचे नाव श्रीनिकेतन, दुसऱ्याचे शांतिनिकेतन. भिंती तुरुंग करू शकत नाहीत म्हणतात. भिंती म्हणजे तुरुंगही नव्हे की शाळाही नव्हे. इमारतींच्या भव्यपणाचा कार्याशी काहीही संबंध नसतो. दिल्लीला लाखो रुपये खर्चून 'रवीन्द्र नाट्यगृह' नावाचा खुला रंगमंच उभारला आहे. तिथे नाटके होत नाहीत आणि कलकत्त्याला पत्र्याच्या आडोशात, टिनपट खुर्च्यांचे सभागृह आणि फळकुटांचा रंगमंच असलेल्या 'मुक्तांगण' नावाच्या उघड्या थेटरात नाट्यकलेचे नवनवे प्रयोग वर्षभर चालू असतात. श्रीनिकेतन आणि शांतिनिकेतन ह्यांचे कार्यदेखील असेच गरीबीतून सुरू झाले. दोघींचेही जनक गुरुदेवच. पण दोन बहिणींतली सावळी लेक गरीबाघरी पडावी आणि दुसरी अधिक मोहक म्हणून तिला श्रीमंत स्थळ मिळून चार ठिकाणी नावलौकिक व्हावा असे काहीसे झाले. पण बापाची माया गरीब लेकीवर असावी तशी गुरुदेवांची शांतिनिकेतनापेक्षा श्रीनिकेतनावर माया अधिक. श्रीनिकेतन ही कृषीसुधारणा शिकवायची शाळा. जुन्या ऋषींचीही कृषीवर माया मोठी. ऋषींची शेती स्वतःच्या हातांनी चाले. ऋषिपंचमीला त्याचे स्मरण म्हणून जनावरांच्या सहाय्याने पिकणारी धान्ये वर्ज्य करून कंदमुळांचा आहार घेतात. ऋषि-संस्कृतीने भारावलेल्या टागोरांनी काव्याइतकेच शेतीवर प्रेम केले, नव्हे त्या विषयातले ते चांगले तज्ज्ञ होते. ते नुसतेच धरतीची गाणी गाणारे भाट नव्हते. तिच्या दातृत्वाला बहर आणण्यासाठी, तिची नुसती गाण्यांनी खुशामत न करता हात राबवून मशागत कशी करावी, हेही ते जाणत होते. दौत आणि औत ही जोडीने नांदली पाहिजेत. साहेबाने दौत शहरात पळवली आणि दौतवाले बाबू आणि औतवाले अडाणी अशी संस्कृतीची दोन शकले केली. पूर्वी खेड्यातला सुखवस्तू माणूसही आपल्या शेतातल्या गवताचा भारा खांद्यावरून आणत होता. गाईबैलांची चाकरी आपल्या हाताने करीत होता. आज मॅट्रिक नापास झालेले शेतकऱ्याचे पोर देखील स्वतःची वळकटी उचलायला लाजते. इंग्रजी राज्यात साहेबाने आपल्या कारभारात सोयीसाठी गावठी साहेब बनवले. त्या साहेबाच्या विलायतेत तो स्वतःची कामे आपल्या हाताने करतो. पण इथे मात्र त्याला शारीरिक श्रमासाठी नेटिव्ह हवे असत. त्याला आपली जरब बसवायची होती. तुम्ही गुलाम आहात हे सांगायचे होते म्हणून बुटाची नाडी सोडायला बुटलेर हवा होता. त्याची बुके शिकणाऱ्या गावठी साहेबांनी त्याचा पोशाख, चालीरीती ह्या सर्व बाबतींत अनुकरण सुरू करून आपल्याच देशबांधवांपैकी ती बुके न शिकलेल्यांना आपले गुलाम करून स्वतःच्या संस्कृतीचे शहरी संस्कृती आणि ग्रामीण संस्कृती असे विभाजन केले. भारतीय संस्कृती म्हणजे ग्रामजीवनाची पद्धती. भारताचा विकास म्हणजे खेड्यांचा विकास हे तत्त्व गांधीजींच्या कित्येक वर्षे आधी रवीन्द्रनाथांनी सांगितले. कलकत्त्याच्या व्यासपीठावर इंग्रजी भाषेत ठराव करून देशाचा उद्धार होणार

नाही. त्याला लोकजीवनात शिरून लोकभाषेत बोलले पाहिजे. त्यांच्या भाषेतच शिकवले पाहिजे, आणि इंग्रजीतले ज्ञान-भांडार—विचारधन लोकांच्या भाषेत मोकळे केले पाहिजे हा आग्रह धरणाऱ्या टागोरांची, तत्कालीन इंग-बंग बाबूंनी इंग्रजीतून कुचेष्टा केली, अवहेलना केली. कलकत्ता युनिव्हर्सिटीत पदवीदान समारंभाला बंगालीतून भाषण करणारे रवीन्द्रनाथ टागोर हे पहिले भारतीय. आमच्या प्रादेशिक विद्यापीठांना आजदेखील हे धैर्य होत नाही. पण टागोर जमीनदार असले तरी बंगालातल्या शेतकऱ्यांच्या, कोळ्यांच्या, सुतार-चांभारांच्या जीवनाच्या जवळ गेले होते. स्वतः कवी होते पण पिपासिताला काव्यरस पाजून त्याची तहान भागत नसते हे जाणणारे होते. आपला मुलगा रथीन्द्रनाथ ह्याला तत्कालीन बंगाली श्रीमंतांच्या मुलांसारखे बॅरिस्टर करायला इंग्लंडला न पाठवता, अमेरिकेत आधुनिक पद्धतीची शेती शिकायला पाठवले होते. त्या काळी अमेरिकेत शिकायला जाणे हे आजच्यासारखे फ्याशनेबल नव्हते. किंबहुना गेल्या शतकातले अमेरिकेचे चित्र हे शेतकऱ्या-कामकऱ्यांचा देश असे होते. संस्कृतीचा मक्ता इंग्रजांकडे होता. पण शेतीचे मात्र नवे नवे प्रयोग अमेरिकेत होत होते. भरघोस पिके घ्यायला आता रसायनशास्त्राचा आधार हवा. नवी बीजे पेरा, नवी अवजारे आणा, हा मंत्र भारताला ह्या कवीने दिला. कारण जमीन सस्यशामला झाल्याखेरीज देश क्षोभरहित होणार नाही हे ऋषिवचन त्यांनी जाणले होते. टागोरांचे सनातनाशी आणि तात्कालिकाशी अति सुंदर नाते होते. त्यांच्या प्रत्येक कृतीत आणि उक्तीत ह्या दोन विचारधारांची मनोहर गुंफण आढळते. द्रष्टा त्रिकालज्ञ असतो म्हणतात. त्याला भूत-वर्तमान-भविष्य अशी तिन्ही कालपरिमाणे दिसतात. भारतीय संस्कृती म्हणजे ग्रामीण किंवा पल्ली संस्कृती म्हणताना त्यांनी विज्ञानाच्या नव्या वरदानाकडे दुर्लक्ष केले नाही. किंबहुना आयुष्याच्या अखेरच्या काळात ह्या कवीने पदार्थविज्ञानशास्त्रावर ग्रंथरचना केली. 'बुद्धीला मोहमुक्त आणि दक्ष करण्यासाठी विज्ञान-विचार करणेच आवश्यक आहे' हे त्यांचे उद्‌गार आहेत. विश्वपरिचय नावाचा आधुनिक विज्ञान-कोश त्यांनी विश्वभारतीतल्या प्रमथनाथ सेनगुप्त ह्या फिजिक्सच्या प्राध्यापकांना बरोबर घेऊन तयार केला. 'बुद्धीला मोहमुक्त' करायला म्हातारपणी जपमाळ न घेता भौतिक शास्त्रे घेऊन बसणारे रवीन्द्रनाथ, प्रयोग करणाऱ्या आपल्या प्राचीन ऋषि-परंपरेतले शेवटले ऋषी वाटतात.

दुर्दैवाने त्यांच्या ऐन जवानीत स्वातंत्र्यप्राप्ती हा काहीतरी वकिली डावपेचांनी खेळायचा प्रकार आहे असे मानणाऱ्या ठराव-चतुरांचीच संख्या अधिक होती. एकोणिसशे वीस बावीस सालापासूनच त्यांच्या डोक्यात विचार होता की 'आमादेर जमीदारी जे नो आमादेर प्रजादेरई जमीदारी हॉय... आमरा जेनो ट्रस्टीर मतो थाकि ! — किन्तु शे देखलुम जमीदारी रथ शे रास्ताय गॅलो ना - आमची जमीनदारी आमच्या कुळांची जमीनदारी

व्हावी - मी त्यांचा विश्वस्त म्हणून राहावे - पण पाहिले की जमीनदारीचा रथ त्या रस्त्याने गेला नाही -' टागोर हे विनोबांचे पूर्वसूरी म्हणायला हवेत.

आणि म्हणूनच टागोरांनी काव्य, नृत्य, नाट्य, संगीत, साहित्य यांची जोपासना करणाऱ्या शांतिनिकेतनाशेजारीच नांगर, खते, बी-बियाणे यांना स्थान दिले आणि श्रीनिकेतन उभे केले. एल्महर्स्ट नावाच्या इंग्रज साहेबाने त्यांना ह्या कार्यात पहिली साथ दिली. हा साहेब राज्य करायला आला नव्हता. तो श्रीनिकेतनच्या शेतात शेतकरी होऊन राबू लागला. आपल्या कृषि-पांडित्याचा उपयोग त्याने सुरूलच्या परिसरातल्या शेतकऱ्यांसाठी केला. टागोरांची निसर्गावर अपार भक्ती, पण डोळस. हा महाकवी भूगोल आणि खगोलांच्या अभ्यासासाठी तासन्तास दूरदर्शक आणि सूक्ष्मदर्शक दुर्बिणीत डोळा घालून बसे. जागतिक कीर्तीचे वनस्पतीशास्त्रज्ञ जगदीशचन्द्र बोस आणि रवीन्द्रनाथ ठाकूर हे परम मित्र. पद्मा नदीत आपल्या आवडत्या 'पद्मा' नावाच्या नौकानिवासात रवीन्द्रांनी आयुष्याची काही वर्षे काढली. वडिलांनी जमीनदारी सांभाळायची जबाबदारी त्यांच्यावर टाकली होती. प्रतिभेच्या पंखांनी आकाशात विहार करणाऱ्या आपल्या कविपुत्राचे मातीशी आणि त्या मातीत राबणाऱ्या माणसांशी नाते तुटू नये म्हणूनच त्या महर्षिने ही जोखीम त्यांच्यावर टाकली असावी. मुलाच्या कविप्रतिभेविषयी त्यांना अभिमान होता. तरुण रवीची काव्ये ऐकून त्या पित्याने म्हटले होते, "रवी, आपली भाषा आणि संस्कृती ओळखणारे राजे असते तर त्यांनी तुझा खूप मोठा गौरव केला असता. आज परक्यांचे राज्य. तुझा गौरव करणारा जाणता राजा नाही. मीच तुझा गौरव करतो—" म्हणून त्या काळी आपल्या मुलाला पाचशे रुपये बक्षीस देऊन तो काव्यग्रंथ छापायला उत्तेजन दिले होते. असल्या मुलाला शेतकऱ्यांमध्ये जा आणि शेतीचे हिशेब ठेव म्हणणारा बापही काही कमी ग्रेट नव्हता. अशा वेळी शुचीनाम् श्रीमताम् गेहे योगभ्रष्टोऽभिजायते— हे खरे वाटायला लागते.

त्या नौकेतच रवीन्द्रांची अभ्यासिका होती. दिवसभर शेतीचे व्यवहार पाह्यचे. शेतकऱ्यांची सुखदुःखे समजून घ्यायची. नौकेतून प्रवास. रात्री सोबत त्या नावाड्यांची. मला रवीन्द्रांच्या जीवनातला हा कालखंड वाचताना मार्कट्वेनच्या मिसिसिपी नदीवरच्या नौकेवरच्या जीवनाचे स्मरण होई. रवीन्द्रांचे ते ग्रामीण सोबती. गावकऱ्यांच्या कलहांतल्या विषग्रंथी काढून टाकायच्या. उद्दाम पद्मेच्या ऋतुमानाने बदलणाऱ्या लहरीही अनुभवायच्या. हे सारे चालू असताना सतत नवी रचना चालू. कथा, कविता, निबंध, नाटक - नाना प्रकारांतून निसर्ग आणि माणूस ह्यांच्या लीलांचा शोध आणि दर्शन. जगदीशचन्द्र बोस शनिवार, रविवार साधून कलकत्त्याहून यायचे. दर शनिवारी मला नवी कथा ऐकायला मिळाली पाहिजे ह्या अटीवर जगदीश बाबू पद्माविहाराला येत. वनस्पतींचे


रहस्य शोधण्यात रंगलेला तो महान् वैज्ञानिक आणि साऱ्या जीवनाचेच रहस्य शोधण्यात रंगलेला हा महाकवी. पद्मा नौकेवर लिहिलेल्या अनेक कथांचा पहिला श्रोता म्हणजे जगदीशचन्द्र आणि वृक्षलतांची स्पंदने कशी चालतात हे एखाद्या बालकाच्या उत्सुकतेने ऐकणारे रवीन्द्रनाथ हे त्यांचे पहिले श्रवणभक्त ! गोपीबरोबर रासक्रीडा करणारा मुरलीधर, राधेचा कान्हा, गाईची राखण करणारा गोपाल, कंसचाणूरमर्दन करणारा मल्ल, राजसूय यज्ञात उष्टी काढणारा, अर्जुनाचा सारथी आणि गीतेचे तत्त्वज्ञान सांगणारा भगवान्-पूर्णपुरुष पुरुषोत्तमाची ही भारतीय कल्पना. टागोरांपुढला आदर्श तोच पुरुष असावा. कृष्ण. गोकुळापासून द्वारकेपर्यंत ग्रामीण आणि नागर जीवनाचे सारे अनुभव घेऊन पूर्णत्वाला पोहोचला. आजच्या भाषेत सांगायचे म्हणजे तो डेअरीतला तज्ञ होता, संगीतज्ञ होता, युद्धकला आणि राजनीतीनिपुण होता. मानवी मनाचे पापुद्रे हलक्या हातांनी उलगडणारी, फुलांच्या स्पर्शाला आतुरलेली, आणि चित्रे रंगवायला कुंचला धरणारी टागोरांची बोटे मातीत रमत होती, रुग्णांची शुश्रूषा करीत होती - स्वतःच्या गृहिणीला पाहुणे येणार असले की स्वैपाकात मदत करीत होती - आणि त्या नाजूक बोटांमागे कुस्तीचे पेच घालणारे बलदंड बाहूही होते. टागोरांना कुस्ती शिकवायला त्यांच्या वडिलांनी पहिलवान ठेवला होता. त्यांचे हाडपेर एखाद्या दांडग्या पंजाबी शेतकऱ्यासारखे मजबूत होते. शारीरिक कष्टांना न डरणारे होते. ब्रह्मचर्याश्रमातल्या आपल्या छात्रांना, पावसाळ्यात कोपाई नदीचा कोप वाढलेला असताना तिच्या त्या संतप्त अवताराशी झुंजत पोहायला ते पाठवीत. पुरात पोहण्यापासून त्यांनी मुलांना कधीही परावृत्त केले नाही. जपानातून बागकाम करणारे आणले. त्याच्या जोडीला जुजुत्सू शिकवणारा जपानी मल्लही आणून जुजुत्सूत मुलामुलींना तयार केले होते. ज्या चंद्रावर आणि चांदण्यांवर त्यांनी शेकडो मधुर गीते लिहिली, त्या चन्द्रावर माणूस पोहोचल्याच्या आजच्या काळात रवीन्द्रनाथ असते तर ह्या महाविजयावर त्यांनी महाकाव्य लिहिले असते. जीवनाला अरुंद करून त्यांनी एकाच दिशेने वाहू दिले नाही. टागोर हा पोरीबाळींना घेऊन नाच गाणी करणारा कवी, अशी महाराष्ट्रात स्वतःला बुद्धिजीवी समजणाऱ्या, चन्द्र, चांदणे आणि तरुणी ह्यांच्यातच सौंदर्याचे रसायन शोधणाऱ्या आणि स्वतःच स्वतःला सौंदर्यवादी (अहाहा !) म्हणवणाऱ्या काही महाभागांची समजूत आहे. त्यांनी शांतिनिकेतन ही टागोरांच्या जीवनाच्या सुवर्णमुद्रेची एक बाजू आहे आणि श्रीनिकेतन ही दुसरी बाजू आहे हे कधीही विचारात घेतलेले नाही. साकल्याच्या प्रदेशाची आपण पोपटपंची करतो ती केशवसुतांच्या पुण्यतिथीची भाषणे करताना ! पण नुसत्या भौतिक जीवनात देखील इतक्या साकल्याने जगणारा महापुरुष जगाच्या इतिहासात दुसरा कुणी असेल की नाही कोण .जाणे.

सुरुवातीच्या काळात टागोरांचे वाङ्मय हे 'दुर्नीति प्रयोजक' म्हणून सनातनी बंगालने त्यांना धारेवर धरले. 'हा धनिक वर्गातला कवी, ग्रामीण जीवनातली आणि शेतकरी-कामगारांची दुःखे याला काय कळणार' म्हणून पांढरपेशे असूनही मार्क्सच्या पोथीवर हात ठेवण्याने आपण श्रमिकांचे प्रतिनिधी झालो असे मानणाऱ्या पुरोगाम्यांनी त्यांना बदनाम करायला सुरुवात केली. इकडे टागोर मात्र श्रीनिकेतनात, ग्रामातले विणकर, कुंभार, सुतार, बुरुड, चांभार उद्ध्वस्त होत चालले होते, त्यांचे उद्योग व्यवस्थित कसे चालतील हे पाहण्यासाठी नव्या नव्या योजना प्रत्यक्षात आणीत होते. देशोदेशींच्या तज्ज्ञांना बोलावीत होते. कालीमोहन घोषांसारखे त्यांचे सहकारी खेड्यापाड्यांतून पायपीट करीत होते. सकाळी सुंदर कविता लिहिणारा हा कवी दुपारी 'मलेरिया-निर्मूलना'च्या प्रचाराचे लेख लिहीत होता. नव्या बीजांचा अभ्यास करायचा, रोपणीच्या नव्या पद्धती शोधून काढायच्या, कातडी कमावून त्यांच्यावर अस्सल भारतीय शैलीच्या चित्रांचे ठसे उमटवून त्यांच्या पिशव्या आणि इतर वस्तू करायच्या, — ह्यांत 'थ्रिल' नाही. हे कार्य शांतपणाने, निराश न होता करायचे असते. त्यामुळे क्रांती म्हणजे बसपासून जे दिसेल ते जाळत सुटायचे आणि त्या ज्वालांना क्रांतीच्या ज्वाला समजायचे एवढीच ज्यांची कल्पना त्यांना टागोर क्रांतिकारक कसे वाटावे ?

निसर्गातही उत्पात होतात. पण ते अपवाद म्हणून. निसर्ग निर्मितीचे ऋतुचक्र नवे सर्जन काही सतत वादळे आणि भूकंपांनी घडवीत नसते. बीज फुटते ते अंकुर दाखवीत. पाने फुटतात ती बुडाची कळी दाखवीत, कळीचे फूल गळले म्हणावे तर तिथे चिमुकले फळ असते. फळ पिकून गळते ते नवे बीज मातीत टाकीत. विसर्जनाबरोबर सर्जनही घडत असते. टागोरांची क्रांतिकल्पना निसर्गातल्या ह्या नवे घडवीत घडवीत शेष होणाऱ्या जुन्यांच्या परिवर्तनासारखी होती. पण क्रांती म्हणजे पिस्तुल, क्रांती म्हणजे रक्ताचे पाट, क्रांती म्हणजे बॉम्ब, ॲसिड बल्ब, मोलोटोव्ह कॉकटेल असे मानणारांना रवीन्द्रनाथ लेखणी, कुंचला, वीणा आणि औत ह्या हत्यारांनी क्रांती घडवू पाहात होते हे कसे रुचावे ? ज्या जपानच्या रसिकतेवर, उद्योगशीलतेवर, चित्रकलेवर त्यांचे अतोनात प्रेम होते, जिथे त्यांना खूप सन्मानही लाभले होते - त्या जपानला साम्राज्यशाहीची भूक लागून त्यांनी त्या काळी चीनवर हल्ला केल्यावर नोगूची ह्या तिथल्या महान् कवी मित्राला त्यांनी पत्रातून लिहिले होते की... "- जिच्यावर माझे प्रेम आहे अशा तुमच्या जनतेला विजय लाभो, अशी नव्हे तर पश्चात्ताप होवो हीच माझी इच्छा !" अन्यायाचा निषेध करायला रवीन्द्रनाथ सदैव उभे राहिले. बिहारचा भूकंप हा हरिजनांवर अत्याचार केल्याबद्दल झालेला ईश्वरी प्रकोप आहे असे गांधींनी विधान केल्याबरोबर त्या आततायी विधानाचाही टागोरांनी स्पष्ट शब्दांत निषेध केला होता. असल्या सूड घेणाऱ्या देवावर

आणि आंधळ्या देशभक्तीवर टागोरांची श्रद्धा नव्हती.

बंगाली असूनही ते आत्यंतिकेच्या आहारी गेले नाहीत आणि कवी असूनही स्वप्नांनाच सत्य मानून शब्दांनी कुरवाळीत बसले नाहीत.





श्रीनिकेतनात मी आणि सलील बराच वेळ भटकत होतो. सलीलचे वडील कालीमोहनबाबू यांचे ते कार्यक्षेत्र असल्यामुळे सलीलचे बालपण तिथेच गेले. तिथल्या अनेक आठवणी. सलील मला, तिथे गुरुदेवांनी शेतीचे, हस्तोद्योगाचे, विणकामाचे कसे निरनिराळे प्रयोग केले, याच्या कथा सांगत होता. एका जपानी शेतीतज्ज्ञाने सारे आयुष्य तिथेच घालवून बागा कशा फुलवल्या, एल्महर्स्टसाहेब कसे संपूर्ण बंगाली झाले होते... नाना कथा. शांतिनिकेतनसारखी इथेही दाट वृक्षराजी. गावाच्या तोंडाशीच एक सुंदर तलाव. आम्ही चालत चालत निघालो. छोट्या छोट्या घरांभोवती बागा होत्या. परसांत भाजी होती. परसदारी केळ आणि आळू दिसले की ते घर मला परके वाटतच नाही. एका घरासमोर तर डेलियाचे अनंत प्रकार होते. रंगीबेरंगी नवी कोरी गोधडी पांघरावी तशी त्या घराने नाना रंगांची डेलिया आणि बोगनवेलीची फुले अंगभर पांघरली होती. मला शेती, ग्रामोद्योग वगैरे प्रकारात गती नसल्यामुळे आम्ही कला-कुसरीच्या वस्तू पाहायला हस्तव्यवसाय-केन्द्रात गेलो. तिथले कर्मचारी वर्तमानपत्र वाचणे, गप्पा मारणे वगैरे व्यवसायांत गढले होते. एकानेही टेकलेले

बुड हलवले नाही. आता ते श्रीनिकेतनातले कर्मचारी नव्हते. 'सरकारी नोकर'. होते. दुकानातल्या वस्तूंविषयी जिथे त्यांना आपुलकी नव्हती, तिथे गिऱ्हाइकाबद्दल का असावी ? चामड्याच्या पिशव्या, कापड वगैरेवर एक खास शांतिनिकेतन-कलेचा छाप आहे. आता त्यात नाविन्य राहिले नाही. त्या डिझाइनची भरपूर नक्कल झाली आहे. गावोगावी भडभुंजे असले तरी पंढरपूरहून येताना माणसे तिथले डाळेकुरमुरे आणतातच. म्हणून काही वस्तू विकत घ्यावी असा विचार आला. कोडगेपणाने त्या विक्रेत्यांची नजर पकडून आम्ही भाव विचारीत होतो.

'कुठून शिंच्या कटकटी येतात कोण जाणे' असा चेहरा करून त्यातला प्रत्येकजण आमचा प्रश्न कानाबाहेर फेकत होता. त्या वस्तू कुणी विकत घ्याव्यात ह्याविषयी त्या पगारी विक्रेत्यांपैकी एकालाही आस्था नव्हती. विक्रीवर त्याचा पगार खालीवर होणार नव्हता. शेवटी त्याने कंटाळून "इथे वस्तू विक्रीला नाहीत -" असे त्यापुढे '- तेव्हा आता टळा -' एवढे न जोडता सांगितले.

"मग कुठे मिळतील ?"

"दुकानात विचारा" असे म्हणून त्याने 'आनंदबाजारपत्रिके'तल्या अग्रलेखात डोके घातले. मी माझ्या दंडाला चिमटा घेऊन, पुण्यातल्या लक्ष्मी रोडवर नसल्याची खात्री करून घेतली.

त्यानंतर मी सलीलचे आणि सलील माझे समाधान करीत होता. गुरुदेवांचे एक वाक्य मला राहून राहून आठवते - अनेक वर्षांपूर्वी त्यांनी अमेरिकेहून पाठविलेल्या पत्रात लिहिले होते - "काही काळाने शांतिनिकेतनात 'सुदक्ष हिशेबनवीसांना' प्राधान्य मिळेल आणि मग त्या संस्थेतून 'जागृत चिन्ता आणि प्रयत्न' आणि 'शान्तम् शिवम् अद्वैतम्' निर्वासित होतील -" शांतिनिकेतन आणि श्रीनिकेतनातले ते प्राचीन वृक्ष वगळले तर अर्वाचीन कारभाऱ्यांनी गुरुदेवांची ही भविष्यवाणी खरी करायचा चंग बांधलेला अनेक वेळा माझ्या अनुभवाला आला. सलीलच्या परिचयाचे जुने लोक भेटत. सलील आपला राग किंवा निराशा व्यक्त करीत होता. आणि ते देखील '- एइ रकम चलबे - असेच चालायचे' म्हणत असत.

'हे असेच चालायचे'... 'हे असेच चालायचे', 'सत्यमेव जयते'च्या ऐवजी 'हे असेच चालायचे' हेच आपले राष्ट्रीय बोधवाक्य का करीत नाहीत ?

श्रीनिकेतनाच्या परिसरातून बाहेर पडताना भोवती फुललेले वृक्ष दिसत होते. निसर्ग आपले कार्य करीतच होता. नवी बीजे पेरणारा आणि नवी फुले फुलवणारा नवा माळी येईलही कधीतरी. भवभूतीसारखे 'कालोह्ययम् निरवधिर्विपुला च पृथ्वी' हेच म्हणायला

हवे. सुरूलच्या त्या एकेकाळच्या उजाड परिसरात रवीन्द्रनाथ ठाकूर नावाचा माळी येणार आहे हे तरी भाकीत त्यापूर्वी कोणी केले होते ? - हिंडत हिंडत नाक्यावर आलो. एका गावठी हॉटेलपाशी गर्दी जमली होती. वैष्णव गायकांचा मेळावा गात होता. आम्हीही त्या गर्दीत घुसलो आणि श्रीनिकेतनातून बाहेर पडताना आलेले औदासीन्य त्या सूर लयीच्या उसळत्या प्रवाहात बुडवून टाकले. बंगाली लोकांना ह्या वैष्णवगीतांचे विलक्षण वेड. ही गर्दी जमली. हां हां म्हणता त्या गायकांच्या पदरात पाच दहा रुपयांचा खुर्दा जमा झाला. 'हरिँ बोऽल'चा गजर झाला. टोळी केंदुलेच्या दिशेला निघाली. पौष-माघ हे जत्रेचे महिने. वैष्णवजन हरिनामाचा गजर करीत एका जत्रेच्या गावाहून दुसऱ्या जत्रेला जात असतात. केंदुली हे अष्टपदीकार जयदेवाचे गाव. अजय नदीच्या तीरावर जत्रा भरते. बंगालच्या चारी दिशांतून बाऊल आणि इतर वैष्णव गायक जमतात. वैष्णवांचा मेळा दूरवर गेला. तेवढ्यात ढोल नगाऱ्यांचा नाद ऐकू आला. आणि लाल निशाणे घेतलेली भली मोठी मिरवणूक दिसायला लागली. सांवताळांची मिरवणूक होती. लाल निशाण फडकत होते. काही तरी 'चोलबे ना - चोलबे ना - चालणार नाही चालणार नाही -' अशा घोषणा चालल्या होत्या. मिरवणुकीतल्या माणसांच्या हाती भाले, तीरकमठे, फरश्या, तलवारी अशी शस्त्रेही होती. नुकत्याच ऐकलेल्या 'हरि बोऽल'वर 'इन्किलाब झिंदाबाद'चा उतारा होता. असली ही सशस्त्र मिरवणूक मी प्रथमच पाहात होतो. हॉटेलवाल्याला माझ्या चेहऱ्यावर भीती दिसली असावी. तो म्हणाला, "काही नाही बाबू -आता हे असंच चालायचं -"

श्रीनिकेतनातला सुस्तपणा पाहून राग व्यक्त केला तर तिथल्या लोकांची प्रतिक्रिया 'हे असंच चालायचं' - इथे शस्त्रधाऱ्यांची मिरवणूक रस्त्यातून आग ओकीत चालली तरी - 'हे असंच चालायचं'. मनात म्हटले वा ! काय देश आहे माझा ! काहीही होवो. 'हे असंच चालायचं' म्हटले की संपले ! 'तथास्तु' म्हणायचे आणि दिवस ढकलायचा. मग कानावर हरिनाम पडो की व्हिएटनाम, व्हिएटनामच्या घोषणा पडोत.

अधूनमधून ही बंगाली खेड्यांतून भटकाभटकी, तिथल्या हॉटेलांची परिस्थिती पाहाणे, धुळीत बसून वैष्णवांची गाणी ऐकणे वगैरे लीला चालू असल्या तरी मुख्य काम बंगाली भाषा शिकणे हे असल्यामुळे लक्ष मात्र बंगाली भाषेच्या लकबी पाहणे, हळूच एखादे बंगाली वाक्य मनात रचून फेकणे हेच होते. रोज शिकवणीच्या मास्तरांबरोबर बसणे होतेच. एके काळी शिकवणीचा मास्तर ह्या भूमिकेत काही वर्षे मी काढली आहेत. शिकणाऱ्या विद्यार्थ्याइतका देखील शिकवणीत मला उत्साह नसे. एका विद्यार्थ्याला घेऊन तासभर शिकवीत बसणे ही एक दिव्य साधना आहे असे माझे मत आहे. विशेषतः

प्राथमिक विद्यार्थ्यांना. वर्गच्या वर्ग शिकवणे त्यामानाने सोपे. मी संगीतसुद्धा गुरूपाशी एकटा बसून शिकलो नाही. माझ्या लहानपणी शिकवणीचे मास्तर ही श्रीमंतांच्या उनाड पोरांसाठी चालणारी चैन होती. आम्ही ज्ञानाच्या आणि कलेच्या सार्वजनिक अन्नछत्रात पानावर पडलेले खाणाऱ्यांपैकी ! त्यामुळे माझ्या आयुष्यात शिकवणीचे मास्तर प्रथम आले ते वयाच्या पन्नासाव्या वर्षी - शांतिनिकेतनात. तिथल्या पाठभवनातल्या रामबहालजींनी मला धडे द्यायला सुरुवात केली. तशी मी मुळाक्षरे वगैरे घटवली होती. रामबहालजी वास्तविक उत्तर प्रदेशातले. पण त्यांच्या दोन तीन पिढ्या बंगालातच गेल्या. नखशिखान्त शाळामास्तर. तीनच्या ठोक्याला हजर. माझ्या खोलीत त्यांनी शिशुवर्ग सुरू केला. आणि टागोरांनी प्राथमिक शाळेतल्या मुलांसाठी लिहिलेल्या 'सहजपाठ, पुस्तक पहिले'पासून माझी शाळा सुरू झाली.

रवीन्द्रांनी हजारो कविता लिहिल्या, नाटके लिहिली, कादंबऱ्या, प्रवासवर्णने, पत्रे, निबंध — खूप काही लिहिले; पण रवीन्द्रनाथ टागोर या माणसापुढे मी जर मनोमन लोटांगण घातले असेल तर प्राथमिक शाळेची ही पाठ्यपुस्तके रचल्याबद्दल ! 'वृद्धत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा असे' असे केशवसुतांनी म्हटले आहे. पण शैशवाचे स्मरण म्हणजे काय ते टागोरांचे हे 'सहजपाठ' वाचल्यावर कळते. ही पाठ्यपुस्तके म्हणजे रस, रंग, गंध, नाद यांच्या सृष्टीतली आनंददायक सहल आहे. बंगाल्यांच्या गेल्या चार पिढ्या ह्या पाठ्यपुस्तकांतून शिकताहेत. आजदेखील सरकार कुठल्याही पक्षाचे असो पाठ्यपुस्तके गुरुदेवांचीच ! आपल्याकडे 'अरुण-वाचन' लिहून आचार्य अत्र्यांनी फार मोठे उपकार करून ठेवले आहेत. अत्रे हे खरे 'आचार्य' त्या पाठ्यपुस्तकांचे निर्माते म्हणून !

'सहजपाठ' ही टागोरांची बंगालला सर्वांत मोठी देणगी. तत्पूर्वी ईश्वरचंद्र विद्यासागरांनी लिहिलेली अंकलिपी होती. ती आपल्या 'काका उठा-दार उघडा' छापच होती. इतकेच नव्हे तर 'खोटे कधी बोलू नये - चोरी कधी करू नये' आणि 'शाळेसी जाताना मुलांनी वाटेत तमाशा पाहात थांबू नये-' हा मराठीतून आम्हाला पाजण्यात आलेला डोज् त्यावेळी बंगाल्यांनाही प्यावा लागला होता. टागोरांनाही तीच अंकलिपी शिकावी लागली होती. ढग, पाऊस, फुलपाखरे, खेळ, नदी, चांदण्या, पाखरे यांची काही स्वप्नसृष्टी असते याची तत्कालीन शाळाखात्याला दखल नव्हती. बालवयातील ती जखम टागोर विसरले नव्हते. शैशव कुरतडणारी ती पाठ्यपुस्तके. उपदेशाचे एरंडेल पाजणारी. सारखे 'अमुक करू नकोस' हे सांगणारी. गुरुदेवांनी ही नवी पाठ्यपुस्तके लिहून प्राथमिक शिक्षणात अभूतपूर्व क्रांती केली. उगीचच थोरांची चरित्रे - राष्ट्रप्रेम - सदाचार वगैरे न पेलणाऱ्या भानगडीच ठेवल्या नाहीत. पोरांना अद्भुतातच नेले असे

नाही. पण त्यांच्या बालसृष्टीतले त्यांचे मैतर कोण हे नीट पाहिले. एक एक धडा म्हणजे सुंदर शब्दचित्र आहे. त्यांना कधी छंद लयीचे पैंजण बांधून नाचायला लावले आहे. कधी रंगांचा साक्षात्कार घडवला आहे. भोवतालचे जग 'पाहायला', 'ऐकायला' आणि आपण काही शिकतो आहोत असे न वाटता शिकायला लावणारे ते धडे ! बंगालातल्या सर्व प्राथमिक शाळांतल्या मुलांना ही पुस्तके सरकारतर्फे फुकट देतात. ही पुस्तके सजवायला गुरुदेवांच्या जोडीला नंदलाल बोसांसारखा असामान्य चित्रकार आपला कुंचला घेऊन बसला होता. टागोरांच्या धड्यांशी नंदलालबाबूंच्या चित्रांनी जुगलबंदी केली आहे. शांतिनिकेतनातल्या वास्तव्यात ह्या सहजपाठांनी माझे हरवलेले बालपण मला परत आणून दिले. ज्याला म्हणून बंगाली शिकायचे असेल त्याने 'सहजपाठा'चे हे चार भाग पुन्हा पुन्हा वाचावे. बंगाली भाषेच्या अंगाखांद्यावर खेळल्यासारखे वाटेल. 'सहजपाठ' हे गुरुदेवांचे बंगालवर महान् उपकार आहेत.

साधी मुळाक्षरे सुद्धा नंदलालबाबूंचे सुंदर चित्र आणि गुरुदेवांचे बालगीत यांच्या संगतीत आली आहेत. 'अडगुळं मडगुळं' ह्या धर्तीची बंगालीत शेकडो बालगीते आहेत. एकतर ह्या भाषेला छंद-प्रासाचा सोसच आहे. आणि बालगीतांची खरी गंमत यमक प्रासांचे खुळखुळे वाजवण्यातच असते. मी अ आ इ ई शिकताना ती बालगीते म्हणत होतो. बंगाली भाषा इंग्लिशसारखी स्पेलिंगचा उच्चार करीत लिहितात. कारण मुळाक्षरे, लिहिणे आणि त्यांचे उच्चार ह्यात फरक पडतो. त्यामुळे, स, श, ष ह्यांतला कुठला 'श' लिहायचा हे तोंडाने म्हणत पोरे लिहितात. दंतव्य 'श' की तालव्य 'श' हे म्हणावे लागते. कारण 'स' देखील 'श'च ! 'य' हा यजुर्वेद्यांसारखा 'ज्य' होतो, त्यामुळे यशवंतराव हे जोशोबोन्तोराय होतात. पुन्हा व्ह चा भ होत असल्यामुळे चव्हाणांचे चक्क 'च्याभन !' त्यातून 'क ख ग घ'चे 'को खो गो घो' होतात ते उच्चारी. लेखी 'क'च ! म्हणून कोका कोला हा 'कका कला' की कोका कोला हे म्हणत म्हणत - कला काना का काला मात्रा को करीत लिहायचे. बरे दर वेळी 'अ'चा ओ होईलच असे नाही. त्यामुळे कमलचे कोमोल झाले तरी कोमोलो होत नाही. फूटबॉल मात्र फूटबल असा लिहायचा. पण माणसासारख्या भाषेलाही खोडी हव्यातच ! नाही तरी मराठी 'गवत' शब्दात तीन निरनिराळे 'अ' कार आहेतच की ! 'गवत कापून आणा' असे आपण लिहिले तरी बोलताना 'गवऽत्कापूनाणा'च म्हणतो. 'सहजपाठा'त ह्या मुळाक्षरांखाली दोन दोन ओळींची गाणी आहेत ! नंदलालबाबूंचे काळ्या पांढऱ्या रंगातले वर एक एक सुंदर ठसठशीत चित्र. प्रत्येक पान असे नटलेले. रामबहालजींकडून ती गाणी वाचून घेतली. शिशुवर्गातल्या मुलाच्या उत्साहानेच ती पाठ केली.

*'ऱ्हश्श इ दीघ्घ ई बोशे खाय खीर खोई —'*

*(ऱ्हस्व इ दीर्घ ई । बसून खाई खीर लाही)*

*च्यो छ्यो ज्यो झ्यो दोले दोले बोजा निये हाटे च्योले—*

*(च छ ज झ डोले डोले, बोजा घेऊन बाजारात चालले)*

—अशी ही मजेदार बालगीते. त्यांतली मुळाक्षरे मुलांचे खेळगडी होऊन येतात. इ ई खीर लाही खातात. उ ऊ कुत्रे होऊन भुंकतात. ए ऐ दही विकायला जातात. ओ औ दोघे भाऊ वहिनीला म्हणतात भात खाऊ !

ह्या 'सहजपाठा'त जसजशी माझी प्रगती होत चालली तसतसा टागोरांचे, मुलांचे कुतूहल वाढवण्याचे, त्यांच्या संवेदना अधिक तीव्र करण्याचे सामर्थ्य केवढे मोठे होते याचा प्रत्यय यायला लागला. कुठेही म्हणून उपदेशाचा स्पर्श नाही. उलट त्या पोरांची स्वप्नेच जणू त्यांच्याशी त्या पुस्तकांतून. बोलत होती. आम्ही आकार, इकाराचे धडे, काका उठा - दार उघडा, असल्या रुक्ष वाक्यातून शिकलो. टागोरांनी काना, मात्रा, टोप्या शिकवताना पोरांना गाण्यांतून त्यांची ओळख करून दिली -

*आलो हॉय - गॅलॉ भोय, चारी दिक् झिक् मिक्—*

*(उजेड होय् - गेले भय । चोहो बाजू झुंजू मुंजू ।)*

हा रोजचा अनुभव छंदातून नाचत आला. मग त्या पहाटेबरोबर सारे गाव कसे जागले - माणसे कामाला कशी लागली - ही चित्रे.

*...पाडे पेरू हरी हर ।*

*मधू राय बांधे घर ।*

*होडी हाके पातू पाल ।*

*धान्य आणे जयलाल ।*

*धरे सुकाणू दीननाथ ।*

*अविनाश रांधे भात ।*

खेड्यातला मुलगा आणि मुलगी हीच डोळ्यापुढे धरून गुरुदेवांनी पन्नास एक वर्षांपूर्वी हे 'सहजपाठ' रचले. त्या लहानग्यांच्या प्रत्यक्ष आणि स्वप्नसृष्टीतल्या अनुभवातून उभी राहणारी ही चित्रे. दर दोन धड्यानंतर 'सुटी'शी संबंध. 'चला उद्या सुटी,' आज सुटी आहे काय करू या ?- असे उल्लेख.

शरद ऋतूच्या वर्णनाचे त्यांचे एक सुन्दर गाणे आहे,

*— येतसे शरद - हिवाळ्याचा हात हळूच हवेला धरे —*

*पहाटे पहाटे रानापानांना हुडहुडी कशी भरे*

*आवळेबनाचा होतो थरकाप, मन लागे हुरहुरू*


*सांगते कोणीसे, झडतील पाने, हिवाळा होताच सुरू —*

हा झाला आपला माझा वेडावाकडा अनुवाद. मूळ बंगालीतले रवीन्द्रांचे शब्दनर्तन मराठीत आणणे माझ्या ताकदीपलीकडले आहे. शरदाचे वर्णन इतक्या सुंदर तपशिलाने केले आहे की शरद ऋतू म्हटला की सगळ्या बंगाली स्त्री-पुरुषांच्या मनापुढे बालवयात झालेला हा चित्रमय संस्कार उभा राहात असेल... फार सुंदर चित्रे.

*...शेवंतीला कशा फुटती कळ्या, बहर ये तगरीला*
*मधुमालतीशी भुंगा ये गुंगत दिसातून दोन वेळा...*

एका कवितेत आश्विनातल्या सोनेरी उन्हाचे वर्णन त्यांनी 'हे तर सुटीचे ऊन' असे केले आहे. बंगालात दुर्गापूजेची मोठी सुटी. मुले भाद्रपदापासून ह्या आश्विनाच्या सुटीची वाट पाहात असतात. आणि म्हणूनच हा चहू दिशांना सोने उधळत येणारा सूर्य पूजेच्या सुट्टीचे प्रकाश-किरणांनी चित्र काढतो. पूजेला लागणाऱ्या फुलांच्या फुलबनावर उगवतो हा सूर्य... पूजार दिनेर रोबी... पूजेच्या दिवसातला सूर्य. हा नेहमीचा, कामाला धाडणारा, शाळेत चला म्हणत उगवणारा सूर्य नव्हे... सुट्टी-सुट्टी असे सांगत येणारा सूर्य! ह्या साऱ्या कविता ही पोरे म्हणतात तरी कशी हे पाहाण्याची मला फार उत्सुकता होती. रामबहालजींना मी सांगत होतो, 'मला एकदा शिशुभवनात घेऊन चला.' गुरुदेवांची ती बालगीते चिमण्या कंठांतून फुलून येताना कशी दिसतात ते मला पाह्यचे होते. आम्ही छडीच्या धाकाने केवळ गणितेच सोडवली नाहीत. कवितादेखील छडीच्याच धाकाने म्हटल्या. कविता म्हणण्यात आनंद आहे हे आमच्या बाळपणी आम्हाला कुणी सांगितलेच नव्हते. कविता पाठ केली की पाच मार्क मिळतात एवढेच ठाऊक. शिवाय 'बरे सत्य बोला यथातथ्य चाला'मध्ये मुळातल्या कवितेलाच आनंदाचे कोम्भ फुटले नव्हते, तिथे आमच्या गळ्यातून तरी ते कशाला फुटावे? 'धरा बुद्धिपोटी विवेके तुम्ही हो' आणि 'देवा तुझिया चरणी नमितो- अंतस्करणी तुज आठवितो—' ही आमची बालगीते! आमचे बाल्य वार्धक्याहून वैराग्यशील करायची तत्कालीन शाळाखात्याची धडपड होती. त्याच काळात तिकडे बंगालीत रवीन्द्रनाथांनी बंगाली मुलांमुलींना किती सुंदर गाणी रचून दिली होती! बंगाली माणसाचे बाल्य ह्या गीतांनी साजरे झाले.





संध्याकाळचे साडेपाच सहा वाजले होते; पण दिवेलागणी झाली होती. मी सलीलला म्हणालो, "चल, आपण शिशुभवनाच्या वसतिगृहात जाऊ!" आम्ही त्या सुन्दर वसतिगृहात गेलो. सगळ्या चिमण्या घरट्यात आल्या होत्या. टुमदार बैठे वसतिगृह. भिंतीवर, नंदलालबाबू, अवनीन्द्रनाथ, विनोद-दा यांच्यासारख्या कलामहर्षींनी हरणे, बगळे, माकडे, वाघ, सिंह यांची सुन्दर चित्रे काढली आहेत. अजंठ्याची प्रस्तर-चित्रकला बालकांसाठी, त्यांच्या कल्पनासृष्टीतली चित्रे दाखवीत उभी आहे. लांबलचक डॉर्मिटरी. चिमुकल्या खाटा. त्यांच्यावर मच्छरदाण्या सोडलेल्या. एका टेबलापाशी बाईच्या भोवती पाचपंचवीस पोरींचा किलबिलाट चालला होता. आम्हाला पाहिल्यावर उगीचच त्या पोरी लाजल्या काय, जिभा काय काढल्या, गंभीर काय झाल्या, खुदकन हसल्या काय. काही बोलायची सोय नाही. सलीलने बाईशी माझी ओळख करून दिली. मग त्या बाईंनी त्या पोरींना काय सांगितले देव जाणे, त्या चिमण्यांचा थवा एकदम माझ्या पायाकडे झुकून 'प्रोनाम' करायला लागला. 'पुरे-पुरे' म्हणायला 'थाक् थाक्' म्हणतात हे तेव्हा मला कळले. मी बाईंना हळूच म्हटले, "ह्या

पोरींना सहजपाठांतली गाणी म्हणता येत असतील. एक दोन गाणी म्हणायला सांगाल का ?''

''एक दोन ? एकदा सरबत्ती सुरू झाली की आवरणे मुश्किल होईल.'' आणि खरोखरीच जी सरबत्ती सुरू झाली ती संपेचना. एक तर बंगाली म्हणजे 'ओ'ची भाषा. त्या चिमण्या ओठांचे चंबू झाले. एका पाठोपाठ एक अशी गाणी सुरू झाली. सलीलही बालपणी हीच गाणी शिकलेला. त्यानेही आवाज मिसळला. मधूनच तो एखादी ओळ विसरला की पोरींच्या आनंदाला उधाण ! एवढा मोठ्ठा दाढीवाला - कविता पाठ नाही ? बंगालीत कविता पाठ म्हणण्याला 'आवृत्ती' (आब्रित्ती) म्हणतात. एका मागून एक आवृत्त्या निघत होत्या. त्यात ह्या पूजेच्या सुटीची ओळ आल्याबरोबर, त्या पोरींनी त्या ओळी म्हणताना पूजेच्या सुटीच्या नुसत्या कल्पनेने इतक्या जोरात त्या ओळी म्हटल्या की भिंतीवरची हरणेदेखील घाबरून धावत सुटतील असे मला वाटले.

पूजार फूलेर बने ओठे ओई । पुजार रोबी - पूजेच्या फुलांच्या वनी उगवला - पूजेच्या दिनीचा रवी —

बंगाल्यांचा कधीही वाटला नव्हता इतका हेवा मला त्या दिवशी वाटला. पुढे एकदा चांगल्या प्रौढ स्त्री-पुरुषांच्या मेळाव्यात मी सहज ह्या बालगीतांचा उल्लेख केला. आणि गंमत अशी की त्या रात्री भोजनासाठी जमलेल्या निरनिराळ्या कुटुम्बांतल्या स्त्री-पुरुषांनी ती गाणी कोरसमध्ये म्हणायला सुरुवात केली. तोवर माझीही ती गाणी पाठ झाली होती. त्यामुळे त्यांच्या जोडीने मीही माझा आवाज मिसळला. कुमोर पाडार गोरूर गाडी... नाम तार मोती बिल... एशेछे शोरोत् हिमेर पोरोश... ह्या बालगीतांचा पासपोर्ट घेऊन मी बंगाली कुटुम्बांत हिंडलो. आज साठीत असलेल्या आजोबांपासून ते सहा वर्षांच्या नातवापर्यंत सगळ्यांना ही गाणी पाठ ! मला वाटले कांश्मीरपासून कन्याकुमारीपर्यन्त सगळ्या भारतीय भाषांतून जर अशी चार चार सहा सहा ओळींची गाणी निवडली आणि असली पाच पन्नास गाणी साऱ्या देशातल्या पोरांना नाचत-खेळत पाठ करायला लावली - तर त्या गीतांच्या नात्याने सारा देश बांधला जाईल. सगळ्या भाषा शिकणे अवघड आहे. पण नाद, प्रास, छंद, यांच्या जादूने मंतरलेली गाणी असली म्हणजे झाले. साउंड ऑफ म्यूझिकमधले ते 'सारेगम' चे गाणे साऱ्या जगातली पोरे गातात. सगळ्यांना अर्थ कुठे समजतो ? आणि करायचाय् काय अर्थ ? लय, छंद, नाद यांचा खेळ महत्त्वाचा.

गाणे हरवून बसणे हे समाजाच्या म्हातारपणाचे लक्षण आहे. आज जगभर तरुण मुले आणि मुली ही बीटल्सची गाणी गातात. जवानीच्या जोषाने भरलेली. नृत्याला आव्हान देणारी. आमच्या लोकनृत्याला जर आम्ही तरुण मुलामुलींच्या जीवनात कौतुकाचे स्थान

दिले तर तीही नृत्ये लोकप्रिय होतील. समूह-गायन आणि समूह-नृत्य ही माणसाची आदिम अवस्थेपासूनची गरज आहे. इंग्रजाला घाबरून आलेल्या सभ्यतेच्या कल्पनांमुळे आमचा मध्यमवर्गीय समाज हा सुतक्यासारखा सभ्य झाला. महाराष्ट्रातल्या मध्यमवर्गाला तर तो सदैव सुतक्यासारखा भारतात वागणारा हापिसातला गोरा साहेब आणि भिक्षुक संस्कृतीतली करनकरी क्षुद्रता यांची कीडच लागली. आमच्याकडे वास्तविक लेझमीसारखा साऱ्या गावाला नाचायला लावणारा खेळ होता. पण त्यातून आमच्या ब्राह्मणआळ्या अलिप्त ! एखादा रामजोशी लावण्या गायला लागला की टाक बहिष्कार. पठ्ठे बापूरावाने गणगौळण उभी केली, टाक वाळीत ! अशा वेळी महाराष्ट्राला पुन्हा एकदा गाणे गायला लावणाऱ्या अण्णा किर्लोस्करांचे आणि बालगंधर्वांचे ऋण किती अपार आहे याची जाणीव होते. निरनिराळ्या देशांतून हिंडताना समूहनृत्यांत रंगलेला समाज पाहिला की जीवनातल्या केवढ्या मोठ्या आनंदाला आपण मुकलो आहोत या जाणिवेने मन ओशाळते. हजारो लोकांनी कसल्याही पारलौकिक सौद्याखेरीज केवळ आनंदासाठी उत्स्फूर्तपणाने गायलेली गाणी ऐकताना मन हरखून जाते. मी पूर्व-जर्मनीत असताना एका छोट्याशा खेड्यातल्या जुन्या जमानातल्या 'इन्'सारख्या हॉटेलात माझी दुभाषीण बाई मला घेऊन गेली. लाकडी झोपडी होती. मध्यभागी सरदारजीच्या तंदूरसारखी भट्टी पेटत होती. मुर्ग्या तयार होत होत्या. 'मय'खाना होताच. सुमारे चाळीस पन्नास कुटुंबे लाकडी बाकड्यांवर बसून समोरच्या ओबडधोबड बश्यांत ठेवलेल्या 'मुर्गी'चा आणि जर्मन वारुणीचा आस्वाद घेत होती. बॅण्ड वाजत होता. नृत्य चालले होते. तेवढ्यात एका कुटुंबातल्या स्त्री-पुरुषांनी गाणी म्हणायला सुरुवात केली. बॅण्डवाल्यांनी त्यांना साथ दिली. हां हां म्हणता त्या खाणावळीतल्या वेट्रेसेसपासून ते गिऱ्हाइकांपर्यन्त सगळ्यांनी एकामागून एक गाणी सुरू केली. बसल्या बसल्या ओळखी-अनोळखीचे सारे स्त्री-पुरुष एकमेकांच्या कोपरात कोपर गुंफून डोलत गाऊ लागले. हे दृश्य इंग्लंडात दिसत नाही. पण युरोपात मात्र हॉटेलमध्ये- विशेषतः लहान लहान गावातल्या हॉटेलमध्ये सगळी माणसे एकदम गाऊ लागतात. शेकडो गाणी त्यांना पाठ असतात. छोटी छोटी चार चार ओळींची साध्या चालीतली सोप्या ठेक्यातली गाणी. कुणीही आवाज मिसळावा. बंगालमधल्या पोरासोरापासून प्रौढापर्यन्त सगळ्यांनी गावी अशी शेकडो गाणी चालीसकट टागोरांनी दिली. त्यापूर्वी वैष्णव कवींनी राधाकृष्णप्रेमाची गाणी दिली होती. त्याखेरीज बाउलांची गाणी, नावाड्यांची भाटीयाली गीते. कुठेही कौटुंबिक किंवा मित्र-मैत्रिणींचा मेळावा जमला की 'गान धोरून्' - 'गाणं धरा-' अशी सूचना होते. ह्या गीतांचे बीजारोपण ह्या सहजपाठांतून टागोरांनी केले.

हे पाठ वाचताना बंगाली रीतीरिवाजांचे, खाण्यापिण्याच्या रुचीचे मोठे मजेदार दर्शन होत असे. आमची पाठ्यपुस्तके ब्रिटिश अमदानीत शाकाहारी पंडितांनी रचली. त्यामुळे मांसाहार किंवा मत्स्याहाराचा उल्लेख 'अब्रह्मण्यम्' म्हणून टाळलेला. टागोरांच्या सहजपाठांत सणाला जेवणाचा बेत काय आहे ते सांगताना, 'कोई' मासे, 'बाटा' मासे, यांचाही उल्लेख सापडतो. नव्या सरकारी पाठ्यपुस्तकात देखील मला कुठे 'आज आईने सरंगा तळला होता' किंवा 'कोंबडीचा पुलाव मस्त झाला होता' अशासारखे वाक्य आढळले नाही. म्हणजे आम्ही जे खूप आवडीने खातो त्याचा उल्लेख मात्र करायचे टाळतो. बंगालात माणसाचा लहान-मोठेपणा त्याच्या शाकाहार-मांसाहारावर टांगलेला नाही. त्यामुळे आपण शाकाहारी आहोत म्हणजे 'उच्च' आहोत हे मानण्याचा मूर्खपणाही तिथे नाही.

खाणे, गाणे, अद्‌भुतांत रंगणे, मोकळ्यावर खेळणे, पाखरांची मजा पाहणे, बोरे, पेरू काढणे, उत्सव, जत्रा, बाजार - आणि सुट्टी - ह्यासारख्या मुलांच्या नैसर्गिक आवडी लक्षात घेऊन गुरुदेवांनी हे सहजपाठ रचले आहेत. आमच्या शिक्षणतज्ज्ञांनी निदान आदर्श बालवाचनमाला कशा असाव्या हे पाहाण्यासाठी तरी बंगाली शिकावे. मुलांपुढे एक एक धडा एक एक चित्र होऊन येतो. पहिल्याच पुस्तकातला धडा आहे -

"निलू चल. तालवनाची हीच वाट. पलीकडे तिळाचे शेत. आणि तिथून पुढे मोहरीचे. पुढे तळे लागते. निळे निळे पाणी. काठाकाठाला चिखल. जळात किरण कसे झगमग झगमग करतात पाहा. बगळा कसा टुकूटुकू बघतो आणि मासा पकडतो. हे कुठले रे पाखरू ? अरे ! हा तर पोपट. हा काही बोलतो का रे ? तो बोलतो राम राम हरी हरी." किती सुंदर चित्रे. सगळ्या धड्यांतून मुलांना घराच्या चार भिंतीबाहेर नेऊन हिंडवलेले.

"चूप बशे घूम पाय. चोलो घूरे आशि.. चूप बसून झोप येते. चल फिरून येऊ - फुले तोडून आणू- आज खूप थंडी. आळवाच्या पानावरून टुपटुप करीत दंव पडतंय्. गवत ओलं, पाय भिजतात. दूखी आजी चुलीजवळ बसून अंग शेकत्येय् - शेकता शेकता गाणं गुणगुणत्येय्. गोपी टोपी काढून शाल ओढून झोपलाय्. हळूच उठवूया. बोरवनात जाऊया. बोरं पाडून खाऊया. बोरीवर चिमणीचे घरटे आहे. तिला राहू दे तिथेच. आज बुधवार. सुटी. तरीच नटू खूष. तोही येईल बोरवनात."

— इतके सुंदर धडे आहेत की गुरुदेवांच्या गीतांजलीसारखे ह्या प्राथमिक पाठ्यपुस्तकांचे रूपांतर करायला हवे. जोडाक्षरांसारखा कठीण मामलाही टागोरांनी गमतीचा केला आहे. "आज आद्यनाथबाबूंच्या कन्येचा विवाह. शल्यपुरातील घरी. कन्येचे नाव श्यामा. वराचे वैद्यनाथ. त्याचा भाऊ सौम्यनाथ आणि कॉलेजात शिकणारा

भाऊ आहे तो धौम्यनाथ...''

धौम्य, सौम्य, रम्य, आद्य, वैद्य, अवश्य, नृत्य असल्या जोडाक्षरांची मजेदार योजना केली आहे. लग्नाच्या मांडवाचे वर्णन. खेड्यातले लग्न. यंदा 'शस्य' (धान्य ह्या अर्थी बंगालीत हाच शब्द रूढ आहे) खूप झाल्यामुळे शेतकरी खूष. म्हणून मांडवात गर्दी. मांडवाबाहेर मुले ब्याटबॉल खेळतात. ('ब्या' हे जोडाक्षर) आणि नि'त्य' शरण त्यांचा 'क्या'प्टन. एकतर टागोरांच्यापुढे शब्द हात जोडून उभे. त्यामुळे ही सारी जोडाक्षरे सहज आल्यासारखी वाटतात. 'चन्दननगरातून आनंदबाबू आले. इन्दूला सांगा आतिथ्य चांगले होऊ द्या. सुंदर फुलदाणी ठेवा. कुन्दाची फुले आणा.' ही सगळी वाक्ये मुले त्या नादाच्या आनंदात गुंगत वाचतात. 'र'फाराचा धडा आल्याबरोबर 'वर्षा' आली. गर्मी सरली. मेघगर्जना सुरू झाली. पर्वतावरून झरे धावत सुटले. कर्णफुली नदीला पूर आला. वर्षा, गर्जना, पर्वत, कर्णफुली यात रफार आले आणि मुसळधार पावसाचे खेड्यातल्या पोरांना परिचित असे चित्रही आले. 'दुर्गानाथाच्या अंगणात पाणीच पाणी. गोठ्याची भिंत फुटली. गाईगुरांची दुर्दशा. शेतकऱ्यांचे काजकर्म बंद. घरोघर सर्दी खोकला...' नुसता 'र'फार फिरवीत फिरवीत किती सुरेख चित्र काढले आहे.

परवाच कुठेसा मी लहान मुलांना केलेला हितोपदेश वाचीत होतो. त्यांत 'पाठ्यपुस्तकांतील चित्रे रंगवू नका' असे होते. नंदलालबाबूंनी सहजपाठांतली काही चित्रे मुलांनी रंग भरावा म्हणून आराखड्यासारखी पोकळ काढली आहेत. पोरांचा उत्साह न दाबता तो सौंदर्य आणि आनंद ह्यांच्या निर्मितीसाठी वापरला पाहिजे हा विचार आता नवा वाटत नाही. परंतु सैन्ये पोटावर चालतात तशा 'शाळा छड्यांवर चालतात' हे ज्या काळी शिक्षणाचे तत्त्व होते त्या काळी मुलांना पाठ्यपुस्तके हीदेखील 'खेळणी'च आहेत असे वाटायला लावणारे टागोर हे नुसते गुरू नव्हेत तर गुरुदेव का होते ते कळायला त्यांचे हे 'सहजपाठ' वाचायला हवेत. आपण वाचतो आहोत ती मौज आहे, 'धडा' नव्हे हे आधी मुलांना वाटायला हवे. धड्याखाली मुलांना स्वाध्याय (?) वगैरे भानगड नाही. कठीण शब्दांचे अर्थ वगैरे प्रकार नाही. कारण त्या पोरांच्या चिमण्या दाताखाली न रगडण्याजोगा शब्दच वापरला नाही. आजूबाजूच्या संस्कारांतून किती नवीन शब्द कानी पडतील याचा बिनचूक अंदाज. बोरे किंवा पेरू खाल्ल्यासारखा पोरांनी धडा खायचा. कविता मटकवायची ! पहिल्या चार यत्तांत व्याकरण, षष्ठी, सप्तमी, कर्तरी, कर्मणी वगैरे भानगड नाही. शब्दांची आणि वाक्यांची असंख्य रूपे त्यांच्यापुढे गोट्यांसारखी ठेवलेली. पोरे मोकळ्या आवाजात गाणे म्हणतात की नाही हे पाहण्याऐवजी त्यांच्याकडून रोगाच्या लक्षणासारखी रागाची लक्षणे गद्यात पाठ करून घेणारी आमच्या शाळांतली संगीत शिक्षण पद्धती आणि त्या पद्धतीच्या फासात चिमुकले गळे आवळणारे आमचे

गायन मास्तर ! पोरांच्या जोडीने ज्याला किंवा जिला टाळ्याबिळ्या वाजवून गाणी म्हणता येत नाहीत अशा बुवाला किंवा बाईला शाळेच्या आवारात शिकवायला यायची बंदी केली पाहिजे. गणितासारखा चिमुकल्या मेंदूंना शिणवणारा विषय शिकवताना त्या गुरुजींनीच किंवा गुरुजीणबाईनीच म्हणावे - 'कारे बुवा - जरा कंटाळा आला नाही का ! दोन मिनिटे एखादे मजेदार गाणे म्हणूया - जरा डोक्यातला कंटाळा बाहेर फेकून भांडी स्वच्छ करूया -' छे ! नुसत्या कल्पनेनेसुद्धा आमचे शिक्षणतज्ज्ञ तडकतील ! आणि इथे नोबेल प्राइझ मिळालेले गुरुदेव रवीन्द्रनाथ शांतिनिकेतनाच्या आश्रमात प्राथमिक शाळेतल्या पोरांना शिकविण्यासाठी भुकेलेले असायचे ! आपल्या शैशवाला त्या शिशुसमूहात बसून हा कवी वृद्धत्वी जपत होता. इतकेच नव्हे तर मोठ्यांच्या नृत्य-नाटिकांच्या तालमींनादेखील प्राथमिक शाळेतल्या पोरांना मुक्तद्वार ! शांतिनिकेतनात आज कुठल्याही समारंभाला सगळ्यात पुढे फुलांचा गालिचा पसरल्यासारखी रंगीबेरंगी पोशाखातली बच्चे मंडळी बसलेली असतात.

शांतिनिकेतनात मला लाभलेले सगळ्यात मोठे भाग्य म्हणजे या बालचमूचा सहवास ! माझे हे चिमुकले गुरुजन, संध्याकाळी आम्रकुंजातून हिंडताना सुर्रकन् एखाद्या झाडामागून हा थवा यायचा आणि मग 'दादा - प्रोनाम', 'दादा-प्रोनाम' सुरू व्हायचे. मग माझी परीक्षाही व्हायची. 'गान धोरून तो-' गाणं म्हणा ना- असा आग्रह होई. मग माझ्या चुकीच्या बंगाली उच्चारांना मनमोकळ्या हसण्याची साथ मिळायची. 'ए बोका-' 'ढ'ला बंगालीत 'बोका' म्हणतात हे ज्ञान इथेच झाले. 'आपनार बाडी कोथाय ?'

'आमार बाडी बोम्बायते—' अशी अधूनमधून तोंडी परीक्षाही व्हायची. ह्या पोरांची निर्भयता विलक्षण.


शांतिनिकेतनात निर्भयता असावी. मत मांडायला मुलांनी आणि शिक्षकांनी भिऊ नये याबद्दल गुरुदेवांचा फार मोठा आग्रह. ह्या निर्भयतेचे प्रत्यंतर महात्मा गांधींच्या सामुदायिक सत्याग्रहाच्या चळवळीच्या वेळी खुद्द गुरुदेवांनाच आले. सामुदायिक चळवळीत गांधीजींचे सत्य, अहिंसेचे व्रत पाळले जाईल अशी गुरुदेवांची खात्री नव्हती. मुलामुलींनी शाळा-कॉलेजे सोडून चळवळीत भाग घ्यावा हेही त्यांना पसंत नव्हते. ह्यांतून शेवटी ज्ञानाचा विद्वेष सुरू होईल. अडाणीपणाचेच भांडवल होईल अशी त्यांना भीती वाटत होती. परंतु देशभर सत्याग्रहाचे प्रचंड आंदोलन उभे राहिले होते. आश्रमातले अध्यापक आणि तरुण मुलेमुली अस्वस्थ होती. टागोरांना त्यांची विचारसरणी, त्यांची सत्याग्रहात उडी टाकण्याची उत्सुकता पटत नव्हती - परंतु त्यावेळीही त्यांनी आपल्या मताचा आग्रह न धरता स्वतःच्या अध्यक्षतेखाली टागोर-मत आणि गांधी-मत ह्याच्यावर वादविवाद घडवून आणला. केवळ छात्रांनाच नव्हे तर अध्यापकांनाही मोकळेपणाने मत

मांडायला लावले. ठराव मताला पडला आणि गांधीमताचा विजय झाला. गुरुदेवांनी त्या चिमुकल्या लोकशाहीचा कौल मान्य केला. 'निर्भयतेच्यां साधनेचे दृश्य फल आपल्याला पाहायला मिळाले' याचा त्यांनी आनंद व्यक्त केला. उत्स्फूर्तपणे सत्याग्रहात जाणाऱ्या छात्र-छात्रींना आणि अध्यापकांना आशीर्वाद दिला. परमताविषयीच्या सहिष्णुतेखेरीज लोकशाही नांदणार नाही हे तत्त्व आपल्या आचरणाने त्यांनी दाखविले. पाठभवनात मुख्याध्यापक देखील कायम नेमणूक झालेले नसत. दरवर्षी शिक्षकच आपल्या मधील एकाला मुख्याध्यापक म्हणून निवडीत असत. मला वाटते भारतात विद्यार्थ्यांचे पहिले पार्लमेंट देखील शांतिनिकेतनातच सुरू झाले. गांधींशी टागोरांचे काही बाबतीत मतभेद होते. परंतु ह्या दोघांतील मतभेदांविषयी परस्परांना लिहिलेली पत्रे वाचणे हा एक 'वादविवाद' कसा करावा या बाबतीतला आदर्श आहे. आज मतभेदांमुळे बाजूला गेलेल्या वर्षानुवर्षांच्या सहकाऱ्यांचे दुसऱ्या दिवसापासून किती हीन पातळीवर चारित्र्यहनन सुरू होते ते काँग्रेसच्या शकलानंतर साऱ्या देशाने पाहिले. आणि गांधीजी शांतिनिकेतनात येणार म्हणून उत्तरायणाशेजारी गुरुदेवांनी श्यामली नावाची दृष्ट लागावी अशी मातीची सुंदर कुटी बांधली आहे, ती पाहिल्यावर मतभेद असूनही दुसऱ्याचे मोठेपण मानणाऱ्या मनाचे हे एक सुंदर स्मारक आहे असे वाटते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
दा. क्र. ७६६ २८७९९ २८४३१







शांतिनिकेतनात 'श्यामली'सारखी असली लहानमोठी कितीतरी सुंदर शिल्पे आहेत. शब्द, सूर आणि रेषा ही इथली उपास्य-त्रयी आहे. इथल्या हिंदी भवनात, चीन भवनात आणि कलाभवनात एकाहून एक सुंदर अशी म्यूरल्स आहेत. एकदा कलाभवनातल्या बंगलीवजा वसतिगृहातल्या छतावर सुंदर म्यूरल पाहिले. बंगाली खेडी पुकुराभोवती फेर धरून वाढतात. पुकुर म्हणजे पुष्कर किंवा तळे. सकाळी गावातल्या लेकी-सुना तिथेच पाणी भरायला जातात. पुरुषमंडळी आणि पोरे स्नानाला जमतात. एखादा कोणी गळ टाकून मासे धरतो. दुपारी कपडे धुण्यासाठी जमणाऱ्या बायाबापड्या एकमेकींशी सुखदुःखाच्या कथा सांगत रेंगाळतात. संध्याकाळी वृद्ध मंडळी त्या जलाशयाकाठी विसावतात. गाई तिथेच पाण्याला येतात. अशा ह्या पुकुराभोवती गाव, गावाभोवती शेतीवाडी, शेतीवाडीपलीकडे छोटी जंगले. बारा बलुती एकमेकांच्या आधाराने उदरनिर्वाह करतात. हर्ष, खेद, रागलोभ, जननमरण अशा गोष्टींनी गजबजलेला हा टुमदार रंगमंच. कलाभवनातल्या त्या छतावर हा दृश्यपट मी पाहात होतो. सहज सलीलला म्हणालो,

"कुणी काढली ही म्यूरल्स ?"

"विनोद-दांनी—"

"कोण विनोद-दा—"

"विनोद बिहारी मुखोपाध्याय — चला जाऊ या त्यांच्या घरी—"

अंधार पडला होता. कलाभवनातून हिंडत हिंडत आम्ही एका टुमदार घरापाशी गेलो. घरात अंधार गुडुप.

"घरात कुणी नाही वाटतं—"

"थांबा" म्हणून सलीलने जोरात हाक मारली— "विनोद-दाऽऽ"

"आशून-आशून.. या या.." आतून एक वृद्ध आवाज आला.

"आमी शोलील — शांतीदार छोटभाय— मी सलील, शांतीदाचा धाकटा भाऊ..."

"आशून-आशून..." त्या आशूनला आता अतिशय आनंदाने केलेल्या स्वागताचा सूर लाभला.

अंधारातच दार उघडले गेले. हा चित्रकार अंधारात का बसला होता ते मला कळेना. तेवढ्यात एक मोलकरीण आली आणि तिने बटण ओढून दिवा लावला. काळोखातल्या रंगमंचावर प्रकाश पडावा आणि एकदम अनपेक्षित अशा प्रकारच्या देखाव्याने चकित व्हावे तसे मला झाले. एका ईझिचेअरवर काळा चष्मा घालून एक अतिशय सौम्यदर्शन वृद्ध गृहस्थ बसले होते. बराच वेळ ते तिथे बसलेले असावेत. समोर एक लहानशी तिपाई होती. तिच्यावर वीत सव्वा वीत उंचीची एक मातीची मूर्ती घडत होती. बाजूला मातीचा गोळा होता. त्यामुळे अंधारातच ही शिल्पकलेची आराधना चालली असावी. भिंतीवर नाना प्रकारची चित्रे होती आणि फडताळ पुस्तकांनी भरलेले होते.

"बरोबर कोऽऽण ?"

"माझे मित्र—" मग सलीलने माझे नाव सांगितले—

"देशपांडे ?"

"होय."

"कुठून मुंबईहून आलात, पुण्याहून की नागपूरहून ?"

"नाही. मी मुंबईचा देशपांडे—" 'देशपांडे'विषयक बराच भौगोलिक तपशील त्यांना ठाऊक होता. मग त्यांनी कुठल्याशा देशपांड्यांचा मी कोण लागतो की काय याची मोठ्या आस्थेने चौकशी केली. मला काही ते देशपांडे ठाऊक नव्हते. "बाकी देशपांडे हे नाव तुमच्या देशात आमच्या बानर्जी मुखर्जी सारखंच आहे म्हणा." बंगाली लोक प्रांताला 'देश' म्हणतात आणि देशाला 'जाती' म्हणतात. जातीय ऐक्य म्हणजे राष्ट्रीय ऐक्य. खरे

तर देशपांड्यातला 'देश'देखील 'प्रांत' ह्याच अर्थी होता. बंगाली लोकांच्या तोंडच्या आमच्या देशात तुमच्या देशात अशा उल्लेखामुळे सुरुवातीला मलाही जरा आश्चर्य वाटत असे. विनोद-दा, 'तुमच्या देशांतले इथे अमके होते — तमके होते—' अशा मराठी लोकांच्या आठवणी सांगत होते.

मी त्यांच्याकडे पाहाण्यातच गर्क होतो. किती विलक्षण प्रसन्न व्यक्तिमत्व ! बोलणं तर खडीसाखरेसारखे. तपःपूत चेहरा. डोक्यावर पांढरे शुभ्र केस, सडसडीत देहयष्टी, अंगात शुभ्र कुडता पायजमा. दोन चार मिनिटांतच त्यांच्या अंधत्वाचा मला विसर पडला. मी सहज त्यांनी केलेल्या म्यूरल्सविषयी बोलणे काढले. "खूप वर्षे झाली त्या म्यूरल्सना - त्यावेळी थोडे थोडे दिसत असे मला." मग मला कळले की चित्रकलेचे वेड आणि डोळ्यांचे अधूपण घेऊनच विनोद-दांनी जगात प्रवेश केला. कागदाच्या अगदी जवळ डोळे नेल्याशिवाय त्यांना दिसत नव्हते. त्या काळी कुठलीही चित्रशाळा त्यांना प्रवेश देत नव्हती. तसल्या अधू दृष्टीच्या बालचित्रकाराला सरकारी चित्रशाळेचे दरवाजे बंद होते. पण टागोरांनी पन्नास साठ वर्षांपूर्वी ह्या मुलाची प्रतिभा पाहून त्याला आपल्या पंखाखाली घेतले. चित्रशाळा फक्त नियम जाणत होत्या. टागोरांना ह्या मुलाच्या अधू डोळ्यांतले तेज दिसत होते. त्यांनी त्याला रंग आणून दिले, कुंचले दिले आणि सांगितले, "काढ तुला हवी तेवढी चित्रे." "गुरुदेवांचा आधार लाभला नसता तर कुठली चित्रे काढणार होतो मी—" सत्तरीच्या घरातल्या वृद्धाकडून ते वाक्य ऐकताना काळजाचे पाणी झाले. सहा चौरस इंचाहून एका दमात अधिक पृष्ठभाग दिसू न शकणारे विनोद-दा. त्यांनी मुकाबला घेतला तो विस्तीर्ण भिंतीशी. त्या विस्ताराच्या इंचा इंचात डोळा घालून त्यांनी भव्य म्यूरल्स उभी केली. सलीलच्या वडलांनीच त्यांना लहानपणी गुरुदेवांपुढे आणल्यामुळे घोष कुटुंबावर त्यांचा विशेष लोभ. अनेक गोष्टी सांगत होते. मात्र गोष्टीवेल्हाळपणा नव्हता. बोलणेही लोभस असून रेखीव. विनोद-दा म्हणजे शांतिनिकेतनातल्या गेल्या तीस चाळीस वर्षांतल्या कलासाधनेचा चालता बोलता इतिहास आहे. केवळ चित्रकलाच नव्हे तर महाभारत, रामायण ह्या महाकाव्यांचा त्यांनी खूप बारकाईने अभ्यास केला आहे. शांतिनिकेतनातल्या त्यांच्या सहकाऱ्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या आठवणी ऐकताना वाटत होते की केवळ कुंचल्यानेच नव्हे तर लेखणीने देखील हा माणूस काय सुरेख व्यक्तिचित्रे काढू शकला असता. त्या तासा-दीड तासाच्या बैठकीत त्यांनी कलेविषयी फार सूचक विचार मांडले. वार्धक्य, अंधत्व किंवा गुरुदेवांच्या निधनानंतर हळूहळू सरकारजमा होत गेलेली आणि चैतन्य गमावीत चाललेली विश्वभारती, ह्यापैकी कुठल्याही अनिष्टाने विनोद-दांच्या मनावर काजळी धरली नव्हती. पूर्वी डोळे कागदाजवळ नेऊन का होईना पण दिसत होते. आता संपूर्ण अंधत्व. पण ह्या अंधारात त्यांच्या प्रज्ञाचक्षूंपुढे आजही

रंगरेषांचे विलास चालू असतात. आता त्यांनी शिल्पकलेशी मैत्री जमवली आहे. स्पर्शातून आकाराचा अंदाज घेत छोटी छोटी मृत्तिका-शिल्पे घडवीत असतात. दिवस आणि रात्र यांच्यात आता अभेद आहे. आता रात्र झाल्यावर झोपलेच पाहिजे ही सक्ती नाही आणि दिवसा काम केलेच पाहिजे ही देखील सक्ती नाही. आता मानू ती वेळ. बोलता बोलता मी माझे चित्रकलाविषयक अजाणतेपण त्यांना सांगितले. मला लगेच त्यांनी धीर द्यायला सुरुवात केली. "उद्यांच्या उद्या अवनीन्द्रनाथांनी गुरुदेवांच्या सहजपाठाच्या जोडीला 'सहज चित्र शिल्प' म्हणून छोट्या मुलांसाठी चित्रकलेवर एक पाठ्यपुस्तक लिहिलंय ते मिळवा. की चोमोत्कार लिखछेन ओबोनीदा - काय वंडरफुल लिहिलंय अवनीदानी..." शांतिनिकेतनातली ही वृद्ध कलावन्त मंडळी किती जिव्हाळ्याने बोलतात एकमेकाविषयी. आपली भांडणे - मतभेद देखील अशा आदराने सांगतात - त्या पुस्तकाविषयी तारीफ करताना मोठ्या मिश्किलपणाने विनोद-दा म्हणाले, "खरं सांगायचं तर त्यातल्या आकृतीपेक्षा त्यातले सुलभ भाष्यच अधिक मोहक आहे."

"तुम्हाला विनायक मासोजी ठाऊक असतील." विनोद-दा म्हणाले. विनायक मासोजी हे नाव मी किती तरी वर्षांनी ऐकले. मी शाळेत असताना त्यांचे नाव वाचले होते आणि कुठल्याशा पुस्तकात निराळ्याच ढंगाचे त्यांनी काढलेले चित्र स्मरणात होते. मला वाटते, 'वुडकट' म्हणतात तसले ते चित्र होते. वास्तविक विनायक मासोजी महाराष्ट्रीय, आपल्या नागपूरचे. शांतिनिकेतनातल्या कलाभवनात त्यांचे आयुष्य गेले. मासोजी आणि संगीताचार्य भीमराव शास्त्री ह्या दोघांही महाराष्ट्रीयांवर गुरुदेवांचे अतिशय प्रेम आणि विश्वास. पण ही दोन्ही नावे महाराष्ट्राला अपरिचित.

"मासोजी हल्ली नागपूरलाच असतात. भेटले तर माझे नमस्कार सांगा."

मी मनात म्हटले, की निदान विनोद-दांचे प्रणाम सांगायला तरी नागपूरला जाऊन मासोजींना भेटले पाहिजे. गुरुदेवांनी विनोद-दांना जपानची यात्रा घडवली. शांतिनिकेतनच्या चित्रकलेवर एक हलकासा जपानी ठसा आढळतो. एकतर इथे चीन आणि जपानी चित्रकारांचे खूप येणे असे. दुसरे म्हणजे खुद्द गुरुदेवांना जपानच्या सौंदर्यदृष्टीचे फार कौतुक. त्यांनी असे म्हटलेही आहे,

"जपानी वाचकाच्या मनाला डोळेच डोळे !" विनोद-दांच्या मनाला असे डोळेच डोळे !

कितीतरी वेळ आमच्या गप्पा चालल्या होत्या. विनोद-दा बंगालीतूनच बोलत होते. पण मला समजावे म्हणून की काय कोण जाणे शांतपणाने-सावकाश बोलत होते. एखाद्या संथ जलाशयासारखे विनोद-दा. अंतःकरणात अनंत प्रतिबिंबे. चेहऱ्यावर जलपृष्ठासारखीच प्रसन्नता आणि आवाजात खूप आर्जव. मला म्हणाले, "तुम्हाला बंगाली शिकण्यासाठी चांगलासा शिक्षक हवाय् का ?"

मनात म्हटले विनोद-दा जर रोज माझ्याशी तासभर बंगालीतून बोलतील तर मला आणखी काय हवे? म्हणून सहज म्हणालो, "एक का? ह्या शांतिनिकेतनातल्या प्रत्येकाला मी माझा बंगालीचा शिक्षकच मानतो."

"छान! मग तुम्हाला मी सगळ्यात उत्तम शिक्षक सांगतो. शिशुभवनातल्या पोरांकडून बंगाली शिका. त्यांच्यात जाऊन बसा."

"विनोद-दा मी ती शिकवणी केव्हाच सुरू केली आहे."

"मग तुम्हाला अगदी लवकर बंगाली येईल."

थोड्या वेळाने आम्ही विनोद-दांचा निरोप घेतला. कुंपणाच्या दारापाशी आलो. सहज मागे पाहिले. खोलीतला दिवा मालवला गेला होता. विनोद-दा आपल्या जिवलग अंधाराच्या पटावर नवी नवी चित्रे पाहण्यात दंग झाले होते.

काही दिवसांनंतर कलाभवनाच्या वाटेने जाताना एका भिंतीपाशी छात्र छात्रींचा घोळका आढळला. रंगसाहित्य घेऊन तरुण शिष्यगण धावपळ करीत होता, थांबून पाहिले तर एका भिंतीपाशी विनोद-दा उभे, भिंत हाताने चाचपीत म्हणायचे 'इथे'. मग एखादा छात्र किंवा छात्री तिथे एका वर्तमानपत्राचा कपटा चिकटवीत असे. पुन्हा विनोद-दा भिंत चाचपीत म्हणायचे 'इथे' मग तिथे एक कपटा. असे काही कपटे चिकटवल्यावर विनोद-दांनी हाताने त्या त्या जागांना स्पर्श केला. एका शिष्याकडून खडू मागून घेतला आणि भिंतीवरच्या त्या कपट्यांना स्पर्श करीत सरसरसरसर रेखाकृती काढायला सुरुवात केली. केवळ स्पर्शाच्या आधाराने रेखिली जाणारी ती चित्रे मुले मुली श्वास कोंडून पाहात होती. रेषा काढणाऱ्या त्या हातांना केवळ तपस्येतूनच मिळणारे आत्मविश्वासाचे वरदान होते. रेषा कुठे कापत नव्हती. थरथरत नव्हती. धीट रेषा, हातातले सामर्थ्य दाखवणाऱ्या रेषा. मनात रंगलेला चित्रपट इतका स्पष्ट की तो भिंतीवर रेखताना त्या भिंतीकडे डोळ्यांना दिसत असले तरी पाहाण्याची गरज नसावी. तयार सतारियाची बोटे जशी पडद्याकडे न पाहता त्याच जागी पडतात, त्याप्रमाणे त्या चित्रविषयाच्या चतु:सीमा स्पर्शून झाल्यावर प्रमाणबद्धतेत सुताइतकाही फरक नव्हता. लता मंगेशकरला जसे चेष्टेतसुद्धा बेसूर होणे अशक्य तसे विनोद-दांच्या बोटांना प्रमाणहीन रेखाटन अशक्य. हाताच्या त्या हमखास हालचालीकडे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या त्या चित्रबंधांकडे मी अवाक् होऊन पाहात होतो. डोळ्यापुढे सदैव अंधाराचा पट असताना प्रकाशाची उपासना करणारा हा चित्रकार — चित्रकार कसला? चित्रयोगी! वार्धक्य, अंधत्व यांना परौते सरा म्हणणारा! नव्या नव्या कल्पनांचे स्वागत करणारा. काही काळानंतर शर्वरी राय चौधुरी नावाच्या तरुण प्रतिभावान् शिल्पकाराशी माझा स्नेह जडला. शर्वरीबाबू परदेशात शिल्पकलेची शिष्यवृत्ती घेऊन गेले होते. तिथून

परतल्यावर शांतिनिकेतनातल्या कलाभवनात त्यांना प्राध्यापक म्हणून बोलावले. नेमणूक झाल्यावर विनोद-दांना प्रणाम करण्यासाठी ते गेले. विनोद-दा म्हणाले,

"काय शर्वरी - पाश्चात्य देशांतल्या शिल्पकलेत काय काय नवीन चालले आहे ?"

शर्वरीबाबूंनी आपले अनुभव सांगितले आणि बोलण्याच्या ओघात सहज म्हणाले, "पुष्कळदा मात्र मला तरुण शिल्पकारांत आपल्या शिल्पांत नवी सृष्टी निर्माण करण्याऐवजी धक्के देण्याचीच प्रवृत्ती दिसते... जुन्या मास्टर्सची सर येत नाही."

"हे बघ शर्वरी — वृद्धेच्या आलिंगनापेक्षा युवतीचा पदाघात अधिक आल्हाददायक" विनोद-दा म्हणाले.

रवीन्द्रांनी आपल्या बगिच्यात ही अशी अलौकिक रोपटी आणून लावली. त्यांचे किती सुंदर वृक्ष झाले. त्यांतले आज काळाने काही नष्ट केले. पण जे काही आहेत त्यांच्या सावलीला मात्र पुन्हा पुन्हा जावेसे वाटते. दुर्दैवाची गोष्ट की, विश्वभारतीतले वृद्ध शिक्षक मला जितके तरुण वाटले तितके बाहेरून इथे आलेले तरुण प्राध्यापक वाटले नाहीत. त्या रोपट्यांना गुरुदेवांच्या प्रत्यक्ष प्रेमाचे सिंचन लाभले नाही म्हणून की त्यांच्या 'विपुल समग्रते'च्या कल्पनेशी ते एकरूप झाले नाहीत म्हणून हे सांगणे कठीण आहे. इथल्या जुन्या माणसांची घडणच मला निराळी वाटते. वार्धक्याकडे झुकलेले चैतीबाबू. लायब्ररीत दिवसभर कारकुनी करतात. पण संध्याकाळी प्राथमिक शाळेतल्या चिमुकल्या मुलांमुलींपासून ते संगीत भवनातल्या तरबेज विद्यार्थ्यांपर्यंत कुणाच्याही साथीला दिलरुबा घेऊन हजर. चैतीबाबू साथीला नाहीत असा एकही कार्यक्रम नसतो. चित्रकलेचे प्राचार्य दिनकर कौशिक-दा संध्याकाळी मुलामुलींच्या मेळाव्यात गाण्याच्या बैठकीत असतात. अमुक एक डिपार्टमेंट तेवढे माझे, या विचारालाच गुरुदेवांचा विरोध होता. दीनबंधू सी.एफ. ॲण्ड्र्यूजसारखा टागोर आणि गांधी यांच्यातला दुवा. केंब्रिज विद्यापीठातले हुषार विद्यार्थी. असामान्य सेवाभावी. सर्वसंग परित्याग करून ॲण्ड्र्यूज भारतात आले. भारतीयांच्यापैकीच एक झाले. विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकवीत. पण शांतिनिकेतनातली पोरे त्यांना क्रिकेट मॅचचे अंपायर करीत. गांधीवादी पद्धतीने जगणाऱ्या ह्या इंग्रजाचे क्रिकेटचे प्रेम काही गांधी कमी करू शकले नाहीत. शांतिनिकेतनातली पोरे त्यांना क्रिकेटसाठी ओढून नेत आणि नेले नसते तरी ते गेले असते. गुरुदेवांचे द्विजेन्द्रनाथ म्हणून बंधू शांतिनिकेतनात राहात. वृद्ध होते. अनेक वर्षे हिंडूफिरू शकत नसत. हा एवढा विद्वान इंग्रज त्यांना रिक्षेत बसवून स्वतः रिक्षा ओढीत हिंडवून आणायचा. रवीन्द्रांनी आपल्या ह्या सगळ्या सहकाऱ्यांविषयी किती जिव्हाळ्याने लिहिले आहे. नंदलालबाबू - त्यांना

सगळेजण मास्टर मोशाय म्हणत, नेपाळचंद्र राय, जगदानन्द बाबू, कालीमोहन बाबू, भीमराव शास्त्री— 'हे माझे सारे कर्मसंगी दारिद्र्यात दिवस काढीत होते. इथे केवळ कामाचे कष्टच नव्हे तर शारीरिक-सांसारिक - किती प्रकारचे दैन्य भोगावे लागले त्यांना. प्रलोभनाचा तर इथे प्रश्नच नव्हता. जीवनयात्रेला आवश्यक सोयी नव्हत्या. प्रसिद्धीचीच काय पण भावी उत्कर्षाचीही काही आशा नव्हती. हल्ली वर्तमानपत्रात जसे प्रसिद्धीचे ढोल बडवले जातात, त्याचाही त्या काळी कुठे मागमूस नव्हता. लोकांना कधीच कळणार नाही अशा हालात राहून, ती दुःखे लपवीत त्यांनी तपस्या केली. पैशाचा किती अभाव होता याची तर कोणाला कल्पनाही येणार नाही. त्यांच्या त्या कष्टांची कहाणी कुणाला कळणार नाही की कुणी त्यांचा इतिहासही लिहिणार नाही.'

— कसली धुंदी घेऊन जगली ही माणसे ? त्या त्यागाचीच धुंदी. नव्या निर्मितीची. नव्या प्रयोगांची. स्वतः गुरुदेवांनी नोबेल प्राइझची लक्षांवधी रुपयांची रक्कम 'इदम् न मम' ह्या भावनेने आश्रमार्पणमस्तु केली. सहकाऱ्यांनी आपापल्या जीवनाच्या आहुती टाकल्या. या साऱ्यांनी डोळ्यापुढे उभी केलेली स्वप्नेच एवढी मोठी होती की ती प्रत्यक्षात आणायला कुबेराचे भांडार अपुरे पडले असते. आकाशातल्या नक्षत्रांपासून ते नूपुरांच्या झणत्कारापर्यन्त विपुल समग्रतेचा साक्षात्कार घडवून घेऊन इथला प्रत्येक छात्र आणि छात्री जीवनात आपली होडी लोटायला समर्थ करून पाठवू असा संकल्प सोडून हे सारे ऋषी त्या तपोवनात सज्ज झाले होते. ऋषी नित्यनूतन प्रयोगात दंग असतात. वृद्ध विचारांना ते आलिंगन देऊन बसत नाहीत आणि नव्या विचारांच्या पदाघातांना भीत नाहीत. यौवनाची आव्हाने स्वीकारीत असतात. 'काल' त्यांना जखडून ठेवीत नाही, 'उद्या' भेडसावीत नाही आणि 'आज'कडे ते निर्भय डोळ्यांनी पाहातात. तसल्या त्या ऋषींना वृद्ध मानणारे केवळ वयाच्या दाखल्याच्या हिशेबात तरुण ! परीक्षार्थी शिक्षण घेऊन विश्वभारतीत नोकरीला आलेले हे तरुण, स्वतः जसे छापाचे गणपती आहेत — तसेच आपल्या विद्यार्थ्यांनाही करू पाहातात आणि त्याला 'अद्ययावत्पणा' मानतात.

'अरे नवी पुनव आली आहे - खोलीत काय बसलात - फेकून द्या ती पुस्तके - पडा बाहेर आणि वैतालिकासारखे गात गात त्या चांदण्याला जाऊन भेटा' म्हणणारे गुरुदेव त्यांना जुने वाटतात. 'अनरिॲलिस्टिक' वाटतात. फिजिक्सच्या व्याख्यानाची वर्षानुवर्षे पोपटपंची करणाराला वाटते, मी फिजिक्सचा प्राध्यापक म्हणून नोकरी करतोय् - चांदण्यांचा आणि माझा काय संबंध ? बंगाली साहित्याची दशग्रंथी करणाराला वाटते, श्रीनिकेतनात फुललेल्या शेतांचा आणि डेलियाच्या रंगोत्सवाचा आणि माझा काय संबंध ! मी बंगाली साहित्याचा आचार्य ! गुरुदेवांना ज्ञान विज्ञान कला ह्या साऱ्या रंगांत न्हाऊन, जीवनातल्या क्षणाक्षणात आणि कणाकणात दाटलेला आनंद टिपणारे अध्यापक

आणि छात्र हवे होते. मी तिथे असताना आजच्या विश्वभारतीतल्या केवळ वेतनाभिमुख प्राध्यापकांनी आपल्या युनियनतर्फे ठराव करून मागणी केली होती — 'प्रमोशने देताना योग्यतेपेक्षाही सिनिऑरिटीला अग्राधिकार द्यावा !'' खूप निराश झालो मी हे ऐकून. शांतिनिकेतनात राहून ज्यांच्या जगण्यात झिंग येत नाही त्यांना आणखी कुठे येणार ? हे सारे पाहताना आणि ऐकताना एकच एक प्रश्न मनापुढे उभा राही - 'माणसांच्या जगात साऱ्या सुंदर आणि उदात्त कल्पनांचा हाच का शेवट ?' कधी कधी गुरुदेव, त्यांचे स्वप्न यांचा ओझरतादेखील स्पर्श न झालेला एखादा अगदी करकरीत, कुणावर तरी तोंड टाकायला सरसावलेला - वैतागलेला असा एखादा तिथे नोकरी बजावणारा प्राध्यापक भेटायचा. अशाच एका वैतागवाडीकराने मला कँटीनमध्ये विचारले, ''तुम्ही लेखक आहात म्हणे ?'' प्रश्न विचारण्याची चाल ''तुम्ही गांजा ओढता म्हणे'' यासारखी होती.

''हो'' मीही निर्ढावलेल्या साक्षीदारासारखा जवाब दिला !

''कुठल्या भाषेत लिहिता ?'', पुन्हा तोच रुबाब.

''मराठीत.''

''मग इथे कशाला आला ?''- पुन्हा त्याच ऐटीत. मी मनात म्हटले, 'आयला, तुझ्या बाचं काय गेलं रे फोकलीच्या—' पण प्रकट मात्र—

''बंगाली भाषा शिकायला—'' असे नम्रपणाने सांगितले.

''किती वर्षे राहणार ?''

''वर्षे ? — छे छे — तीन महिने.''

''तीन महिने ? फक्त ? तीन महिन्यांत तुम्हाला किती बंगाली येणार ?''

''तुम्हाला काय वाटतं ? किती येईल ?''


''व्हाय डू यू वेस्ट युवर टाइम ?'' जणू काय माझ्या कँटीनचे बिल हा भरत होता. मी संवाद फार न वाढवता हसण्यावारी घालवले. एक सुशिक्षित प्राध्यापक त्याचीच बंगाली भाषा शिकणाऱ्या परप्रांतातल्या माणसाला भाषा शिकण्यात 'टाइम वेस्ट' का करतोस असे विचारीत होता. इतर कुठेही या प्रश्नाचे मला विशेष वाटले नसते. पण शांतिनिकेतनात ? रवीन्द्रांनी कविता लिहिण्यात, त्यांना चाली लावण्यात कशासाठी टाइम वेस्ट केला ? विनोद-दा, मास्टर मोशाय यांनी चित्रे काढण्यात का टाइम वेस्ट करावा ? राम किंकरदांनी दगड फोडून शिल्पे उभी करण्यासाठी का म्हणून टाइम वेस्ट केला ? शिक्षणसंस्थांतूनदेखील पोटार्थी टोपल्या टाकणाऱ्यांची गर्दी झालेली पाहिली की दुःख अधिक होते. तपोवनात अशी न रुजणारीही रोपटी आहेत.

पण त्यांतूनही मला एकच समाधान होते की संगीतभवनातले तंबोरे वाजताहेत. कलाभवनातली मुले समोरच्या पलाश वृक्षावर फुललेल्या अग्निपुष्पांच्या लीला कागदावर

आणताहेत, शिशुभवनातल्या चिमण्या कंठांतून गीते ऐकू येताहेत, तरुण मुला-मुलींचा घोळका गुरुदेवांचे गीत मुक्तकंठाने रस्त्यातून गात चालला आहे —

*'ओ गो दखिन हावा पथिक हावा,*
*दोदूल दोलाय दाव दुलिये—*
*अरे दक्षिण वाऱ्या यात्रिक वाऱ्या*
*झुलवित ये रे हिंदोळा—'*

दक्षिण वायूला मुक्तकंठाने अशी सुरेल साद घालत हिंडणाऱ्या त्या युवयुवतींना पाहिले की निराश मनाला 'मलयज शीतल' गारव्याचे सुख लाभायचे.





एकदा खोलीच्या दारावर थाप पडली. खडबडून जागा झालो. दिवा लावला. पहाटेचे तीन वाजले होते. दार उघडून पाहातो तर स्वतःला नखशिखान्त गरम कपड्यात गुंडाळून घेऊन, हातात लाठीबिठी धरून सलील उभा.

"चलो" त्याने कमांडरच्या थाटात ऑर्डर केली.

"किधर ?"

"खजूर-रस प्यायला "

"ह्या वेळी ?"

"खजूर-रस पहाटेच प्यायचा असतो."

"पहाटे तीन वाजता ?"

"तीनच वाजले आहेत का ? मला वाटले, चार-साडेचार झाले असतील. हरकत नाही. भटकत भटकत जाऊ या." त्याने लगेच गुरुदेवांचे गाणेच सुरू केले —

पौष तोदेर डाक दिये छे - आय् रे चली आय् आय्

(पौष तुला साद घालतोय ये रे गड्या, चल ये ये —)

पहाटे पौषच काय पण परमेश्वर हाक घालीत असला तरी तसल्या त्या जीवघेण्या थंडीत पहाटे तीन वाजता उठून भटकायला जाणे ही काही फारशी मोहक कल्पना नव्हती.

खजूर-रस कशाला ? नाक्यावर अमृताचा कुंभ घेऊन उर्वशी वाट पाहात उभी आहे असे म्हटले असते तरी मी गेलो नसतो. पण गुरुदेवांच्या त्या ओळी ऐकल्यावर अशाच एका पौषाची हाक ऐकून ते बाहेर भटकायला निघाले असतील, तो अनुभव घेण्याची संधी दाराशी चालून आली आहे असे वाटले. खजूर-रसापेक्षा त्या अनुभवाच्या चवीसाठी भटकायला निघालो. सहजगत्या, संस्काराने जसा तुकोबा ग्यानबा मराठी माणसांच्या मनात चार ओळी पेरून जातो, तसे टागोर बंगाली माणसांच्या मनात ही कवितांची पेरणी करून गेले आहेत. पण सलीलचे पाठान्तर विशेष चांगले आहे. अर्थात् शांतिदेव घोषांचा सख्खा भाऊ असूनही सलीलचे गायन हा चिंतेचा विषय आहे. गाताना सूर नावाची एक अट आहे याचा त्याला अजून पत्ता लागलेला नाही. मात्र रवीन्द्रांची अनेक गीते पाठ. मूळ चाल आणि सलीलची चाल ह्यात हत्तीच्या आणि उंटाच्या चाली इतकेच साम्य असते. पण पाठांतर हीच एक केवढी श्रीमंती असते. पाठांतर ही रोकड मालमत्ता. सलीलने पहाटे तीन वाजता गेस्ट हाऊसमधल्या इतर कुणाही गेस्टला पौषाची हाक ऐकायची इच्छा नसेल हे ध्यानी न आणता टागोरांचे प्रभात वंदन सुरू केले. ग्रामीण माणसांत जशी एक लोभस अनौपचारिकता असते तशी सलीलमध्ये आहे. शहरात आयुष्य जाऊनही त्याचे ग्रामीण साधेपण सुटले नाही. दाढी वाढवावीशी वाटली, वाढविली दाढी. रंगीबेरंगी पोशाख करावासा वाटला, केला. गावेसे वाटले की स्थळकाळाचा आणि आपल्या गायननैपुण्याचा विचार न करता लावला आवाज! रस्त्यात भजीपकोडेवाला दिसला, खा तिथेच उभा राहून !

सलीलच्या गाण्याची मला एकच भीती वाटत होती ती म्हणजे शेजारच्या खोलीतल्या एखाद्या बंगाल्याची झोपमोड होऊन भल्या पहाटे गेस्ट हाऊसला आग लागण्याची. बंगाल्यांना झोप अति प्रिय. बंगालीत झोपेला 'घूम' म्हणतात. दिवसाच्या कुठल्याही वेळेला 'बाबू घुमेच्छे' हे ऐकायची तयारी हवी. सलील पत्रकार असल्यामुळे स्वतः झोपण्याऐवजी दुसऱ्याची झोप उडवण्याच्या व्रताशी इमान राखीत असावा.

मी त्याला लवकर बाहेर काढावा म्हणून झटपट कपडे करून तयार झालो. थंडी मस्त होती. पण खोलीत जितकी 'दारुण' वाटत होती, तितकी बाहेर नव्हती. आम्ही ग्वालपाडा (गौळपाडा) गावाच्या दिशेला निघालो, आकाशात तारांची बरसात. सलीलचे आणि माझे कवितांचे सवाल -जवाब सुरू झाले. पुरते साडेतीन वाजले नव्हते. अर्धा एक तास वाटचाल केल्यावर सलील म्हणाला, 'अजून खजूर-रसाची मडकी झाडावरून उतरवली नसतील.' हा खजूर म्हणजे शिंदीचा खजूर ! त्याच्या नीरेला 'खेजूररस' म्हणतात. नीरा वगैरे पेयावर माझा फारसा लोभ नाही. पण खजूराची नीरा प्यायलो नव्हतो. आम्ही शिंदीच्या बनातून चाललो होतो. सगळीकडे सामसूम. कुत्रीदेखील रात्रभर

भुंकण्याबिंकण्याचे कार्यक्रम आटपून झोपली होती. पहिला कोंबडाही उठला नव्हता. पहाटे खजूररसाची मडकी उतरवणारांचीही 'रात्रीची' उतरली नसावी !

आम्ही रस्त्यातच एका कल्वर्टच्या बांधावर बसलो. ऐकायला फक्त सलीलच असल्यामुळे मी भटियार, ललत, भैरव वगैरे सकाळच्या रागांची धार काढायला लागलो. वर आकाशात देवाघरची दौलत उधळलेली. भोवती अंधार. फक्त झाडांच्या छायाकृती. क्वचित कुठेतरी दूर खेड्यात एखाद्या दिव्याने रात्र पंक्चरलेली. त्या विराट शामियान्यात आमचा मुशायरा सुरू झाला. टागोर, ज्ञानेश्वर, बालकवी, गालिब (सलीलला उर्दू शेरोशायरीही खूप याद आहे. उर्दू उच्चार मात्र 'तोबा'), जीवनानंद दास, चंडी ठाकूर असे अनेक कवी मुशायऱ्यात मौजूद होते. खजूररसाचा मयखाना बंद होता. शराबी मात्र दरवाजे खोलण्याचा इन्तजार करीत होते. अजूनही पूर्वेचेही दार खुलत नव्हते.

मी एकदा विमानातून जाताना अतिशय सुन्दर पहाट उमलत गेलेली पाहिली आहे. कैरोच्या अलीकडे एका अज्ञात भूभागावरून काळोखाचे पांघरूण अलगद उचलले जात होते. खेजूररसाच्या निमित्ताने आज एका विस्तीर्ण माळावर क्षितिजावरच्या वृक्षांच्या शेंड्यावरून उमलणारी पहाट दिसत होती. रवीन्द्रनाथ म्हणे रोज पहाटे चार वाजता उठत असत. मग उत्तरायणातल्या सौधावर येऊन स्वस्थ उभे राहात. अनेकांच्या पाहण्यात ही गोष्ट आली होती. कुणीतरी धिटाईने विचारले, "गुरुदेव, रोज इतक्या पहाटे उठून आपण काय पाहाता ?" -

गुरुदेव म्हणाले, "पहाट पाहातो." रोजची पहाट त्यांना नवी दिसायची आणि ती तशी असतेच. फक्त पाहाणारे डोळे हवेत. त्यांच्या पहाटे उठण्याविषयी आणखीही एक सुन्दर आठवण आहे. सूर्योदयानंतर ते कधीच बिछान्यात पडून राहिले नाहीत, रुग्णावस्था वगळून. पण युरोपच्या प्रवासात असताना खूप जाग्रणे घडायची. तिकडल्या थंडीत खिडक्या उघड्या टाकून पडल्या पडल्या आकाशदर्शनही शक्य नसे. युरोपातल्या एका मुक्कामात वेळेचे भान राहिले नाही. उठून बाहेर आले त्यावेळी व्हरांड्यात सूर्याची कोवळी उन्हे आली होती. गुरुदेवांनी आपल्या मनाच्या अवस्थेचे वर्णन केले आहे, "उशिरा उठून बाहेर आलेले त्या किरणांनी मला पाहिले आणि नव्या नवरीने गपचूप म्हणून शय्यागृहातून बाहेर पडावे आणि सकाळच्या गृहकार्यासाठी आधीच उठलेल्या सासूबाईच दारात भेटाव्या तसे माझ्या आधी व्हरांड्यात आलेली ती उन्हे पाहताना मला झाले." एका कवितेत तर त्यांनी, 'आज पहिल्या फुलाचा प्रसाद मिळणार आहे म्हणून पहाटे उठून बसलोय्-' असे म्हटले आहे. पहिल्या अपत्याच्या आगमनासारखे पहिल्या फुलाचे आगमन वाटायला वृक्षवल्लीची सोयरीक जुळावी लागते. सलील गात होता -

आज प्रथम फुलेर पाबो प्रसादखानी - ताइ भोरे उटे छि !

(आज पहिल्या फुलाचा प्रसाद लाभणार आहे - म्हणून पहाटे उठलोय् !)

आज शुनते पाबो प्रथम आलोर बानी ताइ बाहिरे छुटे छि !

(आज ऐकायला मिळणार आहे पहिल्या किरणांची वाणी म्हणून बाहेर पडलो आहे.)

आता तारकानृत्याचा शेवटचा अंक सुरू झाला होता. सलील बरोबर होता म्हणून बरे. एरवी एकट्याला हे आकाशीचे ऐश्वर्य पाहाणे सहन झाले नसते. थंडीतल्या सुस्नात रात्रीच्या अंगावरचे हे तारालंकार पाहाताना खिशात दोन रुपयाचा खुर्दा असलेल्या माणसाने जवाहिऱ्याच्या दुकानातले रत्नखचित हार पाहाताना त्याचे जे काही होईल तेच आमचेही झाले. पराकोटीच्या सौंदर्याच्या अनुभवाने माणूस आनंदित होतो तसा दबतोही. कालिदासाने वर्णन केलेल्या त्या पर्युत्सुकतेत, हुरहुरण्याबरोबर किंचित् घाबरल्यासारखे होण्याचाही भाग असावा. अशा वेळी त्या आनंदाचे ओझे हलके करायला वाटेकरी हवा.

जरासे फटफटले. दुरून एक बैलगाडी येताना दिसली. खेडे जरा जरा हलायला लागले. आम्ही एका प्राथमिक शाळेच्या ओसरीवर येऊन पोहोचलो. इतका वेळ इतके बेसुमार गायलो होतो, बडबडलो होतो की आमची एकूण वागणूक शाळकरी कार्ट्यांनाच शोभण्याच्या लायकीची झाली होती. 'कुणि नाहीं ग कुणि नाही आम्हाला पाहत बाई' असे तारकांचे गाणे आहे. आम्हीही त्या तारकांकडे पाहात आम्हालाही पाहणारे कुणी नाही या भावनेनेच त्या माळावर त्या तसल्या थंडीत, गर्गमुनीच्या मुहूर्ताआधी त्या अंधारात गोंधळ घातला होता. त्या शाळेत शिरताना मला माझी तसलीच चिमुकली प्राथमिक शाळा आठवली. सलील गुरुदेवांच्या ओळी म्हणू लागला —

आज मनेरमध्ये छेये सुनील आकाश ओठे गये छि

आज शकाल बेलाय छेले खॅलार छले शकल शिकल टूटे छि—

मी मराठी तर्जुमा केला -

आज उतरले सुनील अंबर मनात माझ्या वेड्या

आज पहाटे लुटूपुटूच्या शैशव लीला तोडिति सगळ्या बेड्या-

काही वेळाने दूर एक शेकोटी पेटलेली दिसली. भंडारीदादा शेकोटीच्या दिशेला निघाले होते. त्यांच्यापैकी एकाला आम्ही गाठले. त्याने आम्हाला ती शेकोटी पेटली होती त्याच दिशेला नेले. तिथे एक झोपडी होती. एका मोठ्या मडक्यात खजूररस साठवला जात होता. आम्ही तिथे पोहोचलो. 'आशून बोशून' झाले. आणि मी माझ्या आयुष्यात प्रथमच तो खजूररस प्यालो. माडाच्या किंवा ताडाच्या नीरेपेक्षा खूपच गोड. किंबहुना जरा जास्तीच गोड. त्यामुळे एका ग्लासावर भागवले. सकाळच्या पारी पेय एकच. चहा !


आता चांगलेच उजाडले होते. गावात हालचाल सुरू झाली होती. मंडळी बहिर्दिशेस

निघाली होती. हा बाकी साऱ्या भारतीय खेड्यातला सक्तीचा मॉर्निंग वॉक्! ग्वालपाडा होता म्हणून की काय देव जाणे पण पहाट थेट 'घनःश्याम सुन्दरा'च्या तपशिलाबरहुकूम फुटत होती. महाराष्ट्रापासून इतक्या दूर असलेल्या त्या खेड्याचे आळोखेपिळोखे पाहाताना मला तर कृष्णाकाठच्या औरवाडसारख्या खेड्यात आहोत असे वाटले. कृष्णेऐवजी कोपाई नदी. कोपवतीची ही कोपाई झाली. केम्ब्रिजला 'कॅम' नदीचे कौतुक, तसे विश्वभारतीला कोपाईचे. तीरावर गर्द आमराया. छोटा घाट. तिथे 'पानी भरेली कौन अलबेलेकी नार' आणि तिच्या सहेल्या. अरुणोदय होताच चरायला उडालेले पक्षी. इतकेच नव्हे तर त्या दिवशी माझ्या सुदैवाने तीर्थपंथाला निघालेले कापडीही दिसले. कमलिनीपासून भृंगाची मुक्तता होताना पाहिली नाही. पण बंगालात कोऱ्हांटीसारखी कमळे! महाराष्ट्रात 'क' कमळ अंकलिपीतच भेटते. मुंबईहून पुण्याला जाताना पनवेलच्या उजव्या बाजूला एक विस्तीर्ण जलाशय रक्तकमलांनी भरलेला दिसतो. बंगालात मात्र आपण कमळांना पाहण्याऐवजी शेकडो कमळे आपल्याला पाहात असतात. आणि रक्तोत्पल, नीलोत्पल, पुंडरीक अशी नाना रंगांची कमळे. हंसही आहेत. हंस आणि कमळे असल्यावर सरस्वतीला वीणा वाजवण्यासाठी येणे प्राप्तच आहे.

पहाटे निघालो त्यावेळी सूर्यदेव रंगपटातच होते. परतताना दिवसाचा अंक पहिला, प्रवेश पहिला सुरू झाला होता. बरेच चाललो होतो. अजून अडीच मैल चालायचे होते. आश्रमाच्या दिशेला जाणारी बैलगाडी दिसली. गाडीवाल्यानेही मोठ्या प्रेमाने लिफ्ट दिली.

फार वर्षांपूर्वी हरवलेले आकाश भेटले, प्राथमिक शाळा भेटली आणि बैलगाडीची घुंगरांच्या साथीतली ठाय लयीतली यात्राही घडली. पौषाच्या हाकेला 'ओ' दिली याचा आनंद मनात कोंदला होता. पण आयुष्यात अशा कितीतरी हाकांना आणि खुणांना 'ओ' द्यायची राहून गेली याचीही एक खंत त्या आनंदामागून लहानशी कळ उठवून गेली.





ह्या गेस्ट हाउसपुढले भुवन डांग्याचे मैदान म्हणजे निसर्गाच्या लीलानृत्याचा विराट रंगमंच आहे. मी माझ्या तीन महिन्यांच्या इथल्या मुक्कामात ह्या मैदानावर ढग-बिजली डान्सिंग पार्टीचे मणिपुरीपासून तांडवापर्यंत सगळे नृत्यप्रकार पाहिले. बंगाली स्वभाव आणि बंगाली हवा ह्यात अधिक लहरी कोण आहे हे सांगणे कठिण आहे. कित्येकदा मला प्रश्न पडे की, रवीन्द्रांनी निसर्गाच्या ह्या नाना विभ्रमांतून आपली गीतशिल्पे तयार केली की, त्या प्रतिभावंताला सतत उत्साह लाभावा म्हणून निसर्गाने त्यांना रोज नवा खेळ दाखवायचे ठरवले होते ? इतक्या तऱ्हेतऱ्हेच्या 'मूडस्'चा निसर्ग क्वचित् भेटतो. निरभ्र रात्रीचा आनंद आठवीत उठावे तर पहाट ढगांची काषाय वस्त्रे नेसून विरक्त होऊन आलेली. एखाद्या नर्तकीला रात्री रंगमंचावर चमचमताना पाहावे आणि सकाळी घरासमोरच्या लॉजिंग बोर्डिंगच्या ग्यालरीत ती दातांना मशेरी लावताना दिसावी तसे वाटायचे ! हवेत विलक्षण गारठा की वाऱ्याने झाडे डोलण्याऐवजी कुडकुडताहेत असे वाटे. गेस्ट हाउसमागल्या पटांगणातील गाढवे देखील चूपचाप. मग एखाद्या रात्री जोरदार वृष्टी. मोसम चुकवून भलत्या वेळी असा पाऊस कोसळू लागला की, गरम भजी आणि गरम चहा पुढ्यात घेऊन बसावेसेसुद्धा

वाटत नाही. गेस्ट हाउसमधला नोकर म्हणायचा - "बाबू, ए ब्रिष्टी भालो नोय - चांगला नाही हा पाऊस. ह्या महिन्यात पाऊस कोसळणे राजाला अनिष्ट. हे राज्य कोलमडणार." मी मनात म्हटले, राज्य कोलमडायचे तर कोलमडू दे. मला उद्या चंडिदासाच्या गावी जायचे आहे. तो कार्यक्रम वाहून गेला नाही म्हणजे मिळवली. मी नोकराला म्हणालो - "शशधर - (बंगाली नोकर देखील 'शशधर' होता!) ब्रिष्टी थांबणार की अशीच चालणार?"

"के जाने बाबू! पावसाचं काय सांगावं? -"

बाकी हे सांगायला शशधर कशाला हवा होता म्हणा. "पण पाऊस पडला म्हणजे एक बरं होतं साहेब. धूळ येत नाही -"

जो-तो फक्त आपल्यापुरते पाहातो. शशधर खूष. कारण दोन मिनिटांचे त्याचे खोली झाडणे पाव मिनिटावर आले म्हणून आणि मी मात्र त्या पावसाला विचारीत होतो - "का रे बाबा, उद्या जाऊ देणार का चंडिदासाच्या गावाला?"

सगळे काही सापेक्ष. मागे एकदा आमच्या नाटकाच्या प्रयोगाच्याच दिवशी भारतातल्या एका थोर नेत्याचे निधन झाले. आम्ही अशा वेळी एक मिनिट उभे राहून शोक प्रदर्शित करायचा की, सरकारी सुतक पाळायचे ह्या फिकिरीत. लोक तिकिटाचे पैसे केव्हा परत करणार हा सवाल घेऊन उभे; आणि थिएटरचा कँटीनवाला 'साहेब, हजार बटाटेवड्यांची तयारी आहे - तळायला घेऊ की घेऊ नको?' ह्या प्रश्नाचे टुमणे माझ्या मागे लावीत उभा. त्याला त्या राष्ट्रीय शोकप्रसंगात फक्त ते तळायची वाट पाहात पडलेले बटाटेवड्यांचे हजार कच्चे गोळे दिसत होते!

त्या पावसात मलाही चंडिदासाच्या गावी जाण्याचा कार्यक्रम चिंबणार हीच भीती होती. माझ्या आणि टागोरांच्या निसर्गप्रेमातला मूलभूत फरक मला जाणवला. टागोरांच्या जीवनात निसर्गप्रेमाला 'टॉप प्रायॉरिटी' - ते त्या पावसाच्या धारानृत्यात रंगले असते. त्यांची जत्रा रोज त्यांच्या अंगणात भरत होती. आमचे निसर्गप्रेम 'ॲट अवर अर्लिएस्ट कन्वीनियन्स्!'

हां-हां म्हणता समोरच्या त्या मैदानाचा तलाव झाला. मी निमूटपणे 'शाळेसी जाताना मुलांनी वाटेत तमाशा पाहात थांबू नये -' ह्या जुन्या शिकवणीला स्मरून सहजपाठात डोके घालून बसलो. धडा गिरवता गिरवता केव्हा डोळा लागला देव जाणे. शाळेत प्रत्येक वर्गात दोन-चार झोपाळू विद्यार्थी असतात. मी त्यावेळी झोपाळू नव्हतो - पण ह्या वयात व्याकरण वगैरे निद्रानाशावर उत्तम उपाय आहेत हे ध्यानात येत होते.

कॉलेजच्या परीक्षांच्या मोसमात जशी झोप आली तशी आजतागायत पुन्हा आली नाही. सुनीतिकुमार चतर्जींचे व्याकरण छातीवर घेऊन मी गाढ झोपलो होतो. दार वाजले म्हणून जागा झालो. दुपारचा एक वाजला होता. कँटीनचा निरंजन दाराबाहेरून विचारीत होता -

"भात खाबेन ना ? जेवणार नाही ?"

"नको" मी पडल्या-पडल्याच म्हणालो.

"की ब्यॅपार ? - तुम्ही तर सकाळी नाश्ताही घेतला नाही - ते काही नाही - थोडेसे जेवा -" कँटीनचे मणीजरबाबू, निरंजन, गौतम, इंद्रमणी वगैरे सेवक यांचे आणि माझे आता पाल्य-पालक संबंध प्रस्थापित झाले होते. त्यातच थोडासा गुरुशिष्य नात्याचाही रंग मिसळला होता. कारण कँटीनमधल्या स्वैपाक्यापासून ते मणीजरपर्यंत सर्वांनी माझा 'बंगालीचा नादार विद्यार्थी' म्हणून स्वीकार केला होता. फुकट शिकवण्या करीत होते. सहजपाठात निरनिराळ्या भाज्यांची बंगाली नावे असायची. बंगालीत कोबी म्हणजे कवी आणि कोबीला 'कोपी' म्हणायचे, हे मी खाणावळविद्यालयातच शिकलो. एकदा अचारीबुवांनी आपल्या 'रान्ना' घरात नेऊन माझा वस्तुपाठही घेतला होता. गेस्टहाउसच्या स्वैपाकघराशी सकाळ-दुपार गाणारे वैष्णव किंवा बाऊल येत. त्या स्टाफपुढे हा सांस्कृतिक कार्यक्रम चाले. त्या तालावर भाज्या चिरल्या जात ! एखादे पोरगे धावत माझ्या खोलीवर येऊन - "पांडे-दा - ताडाताडी आशून - लवकर या - दारून गानटा हये छे - भयंकर छान गाणं चाललंय् -" म्हणून मला ओढून न्यायचे. आणि मग 'आपनि ओ एकटी माराठी गानटा धोरून तो -' असा 'मराठी' गाणे गायचा आग्रह व्हायचा. मी त्या गेस्ट हाउसमध्ये आता विश्वभारतीचा 'गेस्ट' नसून तिथल्या स्वैपाकी-वाढपी वगैरे मंडळींचा 'गेस्ट' होतो. नाहीतरी खाणावळवाल्यांशी दोस्ती हा माझा पुरातन षौक आहे. बंगालीत स्वैपाक्याला 'पाचक' म्हणतात. तेही मला आवडले. वाचणारा वाचक, तर पचवण्यासाठी रांधणारा 'पाचक' का नसावा ?

मी त्या पाचकाच्या हुकुमावरून जेवायला ज़ायला निघालो. दार उघडून बाहेर पाहतो तो लख्ख उन ! आकाश कसे 'आपण नाही बाई कसली धिंगामस्ती केली' असा साळसूदपणाचा आव आणून स्वच्छ चेहऱ्याने वर उभे ! मैदानातले पाणी त्या मुरमाड जमिनीत केव्हाच झिरपून गेले होते. इथल्या मातीत हा-हा म्हणता पाणी मुरते. मी देखील चंडिदासाचे गाव पदरात पडणार ह्या खुषीत भात आणि माछेर झोल खायला गेलो.

सारा दिवस कोरडा गेला आणि रात्री पुन्हा वृष्टी सुरू झाली. पण पाऊस असो वा नसो, सकाळी चंडिदासाच्या गावाला जायचेच असा निर्धार मी केला. सुदैवाने सकाळी ढगांच्या धमक्या पोकळ ठरल्या. बोलपूरला येऊन मी, सलील, शार्लट, सुजाता, लेबू-दा

अशी आमची दिंडी सर्विस मोटरीची प्रतीक्षा करीत उभी राहिली.

पंचवीस वर्षांपूर्वी सर्विस मोटारीत माणसांची मेंढर-भरती व्हायची तशी बंगालात आजही होते. मोटार अड्ड्यावरची गर्दी आणि मोटारीच्या टपावर बसून, आजूबाजूला लटकून जाणाऱ्या पाशिंजरांचे हाल पाहून विप्र चंडिदासाला बोलपूरातूनच प्रणाम ठोकावा असे वाटले. इथे पावसाचा चिखलही होता. भिकारी, खोमचेवाले, भांडणारे उतारू, कुठूनही वाटा काढणारे रिक्षावाले, हॉटेलांतून किंचाळणारे रेडिओ, असल्या तापत्रयातून मनःशान्ती ढळू न देता त्या भोगाला सादर होऊन उभा होतो. माशांप्रमाणे माणसेही कशी घोंघावतात ते अलिप्तपणाने पाहात होतो. बस आल्यावर त्यात घुसायची 'स्ट्रॅटेजी' कशी आखावी याची चर्चा करीत होतो. इष्ट गावी जाणारी 'बस केव्हा येणार ?' ह्या प्रश्नाला 'एखून आशबे' - 'आत्ता येईल' - हे उत्तर तासभर चालले होते.

शेवटी ती बस आली आणि 'हरहर महादेव' म्हणत गनिमाची फळी तोडून घुसणाऱ्या मराठा बारगीर शिलेदारांचे स्मरण करीत आत घुसलो. समोरच्या पहिल्याच रिकाम्या बाकावरची जागा धरली. तेवढ्यात कुणीतरी माझ्या अंगावर खेकसून, ती शीट 'मोहिलां'साठी आहे असे सांगून मला उठविले. बंगालात महिलांसाठी ट्राम-बसमध्ये बाके राखलेली असतात आणि पुरुष पाशिंजर तेथे बसत नाहीत. अजून अराजकाची मजल तिथपर्यंत गेली नसावी. मी जागेवरून उठलो. आमच्या बरोबरीच्या महिला चतुर निघाल्या. त्यांनी आमच्या जागा धरल्या होत्या. त्या आम्हाला मिळाल्या आणि त्या महिला-विभागात गेल्या. बस आंतर्बाह्य ठेचून भरली. माफक भांडण-तंटे झाले. पावसामुळे माचिस् भिजल्या असाव्यात - कुणी आगबीग लावली नाही. कारण बस जाळणे हा बंगालातला अतिशय आवडता जनता-छंद आहे. एकदाची ती बस सुटली.

"वंदे मातरम्" हे बंकिमचन्द्रांचे गीत गाताना 'सुजलाम्, सुफलाम् - मलयज शीतलाम् -' हे वर्णन आले की जरा अडखळायला होई. दुष्काळ, अवर्षण, भयानक उन्हाळा असलेल्या ह्या आपल्या मायभूमीला 'सुजलाम्-सुफलाम्' म्हणणे जिवावर येई. पावसाळ्याचे दोन-तीन महिने सोडले तर कुठले जळ, कुठले फळ आणि कुठली शस्यश्यामला धरती ! बंकिमबाबूंना एकदा पुणे-सोलापूर मोटार प्रवास घडायला हवा होता. बोडख्या डोंगराचे फोड उठलेला आणि कोरडा भूभाग पाहताना सुजल आणि सुफल असण्याऐवजी सुजलेला आणि सुकलेला तो भाग ! पण नानूरच्या रस्त्याने ह्या 'सुजलाम् सुफलाम्'चे रहस्य उलगडले. पूर्व पाकिस्तानात गेलेला बंगाल तर सतत सुजल सुफल ! त्या मानाने पश्चिम बंगाल रुक्ष मानतात. बंगालचा संबंध दुष्काळाशी अधिक

असला आणि बंगालची गौड-बंगाल आणि भुके बंगाल ही दोनच रूपे आपल्या अधिक परिचयाची असली तरी मी ह्या प्रवासात पाहात होतो तो बंगाल मात्र खरोखरीच सुजल, सुफल आणि शस्यश्यामल होता.

मधून-मधून डोकावणारी खेडी तर मोठीच टुमदार. अशा खेड्याचे वर्णन रवीन्द्रांनी सहजपाठातल्या कवितेत केले आहे. 'छायार घोमटा - छायेचा घुंगट ओढून आमचे गाव बसले आहे - तो पुकूर. चहू बाजूंनी तालवृक्षांचा फेर धरलेला. मध्ये कळकाचे बेट हवेच. एक छोटेसे वाण्याचे दुकान, कुठे एखादी म्हातारी सुपात धान्य घालून पाखडते आहे - गवळ्याचं पोर गुरामागून धावते आहे - कुठेतरी थोरल्या न् धाकल्या जाऊबाई घरांच्या भिंती सारवताहेत...' पन्नास साठ वर्षांपूर्वी रवीन्द्रांनी पाहिलेल्या दृश्यात आजही फरक नाही. बैलगाडीच्या गतीने चाललेली जीवनाची संथ लय. जेटयुग येवो - सुपरजेट येवो, धान्याचे शेत आश्विनातल्याच उन्हात पिकणार. बीजाचा अंकुर, अंकुराचे रोपटे, रोपट्यावर कणीस, कणसात टंच भरलेला दाणा - हे चक्र एका सनातन गतीनेच फिरणार. आणि त्या चक्राशी जुळलेली जीवनचक्रेही त्या लयीतच फिरायची. यंत्रांत इकडून कापूस घालून तिकडून कापड बाहेर पडते - बेसुमार वाढलेली लय. कारखान्यांनी भरलेल्या शहरांत त्या लयीशी जीवनाची लय जुळवावी लागते. पण कपाशीला बोंड केव्हा धरायचे हे निसर्गाने ठरवले आहे. ती लय ठरवणारा तो संगीत दिग्दर्शक ! यंत्राची गती आपल्या हाती. धाव म्हटले, धावले. थांब म्हटले, थांबले. आंब्याला केव्हा मोहोर फुटायचा ते आपण नाही ठरवू शकत !

हाडाचा शेतकरी आणि मातृधर्म पाळणाऱ्या माता ह्यांना सुटी नसते आणि कामाच्या तासाचे वेळापत्रकही नसते. पाळण्यातल्या पोरासारखी धरतीच्या कुशीतल्या बीजाची हाक केव्हा ऐकू येईल ते सांगणे शक्य नाही. पोराची दुखण्याखुपण्याची, भुकेची, 'शी' लागल्याची भाषा जशी आईलाच कळते तशी बीजाच्या सुख-दुःखाची मूक वाणी जातीच्या शेतकऱ्याला कळते. पाळणा गाताना आईने पोराला - 'व्हा गडे लौकरी मोठे' असे कितीही कळवळून सांगितले तरी त्या मोठ्या होण्याची लय, उत्पत्ति-स्थिति-विलयाची लय दाखवणाऱ्या त्या अज्ञात डमरूधराने बांधलेली आहे ! काळ्याशार मातीचे हिरवे शिवार करण्याची शेतकऱ्याला कितीही घाई असली तरी उतावळ्या मनाला शेतापेक्षाही कणखर बांध घालीतच त्याला जगावे लागते. त्याच्या शेताची लय बदलत नाही म्हणूनच खेड्याचे परिवर्तन सावकाश होते. वरपांगी बदल घडले तरी शेतकरी ठायलयीच्या जीवनसंगीताचाच उपासक.

आज त्या संथ, काहीशा बुजऱ्या खेड्यांत अनेक नव्या गोष्टी आल्या. वीज आली. रेडिओ आला. सिनेमा आला. वर्तमानपत्रांतल्या बातम्या आल्या. शहरांच्या धडधड-धडधड धावणाऱ्या गतीतून निर्माण होणारे हादरे बसू लागले. देवावरची श्रद्धा उडाली नाही. पण धर्मकल्पना, जन्मजात उच्चनीचता, स्वर्ग-नरक यांच्या खरेपणाविषयी शंका येऊ लागली. राजकीय गुंड नामक नवा पुरुषावतार - अशी काही आतली दुखणी -, काही अस्वस्थता सुरू झाली. त्याबरोबर बाह्य दर्शनातही बदल घडू लागला. देवळांतल्या भिंतीवरच्या देवादिकांच्या चित्रांवर आता सिनेमांची आणि राजकीय पक्षांच्या विराट मेळाव्यांची पोस्टर्स चिकटू लागली. देवळातला हनुमन्त त्या अंधेऱ्या गाभाऱ्यातच शेंदूर थापून उभा आहे हे ठीक आहे. चुकून देवळाबाहेर येऊन पाहाता तर, स्त्री हा एक केवळ सस्तन प्राणी आहे, हे शिक्षण देण्यासाठी त्या देवळाच्या भिंतीवर चिकटवलेली सिनेमाच्या पोस्टर्सवरची चित्रे पाहून चिरंजीव हनुमन्ताने तिथल्या तिथे शेवटले 'राम' म्हटले असते ! शाळांच्या भिंतीवरच 'दो या तीन बच्चे बस'चा त्रिकोणही आला आहे.

ह्या सर्व आघातांनी युक्त अशा एका छोट्या गावाशी आलो. गाव अगदीच छोटे नव्हते. टुमदार झोपड्यांच्या बाजूला सिमेंट कॉंक्रीटच्या दोन-चार कुरूप इमारतीही होत्या. सलील म्हणाला, "उतरा."

हेच ते चंडिदासाचे गाव नानूर. बसच्या थांब्याजवळच चंडिदासाचे देऊळ आहे. मला फक्त आठवत होता सैगलचा चंडिदास आणि उमाशशीने घडवलेले रामी धोबिणीचे दर्शन. गाव पाहून गोव्यातल्या डिचोलीसारख्या गावात आल्यागत वाटले. मंगेशीच्या देवळाकडे जाताना मुख्य रस्त्यावर कमान आहे. तशीच इथेही एक कमान होती. त्या कमानीवर चंडिदासाच्या गीतातली प्रसिद्ध ओळ होती - 'सबार उपरे मानूष सत्त. ताहार उपरे नाई. - सर्वांहून माणस श्रेष्ठ, त्याहून श्रेष्ठ कोणी नाही -' चंडिदासाचे रामी नावाच्या धोबिणीवर प्रेम जडले. मग रूढिनिष्ठांचे पित्त भडकणे वगैरे नेहमीची शास्त्रोक्त प्रतिक्रिया. एखादा बंगाली भटजी 'चंड्या शिंच्या, हवें तर ठेव तीस. प्रेमे कसली करतांय-' वगैरे सल्लाही देता झाला असेल.

'बाशुली' नावाच्या देवीच्या देवळातला चंडिदास हा पुजारी. बंगालात देवभक्तीचे दोनच प्रकार. एक म्हणजे बळीच्या रक्ताच्या धारेचा अभिषेक धरून देवीला प्रसन्न करणे किंवा मग बासरी, मंजिऱ्या, खोल, घुंगूर ह्या साथीत 'अश्रुनीर वाहे डोळा' ह्या अवस्थेत गात-नाचत करायची मधुरा भक्ती. सारी शक्ती रक्तबंबाळ करण्यात किंवा अश्रुबंबाळ करण्यात. त्यामुळे 'दुर्गा' आणि कृष्णप्रेमाने बावरी झालेली 'राधिका' ह्या दोन मुख्य देवता. शंकर, राम वगैरे देवबाप्पा मला बंगालात थोडेसे दुय्यम दर्जाचे अधिकारी वाटले. महाराष्ट्रात मुरलीधर कृष्णापेक्षा सुदर्शनधारी कृष्णाचे कौतुक अधिक. ज्ञानदेवे भक्तीचा

पाया रचिला तो देखील कुरुक्षेत्राच्या रणभूमीवरच्या कृष्णाने सांगितलेल्या गीतेवरच्या भाष्याने. तशी राधा अधून-मधून येते. पण लोकजीवनात राधेपेक्षाही मारुतराया, कोदंडधारी राम, रखमाईशी इमानेइतबारे संसार करणारा इठूराया यांनाच जिव्हाळ्याचे स्थान आहे. आमची राही म्हणजे रखमाई. बंगालीत 'राही' म्हणजे राधा ! चंडिदास आणि रामीचे प्रेम हे राधाकृष्ण प्रेमासारखे. प्रेमात, कसली आली आहे जात आणि पात. हे माणसांचे जग आहे. माणूस हीच एक जात. तत्कालीन समाजाला हे पटले नाही. प्रेम ही वस्तूच अशी आहे की, दुसऱ्याने तिसऱ्यावर केलेले पहिल्याला पटत नाही. चंडिदासाला ब्राह्मणांनी बहिष्कृत केले. चंडिदास मनात म्हणाला असेल - 'बरं झालं. सकाळी उठून संध्या-बिंध्या करायची कटकट गेली.' त्याने ब्राह्मणांना सांगितले की, "बाशूली आदेशे कोहे चोंडिदाशे, धोपानी चोरोणशार - माझ्या बाशुली देवीचा मला आदेश की, माझ्या जीवनाचे सार्थक रामी धोबणीच्या चरणांत आहे — थोडक्यात म्हणजे, तुम्हाला काय करायचे ते करा. मी रामीला घेऊन नांदणार."

रामी धोबीण जिथे कपडे धूत असे तो सुंदर तलावही आज पाण्याने तसाच तुडुंब भरलेला आहे. तळ्याकाठी एक देऊळ आहे. त्या देवळात मूर्तीऐवजी रामी धोबीण ज्या शिळेवर कपडे धूत असे त्या शिळेचीच 'देवी' केली आहे. मी पाहिले त्यावेळी त्या शिळेवरची फुले ताजी होती. कुंकू वाहिलेले होते. विचार आला की, त्या शिळेची पूजा करणाऱ्या एखाद्या भटजीबुवांच्या चिरंजीवाचे आजही एखाद्या धोबणीवर प्रेम बसले तर या नानुरातले ब्राह्मण विरोधच करतील किंवा धोबी त्या भटाला धोतरासारखा बडवतील ! - तो मेल्यावर मात्र शिळेचे देऊळ करून चरितार्थाची सोय करतील ! धर्माचा धंदा करायलासुद्धा डोके पाहिजे. रामी धोबिणीच्या शिळेचे देऊळ करणाऱ्या त्या कोण्या अज्ञात बेरकी भटजीबुवाच्या चलाखीवर मी खूष झालो. शेवटी देऊळदेखील देवाला जगविण्यासाठी नसून, माणसाच्या चरितार्थाच्या सोयीसाठीच हवे. 'सर्वांहून माणूस श्रेष्ठ' हे चंडिदासाचे सुभाषित खरे तर हाच अर्थ सांगून गेले आहे. 'देवदानवा -नरे निर्मिले' - भिक्षुकशाहीने राजेशाहीशी संगनमत करून देवाचा व्यापार मांडून आपापल्या घृतकुल्या - मधुकुल्यांची सोय केली - कुणी देवळात, कुणी मशिदीत तर कुणी चर्चमध्ये ! देवाने आपल्याला उत्पन्न केल्याच्या बदल्यात देवालाही उत्पन्न तोडून द्यावे लागते !

रामी धोबिणीवर प्रेम केल्यामुळे चंडिदासाला छळ सोसावा लागला. पण छळाच्या त्या यातनांतून चंडिदासाने बंगालला असंख्य मधुर गीतांची देणगी दिली. चंडिदासाला छळणारे भटजी आणि इतर रूढिग्रस्त लोक कालप्रवाहातून वाहून गेले. पण आजही बंगालातल्या खेड्यापाड्यांतून - 'चंडिदास कहेऽऽ' अशी सुरेल लकेर जाते. नानूरमधल्या

त्या तलावासाठी ती गीते बंगाली जीवनात काठोकाठ भरून राहिली आहेत. ती ऐकताना कुणी राधा होऊन ऐकत असेल, कुणी कृष्ण होऊन, कुणी रामी होऊन तर कुणी चंडिदास होऊन !

बंगाली खेड्यांतून हिंडताना मला एखादा बंगाली जमीनदारबाबू बघावा अशी फार इच्छा झाली. बंगाली चित्रपटांतून हुक्काबिक्का ओढणारे, शाल पांघरून वावरणारे जमीनदार पाहिले होते. महाराष्ट्रात रयतवारी असल्यामुळे इतके ठसठशीत जमीनदार नाहीत. कोल्हापूरकडे काही सरदार मंडळी आहेत. पण प्रचंड हवेली, डझनावारी नोकरांचा राबता. महालात भरपूर मोठे अंतःपुर, दारी हत्ती झुलतोय असला जमीनदार मुम्बई-पुण्याच्या आसपास तरी आढळला नाही. बंगाल-बिहार वगैरे भागात असले जमीनदार फार. आपल्या एकेकाळच्या मराठी संस्थानिकांना त्यांच्या उत्पन्नाइतका पगार देऊन कारभारी म्हणून ते नेमू शकले असते. स्वातंत्र्यानंतर हे जमीनदार आकसत गेले आणि आता नक्षलवाद्यांनी तर त्यांचे कांडात काढायचे काम चालविले आहे. मी सलीलला सुचवले - ''सलीलबाबू, एखाद्या जमीनदाराचा वाडा दिसला तर उतरू या.'' आम्ही नानूर सोडले आणि वाटेवरच एक गाव लागले. सुजाता-दी म्हणाली, ''इथे तो अमका-अमका जमीनदार आहे, बघू या.'' मग आम्ही बस सोडली आणि जमीनदाराच्या शोधात निघालो.

एका जुनाट वाड्यापाशी आलो. दारातच गवताच्या गंज्या पडल्या होत्या. मूळ वाडा आत असावा. बाहेर एका लांबलचक ओसरीला खोल्या चिकटवलेली छपरी वास्तू होती. त्याच्या मधून आत शिरण्याचे प्रवेशद्वार. दोन्ही बाजूंच्या खोल्यांमधून धान्याची पोती, तेलाचे डबे वगैरे गावातल्या किराणाभुसार मालाच्या व्यापाऱ्याचे गुदाम असावे असा माल. एकूण स्वच्छता मोटार मेकॅनिकचे वर्कशॉप स्वच्छ म्हणावे अशी ! डाव्या बाजूला एक खोली होती. तिच्यात कानावर चष्म्याच्या काड्यांऐवजी सुतळी बांधलेले एक थेट नाटकसिनेमांतून पळवलेले दिवाणजी. त्यांनी एकदा वहीतून डोके काढले. आमच्याकडे हनुवटी गळ्यात खोचून चष्म्याबाहेरून पाहिले आणि पुन्हा चोपडीत डोळे घातले. सलीलने कुणाला तरी धरून आत वर्दी पोहोचवली. दहा-पंधरा मिनिटे आम्ही ती पडझड पाहात उभे होतो. तिथली माणसे देखील मोडकळीला आल्यासारखी वाटत होती. तसे भलेमोठे कंपाऊंड होते. पण बागबगीच्यावरून माळ्याचा हात दोन-तीन पिढ्यांपूर्वी फिरलेला असावा. एक भंगलेली पुष्करणी होती. एक कोरीव लोखंडी बाक कुण्या पूर्वजाच्या षौकीनपणाची साक्ष देत गंजत पडलेले होते.

काही वेळाने जमीनदारबाबू आले. चार-साडेचारचा सुमार होता. पण त्यांच्या डोळ्यावरची झोप पूर्णपणे उडाली नव्हती. धोतर-बनियन आणि त्या बनियनवरच

आमच्या सन्मानार्थ किंवा बनियनची भोके दडविण्यार्थ एक वुलन कोट चढवला होता. बनियन आणि धोतर ह्या दोघांकडूनही पोटाचा ओसंडता आवेग आवरण्याचे कार्य चालले होते. धोतराची अक्षरशः मच्छरदाणी. चेहरा चांगला गुबगुबीत गोरा. पण दाढीला एकदोन दिवसांत फुरसद मिळाली नसावी. रीतसर 'आशून' वगैरे झाले. सलीलच्या दाढीमुळे हा साला छुपा 'नक्षाल' तर नाही ना, अशीही शंका त्यांना आली असावी. पण सलील आणि सुजाता-दी हे कालीमोहन घोषांचे 'शुपुत्र एबम् शुकन्ना' आहेत हे कळल्यावर त्यांना दारुण आनंद झाला. त्यांच्या लहानपणी त्यांनी कालीमोहनबाबूंना पाहिले होते म्हणे. "आमच्या पितृदेवांची आणि त्यांची मैत्री होती. ." वगैरे वगैरे. हे बंगाली लोक वडलांना 'पितृदेव' वगैरे सहज म्हणून जातात. मराठीत एखाद्या सुपुत्राने आपल्या बापाची ओळख 'आमचे पितृदेव' अशी करून दिली तर बापच पोराचा 'बाप' काढल्याशिवाय राहणार नाही. मराठीत भलत्याच जागी संस्कृत शब्द कितीही निर्मळ मनाने वापरला तरी तो भोंदू वाटतो. पण बंगालीत मात्र सारा संस्कृत शब्दरत्नाकर, फक्त म्हातारपणामुळे दात पडून बोचऱ्या झालेल्या भटजीसारखा का होईना, पण भक्कम सोवळेभांडे ठेवून आहे. स्वैपाकघरातून, 'वाढायला घ्यायचं का ?' ह्याऐवजी चक्क 'भाताचे परिवेशन करायचे का ?' असा प्रश्न येतो. माझी ओळख झाल्यावर जमीनदारबाबूंना 'भीषण भालो' वाटले.

जमीनदारबाबूंच्या मागून आम्ही मधल्या चौकात गेलो. उजव्या बाजूला उंचच्या उंच चौकोनी तिमजली घर होते. घरांच्या वर्णनात बंगाली लोक न चुकता दोतालाबाडी, तीनतालाबाडी असे मजल्यांचे गणित सांगत असतात.

"सध्या आम्ही ह्या वाड्यात राहतो. पण आमचा जुना वाडा पलीकडे आहे" म्हणून त्यांनी आम्हाला पलीकडे नेले. मला केवळ चहानेच भागणारी जी एक तहान असते ती लागली होती. पण जमीनदारबाबू 'चा खाबेन ?' असे विचारीत नव्हते. हे 'नक्षाल' नाहीत अशी त्यांची नक्की खात्री नसावी. बाहेरच्या बाहेर हिंडवत होते. बहुधा सलीलची ती दाढी, डोकेभर भरमसाट वाढलेले केस यामुळे हे असे झाले असावे.


आम्ही जुन्या वाड्यात गेलो. समोर उद्ध्वस्त झालेला एकेकाळचा टोलेजंग वाडा. बऱ्याचशा भिंती कोसळल्या होत्या. एखादी आपली जुनी उंची दाखवीत उभी होती. मधूनच एखादा सुरूदार खांब. मध्येच कुठेतरी सुरेख महिरप. ऐतिहासिक चित्रपटाचे शूटिंग संपल्यावर अर्धवट उस्कटवलेला भव्य सेट दिसतो तसे ते दृश्य होते. वाड्याची एक बाजू त्यातल्या त्यात शाबूत होती. सुमारे हजार माणसे लोड-तक्क्याला टेकून बसावीत एवढा विस्तीर्ण दिवाणखाना. छतावरची नक्षी उडाली होती. पण जी होती ती विलक्षण नाजूक. मुसलमानी कारागिरांच्या हातची वेलपत्ती असावी. आणि एकच एक

निळ्या काचेची हंडी 'अजूनही इथेच जीव टांगलाय' असे सांगत केविलवाणेपणाने लटकली होती. जमीनदारसाहेब एखाद्या गाईडच्या अलिप्ततेने आपल्या पूर्वजांच्या ऐयाषीच्या हकीगती ऐकवीत होते. त्या दिवाणखान्यात म्हणे हिंदुस्थानातल्या तत्कालीन तमाम उस्तादांचे आणि बाईजींचे गायन-वादन झाले होते.

"..त्या दिशेला आमचा जनाना असे. त्या एका मजल्यावर लहान-मोठी एकूण एकशेवीस दालने होती—"

एकशेवीस खोल्यांतून भरून ठेवण्याइतका जनाना पूर्वजांनी जमवला होता, हे ऐकल्यावर हा वाडा उद्ध्वस्त का झाला याचे कारण विचारण्याची गरजच उरली नाही. तरीही मी विचारलेच. कारण वाडा तसा फार जुना वाटत नव्हता. फारतर दीडशेएक वर्षांपूर्वीचा असावा. कारण मुख्य दारांतल्या ग्यास बत्त्यांचे स्टॅण्डस् थेट लंडनचा बकिंगहॅम पॅलेस पाहून आल्यावर त्याबरहुकूम तिथल्या लोहाराकडून ओतवलेले दिसले. जमीनदाराचा परिवार हळूहळू कलकत्त्याला स्थायिक झाला. कलकत्त्यात नवा वाडा. चैनीच्याही देशी आणि नव्या विलायती तऱ्हा. सोहबबहादुराला प्रसन्न करणाऱ्या मेजवान्या. विलायती मदिरा-मदिराक्षी. साहेब गेला. जमाना पालटला. जमीनदार बदलणे शक्य नव्हते. एकशेवीस दालनांतून वाढणाऱ्या वंशवेलींना टोपल्या भरभरून फळे आली. मग भाऊबंदकीची भांडणे. कलकत्त्याचे बालिस्टर श्रीमंत झाले. दागिन्यांपासून हंड्या-झुंबरा-पर्यन्त जे जे मोडून खाता येण्यासारखे होते ते ते खाल्ले. मला वाटते, फरशीचा संगमरवरही विकला असेल. प्रस्तुत जमीनदारसाहेब कॉंग्रेसचे कार्यकर्तेही होते. कॉंग्रेसने भले भरडून खोटेच कंठी धरले होते. आता कम्युनिस्टांनी जमीनदारबाबूंच्या धोतराची चाळण केली. हल्ली म्हणे फक्त पाचसहाशेच (?) एकर जमीन उरली आहे. 'कोनो रकम चोल छे' - कसेबसे रसगुल्ले गिळत दिवस कंठताहेत. कदाचित् हा दरिद्रवेष हे त्यांचे चिलखतही असेल !

'पुन्हा अवश्य या' असे म्हणून त्यांनी मोहरा फिरवला. त्या नागमोड्या अरुंद गल्लीतून ढबक-ढुबुक करीत ज़ाणारी त्या जमीनदाराची आकृती दिसेनाशी होईपर्यंत मी त्याच्याकडे पाहात होतो. 'आयतेपणा' हाच जिथे वंशपरंपरागत कुळाचार होता अशा वाड्यातल्या एकशेवीस दालनांपैकी एका दालनात जन्माला आलेल्या जमीनदारबाबूला तो कुळाचार कसा सोडता येणार? 'आम्ही नव्हतो आमुचे बाप उगीच का मग पश्चाताप' म्हणत 'मिळतील ते रसगुल्ले आपले' असे म्हणत असेल बापडा ! गेल्याच महिन्यात म्हणे त्याचे कोठार लुटून नेले होते. आपला तो एकशेवीस दालनांचा जनाना असलेला आणि हजार माणसांच्या मैफिलीचा दिवाणखाना असलेला वाडा आणि वैभव देखील एका निराळ्या प्रकारच्या लुटीतूनच आले होते, हे मात्र त्याला उमजत नव्हते ! — पण संपली आता ही माळ ! त्या आयत्यांच्या माळेतला - तो अखेरचा आयता !



आपल्या ग्यानबा-तुकारामासारखे बंगालचे विद्यापती आणि चंडिदास. तसा विद्यापती मैथिली; पण बंगाल्यांनी त्याला आपलासा केला. मैथिलीत बंगालीचा खूपच रंग मिसळलेला आहे. राधा-कृष्णाच्या प्रेममाधुरीची गीते गाणाऱ्या विद्यापती-चंडिदासांचे पूर्वसूरी गौरांग महाप्रभू चैतन्य. परंतु राधामाधवविलासाची गीते गाणारा सगळ्यांचा परात्पर गुरु गीतगोविंदकार जयदेव कवी. त्याची ती -

'ललित लवङ्गलता परिशीलन कोमल मलय समीरे
मधुकर निकर करम्बित कोकिल कूजित कुञ्जकुटीरे -'

अशी नादमधुर 'मधुर कोमलकान्त पद्य'रचना. सारे बंगाली कीर्तन ह्या जयदेवाच्या अष्ट पद्यावर उभे आहे. राधामाधवविलासातली एखादी अष्टपदी घ्यायची आणि त्या अष्टपदीवर आधारलेली चंडिदासाची बंगाली गीते, इतर वैष्णव कवींची गीते आणि कीर्तनकाराचे संगीतातच निरूपण असा हा बंगाली कीर्तनाचा थाट असतो. शृंगार हाच ह्या गीतांचा स्थायी भाव. बंगाली कीर्तनेच कशाला, दक्षिण आणि पूर्व भारतीय नृत्याचा गीताधार जयदेवच. 'जय जगदीश हरे' ह्या दशावतारातील एका पदावर नृत्याचे भाव दोन-दोन, तीन-तीन तास चालतात. कुचिपुडी पद्धतीतही जयदेवाचीच गीते. हा जयदेव

बीरभूम जिल्ह्यातल्या अजय नदीच्या तीरावरच्या केंदुली गावचा. केंदुलीला जाण्यातला माझा मुख्य हेतू 'बाऊल' ऐकणे हा होता. कारण जेजुरीला जसे मल्हारी-मार्तंडाची गीते गाणारे वाघ्ये आणि मुरळ्या न चुकता खंडोबाच्या जत्रेला हाजरी लावतात, तसेच साऱ्या बंगालातले बाऊल केंदुलीच्या जयदेव मेळ्याला जमतात.

माझ्या आयुष्यात मी ऐकलेला पहिला बाऊल गायक म्हणजे पूर्णदास बाऊल. एखाद्या देखण्या ऋषिकुमारासारखा हा तरुण आणि त्याची सावळी बायको. हातात चौणक्यासारखे वाद्य, पायांत घुंगरू, कमरेला छोटासा डग्गा बांधलेला. त्या चौणक्याला 'दोतारा' म्हणतात. एका तारेवर लयीची छेड, दुसरीवर मुख्य मुख्य सुरांचा आघात. दादरला सलीलच्याच घरी काही वर्षांपूर्वी एका छोट्या मैफिलीत पूर्णदासाने असा सूर फेकला की, गोविंदराव टेंब्यांनी भाऊराव कोल्हटकरांच्या आवाजीचे वर्णन केले आहे, त्याची आठवण झाली. काळी पाचच्या सुरात तो गात होता. दोतारा, तो छोटा डग्गा आणि घुंगूर यांतून सुरेख लय बांधली होती. तिच्या चलनात जराशीदेखील ढिलाई नव्हती. बंगाली भाषेतले एक अक्षरही मला त्यावेळी कळत नव्हते; पण केवळ त्या तीरासारख्या सुरांच्या फेकीने आणि लयीच्या अंदाजाने गुंग होऊन दोन-अडीच तास ती बाऊलगीते मी ऐकत बसलो होतो. दादरच्या हिंदू कॉलनीतला ब्लॉक हे बाऊल ऐकायचे स्थान नव्हते.

आज मी अजय नदीच्या काठी मोकळ्या वाळवंटी ते बाऊल गायन ऐकणार होतो. जत्रेला जाण्याचा उत्साह 'सहजपाठा'च्या विद्यार्थ्याला शोभणारा होता आणि भल्या पहाटे दारावर टकटक झाली. दारात माझे मित्र नंदा नारळकर उभे. थेट पुण्याहून आले होते ते. मी आणि नंदाने अनेक गाणी बरोबर बसून ऐकली आहेत. पण बाऊलांची बैठक ऐकायला त्याने नेमके येऊन टपकावे हा योगायोग फारच मजेदार.

केंदुलीच्या प्रवासाच्या वेळी मात्र बंगाली बस सर्व्हिसचे सुख भोगून जनतासंपर्क साधण्याचा बेत रद्द केला. टूरिस्ट खात्यातून टॅक्सी घेऊन मी, नारळकर, सलील, शार्लट आणि सुजाता-दी निघालो. सुजाताबाईचा 'ट्रिप' वगैरेचा उत्साह फारच दांडगा. मुडी, उकडलेली अंडी, कॉफी भरलेले थर्मास वगैरे सामुग्री घेऊन आम्ही जयदेवाच्या जत्रेला निघालो. हवेने मेहरबानी केली होती. वाटेत एक थेट 'ग्रिम्स फेअरी टेल्स'मधून उचलून आणल्यासारखे टुमदार जंगलही दिसले. अनेक अनोळखी वृक्ष आणि अनोळखी फुले. शांतिनिकेतनाहून साठ-सत्तर मैलांचा प्रवास होता.

शेवटल्या टप्प्यात बैलगाड्यांच्या रांगा भेटायला लागल्या. पंढरीच्या वाटेला गाड्या जुंपून निघालेली यात्रेकरू मंडळी भेटतात तशीच. मधूनच वैष्णवांचे तांडे-जत्रेहून येणारे आणि जाणारे. चंद्रभागेच्या तीरावर बैल सोडून गाड्या उतरत्या उभ्या करून ठेवलेल्या

असतात तेच दृश्य. रेडिओचे कर्णे वाजत होतेच. नाना तऱ्हेची दुकाने. हॉटेलांतून मिठायांबरोबर माशांचे आणि मटणाचे चॉप्स, उकडलेली अंडी हेही होते. पंढरीला हे नाही ! बंगालात मत्स्य-मांस निषेध जवळ जवळ नाहीच. विधवांना फक्त सामिष भोजन वर्ज्य. बाकीच्यांना 'हरि बोऽऽ ल' म्हणून मासा मटकावण्याला धर्माची आडकाठी नाही.

जत्रा खूप मोठी होती. प्रचंड कोलाहल. त्यात ठिकठिकाणी पडलेल्या महंतांच्या अड्ड्यातल्या भजनाचा गोंगाट मिसळला होता. अंधार पडत चालला आणि दिव्यांचा झगमगाट झाला. फिरत्या चक्राकार पाळण्यावरही विजेच्या बत्त्या पेटल्या. लाऊडस्पीकरवरून पोरे हरवल्याच्या किंवा सापडल्याच्या घोषणा चालू होत्या. एकूण गंदारोळ होता. पण सगळेच आनंदात. असल्या गदारोळात मुसंडी मारून घुसणे ज्याला आवडत नसेल किंवा ज्याचे स्वच्छतेबिच्छतेचे इंद्रिय तीक्ष्ण असेल त्याने जत्रेला जाऊ नये. जत्रा हा एक 'ॲब्स्ट्रॅक्ट' गोंधळ असतो.

आम्ही बाऊलांचे अड्डे शोधीत निघालो. एके ठिकाणी गारुड्याभोवती जमते तशी गर्दी होती. त्यात घुसलो. एका लहानशा तंबूत कुठल्याशा देवीचा चौरंग मांडला होता. रिंगणाच्या मध्यभागी माइक्रोफोनचे दांडके उभे केले होते. एक पिळदार शरीराचा, ऐटबाज दाढी राखलेला, त्या तसल्या थंडीत उघडाबंब राहिलेला. ब्राँझचा सजीव पुतळ्या-सारखा वाटणारा बाऊल त्या माइकपुढे उभा राहून पुढच्या गर्दीला 'बसून घ्या - नीट बसून घ्या' म्हणून सांगत होता. त्या तंबूत पाच-दहा बाऊल गायक आणि गायिका बसल्या होत्या. त्या पिळदार म्हाताऱ्याचा आवाजही पिळदार होता. डोळे तर असे तेजस्वी की, नुसत्या त्या डोळ्यांच्या जरबेने माणसे सावरून बसत होती. 'आत्मबलिष्ठ स्पार्क' नावाच्या 'वाटेल त्या सुंदरीला वश करून घेणाऱ्या' ताइताच्या जाहिरातीतल्या माणसाचे तसले डोळे असायचे..

तो म्हातारा त्या गर्दीवर रागावत होता, थट्टा-विनोद करीत होता. कमरेला बांधलेल्या डुग्गीवर ताल धरून नाचत होता. मधूनच एखाद्या बाऊलाच्या हातातील चौणके घेऊन वाजवीत होता, गडबड करणाऱ्या पोरांच्या अंगावर धावून जात होता. तो त्या कार्यक्रमाचा सूत्रधार होता, विदूषक होता आणि स्वतः चांगल्या साठ-पासष्ट वर्षांच्या जत्रांच्या गर्दीचा अनुभव गाठीशी असणारा बाऊलही होता. हा बहुधा त्या बाऊलांचा उस्ताद असावा. कारण इतर बाऊल त्याला मानीत होते. पुढे त्याची आमच्याशीही जानपहेचान झाली. त्या ग्रामीण मेळाव्यात आम्ही 'टूरिस्टां'सारखे वेगळेच दिसत होतो. त्याने नेमके आम्हाला टिपून तंबूत 'पेशल' व्यवस्था केली. आम्ही शांतिनिकेतनातून आलो, म्हटल्यावर 'रोबी ठाकूरा'च्या जत्रेत आज अनेक वर्षे आपण जातो आहोत, हेही त्याने आम्हाला ऐकवले. ग्रामीण बंगालला गुरुदेव म्हणजे 'आमचा रवि ठाकूर !' जसा

नंडिदास हा चंडी ठाकूर तसेच ! मला गुरुदेवापेक्षा — 'आमादेर रोबी ठाकूर' हे नाव अधिक आवडले.

कुस्त्यांच्या फडात प्रथम उमेदवार पैलवानांची कुस्ती होते, मग चुरशीचे पैलवान उतरतात. गर्दी त्यांच्यासाठी असते. होतकरू बाऊल आधी मैदानात उतरले. बुजुर्ग गायक त्या पालात स्वस्थ विड्या ओढीत-चिलीम भरीत बसले होते. त्यांतल्या कच्च्या पोरांच्या गाण्यांना हा म्हातारा नाच करून, डुग्गीवर नाना लग्ग्या वाजवून किंवा पायातल्या घुंगरांनी नाचातले तोडे दाखवीत रंग भरीत होता. त्यांच्या गीतांना आपल्या बसकट पण चांगल्या घटलेल्या आवाजात साथ करीत होता, झील धरीत होता. ती खेड्यातली जनता कधी कौतुकाने, कधी मिश्किलपणाने थट्टा करीत होतकरू बाऊलांची गीते ऐकत होती. पण लक्ष आतल्या उस्तादांकडे होते. मधूनच कोणी त्यांच्या नावांची फर्माइश करी. म्हातारा म्हणे, "जरा दम धरा. पुनवेचा चांद काय एकदम उगवतो ? प्रतिपदा, द्वितीया बघत-बघत पुनवेकडे जायला हवे. अरे ही पोरे अजून पुरती उगवायची आहेत. तुमच्या आशीर्वादाने ह्या चंद्रकोरीचेच काही काळाने गरगरीत चांद होतील. काय ?" असे म्हणून डुग्गीवर तुकडा मारून नाचाची गिरकी घेत समेवर त्याने लोकांचा 'हो'कार घेतला.

दुर्दैवाने त्या चंद्रकोरीत चांद होणारे फारसे कोणी नव्हते. तेवढ्यात एक तरुण बाऊल माईकपाशी आला. माझ्या शेजारी बसलेला एक गृहस्थ मला म्हणाला, 'शाहेब, एटा रेडिओ बाऊल !" मग त्या रेडिओ-बाऊलने आपले गीत सुरू केले - सुरेल होता, म्हणतही चांगला होता. पण त्याच्या म्हणण्यात मस्ती नव्हती. माइकमध्ये तोंड घालून लाडे-लाडे म्हणण्याचे बाऊल हे गाणेच नव्हे. एक तर बाऊल गायन हा केवळ गायन प्रकार नाही. बाऊल होऊन जगणे ही एक वृत्ती आहे. आमच्या लोकसंगीताची नाना तऱ्हेची अधिष्ठाने आहेत. खंडेरायावरून जीव ओवाळायची तयारी असते तेव्हाच वाघ्या-मुरळीच्या गाण्याला जीव येतो. तिथे गाणे हे पूजेच्या फुलासारखे उपकरण असते; साध्य नव्हे. संगीताच्या जाणकारांना त्यातले फक्त गायनांगच हवे असते.

बाऊल हा केवळ गायक नाही. भिक्षा मागून जगणारा भिक्षेकरीही नाही. बाऊल म्हणजे वेडा-बावरा. बाऊल लोक स्वतःला 'ख्यापा' म्हणजे वेडा असेच म्हणतात. पण हे एक अलौकिक वेड आहे. केशवसुतांनी सांगितलेला 'निस्संगपणा धरून वाडे कोडे गाणारे', 'शय्या भूमितले दिशोऽपि वसनम्' ह्या वृत्तीने जगणारे; संन्याशी नव्हेत-संसारीच. पण सारा संसार उघड्यावर-झाडाखाली. हक्काचे घर नाही की शेत नाही. मनातला जिप्सी नेईल तिथे जाणारे, आनंदयात्री. ते जातीचाच काय पण धर्माचाही भेद मानत नाहीत. बाऊल हे बंगालचे स्वातंत्र्यवेडे संगीत साधक. सूर, लय आणि शब्द हेच त्यांचे ब्रह्मा-विष्णू-महेश. त्या त्रिमूर्तीची भक्ती करीत जीवनात बागडत असतात. कुठल्याही

सांप्रदायिक धर्माचे ते पालन करीत नाहीत. कसलीही पोथीनिष्ठा, जपतप, अनुष्ठान ह्यांतही ते गुंतलेले नाहीत. त्यांच्या ह्या जीवनसाधनेला 'सहजिया' म्हणतात. जी सह-ज आहे ती साधना. हे खरे गाणारे हिप्पी ! त्यांचे कोणाशी वैर नाही. निःसंगावर प्रेम. त्यांचा देव म्हणजे 'मनेर मानूष !' मनातला माणूस. त्याची पूजा स्वरपुष्पांनी करायची. 'आमार पूजा गाने गाने चोलछे तायी-' म्हणून माझी पूजा गाण्यागाण्यातूनच चालते. साऱ्या धरित्रीचेच मंदिर करून मुक्त मनाने अंगावर ऊन-पाऊस झेलीत जाणारे हे बाऊल. रवीन्द्रांच्या कवितांच्या चालीवर ह्या बाऊलांच्या चालींचा फार मोठा संस्कार आहे. 'एकला चालो रे-' हे त्यांचे सुप्रसिद्ध गीत बाऊलपद्धतीचेच आहे.

मला बाऊलांची 'मनेर मानूष' - मनातला माणूस शोधत जाण्याची कल्पना ऐकल्यावर, योगवासिष्ठांतली माणसाची व्याख्या आठवली. योगवासिष्ठाचा मी मुळीच अभ्यास वगैरे केलेला नाही. पण एकदा रत्नागिरीच्या फडकेशास्त्री यांनी केलेला योगवासिष्ठाचा संक्षिप्त अनुवाद चाळत होतो. त्यात 'मन एव मनुष्यः' ही माणसाची व्याख्या वाचून 'युरेका' असे ओरडायलाच शिल्लक ठेवले होते. मन म्हणजेच तो माणूस. त्या मनाला निर्मल करण्यासाठी हा बाऊल 'मनेर मानूष' जागवत हिंडत असतो आणि मनाला स्नान घालण्याचे सर्वांत मोठे सामर्थ्य सूर-लयीलाच आहे. लोकांशी बोलल्यासारख्या भाषेतली गाणी आणि मनालाच नाचायला लावणारा ठेका ! चिरगुट-चिंध्या धारण करून रस्त्यात गात जाणारा हा भणंग. ह्या भणंग वृत्तीचे वर्णन एका बाऊल गायकाच्या गीतातूनच ऐकायला मिळाले. 'मा आमादेर पागोलिनी। पागोल बाबा गँजाखोर।' आमची आई पागल आणि बाप गांजेकस ! शिवपार्वतीसारखी जनांत आणि विजनांत मुक्तपणाने जगणारी ही बाऊल जोडपी !

बंगालात श्रीमंत गरीब सगळ्यांचे बाऊलांच्यावर फार प्रेम. रस्त्यातल्या बाऊलांचे गाणे कलकत्त्याच्या रवींद्र मंदिराच्या वातानुकूलित आलिशान सभागारातही होते आणि ते ऐकायला सारा बंगाली भद्र समाज जमतो. चांगल्या बाऊलांच्या ध्वनिमुद्रिका हजारोंनी खपतात. 'मनेर मानूष' शोधायची ओढ माणसांतून ओसरली नाही. 'शुद्ध-शान्त-रसिक' झालात तरच हा अधर माणूस धरता येतो, असे एक बाऊलच म्हणून गेला आहे. अज्ञात अनामिक बाऊल कवींनी आजपर्यन्त शेकडो सुंदर गीतांचे धन बंगालला दिले आहे.

मोठ्या अलिप्ततेने हे बाऊल जगत असतात. सगळेच नसतीलही कदाचित 'मनेर मानूष' शोधायला निघालेले ! काहींचा हा पोटाचा व्यवसायही झाला आहे. पूर्णदासासारखे बाऊल आता अमेरिकेचा दौराही करून आले. शिष्टसमाज म्हणतो पूर्णदास आता पूर्वीचा बाऊल राहिला नाही. त्याचे वडील नबनीदास. ख्यापा बाऊल म्हणत त्यांना. रवीन्द्रांचा तो आवडता बाऊल. चंडिदासाच्या नानूरचाच राहणारा. चांगला

संसारी होता. पण मुक्काम चंडिदासाच्या बाशुली देवीच्या मंदिरात. एके दिवशी बाऊलांचा दोतारा धरला हाती. पायात घुंगूर बांधले आणि सारे कुटुंब गात-गात निघाले. बापाने खाली ठेवलेला दोतारा मुलाने उचलला. तोही असाच निघाला. आवाजाची अलौकिक देणगी आणि देखणे व्यक्तिमत्त्व. आज तिशीच्या अलीपलीकडे असेल. पण त्याची बाऊलगाणी ऐकायला हजारोच्या संख्येने लोक जमतात. त्याचे एक बाऊल गीत तर विलक्षण लोकप्रिय आहे. 'आमार जेमन बेनी तेमन रबे च्यूल भिजाबो ना-' कृष्णप्रेमात डुबलेली गोपी म्हणते - 'मी प्रेमजलात न्हाऊन निघाले तरी माझी वेणी तशीच राहील - केस नाही भिजू देणार. जग वाटेल ते म्हणो - मी मनाला वाटेल तिथे पोहणार..' बहुतेक सारी गाणी भैरवीत. ही भैरवी भारतातच नव्हे, मी स्पेनमधल्या लोकसंगीतातदेखील ऐकली आहे. हजारो वर्षांपासून उघड्यावर गात-गात हिंडणाऱ्या आमच्या भटक्या गायकांनी फुलपाखरे जशी फुलांचे केसर रानोमाळ नेतात तसे हे भैरवीचे सूर सगळीकडे नेले. बाऊलांच्या गाण्यांत खेमटा किंवा दादऱ्याची असंख्य चलने आणि भैरवीतल्या बाराही सुरांचा मुक्त विहार !

त्या जत्रेत, जयदेवाच्या स्मृतीला आपली सुरांची श्रद्धांजली वाहायला हे अनेक वेडे बाऊल जमले होते. प्रत्येक अड्ड्यातून हिंडत-हिंडत रात्री अकराच्या सुमाराला एका अड्ड्यावर आम्ही पोहोचलो. तिथे दोन बाऊलांचे सवाल-जवाब चालले होते. आमच्याबरोबर सलील आणि सुजाता-दी असल्यामुळे त्या गीतांचा अर्थ सांगणारे दुभाष्ये होतेच. लोकव्यवहारातल्या उपमा उत्प्रेक्षांनी अवघड वेदान्त सोपा करून सांगायचा हे तर आमच्या संतांचे वैशिष्ट्य. तऱ्हेतऱ्हेची रूपके. एकनाथी भारुडांची आणि ह्या गीतांची जात सारखीच. मग शेवटी त्या विनोदी वाटणाऱ्या रूपकाला एक उदात्त शिडी. सुर्रकन् त्या वातावरणातून उंच नेणारी. हसता-हसता अंतर्मुख व्हायला लावणारी. ह्या साऱ्याला त्या सूर-लयीची मस्त जोड. चार-चार किंवा सहा-सहा मात्रांचे हे अतिशय कसबाने वाजवलेले ठेकेच आधी सभ्य संकोचाची वस्त्रे नकळत ओढून काढतात. घटकेपूर्वी कपडे आणि सामाजिक किंवा आर्थिक दर्जाची ऐट सांभाळीत बसलेला बाबू चार-पाच आवर्तनांत झुमायला लागतो. व्यवहारातल्या आडंबराची आणि अहंकासची वस्त्रे गळून पडतात. त्या लयीच्या धुंदीत त्या अड्ड्याचा पुकूर होतो आणि माणसांचे नुसते थेंब होतात.


त्या बाऊलांचे सवाल-जवाब असे रंगले होते की, जयदेवाच्या जत्रेची रात्र संपूच नये असे वाटत होते. त्या टूरिस्ट खात्यातल्या टॅक्सीवाल्याला वेळेचे बंधन होते म्हणून उठणे प्राप्त होते. पण पाय निघत नव्हता. शेकडो गाण्यांची त्या नदीतटावर बरसात चालली होती. हवाही मस्त. '-हवाभी खुषगवार है - गुलो पे भी निखार है तरन्नुमे हजार है बहार

पुरबहार है -' म्हटले आहे ते हेच! माणसांच्या झुंडीच्या झुंडी त्या उत्तररात्रीदेखील अजयेच्या प्रवाहाच्या जोडीने वाळवंटात वाहात होत्या. वाळवंटी चंद्रभागेच्या काठी काला मांडिला! इथे तोच काला अजयेच्या काठी होता. 'हरिबोऽऽल'च्या गर्जना उठत होत्या. मोठ्या नाइलाजाने ती मैफिल सोडून उठलो.

मनात सहज विचार आला — एका कवीविषयीच्या आदराने, प्रेमाने आणि कृतज्ञतेने अंतःकरणे भरून आलेल्या माणसांना प्रेमाच्या मस्तीत धुंद करायला, पोरांपासून थोरांपर्यंत कोणीही मोकळ्या मनाने गावे - नाचावे - खावे - उघड्यावर आकाशाच्या छताखाली नुसतेच हिंडावे यासाठी 'जत्रा' हा काय सुंदर सोहळा आहे! आधुनिक कवीच्या नशिबात हा असला अलौकिक सन्मान लिहिलेला नाही. जनसागराच्या अंतःकरणातल्या लाटा उचंबळून आणणारे हे संत त्या पौर्णिमेच्या रात्री आकाशातल्या चंद्रासारखे वाटले.

पहाट फुटता-फुटता शांतिनिकेतनात परतलो. डोक्यात त्या डुग्ग्या, घुंगूर, मंजिऱ्या, खोल, मृदंग, एकताऱ्या आणि बाऊलांचे ते खुल्या वातावरणातले फेकून दिलेले सूर थैमान घालीत होते. जयदेवाच्या जत्रेत मला बंगाल भेटला - इतका कडकडून की, त्या बंगाल्यांत मीही केव्हा मिसळून गेलो ते माझे मलाच कळले नाही. टाळ-मृदंग-वीणेच्या धुंदीत माणसांची स्पंदने एक होतात. इतर सारी 'लेबले' गळून पडतात. सूर-लयीच्या ह्या भावबंधनात माणूस मुक्त होतो. त्यात आपपर भेद राहात नाही - त्या सूरलयीमुळे त्या बंगाली जनसाधारणाशी माझी रास, गोत्र, प्रवर सगळे काही जमले! मनाला खूप श्रीमंत करणारी ती जयदेवाच्या जत्रेची रात्र!





शांतिनिकेतनला जाताना कलकत्त्यात जायचे नाही असा निश्चय केला होता. शांतिनिकेतनातली लहरी हवा परवडली, पण कलकत्त्यातली ती राजकीय हवा नको. पण तरीही कलकत्त्याचे एक विलक्षण आकर्षण उत्पन्न झाले. केवळ तेवढ्यासाठी मी कलकत्त्याला गेलो. रामबहालजी सरांनी आठ दिवसांचा अभ्यासही नेमून दिला होता. वांड कारटी दिवाळीच्या सुट्टीला मामाच्या गावाला जाताना विटी-दांडू, गोट्या इत्यादी वस्तूंबरोबर, आईबापांच्या डोळ्याला पाणी लावायला एक पाटी दप्तरही कोंबतात. मी देखील माझी अभ्यासाची पुस्तके बरोबर घ्यायचे कबूल केले. कलकत्त्यात यापूर्वीही मी बरेचदा गेलो आहे. बंगाली रंगभूमीवरच्या अनेक नट नटींशी आणि नाटककारांशी माझा स्नेह आहे. त्यामुळे पुढल्या आठ दिवसांत माझा अनाध्याय होणार हे कळत होते. पण ते आकर्षण इतके अकल्पित होते की मला कलकत्त्यात गेल्याशिवाय राहवले नाही.

एके दिवशी संध्याकाळी मी बाहेर फिरायला निघालो. सलील वाटेतच भेटला आणि म्हणाला, 'कलकत्त्याचे माझे स्नेही इथे सहकुटुंब आले आहेत. त्यांच्या घरी जायचे

आहे. शांतिनिकेतनातच त्यांची बंगली आहे. चक्रवर्ती कुटुंबाशी त्या संध्याकाळी माझा परिचय झाला. युधाजित चक्रवर्ती हे जाहिरातीच्या व्यवसायातले एक अतिशय यशस्वी गृहस्थ. ते, त्यांच्या पत्नी उमा-दी, एम.ए. ला असलेली त्यांची मुलगी सुमा — आमची वाटच पाहात होते. सलीलने बहुधा युधाजितबाबूंकडे माझी आधीच जाहिरात केली असावी त्यामुळे साग्रसंगीत स्वागत झाले. छोट्याशा त्या बंगलीतल्या ओसरीलगतच्या लहानशा खोलीत दारेखिडक्या बंद करून आम्ही बसलो होतो. हवेत भयंकर गारठा होता हे एक, दुसरे म्हणजे जरा खिडकी उघडली की डासांच्या झुंडी आत घुसायच्या. बंगालइतके डास मी आमच्या लहानपणी पार्ल्यातसुद्धा पाहिले नाहीत. एके काळी पार्ले डासांविषयी फार प्रसिद्ध होते. आता बिस्किटे, सिगारेटी, मँगोला वगैरेमुळे आहे.

मी त्या खोलीत शिरल्यापासून कोपऱ्यातल्या तिपाईवर ठेवलेल्या एका तैलचित्राने माझे लक्ष वेधून घेतले. शांतिनिकेतनच्या परिसरातले जमिनीच्या धुपीने झालेल्या 'खोवाई'चे चित्र होते. मोठा कॅनव्हास होता. शैली आधुनिक होती. ब्रशाचे फटकारे जोरदार होते. आकाशाची निळाई, तीनच तालवृक्षांच्या शेंड्यांचा गर्द हिरवेपणा, जमिनीचा शेंदरी मातट असा उंचसखलपणा.

मी चित्राच्या जवळ गेलो तशी युधाजितबाबू एकदम म्हणाले,

"हां-रंग ओला आहे. आज संध्याकाळीच पुरे झाले आहे ते चित्र-"

"आपण काढता चित्रं-"

"छे छे - तुम्हाला भेटायचं आहे का चित्रकाराला ?"

"अवश्य-"

"ठिक आहे. शुमा खोकाला बोलव -" बंगालीत छोट्या मुलांना खोका म्हणतात - आणि पोरीला खूकी.

मी ते चित्र पाहात उभा होतो. इतक्यात युधाजितबाबू म्हणाले,

"मिस्टर देशपांडे, मीट द आर्टिस्ट."

मी पाहातच राहिलो. एक गुबगुबीत गालाचा, गब्दुल अंगाचा गोरापान असा दहाबारा वर्षांचा मुलगा उभा होता. त्या बालमूर्तीचे डोळे सुंदर होते, पण अथांग कारुण्याने भरलेले. त्या वयाला विसंगत वाटणारे, तरीही पाहाणाराचे कुतूहल वाढवणारे. "हा माझा मुलगा अनमित्र." (बंगालीत ओनोमित्रो !)

"खोका नमस्कार कर." त्या मुलाने काहीशा यांत्रिकपणाने मला नमस्कार केला.

"फार सुंदर चित्र आहे. मला खूप आवडलं."

"से थँक्यू खोका—"

मग एक एक अक्षर ओढीत बोलल्यासारखा अनमित्र 'थँक्यू' म्हणाला.

वयाच्या मानाने बौद्धिक वाढ न झालेली मुले असतात. अनमित्र किंचित् तसा होता. का कोण जाणे, माझे पुन्हा पुन्हा त्या चित्राकडे आणि कोपऱ्यात येऊन बसलेल्या त्या बालचित्रकाराकडे लक्ष जात होते. एखादी गाण्याची मैफल संपली तरी आपल्या नकळत तोंडून पुन्हा पुन्हा 'वा ! वा !' असे येतच राहते तसे त्या चित्रामुळे झाले होते. वास्तविक सुराइतका काही मी चित्रकलेचा लोभी नाही. मला ती नजर नाही. मी चित्रे पाहतो. पण चित्रे माझ्याशी मोकळेपणाने बोलत नाहीत. चित्रे पाहण्याचे माझे डोळे गेल्या दहा-बारा वर्षांतच उघडले. त्यामुळे अनेक भारतीय चित्रकारांच्या हाताची वळणे (आणि खोडी) मी भीत भीत ओळखतो. एखादे चित्र अचानकपणे 'काय कसं काय ?' असे विचारून जाते. पण अनमित्राचे ते चित्र पाहताना त्यात बालचित्रकलेचा मला संशयही आला नाही.

"केव्हापासून काढतो हा चित्रे ?"

"वयाच्या चौथ्या पाचव्या वर्षापासून—" युधाजितबाबू म्हणाले.

"आपण कलकत्त्याला या आमच्या घरी—" अनमित्राची आई म्हणाली.

"दोन एक हजार चित्रे आहेत—"

"काय ?"

"आपण आमच्याच घरी उतरा, आम्हाला खूप आनंद होईल."

शांतिनिकेतनातल्या आपल्या बंगलीत युधाजितबाबू दर शनिवारी सहकुटुंब येत. त्यांचा आणि माझा परिचय खूप वाढला. तसे युधाजितबाबू वागण्या बोलण्यात एकदम विलायती. अनेक वेळा जगाचा प्रवास घडलेला. त्यांचे वडील गुरुदेवांच्या सुरुवातीच्या सहकाऱ्यांपैकी. इंग्रजीचे प्रगाढ पंडित. त्याकाळी मोठी नोकरी मिळाली असती. ती न स्वीकारता टागोरांच्या बरोबर आले. साधे, शिक्षकाचे जीवन स्वीकारले. दुर्दैवाने तरुण वयात त्यांचा अंत झाला. युधाजितबाबूंचे सुरुवातीचे शिक्षणही गुरुदेवांच्याच देखरेखीखाली झाले. पुढे उच्च शिक्षणाला कलकत्त्याला गेले. उमा-दीदी उच्च विद्याविभूषित. दोघांनीही मला कलकत्त्याला येण्याचा आग्रह केला. त्या आग्रहापेक्षाही अनमित्राची चित्रे पाहण्याच्या ओढीने आणि त्याहूनही बालयोग्यासारखा वाटणारा हा चित्रकार चित्रे काढीत असताना त्याला पाहायला मिळावे ह्या हेतूने मी कलकत्त्याला जायला तयार झालो. मोकळ्या कॅनव्हासवर त्याचे चित्र कसे रंगरूप घेत जाते तेही मला पाह्यचे होते. माझा मामा चांगला चित्रकार होता. उत्तम प्रकारची पोर्ट्रेट्स काढायचा. त्रिनिदाद, हळदणकर यांच्या घराण्यातला. तो चित्रे काढीत असताना मी मागे जाऊन बसत असे. त्याला लहानपणी कसल्याशा आजाराने बहिरेपण आले होते. एकदा कामात दंग झाला की त्याला कसलेही भान राहात नसे. त्या सफेद कॅनव्हासवरच्या कोऱ्या जागा त्याच्या ब्रशाच्या फटकाऱ्याने बोलक्या व्हायच्या. बधिरतेमुळे त्याला बोलतानाही त्रास

होई. तरीही तो तल्लीन झाला की अं-अं-अं- असा गुणगुणल्यासारखा आवाज करीत चित्रांत रंग भरायचा. त्यानंतर गेल्या पस्तीस चाळीस वर्षांत चित्र घडताना पाहण्याचा योग आला नव्हता. तेव्हा त्या बालचित्रकाराची ती शेकडो पेंटिंग्ज आणि जमले तर चित्रकाराची ध्यानसमधी पाहावी अशीही इच्छा होती.

अपर इंडिया एक्सप्रेस नावाच्या गाडीने मी, सलील आणि शार्लट कलकत्त्याला जायला निघालो. प्रजासत्ताक दिनाची सुट्टी होती. बोलपूर ते कलकत्ता शंभर एक मैलांचा प्रवास. पुण्या-मुंबई एवढा. निघालो तेव्हा हवा सुरेख होती. वसंतऋतूचे कितीही कौतुक झाले तरी आपल्या देशात ओढ शरदाचीच. 'जीवेत् शरदः शतम्' हीच इच्छा. सरस्वतीदेखील शारदा. शरदातल्या ढगांना रवीन्द्रांनी 'छायानट' म्हटले आहे. छायाप्रकाशाचे भरल्या शेतांना डोलडोलवणारे नृत्यनाट्य पाहात निघालो होतो. हळूहळू दृश्य पालटत गेले. कलकत्ता शहराच्या विद्रूप खुणा दिसायला लागल्या. माओवादी लोकांनी भिंतीवर काढलेल्या डांबरी रांगोळ्या, धुरांड्यातून निघणाऱ्या ढगांचे ते भीषण नृत्यनाट्य ! एखाद्या वृक्षाच्या फांदीवर बराच वेळ बसलेला पोपटांचा थवा उडून जावा आणि तिथे गिधाडे येऊन बसावीत असे झाले. जीवनाच्या ह्या विराट रंगमंचावर नुसताच राघूमैनांचा खेळ नाही. गिधाडांचेही ह्या नाटकात प्रवेश आहेतच.

गाडीने डमडम सोडले आणि सियालदा स्टेशनजवळच एका पुलावर येऊन गाडी थांबली. पुलाखालून शहरातला एक मोठा रस्ता जात होता. रुळावर माणसांची धावपळ चालली होती. भीषण हत्याकाण्डाचे अमंगलाचरण सुरू झाले होते. आरोळ्या ऐकू येत होत्या. एक उघडाबंब तगडा गुंड हातात लोखंडी गोळा बसवलेली लाठी घेऊन युद्धनेतृत्व करीत होता. आणि गाडीतले लोक असहाय होऊन ते दृश्य पाहात होते. हेल्मेट घातलेले पोलिस निर्विकार मनाने अंपायरसारखे उभे होते. बहुधा कुठल्या पार्टीने किती डोकी फोडली याचा स्कोअर मांडीत असावेत. हजार पाचशे लोकांचे दोन गट लाठीमार, दगडफेक करण्यात मस्त झाले होते. नऊमास भरत आलेली लोबूदांची पत्नीही आमच्याच कंपार्टमेंटमध्ये होती. तिला धीर देणे प्राप्त होते. वृद्ध माणसे होती. इतर स्त्रिया आणि मुले होती. हे युद्ध किती वेळ चालणार, ते कळत नव्हते. त्या गाडीने रोज जाणारे काही उतारू आम्हाला धीर देत होते.

'चिंता करू नका, हे रोजचेच आहे. ह्या वस्तीत फॉर्वर्ड ब्लॉक आणि कम्युनिस्टांची मारामारी गेले कित्येक दिवस चालू आहे.... थांबेल थोड्या वेळाने. शिवाय आज प्रजासत्ताक दिनाची सुट्टी आहे ना — त्यामुळे माणसे रिकामी आहेत—'

प्रजासत्ताक दिनानिमित्त हा कार्यक्रम आखला होता ही कल्पना नव्हती. बाहेर ही अशी रणधुमाळी चालू पण गाडीतली बरीचशी माणसे गप्पागोष्टीत दंग होती. अचानक पाऊस आला की माणसे कशी जवळपास आसऱ्याला उभी राहून पाऊस ओसरला की नित्याच्या व्यवहाराला लागतात तसाच हा कलकत्त्याच्या मारामारीचा मामला आहे. माणसांची डोकी फुटणे, ॲसिड बल्बची फेकाफेक, खून, गोळीबार, रस्त्यात छिन्नविछिन्न होऊन पडलेले प्रेत, दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात येणारी वर्णने, ह्या सगळ्यांची सवय झाली आहे. सुपातले जातातल्याविषयी बोलतात. कोण का भरडले गेले याचे अन्वयार्थ लावतात. कोणी काँग्रेसला दोषी धरतात. कोणी कन्युनिस्टांना. कोणी कलियुगाला. आणि आम्ही जशी थांबलेली गाडी केव्हा सुरू होणार म्हणून हताशपणे वाट पाहात होतो तशी जीवनाचे गाडे सुरू होण्याची वाट पाहात बसतात.

सुमारे अर्ध्या पाऊण तासात ते वादळ निवळले. पुलाखाली काय झाले ते समजले नाही. पण रुळावरून खाली नेमबाजी करणारे दंगेखोर रूळ सोडून खाली उतरले. आमच्या गाडीची वाट मोकळी केली. कलकत्त्याने केलेल्या ह्या दणकेबाज स्वागताचा निमूटपणे स्वीकार करून एकदाचे सियालदा स्टेशनात उतरलो. एवढ्याने भागत नव्हते म्हणून पाऊस सुरू झाला. टॅक्सीसाठी रांग लागली होती. टॅक्सीसाठी का होईना ह्या कलकत्त्यात रांग लावून उभी राहणारी काही माणसे शिल्लक आहेत हे पाहून आनंद झाला. मोजून दीड तास टॅक्सीची प्रतीक्षा झाली. आमचा नंबर लागला. युधाजित चक्रवर्तींच्या घराच्या दिशेला निघालो. पहिल्याच वळणाला टॅक्सी ड्रायव्हरने गाडी नेहमीच्या रस्त्याला न घेता दुसरीकडे फिरवली. सलील म्हणाला,

"इथून कशाला गाडी घेतली ? त्या रस्त्याने गेलो तर लवकर पोहोचू—"

टॅक्सीवाल्याला गाडीत महाराष्ट्राचे ख्यातनाम वगैरे विनोदी लेखक बसल्याची कुणकुण लागली असावी. त्याने लगेच विनोद टाकला - "लवकर पोहोचू - पण कुठे ? - त्या बाजूला भीषण हंगामा चलछे ! गोळीबार चाललाय -"

फर्लांगभर गेलो असू नसू. आमची टॅक्सी तीन चार लाठीधारी पोरांनी रोखली. तरुणांच्या एका घोळक्याने दोन्ही बाजूंच्या गाड्या थांबवल्या होत्या. एक टग्या टॅक्सीपाशी आला आणि आम्हाला म्हणाला -

"च्यांदा दाव - वर्गणी द्या - एक टाका - एक रुपया -" बंगालीत रुपयाला 'टाका' म्हणतात. निमूटपणे त्याच्या हातावर रुपया ठेवला. टॅक्सी सुरू झाली -

"दांडाव - थांबा -" असे म्हणून त्याने रुपयाची एक पावती दिली. हे म्हणजे एखाद्या गुंडाने मुस्काटीत मारून मार खाणाऱ्याच्या सुजलेल्या गालावर फेसपावडर लावल्यासारखे

होते. नाक्या नाक्यावर 'च्यांदा दाव'ची सक्ती चालू होती. टॅक्सीवाल्याला मात्र सुटा सोडीत होते. बहुधा कसला तरी उभयपक्षी करार झाला असावा. एकदाची आमची टॅक्सी च्यांद्याला तोंड देत देत युधाजितबाबूंच्या बंगल्यापुढे येऊन उभी राहिली. तिमजली बंगला. मागे सुरेख लॉन. उंच वृक्ष. कुंपणामागूनच गंगेच्या पाण्याचा पाट वाहात होता. विलायतेतल्या साहेबांची घरे डोळ्यापुढे ठेवूनच ह्या वास्तूची उभारणी केली असावी.

मात्र युधाजितबाबू आणि त्यांचे कुटुंबीय तिथे संध्याकाळी येऊन पोहोचणार होते. म्हणून सामान तिथे ठेवून दुपारचे भोजन करायला हॉटेलच्या शोधार्थ बाहेर पडलो. पाऊस थांबून ऊन पडले होते. हवा थंड होती. भटकत भटकत निघालो.

कुठल्याही शहराची ओळख पायी भटकल्याशिवाय होत नाही. आणि भाषेचे सामर्थ्य, रस्त्यातली शिवीगाळ ऐकल्याशिवाय प्रत्ययाला येत नाही. मात्र माझ्या बंगालच्या एकूण वास्तव्यात बंगाली भाषा, शिव्यांच्या क्षेत्रात पंजाबी आणि मराठीच्या मानाने जरा मागासलेली वाटली. 'च्यायला'सारखा अस्सल बंगाली बनावटीचा तत्सम शब्द मला ऐकायला मिळाला नाही. कदाचित् ह्या असल्या भांडवलवादी शिव्यांपेक्षा प्रतिक्रांतिवादी, भांडवलवाल्यांचा हस्तक, पोलिसवाल्यांचा कुत्ता वगैरे मार्क्सवादी शिव्या रूढ झाल्या असतील. किंवा संताप हा उक्तीपेक्षा क्रोबार, मोलोटोव्ह कॉकटेल असल्या जळजळीत कृतीनेच व्यक्त करण्याकडे अधिक ओढा असावा. कलकत्त्यात मरण खूपच स्वस्त आहे. आम्ही हिंडता हिंडता मुख्य रस्त्याला लागण्यासाठी एका गल्लीतून वळलो. तिथे हेल्मेट वाल्या पोलिसांचा पहारा दिसला. चौकशी केल्यावर आमनेसामनेवाल्या इमारतींतल्या दोन गटांची मारामारी होऊन काही तासांपूर्वी एक दोन मुडदे पडल्याचे कळले. पोलिस त्याच गल्लीत रंगात आलेला पोरांचा ब्याटबॉल पाहण्यात रंगले होते. नाहीतरी आपल्या देशात पोलिस हे मारामारीचा शेवटला अंक संपून, हॅम्लेट नाटकासारखे तीन चार मुडदे पडले की त्यानंतरच येतात. पुष्कळदा मला वाटते की हत्यारबंद पोलिस पाठवण्याऐवजी खेळ खलास झाला हे सांगायला सरकारने यापुढे पोलिस बॅण्डच 'जनगणमन' वाजवायला पाठवावा. काही तासांपूर्वी जिथे मुडदे पडले होते तिथे आता ब्याटबॉलचा खेळ रंगात आलेला पाहून कलकत्त्यात खेळातला भिडू औट होणे आणि जगातून औट होणे ह्यांत फारसा फरक उरला नाही हे ध्यानात आले.

रस्त्यात एक बऱ्यापैकी कॉफीहाऊस दिसले. त्याही फूटपाथवर भयंकर गर्दी होती. पण ती शेजारच्या इमारतीतल्या सिनेमागृहापुढे तिकिटांसाठी झालेली होती. आठवड्यापूर्वी कलकत्त्यात कसल्याशा कारणामुळे सिनेमा थिएटरात पडदे फाडणे,

खुर्च्या मोडणे वगैरेच्याही टुर्नामेंटस होऊन गेल्या होत्या. पण ही गर्दी तिकिटांसाठीच होती.

आम्ही कॉफीहाउसमध्ये शिरलो त्यावेळी लंचची वेळ टळली होती. आम्ही विचारू तो पदार्थ 'संपला' असे तो वेटर मोठ्या बेफिकिरीने सांगत होता. मग लक्षात आले की त्या कॉफीहाउसमध्ये तो वेटर हाच एक 'गरम' पदार्थ उरला होता. शेवटी तो एवढ्या उद्धटपणे म्हणाला 'काय मागवायचे ते लवकर मागवा—' की आम्ही तिथून वॉक् आउट केला. तो वेटर तुच्छतेने आमच्याकडे पाहून 'मार कटारी मर जाना-' हे गाणे गुणगुणू लागला. सगळी गाणी सोडून त्याला 'मार कटारी मर जाना' हे गाणे का सुचले कोण जाणे ! मग मी देखील 'किस्मत हमारे साथ है जलनेवाले जला करे-' हे तितकेच जुने गाणे गुणगुणत जिन्यावरून उतरलो. पन्नास सालापर्यंतच्या सिनेमांतल्या गाण्यांच्या मी देखील भेंड्या लावू शकतो हे त्याला काय ठाऊक. तो उगीचच आम्हाला जंटलमेन समजत होता.

भुकेचा प्रश्न घेऊन दुसऱ्या एका अगदी फडतूस हॉटेलात शिरलो. तिथे मात्र भलतेच चांगले स्वागत झाले. तात्पर्य काय माणसाच्या बाबतीत शितावरून भाताची परीक्षा होत नाही. प्रत्येक शीत हे स्वतंत्र. मराठी दुकानदाराविषयी कोणी काहीही म्हणो. पण एका 'इथे जानवीजोडही मिळतील' छाप अगदी प.पू. मराठी दुकानदारानेदेखील एकदा मला साबणचुरा आणि हळद यांच्या पुड्या बांधून होत असताना माझी ओळख नसूनही 'काय साहेब, तपकीर घेणार का ?' असे विचारले होते हे न स्मरण्याइतका मी कृतघ्न नाही !

त्या अत्यंत बेकार दिसणाऱ्या हॉटेलात उत्तम मटण चॉप्स मिळाले, मुरगी लाजवाब होती. मुख्य म्हणजे किसून शेवयासारखा केलेला कांदा, चटणी, लिंबू वगैरे मोफतातले पुरवणी पदार्थ तो पोऱ्या न मागता भरभरून आणून देत होता. तबियत खूष झाली आणि पान जमवायला निघालो. कलकत्त्यात 'बंगला' पान मिळत नाही हे कळले. कदाचित् बंगाली झब्ब्याला हे लोक 'पंजाबी' म्हणतात तसे बंगाली पानाला 'मद्राशी' म्हणत असतील. वास्तविक अशा जेवणानंतर घटकाभर आडवे व्हायला मिळते तर बरे झाले असते. पण सलील घोष पूर्वजन्मी भटक्या जमातीचा नायक असावा. त्याने माझी कलकत्त्यापासून फरफट काढली. आणखी कुठे बऱ्यापैकी मारामारी पाहायला मिळते की काय ते बघायला निघाला. मी सकाळची ती आगगाडीतून पाहिलेली डोकेफोडी, गल्लीतल्या दोन मुडद्यांची कथा एवढ्यावर तृप्त होतो. पण सलीलचे तेवढ्याने समाधान नव्हते.

पण कलकत्त्यातले बहुतेक मारामारीवाले भात खाऊन झोपले असावेत. कारण दुपारची 'घूम' ह्या एकाच विषयावर सगळ्या बंगाली राजकीय पक्षांचे देखील एकमत

असावे. बराच वेळ मारामारीच्या शोधात हिंडलो. शेवटी मी सलीलला म्हटले, "आपणही तासभर आडवे होऊ या." एव्हाना चक्रवर्तींच्या घरापासून बरेच दूर आलो होतो. सलील म्हणाला, "इथे जवळच माझा भाऊ राहातो. त्याच्या घरी तासभर आराम करू या. मग जाऊ कुठेतरी. (मारामारी पाहायला हे शब्द त्याने गिळले असावेत.) युधाजितबाबू संध्याकाळी परतणार तोपर्यन्त तिथे काय करायचे ?" 'झोपायचे' हे शब्द मी गिळले आणि घोषयात्रेत सामील झालो, सलीलचा मोठा भाऊ सागरमय घोष हा 'देश' ह्या अत्यंत लोकप्रिय बंगाली साप्ताहिकाचा संपादक आहे. आम्ही सागरदांच्या घरी गेलो. त्यावेळी तेही बंगाली परंपरेला धरून झोपले होते. आम्ही त्यांची झोपमोड केली. दादरच्या हिंदू कॉलनीत तीन खोल्यांचे ब्लॉक्स् असतात, तसल्याच जागेत सागरदा आणि त्यांची कुटुंबीय मंडळी राहतात. त्यांच्या त्या छोट्या दिवाणखान्यात पुस्तकांच्या ढिगाऱ्याबरोबर ग्रामोफोन रेकॉर्ड्स्चाही ढिगारा रचलेला पाहिल्यावर माणूस आपल्या जातीचा आहे हे ताडले.

सागरदा चांगले तुंदिलतनू आहेत. उठून तोंडबिंड धुऊन आल्यावर त्यांनी प्रथम पान जमवले आणि वर तंबाकूची चिमूट तोंडात टाकली. गोत्राप्रमाणे प्रवरही जमला. ह्या 'देश' साप्ताहिकात टागोरांपासून प्रत्येक श्रेष्ठ साहित्यिकाने आपले लिखाण प्रसिद्ध केले आहे. गेली तीस-बत्तीस वर्षे सागरदा 'देश'च्या संपादकीय विभागात आहेत. पण त्यांचे पहिले प्रेम साहित्यावर नसून संगीतावर आहे हे पाहिल्यावर लगेच दोस्ती जमली. पुढे एका बैठकीत सागरदांनी मला बालगंधर्वांचे 'नृपकन्या तव जाया' म्हणायची फर्माइश करून धक्काच दिला. इकडल्या तिकडल्या गप्पा झाल्या. त्यांनी रवीन्द्रसदनात पश्चिम बंगालचा राज्य संगीत महोत्सव असल्याची बातमी दिली आणि आम्ही रवीन्द्रसदनाच्या दिशेला निघालो.

रवीन्द्रांच्या स्मरणार्थ बांधलेले हे सरकारी नाट्यमंदिर मोठे भव्य आहे. समोर चांगला बगीचा आहे. कारंजीबिरंजी आहेत. पायऱ्या चढून वर गेलो आणि प्रवेशद्वारापाशी काचेवर कोरलेली चित्रे पाहिल्यावर ही चित्रे सरकारी पद्धतीने टेंडरे मागून काढलेली असावी असे वाटले. कॅलेंडरांवर राधाकृष्ण किंवा शिवपार्वतीची ती नकली चित्रे काढणाऱ्यांची कुसर ज्या दर्जाची असते त्याच दर्जाची ही चित्रे पाहून कुठलेही काम पी. डब्ल्यू. डी. नामक खात्याकडे गेले की त्याचा कसा विचका होतो याचे आणखी एक प्रत्यंतर आले. बंगालमध्ये चांगल्या चित्रकारांची अशी काय वाण पडली होती म्हणून ही असली पानवाल्यांच्या दुकानात किंवा एखाद्या कोल्ड्रिंक हाउसमध्ये शोभणारी चित्रकलेची विटंबना तिथे काचेवर कोरून ठेवली होती ते गवर्मेन्टवालेच जाणत असतील.

सभागृह मात्र वातानुकूलित आहे. प्रशस्त आहे. तरीही कलावंत आणि प्रेक्षकात दुरावा निर्माण करणारे नाही. तो त्या कलावंताने आपल्या कलेतूनच करायचा ठरवला तर प्रश्न निराळा. आम्ही आत शिरलो. त्यावेळी सभागृह निम्म्याहून अधिक रिकामेच होते. सरकारी कार्यक्रमाची हीही एक खासियत आहे. पुढल्या रांगा फुकट्या सरकारी अधिकाऱ्यांसाठी आणि त्यांच्या फुकट्या 'मिसेस्'साठी राखून ठेवतात. त्यांना भरमसाट पासेस् देतात आणि ते येत नाहीत. ('सरकारी अधिकाऱ्यांचा आणि लोकनियुक्त प्रतिनिधींचा निर्लज्ज फुकटेपणा' ही माझ्या मते ह्या देशाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांतली सर्वांत मोठी समस्या आहे !)

बंगाली लोकगीतांचा कार्यक्रम चालू होता. पुढल्याच रांगा रिकाम्या पडल्यामुळे गाणारांना उत्साहही नव्हता. आमच्या पाच रुपयेवाल्या तिकिटांत आम्ही पंधरा-सोळाव्या रांगेत होतो. माणसे मधूनच येत होती. उठून जात होती. फॅशनेबल श्रीमंत बायका मॉडेल्ससारख्या मिरवीत मिरवीत येत होत्या. लग्नाच्या रिसेप्शनसारखे वातावरण होते. आणि सनईवाल्यांसारखे गाणारे अलिप्तपणे गाऊन घेत होते. मुंबईत देखील हल्ली श्रीमंत बनियांनी चालवलेल्या संगीताच्या कॉन्फरन्सेस्मधून हेच वातावरण असते. त्यापेक्षा आमची मराठी लोकांची म्यूझिक सर्कल्स् खूप बरी. संगीतश्रवणाच्या बाबतीत साऱ्या भारतात मराठी श्रोते आणि कर्नाटकी संगीताचे श्रोते यांच्यासारखी शिस्त इतर प्रांतात मला तरी कुठेही आलेली दिसली नाही. रवीन्द्रांच्या स्मृतीनिमित्त बांधलेल्या ह्या रंगमंदिरात बंगाली समुदाय हा असा कॉस्मॉपॉलिटनवाल्यांसारखा वागत असेल असे मला वाटले नव्हते. मारून मुटकून आणून बसवल्यासारखी काही श्रीमंत डोनर माणसे होती. 'फेमिना' किंवा तत्सम मासिकांतून उचललेल्या केशभूषेचे भारे डोक्यावर वाहणाऱ्या आणि अंगावरचे कपड्यांचे ओझे हलके केलेल्या ह्या धनाढ्य कुटुंबांतल्या लेकीसुना हळूहळू पेंगायलाही लागल्या होत्या. गाणे कुठे पोचतच नव्हते.

वास्तविक अमरपाल नावाच्या गायकाने 'भटियाली' काय गोड म्हटली. भटियाली म्हणजे पूर्व बंगालातल्या नावाड्यांची गाणी. पूर्व बंगालात नद्यांतून खूप वाहतूक होते. 'माझी रेऽऽ' अशी दीर्घ सुरातली आळवणी करीत चालणारी कोळ्यांची आणि नावाड्यांची गीते. शेफाली घोष नावाच्या बाईने टप्प्याच्या अंगाचे श्यामासंगीत म्हटले. ही कालीची किंवा गौरीची गीते. काही वेळाने कालीपदबाबू पाठक रंगमंचावर आले. ऐंशी वर्षांचा हा वृद्ध बंगाली टप्पा गायक. भरघोस पांढऱ्या शुभ्र मिशा. तकतकीत गहू वर्ण, ताठ अंगलट. कालीपदबाबू आल्यावर मात्र मंडळी जरा सावरून बसली. टप्पा वास्तविक

पंजाबचा. शोरे मियांचे पंजाबी टप्पे आजही गायले जातात. ग्वाल्हेर गायकीत टप्प्याचे अंग अतिशय चतुराईने घेतले आहे. आपल्या नाट्यसंगीतावर तर टप्प्याचा फार मोठा असर आहे. टप्प्याची तान गेली की सुस्तावलेली मैफिलदेखील चमकून उठते. दीडशे वर्षांपूर्वी विधूबाबू नावाच्या बंगाली गायकाने हे बंगाली टप्पे रचले. पंजाबी टप्प्यात गळेबाजी जोरदार. बंगालीत त्या मानाने कमी. बंगाली गायकांच्या गळ्यांना तानेचे वळणच कमी. कालीपदबाबूंचा गळाही वार्धक्यामुळे हलका नाही. पण गळ्याचा 'बोजा' पाहिल्यावर मला वझेबुवांची आठवण झाली. पहिला षड्जच असा 'घना' लावला की आधीचे गायक मिळमिळीत वाटायला लागले. पंजाबी टप्प्याच्या मानाने कालीपदबाबूंचे टप्पे बाळबोध. पण वळण कसे कित्त्यातल्या अक्षरांसारखे सुदृढ आणि डौलदार. दुर्दैवाने सुरुवातीच्या आदराच्या टाळ्या ओसरल्या. म्हाताऱ्याने ओळखले मैफिल कोरडी आहे. काफीचा टप्पा संपला. आणखी एक खमाज अंगाचा म्हणाले आणि 'आता वय झाले' म्हणून गाणे थांबवले. मी सलीलला म्हटले, ''सलील, म्हताऱ्याला भेटून येऊ या.''

ग्रीनरूममध्ये म्हातारबुवा बसले होते. आजूबाजूला चार मंडळी होती. सलीलने परिचय करून दिला. मी त्यांना प्रणाम केला. बंगालीशिवाय त्यांना दुसरी भाषा येत नव्हती आणि बंगाली टप्प्याखेरीज जन्मात ते दुसरे गाणे गायले नाहीत. मी 'माराठा' आहे हे ऐकल्यावर ते म्हणाले -

''माराठी ? - ओ मा - अहो सगळ्या देशाला गाणं ऐकवणारे लोक तुम्ही - आमचं गाणं कसलं ऐकता ?'' मग भास्करबुवा, वझेबुवा, केसरबाई, हिराबाई ह्या साऱ्या नावांचा केवढ्या आदराने उल्लेख केला.

मी म्हटले, ''आज तृप्ती नाही झाली.''

''मी लवकरच शांतिनिकेतनात महिनाभर येणार आहे - पण आता काय ऐकवणार ? सूर गळ्यातून पळून गेले.''

कालीपदबाबूंच्या टप्प्यानंतर नाजूकसाजूक गाणी ऐकायची इच्छा नव्हती. सागरदा म्हणाले, ''चला क्लबात जाऊ.'' मग क्लबात गेलो. गर्भश्रीमंत, नवश्रीमंतांचा क्लब होता. व्हिस्की-सोडा पुढ्यात घेऊन झुळझुळीत स्त्री-पुरुष बसले होते आणि सगळीकडे जोरजोरात चर्चा चालली होती. सागरदांनी पृच्छा केली आणि कळले की काही कारणामुळे रेसकोर्सवरचा जमाव भडकला आणि रेसकोर्सवरच्या इमारतींना त्यानं आग लावली. माहिती सांगणाऱ्या गृहस्थाबरोबर एक बाई होती. निसटलेल्या तारुण्याला रंगरंगोटीच्या आणि केशवेषभूषेच्या नाना सापळ्यात पकडून ठेवण्याचा प्रयत्न करणारी. ती आपले उघडे बाहू, कोरीव भुवया आणि कुशल कारागिराने कापून तोकड्या केलेल्या

आणि रंगवलेल्या केसांच्या बटा एकदम उडवीत म्हणाली, "ओ माऽऽ ! की भीषण लंका कांड !" - त्या आगीचे 'लंकाकांड' हे वर्णन मला खूप आवडले. रेसिससारख्या हेल्दी स्पोर्टचे व्हायचे कसे हे दुःख मंडळी व्हिस्कीत बुडवीत होती. दिवस सुरू होताना पाहिलेली मारामारी, संगीताची मैफिल, गल्लीतल्या मुडद्यांची कथा आणि आता हे रेसकोर्सवरचे लंकाकांड ! सलीलला म्हटले,

"सलीलबाबू चला आता ! आज एवढे धक्के पुरे ! जय काली कलकत्तेवाली !"





घरी आलो त्या वेळी समस्त चक्रवर्ती कुटुंब आमची वाट पाहात बसले होते. मोठ्या शहरांतल्या बायका बिचाऱ्या वादळी दर्यात होड्या घालणाऱ्या कोळ्यांच्या बायकांसारख्या आज काल गेलेले माणूस सुखरूप परत येवो एकदाचे, म्हणत बसत असतात. कुठल्या राजकीय पक्षाला असल्या ह्या माणसांच्या जंगलात कसली शिकार सुचेल काही सांगता येत नाही. माझी आजी मला सांगायची, डास म्हणे घराबाहेर पडताना आपल्या बायकोला सांगतो, 'मी परत आल्याशिवाय भात शिजायला ठेवू नकोस चुलीवर. कोणाची टाळी केव्हा वाजेल आणि तीत मी सापडेन ते सांगता येत नाही.' डासांत आणि साध्यासुध्या माणसांत फरक एवढाच की माणसे भडक पुढाऱ्यांच्या भाषणांना आपणच टाळ्या वाजवतात आणि त्या टाळ्यांत आपणच सापडून युद्धात, पोलिशी गोळीबारात किंवा गुंडांच्या सुरामारीत मरून जातात. युद्धे संपत नाहीत. माणसाच्या रक्तमांसाच्या चिखलाने भरलेल्या रणमैदानात पुन्हा पुन्हा ती लाल लाल पॉपीची फुले मात्र 'अरे जरा इकडे पाहा' म्हणत फुलतच असतात.

चक्रवर्तीच्या घरातल्या भिंती अशाच एका पॉपीच्या चिमुकल्या रोपाइतक्याच निष्पाप आणि रंगवेड्या हाताने काढलेल्या शेकडो चित्रांनी भरल्या होत्या. तिन्ही मजल्यांवरच्या

भिंतींचा इंचन्‌इंच अनमित्राच्या लॅण्डस्केप्सनी भरला होता. दिवसभराच्या भटकाभटकीने मी इतका थकलो होतो, की कसे तरी जेवण उरकून तिसऱ्या मजल्यावरच्या एका सुंदर खोलीत झोपायला गेलो. इतका सुंदर बंगला. सुंदर शयनगृह. खिडक्यांना जाळ्या मारल्या होत्या. पण डासांनी उच्छाद मांडला होता. मोर हा जसा आपला राष्ट्र-पक्षी, तसा डास हा उपराष्ट्र-पक्षी ! उडत्या डासांना पक्ष्यांत ढकलायला हरकत नाही. जितक्या चतुराईने मच्छरदाणीत घुसता येईल तितका घुसलो. पण तेवढ्यात डासांच्या एका स्क्वॅड्रनने मागून हमला केलाच ! प्रजासत्ताक दिन चांगलाच साजरा झाला होता. आता प्रजासत्ताक रात्र कशी साजरी होते पाहू या म्हणत निवृत्त मनाने बिछान्यावर पडलो. दिवसभराची एकाहून एक विसंवादी चित्रे डोळ्यापुढे नाचत होती.

पहिल्या बाळंतपणाला निघालेल्या लेबू-दाच्या पत्नीच्या डमडमजवळच्या भयानक मारामारीच्या देखाव्याने पांढराफटक पडलेला चेहरा - मारामारीचे दिग्दर्शन करणारा तो उघडाबंब गुंड, ते असहाय पोलिस, 'कस्तूरी सूकरा चोजविली' ह्या भावनेने त्या कोरड्या मैफिलीत गायलेल्या वृद्ध कालीपदबाबूंचा तो हताश चेहरा, संध्याकाळी क्लबात 'ओ मा ऽ की भीषोण होत्ताकांडो' म्हणून शहारल्याचा अभिनय करणारी ती भद्र महिला, ते दमदाटीने वर्गणी उपटणारे टगे, ट्रॅम आणि बसेसना लक्तरासारखी लटकलेली ती उतारूंची गर्दी, जराजराशी ओळख देऊ लागलेली ती वंग भाषा, त्यातले मजेदार शब्द, मोहक हेल....

अनेकांनी या कलकत्त्याविषयी लिहिले आहे. पण कलकत्ता म्हणजे काय ? ती मारामारी की रवीन्द्र सदनातले गाणे ? 'मार कटारी' म्हणणारा तो आगाऊ उद्धट वेटर की आमच्या चरणरजांनी हॉटेलचा उंबरा सोन्याचा झाला असे भासवीत आमची सरबराई करणारा तो दुसरा हॉटेलवाला ? शांतिनिकेतनातले बंगाली, जयदेवाच्या जत्रेत भेटलेले बंगाली, निरनिराळ्या कुटुंबातले आमंत्रण देऊन बोलावणारे बंगाली - आणि कलकत्त्यातले बंगाली - असे काही निरनिराळे मनुष्यप्राणी थोडेच आहेत ? बंगालीत माणसाच्या गर्दीला 'लोकारण्य' म्हणतात. गर्दीचा उल्लेख 'ओ-दारूण लोके लोकारण्यो !' असा करतात. कलकत्ताच काय, मुंबई, टोकियो, न्यूयॉर्क, शिकागो, लंडन, पॅरिस सगळी लोकारण्येच ही ! ह्या महानगरात जंगलचाच कायदा लागू असतो. अरण्यात बड्या श्वापदांनी छोट्या श्वापदांना मारून जगायचा कायदा. लोकारण्यातही तोच ! सगळी माणसे बिनचेहऱ्याची. गर्दीला चेहरा नसतोच म्हणा. इथे झुंडमेव जयते. त्यामुळे इथे सतत टोळ्यांच्या कारवाया चालू असतात. 'टु बी बॉर्न इज टु बी रिस्पॉन्सिबल' म्हटले आहे. त्यामुळे मी कशालाच जबाबदार नाही असे म्हणता येत नाही. पण जबाबदारीची निवड ह्या लोकारण्यात आपल्या हाती राहातच नाही. झुंडीच्या

कार्यक्रमात भाग घेण्याचे टाळले तरी त्यांच्या कारवायांचे 'भोग' भोगावेच लागतात! जगातली सगळी महानगरे हे भोळ्या शंकरासारख्या माणसांनीच आपल्या श्रमाचे आणि दामाचे वरदान देऊन निर्माण केलेले भस्मासुर आहेत. थैमानाची प्रत कुठे कमी कुठे अधिक!

मी इथे झोपण्याचा प्रयत्न करीत होतो. पण ते महानगर झोपूही देत नव्हते. आपल्या झोपेचे देखील आपण मालक नाही! गल्लीच्या नाक्यावरचा सरस्वती पूजेचा भोंगा भडाभडा गाण्यांच्या ओकाऱ्या काढीत होता. मधूनच कुणीतरी जोरदार भाषण ठोकले. त्यामागूनं, 'चोलबे ना, चोलबे ना' च्या आरोळ्या झाल्या. तरीही थकलेली गात्रे संपावर गेल्यासारखी झोपी गेली. आणि एकाएकी कसल्या तरी आरडाओरड्याने जाग आली. मध्यरात्र केव्हाच उलटली होती. उशाखालच्या घड्याळात पाहिले. तबकडीवरचे आकडे दोन वाजल्याचे सांगत चमकत होते. हरि बोल हरि बोलचा गजर चालला होता. दचकून उठून खिडकीतून पाहिले. रस्त्यातल्या ट्यूब लाइटच्या त्या पांढऱ्या प्रकाशात लाल आलवाणासारख्या कापडात गुंडाळलेल्या मृतदेहाला खांद्यावरून वाहात एक प्रेतयात्रा चालली होती. आणि काही अर्धनग्न दरिद्री माणसे 'हरि बोऽल हरि बोऽल' असे ओरडत निघाली होती. पुन्हा एकदा मच्छरदाणीत घुसलो; तेवढ्यात त्या मच्छरदाणीत सात-आठशे डास घुसले होते.

सकाळी खूप लवकर जाग आली. सारे घर झोपले होते. तोंड बिंड धुतले आणि चक्रवर्तीबाबूंच्या घराच्या भिंती पाहू लागलो. अनमित्राला दिसलेले जग अनेक आकारांत आणि नाना रंगांच्या छटा घेऊन भिंतीवर विसावले होते. सगळी निसर्गदृश्ये. चित्रांत कुठेही मनुष्याकृती नव्हती. पशू पक्षीही नव्हते. फक्त काही चित्रांत हंसाच्या अनेक विभ्रमांचे चित्रण होते. एक दोन चित्रांवरच 'एसी' अशी इंग्रजी आद्याक्षरे काळ्या रंगात, जणू चित्राचा तोल संभाळायला काही तरी हवे म्हणून ठळकपणाने रेखाटली होती. एरवी कुठेही ह्या बाल कलावंताने चित्रावर आपली सही ठोकली नव्हती. रंग आणि आकारांची ती एक अनाम लीला. एखाद्या सुंदर माळावरून नाना रंगांची रानफुले, वृक्ष, झरे पाहात एकट्यानेच हिंडावे तसा मी ती चित्रे पाहात होतो. उघड्या माळावरची तर अनेक दृश्ये होती. समुद्राची विविध स्वरूपे होती. एका कॅन्व्हासवर काळोख्या रात्री नुसताच एक आगीचा लोळ आकाशातून पडतो आहे आणि मधूनच विमानांचे काही भाग दिसताहेत असे चित्र होते. (डॉ. होमी भाभांना अपघात झाला त्या दिवशी घरात ती चर्चा चालली होती. ती ऐकता ऐकता अनमित्र एकदम उठून गेला आणि त्याने हे चित्र केले.)

दोन चार दिवसांत चक्रवर्ती कुटुंबाने माझ्यातला पाहुणेपण घालवून टाकला. मला

त्या घरात इतकी आपुलकी लाभली की ज॰मान्तर सौहृदाखेरीज मला काही कारणच दिसेना. युधाजितबाबू आणि उमा-दी दोघांनाही गप्पागोष्टींचा षौक. स्वतः युधाजितबाबू तर खाण्यापिण्याचे भलतेच षौकिन. मत्स्यप्रेम हा माझ्या आणि त्यांच्या स्नेहातला मुख्य बंध असला तरी मी खाऱ्या पाण्यातल्या माशांचा प्रेमी. बंगाली मासे गोड्या पाण्यातले. पण उमा-दीनी माझा खाऱ्या पाण्यातल्या माशांचा अभिमान नाहीसा करायचा चंग बांधला होता. गोड्या पाण्यातल्या माशांतदेखील स्वाद वैशिष्ट्य आहे हे त्या पटवून देत होत्या. एके दिवशी आम्ही बाजार करून परत येताना मोटारीत कासवे पाहून मी थक्क झालो. बंगाली लोक परमेश्वराच्या मत्स्य, कूर्म आणि वराह या तिन्ही अवतारांचे परम भक्त आहेत याची मला कल्पना नव्हती. बाजारात मी कासवांचे ढीग पाहिले होते. पंक्तीला रसिक पाहुणे असायचे. युधाजितबाबूंचा जावई वसंत चौधरी हा बंगाली चित्रपट सृष्टीतला नाणावलेला नट आहे. ईश्वरचंद्र विद्यासागरांच्या भूमिकेत त्याने खूप लौकिक मिळवला आहे. त्यांची मुलगी बंगाली साहित्यात रस घेणारी. दुसरी इंग्रजी वाङ्मयात. पण माझे लक्ष मात्र अनमित्राकडे असायचे. सकाळी अकरा अकरा वाजेपर्यन्त तो झोपलेला असायचा. मग वरच्या खोलीतून 'माऽऽ' अशी हाक ऐकू यायची. एके दिवशी वरच्या खोलीतून निरोप आला की अनमित्र तुम्हाला बोलावतोय. घरात सर्वांच्या चेहऱ्यावर विलक्षण आश्चर्य. मला काहीच कळेना. मी त्या खोलीच्या दिशेला निघालो. जाता जाता युधाजितबाबू म्हणाले,

"देशपांडेजी यू आर लकी -"

मी वर त्याच्या खोलीत गेलो. जमिनीवरच चित्र काढायचा पट मांडला होता. जलतरंगाच्या पेल्यासारखे पण आकाराने लहान असे रंगांचे पेले होते. उमादिदी समोरच बसल्या होत्या आणि पूजेला मांडी घालून बसावे तसा अनमित्र चित्र रेखीत बसला होता. सकाळचा दहाचा सुमार असेल. खोलीत सुंदर प्रकाश होता. मी पाय न वाजवता, आत गेलो. तरीही माझी चाहूल लागलीच.

"देशपांडेजी... प्लीज... सी... माय्... पिक्चर..." एक एक अक्षर सावकाश उच्चारीत अनमित्र म्हणाला. मी एक मोढा घेऊन त्याच्या मागे जाऊन बसलो. फलकावर एक सुंदर निसर्गदृश्य तयार होत होते. पुरोभागीच तीन उंच झाडे - मागे मैदान.. वर आकाश...

"मा -शबुज-" (आई-हिरवा). अनमित्र म्हणाला.

उमादिदीने हिरव्या रंगाने भरलेला पेला पुढे केला. त्यात ब्रश घालून हलकेच ढवळीत अनमित्र फलकाकडे निश्चल नजरेने पाहात होता. मग त्या हिरव्यात आणखी कसल्याशा रंगाचे मिश्रण झाले. आईच्या हातातल्या त्या रंगाकडे डोळे खिळले. गवई तंबोरे

जुळवताना ज्या एकतानतेने जोड षड्जाचा गंधार ऐकू येतो की नाही ते पाहात असतात तसा अनमित्र आपल्याला हवी ती छटा उमटते आहे की नाही ते पाहात होता. आणखी एका रंगाची मागणी झाली. आईने ती वाटी दिली. त्यात ब्रश गेला. मनासारखा रंग जमल्याचे स्मित ओठाच्या कोपऱ्यावर उमटले. आता त्या रंगाची कॅन्व्हासवर लीला सुरू झाली. उमादिदी माझ्याकडे पाहून 'आता सांगा हे अवघड प्रकरण कसे सांभाळायचे ते-' असा चेहरा करीत होत्या. आता आमची तिघांचीच मैफिल होती. अनमित्र हातातल्या ब्रशाने त्या कॅन्व्हासवर चित्रसृष्टी निर्माण करीत होता. एखाद्या सुरेल गळ्याचा नव्या नव्या सुरांना स्पर्श घडावा आणि भूपासारख्या भारदस्त रागाचा ख्याल भरत जावा तसा अनमित्राच्या विविध रंगांनी भरलेल्या कुंचल्यांचा त्या कॅनव्हासला स्पर्श होई. कधी झपाट्याच्या तानेसारखा सर्रकन् ब्रश फिरे, कधी षड्जापासून रिषभ, गंधार असा एक एक स्वर दाखवीत, कधी तिथल्या तिथे रमत गमत दुसऱ्या स्वरस्थानाकडे गेल्यासारखा तो कुंचला त्या कॅन्व्हासवरच्या एका स्थानावर रेंगाळत, घुटमळत, वळणे घेत काहीतरी लीला करी आणि अंगावरचे शुभ्र आवरण फेकून देऊन आतून एखादी सुंदरी सौम्य 'अंगडाई' देत उठावी तसा तो कुंचला त्या आवरणामागून ते निसर्गदृश्य उठवीत होता. जणू काय कॅन्व्हासवर झाड काढण्याऐवजी कॅन्व्हासच्या शुभ्र पडद्यामागे दडलेले झाड हलकेच कुंचल्याने पडदा हटवून बाहेर काढीत होता. निळे आकाश, शेते, दूरवरच्या झोपड्या, बांधावर पळसाची तीन झाडे उभी राहिली. आता तो बालयोगी आमचे अस्तित्वही विसरला होता. मधूनच जो रंग हवा त्याचे नाव घ्यायचा. उमादिदी एखाद्या हिप्नटाइज् झालेल्या व्यक्तीने जादूगाराच्या सूचनेबरहुकूम हालचाल करावी तशा रीतीने हव्या त्या रंगाची वाटी पुढे करीत. अनमित्राचा डावा हात ती वाटी घ्यायचा. चित्रावरची नजर न हलवता रंगात ब्रश फिरायचा आणि कॅन्व्हासवर नवी किमया घडायची. दीड एक तास लोटला.

"शबूज - हिरवा-हिरवा रंग दे मा-" अनमित्र म्हणाला आणि उमादिदी लगबगीने एका वाटीत तो रंग भरायला लागल्या. एकाएकी कुणीतरी गुदगुली करावी तसा तो त्या चित्राकडे पाहात हसायला लागला.

"काय झालं खोका ?" आई म्हणाली.

"वारा सुटला-" अनमित्र. मग तो ब्रश हिरव्या रंगात बुडाला. आणि त्या तिन्ही झाडांच्या पानामागून तो ब्रश इतक्या लगबगीने फिरला की क्षणापूर्वी शांत उभ्या असलेल्या त्या झाडांच्या पानांचे नर्तन सुरू झाले. पानन् पान थरथरल्यासारखे दिसू लागले.

"देशपांडेजी-"

"काय-"

"देखून तो - बघाना- भीषण हवा- खूप वारा सुटलाय-"

अनमित्र चित्र काढीत नव्हता तर त्या कॅनव्हासवर जो माळ दिसत होता त्यातून हिंडत होता. तिथे वारा सुटला होता आणि पाने थरथरायला लागली होती. मी अवाक् होऊन निर्मिती आणि निर्माता यांचे ते अलौकिक अद्वैत पाहात होतो. अनमित्र स्वतःच सप्तरंग आणि असंख्य आकार झाला होता. मला ज्ञानेश्वरांच्या ओळी आठवल्या -

*तैसे भोग्य आणि भोक्ता*
*दिसे आणि देखता*
*हे सरले अद्वैता*
*अस्फुटामाजी...*

अनमित्राचा हा रोजचा कार्यक्रम. उमादिदीने ह्या मुलासाठी आपल्या जीवनाची सारी चाल बदलली. क्लब्ज, पार्ट्या, षौकासाठी चालणारा प्रवास अशा वरिष्ठ वर्गाच्या सुखासीन आयुष्याला रामराम ठोकला. आता उमादिदी म्हणजे अनमित्राच्या चित्रकलेच्या साधनेतल्या फक्त साहाय्यक एवढेच जीवितकार्य मानून कमालीच्या अलिप्तपणाने जगताहेत. युधाजितबाबू हे जाहिरातीच्या व्यवसायातले गृहस्थ. ते अनमित्राची चित्रकला-प्रदर्शने, वर्तमानपत्रातले अभिप्राय वगैरेविषयी बोलतात. उमादिदी स्वतः चांगल्या विद्याविभूषित. कलेतल्या चांगल्या वाईटाची चर्चा करण्याची त्यांना बुद्धी आहे. परंतु त्यांना मात्र अनमित्राच्या चित्रांना कोण काय म्हणतो याची क्षिती नाही. स्वतःसाठी त्यांनी दिवसातला तास दीड तास राखून ठेवला आहे. तोही चिंतन-ध्यान धारणेसाठी. बाकी सारा वेळ अनमित्र - त्याचे रंग, फलक, ब्रश आणि नव्या चित्राची निर्मिती. अनमित्र रात्री तीन तीन वाजेपर्यंत जागतो. अस्वस्थ असतो. एकदा पहाटे पाच वाजेपर्यंत बिछान्याशेजारी बसूनच होता. आई म्हणत होती - "खोकाबाबू - झोपा आता." "कसा झोपू?" अनमित्र म्हणाला. "बिछान्यावरची ही परी दिसत नाही का तुला?" तिला बिचारीला झोपायला जागा नाही. माझ्या बिछान्यावर झोपली आहे. मग मी कुठे झोपू?"

आणि पुढे कित्येक दिवस अनमित्र पऱ्यांच्या दुनियेची चित्रे काढीत होता. रंगांचा दंगा असलेली ही अद्‌भुत चित्रमालिका आहे. ऋतू जरा बदलले की अनमित्राला कलकत्त्याबाहेर जायची ओढ लागते. माळावरचा पाऊस पाह्यचा असतो. मग धारानृत्याची चित्रे. त्या काही चित्रांत पर्जन्यधारा पुष्पमाला होऊन झरताहेत. काळ्या निळ्या ढगांतून सुटलेली धार काळ्याभोर केशपाशातून सुटलेल्या जाईच्या सरासारखी ओघळून येते. तुषारांचे नाना रंगी नर्तन. एखादे वेळी रात्री दोन अडीच वाजता त्याला

आकाशदर्शनाची ओढ लागते. 'मा - चल आकाश पाहू या - आज आकाश हिरवे आहे... मा या क्षणी समुद्रावर चल - लाटांच्या फेसावरचे चांदणे पाहू या-.. ' जगावेगळे हट्ट. ही आई मधुमेह, रक्तदाब यांसारख्या विकारांनी, संसारातल्या नाना आपदांनी क्षीण होत चाललेल्या शरीराची पर्वा न करता खोकाला रात्री अपरात्री तो म्हणेल तिथे घेऊन जाते. भुवनेश्वरच्या किनाऱ्यावर मध्यरात्रीच्या समुद्र-दर्शनाने 'ओ मा ऽऽ की शुंदर - दारूण शुंदर' म्हणत अनमित्र वाऱ्यासारखा समुद्राच्या दिशेला धावू लागला. त्याला पकडता पकडता उमादिदींचे प्राण कासावीस झाले. अनेक शतकांपूर्वी गौरांगप्रभू त्या सागराच्या दर्शनाने असेच वेडे झाले होते आणि अष्टांगांनी त्या सागराला आलिंगन देऊन त्यांत विरून गेले होते. तसलेच हे वेड.

"देशपांडे-जी कशाला ही नसती जोखीम देवाने माझ्या पदरात घातली मला कळत नाही. डोळ्यात तेल घालून जपावे लागते."

— आणि खरोखरच डोळ्यात तेल घालून जपावे लागते. हा रंगमत्त मुलगा केव्हा काय करील सांगता येत नाही. एकदा मनासारखा रंग जमल्यावर इतका उत्तेजित झाला की त्या उन्मादात 'की शुंदर - की शुंदर' म्हणत रंगाची वाटी तोंडाला लावून प्याला. चित्रसमाधीचा तर एवढासा भंग त्याला सहन होत नाही. त्या खोलीत एकदा कुणीतरी पाहुणे मोठ्याने बोलत अनाहूतपणे आले, अनमित्राने रंगाच्या वाट्या चारी दिशांना भिरकावल्या.

अनमित्राची प्रदर्शने भरतात. बंगाली वर्तमानपत्रांतून समीक्षेचे रकाने भरून येतात. त्याला ना खंत ना खेद. कुणी बालचित्रकार म्हणून कौतुक करतात. कुणी हतबुद्ध होतात. त्या वेळी खोका हिरवळीवर बायसिकल फिरवीत असतो. बायसिकलवरून आपल्या बागेत चकरा मारणे हा त्याचा आवडता खेळ. त्याच्याहून एक धाकटा भाऊ आहे. बबलू. वय वर्षे आठ किंवा नऊ. त्याने आपण नक्षलवादी आहो असे जाहीर करून टाकले आहे. गल्लीतल्या दरिद्रातल्या दरिद्री पोरांची टीम जमवून त्यांचा खेळ चालतो. अनमित्र मात्र शांतपणाने सायकलवरून त्या विस्तीर्ण हिरवळीवर रिंगण काढीत असतो.

अनमित्राला मी एका नाटकाला घेऊन गेलो. उमादिदी आणि युधाजितबाबूही बरोबर होते. 'मुक्तांगण' ह्या पत्र्याच्या आडोशात उभ्या असलेल्या थिएटरात 'चतुरंग'चे 'आवर्त' नाटक होते. चक्रवर्ती कुटुंब हे मुंबईच्या मलबार हिल छाप संस्कृतीतले असल्यामुळे त्यांचाही मुक्तांगणसारख्या बंडखोरांच्या थिएटरात जाण्याचा पहिलाच प्रसंग. सलील

आणि मी दोघेही मिळून ह्या कुटुंबाची इस्त्री पार मोडून टाकली. वास्तविक युधाजितबाबू स्वातंत्र्याच्या चळवळीत शिक्षा भोगलेले. सुभाषबाबूंच्या नेतृत्वाने तरुणपणी प्रभावित होऊन राजकीय आंदोलनात पोलिसांच्या लाथाबुक्क्या खाल्लेले. पण गाडीने निराळे वळण घेतले. 'इंग बंग' संस्कृतीत मिसळले. 'शुमा' तर आपल्याकडच्या कॉन्व्हेन्टमधल्या मराठी मुली जशा कॉलेजात गेल्या तरी 'ममी हू वॉज धीस सॅने गुरुज्यी ?' असे विचारतात तशाच प्रकारच्या वळणातली - पण हाडाची सालस. ह्या सगळ्यांना घेऊन 'आवर्त' नाटक दाखवायचे म्हणजे सतत 'ताज'मध्ये जेवणारांना श्री दुर्गाभवानी मटण प्लेट हाउसमधली डोळ्यांतले अश्रुपिंड रिकामे करणारी मुरगी घालण्यासारखे होते. खेड्यातल्या उपासमारीला कंटाळून शहरात रोजगारीला जाणारा आणि तिथे टाळेबंदी झाल्यामुळे परतणारा एक शेतकरी आणि हट्टाने खेड्यात राहून शेत पिकवल्यावर ते जोतेदाराने पोलिसांशी संगनमत करून घशात टाकल्यावर गाडगीमडकी घेऊन शहराकडे निघणारा त्याचा भाऊ यांच्या जीवनातल्या ह्या दुर्भागी आवर्ताचे ते प्रभावी नाटक ! - शेवटल्या अंकात हतबुद्ध झालेले शेतकरी प्रेक्षकांत घुसतात, आणि विचारू लागतात, "तुम्ही सांगा - तुम्ही सांगा - आम्ही कुठे जायचे ? - तुम्ही सांगा -" त्या विलक्षण शेवटाने माझ्यादेखील अंगावर काटा आला - अनमित्र ते नाटक पाहाताना अस्वस्थ होता. मी त्यांच्या प्रतिक्रिया पाहात होतो. घरी आल्यावर त्याला विचारले,

"खोका नाटक कसे वाटले ?"

"मला पुन्हा पाह्यचंय्-"

"का ?"

"त्यांनी कुठे जायचे ते मी सांगीन त्यांना-"

"काय सांगशील ?" आई म्हणाली.

"मला पुन्हा पाहू दे- पण मला सांगितले पाहिजे त्यांना -" खोका म्हणत होता. मी मनात म्हटले, मुला, कलावंताचे कोणी ऐकत नाही !

त्यानंतर दुसऱ्या एका ऐतिहासिक नाटकाला मी त्यांना घेऊन गेलो. धंदेवाईक कंपनीचे नाटक. ह्या नाटकात मात्र अनमित्र अजिबात रमला नाही. मुख्य म्हणजे सेटिंग इतके भडक होते की अनमित्र म्हणायला लागला -

"मा, असले घाणेरडे रंग का ओतले आहेत ?" त्याने घरी जाण्याचा आग्रह धरला. त्याहूनही त्या नाटकातले अभिनयाचे आणि नाट्याचे रंग इतके गडद होते की मलाही त्या नाटकातून पळ काढवासा वाटला.

चित्रकलेशिवाय दुसऱ्या कशातही फारसा न रमणारा अनमित्र चित्रे पाहण्यातही रमलेला मला आढळला नाही. वाटेत इतकी पोस्टर्स होती पण तिकडेही त्याचे लक्ष नसे.

मध्येच मात्र एका ठिकाणी सुभाषचंद्र बोसांचे लष्करी वेषातले भले मोठे पोस्टर होतं. तिकडे पाहून अनमित्र हळूच हसला. उमादिदीने विचारले, "काय झालं रे खोका ?"

"कपड्यांचा हिरवा रंग बघ किती घाणेरडा-"

खरोखरीच सुभाषबाबूंच्या अंगावर चढवलेला हिरव्या रंगाचा गणवेश पाहवत नव्हता. एकतर सैनिकी वेषातल्या सुभाषबाबूंची चित्रे काढणाऱ्या सगळ्या चित्रकारांचे हात ब्यांडवाल्यांची चित्रे काढून काढून घटवलेले का असतात हे एक मला कोडे आहे. निसर्गातला हिरवा रंग डोळ्यांनी पिणाऱ्या अनमित्राची हिरव्या रंगाच्या अनेक छटांशी मैत्री आहे. असला हा बेचव, प्राणहीन हिरवा रंग पाहून शूराचा आव आणणारा हा कोणीतरी शेंदाड शिपाई उभा केला आहे असे त्याला वाटले असेल. सुभाषबाबूंची मला कीव आली. थोरामोठ्यांचे हाल काही केवळ कवीच करतात असे नाही. चित्रकार आणि शिल्पकारही काही कमी नाहीत. गोणपाटाच्या पिशवीवरचे ते सुभाषबाबूंचे चित्र काढणारा चित्रकार जर मला कधी भेटला तर त्या पिशवीत त्याचे डोके कोंबून एखादेवेळी मी त्याचा प्राण घेईन. इतके हिंस्त्र विचार मला क्वचितच येतात.

नाटक पाहून आम्ही रात्री घरी परतलो. अनमित्र सारखा आईच्या मागे टुमणे धरून होता त्या शेतकऱ्यांच्या नाटकाला परत जाऊ या. शेवटी मी त्या नाटकात काम करणाऱ्या नटांना घरी बोलावले. बरूण दासगुप्ता, मिहिर चतर्जी आणि इतर नटांना पाहून खोका खूष ! विशेषतः त्या नाटकातली प्रमुख भूमिका केलेल्या मिहिरवर. मग यापूर्वी न केलेली एक गोष्ट त्याने केली. त्यांना ओढून घेऊन वरच्या मजल्यावर गेला आणि आपले प्रत्येक चित्र त्यांना दाखवले. त्यांचे नाटक जसे त्याला आवडले होते तशी त्याची चित्रेही त्यांना आवडतील याची त्याला खात्री होती. मग माझ्या लक्षात आले की आईशिवाय इतर कुणालाही आपल्या खोलीत न येऊ देणाऱ्या अनमित्राने मला का बोलावून नेले.

आदल्या रात्री युधाजितबाबूंनी गाण्या-बजावण्याचा षौक असलेल्या मित्रांना भोजनाचे निमंत्रण दिले होते. त्यात एक दोन हौशी गाणारे स्त्री-पुरुषही होते. मग मलाही गाणे म्हणण्याचा आग्रह झाला. मराठी गाण्याची जरा नवलाई होती. त्यामुळे 'आणखी म्हणा, आणखी म्हणा' चालले होते. तबलजी चांगला होता. पेटीही वाजवली. समोर अनमित्र प्रमुख श्रोता होऊन बसला होता. आणि गाणे संपल्यावर मला म्हणाला -

"देशपांडेजी . . आय् लाइक - युवर साँग." म्हणून मग त्याच्या चित्रनिर्मितीच्या गाभाऱ्यातले आमंत्रण ही परतफेड होती. इतर माणसांहून नाटकात काम करणारी -

गाणारी - वाजवणारी ह्यांच्यात आणि आपल्यात कसले तरी निराळे नाते आहे असे त्याला वाटत होते.

निघायच्या दिवशी अनमित्र माझ्याजवळ आला आणि म्हणाला,

"देशपांडेजी - एक गाणं म्हणाल ?"

मी म्हटले, "खोका, तुझ्या मा-ने मला इतके जेवायला घातले आहे की पोट तुडुंब भरले आहे माझे. पोट भरलेले असले म्हणजे गाता येत नाही." खरे म्हणजे 'एक गाणे म्हणाल ?' हा प्रश्न त्याने इतक्या आर्जवाने विचारला होता की त्यामुळे माझा गळा भरून आला होता. भरल्या पोटाने एकवेळ गाता येईल पण भरल्या गळ्याने कसे गायचे ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र.
संदर्भ शाखा (एकल प्रत)





कलकत्त्यात माणसे घोंघावत असतात. गर्दी नाही असे ठिकाण नाही. त्यामुळे कालीच्या देवळात गेले की बोकडांच्या मुंड्या मुरगळणाऱ्या माणसांची भयंकर गर्दी-मैदानात पाहावे तर कम्युनिस्टांच्या प्रचारसभेची गर्दी-बेलूर मठात रामकृष्णांच्या भक्तांची गर्दी - फुटबॉल मैदानावर बघ्यांची गर्दी - श्रीमंतांचे क्लब्ज भरलेले - नाइट क्लब्ज जॅम् सेशन्स तुफान - गटारे फुटून वाहांवी तसे भणंगांचे मोर्चे फुटून वाहातात - त्यांना छेद देऊन दागिन्यांनी लदलेल्या मारवाडी बायांची लग्नाची मिरवणूक जाते.

मी तर कलकत्ता म्हटले की सुन्नच होतो. काही लोक ह्याला चैतन्य म्हणतात. मला तर त्या शहराला तापात होतो तसा वात झाल्यासारखे वाटते. कोणीतरी कोणावर तरी खवळूनच उठलेला असतो. एकतर ह्या भाषेलाच अतिशयोक्तीचा षौक फार! मराठी लोक जितके शब्दांबाबत कंजूष तितके हे बंगाली उधळे, हे ठायी ठायी पटत होते. प्रत्यक्षात काय वाटेल ते घडो. त्याच्या रिपोर्टिंगमध्ये सनसनाटी हवी.. 'सारा मोहल्ला भस्मसात' म्हणजे एखाद्या घराच्या दोन खिडक्यांना आग! मोर्च्यातून घोषणा देत जाणारे

मी मुंबई-पुण्यात बरेच लोक पाहिले आहेत. पण बंगाली मोर्च्यात लोक अंगात आल्यासारख्या घोषणा देत असतात. आपली 'झालाच पाहिजे' ची घोषणा देखील बंगाल्यांच्या 'चोलबेना - चोलबेना' पुढे भलतीच लडिवाळ वाटेल. कलकत्त्यातल्या प्रेत-यात्रेतले 'हरि बोल' (उच्चार 'होडी-बोल') देखील 'राम बोलो' पेक्षा, खूपच जिवंत. प्रेतयात्रासुद्धा आवेशात जात असतात.

एकूणच कशाचा तरी निषेध केल्याशिवाय बंगाली माणसाला त्याचा रसगुल्ला गोड लागत नसावा. सानुनासिक स्वरात कुजकट शेऱ्याची पिंक थुंकण्यात जसा कोकणी बाणा दिसतो, तसा बंगाली बाणा निषेधात ! कलकत्ता शहर कढईतल्या रश्श्यासारखे नुसते रटरटत असते. पण बोलण्यात फुटाण्यासारखा उडणारा बंगाली गाताना मात्र एकदम नरमपंथी. कधी चांगली सट्टेदार तान हाणणार नाही की तालाशी आट्यापाट्या खेळणार नाही. तिथे सर्व व्यापार उधारीत केल्यासारखा बुबळे भिवयांपर्यंत नेऊन गातो ! पण समुदायात मात्र जोरदार. कोरस गायला लागले की, दात, ओठ, मुठी आवळून गातो. पण 'शूरा मी वंदिले' ठणकावणारा कोणी नाही. त्यामुळे खुद्द टागोरांनी अभिजात संगीत शिकवायला महाराष्ट्रातून भीमराव शास्त्री यांना नेले होते. जवळ जवळ तीस वर्षे ते शांतिनिकेतनात होते. त्यांच्यानंतर गेली तीस वर्षे नागपूरचे वझलवारजी शिकवताहेत ! मात्र चित्रकलेत बंगाली चित्रकार सतत नव्या प्रयोगात दंग असतात. नव्या वाटा शोधत असतात. तीच गोष्ट साहित्यातही. बंगाली नाटकांचे मात्र ठळक दोन प्रवाह. एक म्हणजे अश्रुपाताने वाहून जाणारे धंदेवाईक नाटक आणि दुसरे विचारांना झिणझिण्या आणणारे प्रयोगशील नाटक. अर्थात् प्रचंड गर्दी अश्रुपाताकडे ! पण कथा कादंबऱ्यांतली विषयांची विविधता अचाट !

पूर्वीचे श्रद्धाळू लोक जसे गावातले मारुती करीत निघत, तसे आम्ही, कलकत्त्यातले साहित्यिक करावे म्हणून निघालो. अनियतकालिके आणि मिनि-मासिकांची लाट मला वाटते आपल्याकडे बंगालकडूनच आली. तशी आपल्या आधुनिक साहित्यातल्या प्रत्येक चळवळीची सुरुवात बंगालकडूनच झाली आहे.

सलीलला कुणीतरी सांगितले होते की, नव्या साहित्यिकांचा अड्डा खलासी तोल्यातल्या भाटीखान्यात - म्हणजे एका देशी दारूच्या पिठ्यात असतो. आम्ही त्या भाटीखान्याच्या शोधात निघालो. मुंबईतल्या गोलपिठ्यासारख्या दिसणाऱ्या वस्तीच्या आसपासच हा भाटीखाना आहे. एका हमरस्त्याला टांग मारून जाणाऱ्या बोळकंडीतून आम्ही आत गेलो. त्या भाटीखान्याचे प्रथमदर्शन मी जन्मात विसरणार नाही. एका इमारतीलगतच्या मोकळ्या जागेत एक भला मोठा मांडव घातला होता. त्याला चारी बाजूंनी पत्र्यांचा आडोसा. पत्र्यांना भेसूर पांढराफटक चुना फासलेला. इमारतीच्या

तळमजल्यावर तो पिठा. तिथे एका लांबरुंद ओट्यावर देशी दारूची भली मोठी पिंपे हारीने मांडलेली. मोठा काऊंटर होता. त्यामागे एका लांबरुंद कपाटात चुन्याच्या निवळीच्या रंगाच्या देशी दारूने भरलेल्या बाटल्या होत्या. तिथला तो सगळा चुनेरी पांढरेपण प्रेतवस्त्रासारखा कोरा आणि अभद्र वाटत होता. पाच-पन्नास टेबले मांडली होती. आणि रिक्षावाल्यांपासून ते सुटाबुटातल्या बाबूपर्यंत बंगाली भद्र आणि दळभद्र लोक तिथे दारू पिऊन भकत होते, ओकत होते. कुणी झुकांड्या देत मयखान्याबाहेर पडत होते. कुणी अकारण चिडत होते. कुणी कसल्या तरी महान् चिंतेने व्याकुळ होऊन मान झुकवून पडले होते.

'बार' ही गोष्ट मला अपरिचित नाही; पण त्या भाटीखान्यात मी जे साक्षात् दुर्भाग्य पाहिले ते पुन्हा पाहायची माझी इच्छा नाही. तिथल्या दुर्गंधीने उलटी होण्याऐवजी, तिथल्या त्या दारूने उद्ध्वस्त झालेल्या माणसांचे कळाहीन चेहरे पाहून मला घेरी येते की काय, असे वाटू लागले. तिथे चांगली पिकलेल्या वयाची माणसे होती. तरुण कोवळी पोरे होती. जीवनातले नैराश्य ही एक दारू पिण्यासाठी वापरण्यात येणारी सोयीस्कर सबब आहे. नव्या पिढीला नैराश्याने ग्रासल्यामुळे नव साहित्यात 'सालं काही खरं नाही' ह्या चालीवरची गाणी. '- आपली दुःखे समजण्याची जुन्या पिढीला अक्कल नाही - सगळा भांचोद चोरांचा कारभार - प्रस्थापितांची हरामखोरी-' हा संतप्त पिढीचा दावा. जुनी पिढी ह्या पिढीची प्रतिवादी मग त्या पिढीतलेही साहित्यिक भाटीखान्यात कुठली दुःखे बुडवायला येत होते ते कळेना. तरुणांचे पिणे ही प्रस्थापिताविरुद्धच्या बंडाचे प्रतीक, मग ते म्हातारेही पीत होते ते कशाचे प्रतीक ? की तरुण पीत असला तर बंड आणि बुड्ढा पीत असला तर प्रस्थापित, असे काही उलटे गणित आहे ? एकतर प्रेमभंगाचे असो, नाहीतर आणखी कसले असो, दुःख, निराशा वगैरे बुडवायला दारू पिणे हा दारूचा अपमान आहे. शराबीचा मझा घेणे ह्या कंबख्तांना ठाऊक नसावे, किंवा दारूशी निगडित असलेल्या सामाजिक लांछनांची कुठेतरी पोटात बुकबुक असल्यामुळे निराशा, फ्रस्ट्रेशन वगैरे समर्थन असावे.

विशेषतः बंगाली साहित्यात प्रेमभंगानंतरच्या दारू पिण्याचे जरा अधिकच कौतिक झाले आहे. मराठी नायक त्या मानाने दणकट. एकतर मराठी कादंबऱ्या, नाटकांत प्रेमभंग वगैरे माफक. बहुतेकांची शेवटल्या पानावर लग्नेच लावून दिली आहेत. त्यामुळे मुळात जो दर्दच नाही, त्याची दवा हवीच कशाला ? पण बंगाली नायक देवदासचाच सख्खा किंवा चुलत भाऊ. काही का असेना, पण त्या भाटीखान्याच्या नरकात साहित्यिकांना जीवनातली कुठली सत्यं सापडत होती ते तेच जाणे. माझा दारू पिण्याला विरोध नाही. दारूच काय, एखाद्याला रोज सकाळी पावशेर डांबर उकळून प्यावे असे वाटले तरी त्याने

प्यावे. परंतु पिण्याचे तत्त्वज्ञान करण्याला माझा विरोध आहे. स्वतःच्या आयुष्याचा जो काही खेळ करायचा असेल, तो ज्याने त्याने इतरांना उपद्रव न होता अवश्य करावा. उगीचच समाजाबिमाजाला शिव्या देण्याचे कारण नाही. दारू पिऊन निरर्गल बडबडणारा, झोकांड्या खात, शिव्यागाळी करत, ओकत किंवा गटारात लोळत पडणारा माणूस दारू नावाच्या अमली पदार्थाने त्याच्या मेंदूचा ताबा घेतल्याने तसा वागतो आणि 'मद्या'त सवय करणारी द्रव्ये असतात ह्या वैज्ञानिक नियमाखेरीज इथे कसलेही तत्त्वज्ञान नाही. दारू पिण्याचे एकच कारण असू शकते - दारू प्याल्याखेरीज चैन पडत नाही हे! त्यामुळे त्या भाटीखान्यात येणारे साहित्यिक आणि इतर ह्यांत कसलाच फरक नव्हता. दारू नामक पेयाला आपणाला साहित्यिकाच्या पोटात थारा मिळतोय की रिक्षावाल्याच्या पोटात याची पर्वा नसते. ते पेय बिचारे मेंदूवर आघात करणे, लिव्हर बिघडवणे वगैरे निसर्गाने आखून दिलेले काम करीत असते. साहित्यिक रोज भाटीखान्यात जातो की दुग्धमंदिरात याला कलेच्या हिशोबात काहीही अर्थ नाही. त्याची साहित्यनिर्मिती कशी आहे, हाच महत्त्वाचा आणि इतरांच्या विचाराला आवश्यक असलेला मुद्दा! त्या भाटीखान्यात ज्याच्याशी जाऊन बोलावे अशा अवस्थेत असलेला मला कुणीच सापडला नाही. तिथली दारू तर जाऊ द्या, पण नुसता सोडा प्यावा असे सुद्धा वाटेना. संडासात बसून भजी खाणे म्हणजे नीटपणे पाटावर बसून जेवणाऱ्या प्रस्थापितांना धक्के देणे, असे ज्यांना वाटत असेल त्यांनी अवश्य तो षौक फर्मावावा! पुष्कळदा 'सिनिसिझम्' हा कुणाच्या तरी जिवावर फुकट गिळायला मिळणाऱ्या लोकांचा धूर्त षौक असतो. स्वतःला आपणच बृहस्पती मानायचे आणि समाज आपल्याला बृहस्पती मानत नाही म्हणून वैतागायचे!

भाटीखान्याच्या त्या वैतागवाडीतून केव्हा एकदा बाहेर पडू असे झाले. तिथे त्या पार 'लास्' झालेल्या साहित्यिकारांबरोबर दोन शब्दही बोलणे अशक्य होते आणि नाकात शिरलेल्या घाणीने डोके उठले होते. सलील मात्र गोऱ्या कुम्भाराने थापटणी मारून संतांची डोकी तपासून पाहिली होती तसा मोठ्या जिद्दीने शुद्धीतला साहित्यिक शोधीत होता - पण तिथले चष्मेवाले सर्व बाबू आऊट होते. बाकीचे काही रिक्षावाले, मजूर आणि गुंडांसारखे दिसणारे लोक मात्र 'टाइट्' होते, पण ढेपाळले नव्हते. कारण त्यांच्या पिण्याला कारण नव्हते, मनात पाप नव्हते, भय नव्हते. त्यांची चर्चा नव्या काव्याची दिशा आणि अमक्याच्या कादंबरीतला अँटी-हीरो वगैरे विषयी नव्हती. ते फक्त उरलेल्या पैशात कुठली बाई परवडेल याचीच फार तर चिंता करीत असतील! ह्या नकली अँटी-हीरोंना मात्र दारूनेच पिऊन टाकले होते. सलीलला तिथे शाबूत अवस्थेतला कुणीच साहित्यिक आढळेना आणि मी देखील सावरकरांच्या थाटात 'आलात तर तुमच्यासह-नाही आलात

तर तुमच्याशिवाय-पण हा मी निघालो' म्हणून त्या भाटीखान्यातून बाहेर पडलो. असल्या दारूने लास झालेल्या साहित्यिकांची त्यांच्याच लाडक्या शब्दांत सांगायचे म्हणजे 'साहित्यिक भंकस' ऐकण्याऐवजी रस्त्यातली एखादी जोरदार दगडफेक - मारामारी वगैरे पाहणे बरे!

त्या भाटीखान्यातून निघाल्यावर आम्ही कलकत्त्याच्या एका दुसऱ्या दंगा केन्द्राकडे मोर्चा वळवला. कलकत्त्यात होणाऱ्या दंग्यांत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला आहे. मी कलकत्त्यात असताना कलकत्ता विद्यापिठाने अशाच काही कारणांमुळे टाळेबंदी जाहीर केली होती. विद्यार्थ्यांनी कितीही दंगल केली तरी पोलिसांना विद्यापीठाच्या आवारात शिरू द्यायचे नाही, असा भारतातील सर्व कुलगुरूंनी म्हणे निर्णय घेतला आहे. असल्या दंग्याधोप्यापासून ज्याने त्याने स्वतःचे संरक्षण करून घ्यायचे आहे. विद्यार्थी याचा अर्थ 'शिकू इच्छिणारा' आणि अध्यापक याचा अर्थ 'शिकवू इच्छिणारा' असे समजणाऱ्या बुरसटलेल्या विचारांच्या माणसाने स्वतःचा जीव धोक्यात घालून उगीच त्या भागातून हिंडू नये. शिकणे आणि शिकवणे ह्या दोहोंतही काही अर्थ नाही, अशी उभयपक्षीय तडजोड झाली आहे. मी कलकत्त्यात जायच्या आठ-दहा दिवस आधी काही विद्यार्थी त्यांच्या प्राचार्यांच्या खोलीत घुसले. फर्निचर आणि प्राचार्य यांची यथेच्छ मोडतोड केली. भिंतीवरच्या गांधींची उचलबांगडी करून त्यांना पायाखाली तुडवले (पायात काचा घुसून रक्त आल्यावर 'हा पाहा गांधींच्या हिंसात्मक विचारांचा पुरावा' म्हणून रक्तबंबाळ पाय दाखवीत हिंडले की नाही, मला ठाऊक नाही!). मग भिंतीवर पुण्यश्लोक माओचा फोटो लावला. चोहोकडे त्याची वचने लिहिली. प्राचार्यांना सक्तीने ती मोठ्याने वाचायला लावली. कदाचित् वाचन नीट न केल्यामुळे 'हात पुढे कर' म्हणून छड्याही मारल्या असतील. त्यानंतर त्या आवारात ॲसिड बल्बज्, लाठ्या आणि तलवारी, हो, चक्क तलवारी!) वगैरे घेऊन विद्यार्थ्यांच्या निरनिराळ्या गटांची मारामारी झाली. तोपर्यंत दुपार झाली असावी. म्हणजे भात खाणे आले आणि भात पोटात गेला की, 'घूम' आलीच. असल्या ह्या भीषण मारामारीप्रीत्यर्थ कॉलेजे अनिश्चित काल बंद ठेवली होती. ह्यांत मार्क्सिस्ट कम्युनिस्ट किती, सी.पी.आय. किती, नक्षलवादी किती, नुसतेच निर्भेळ गुंड किती हे सांगणे कुणालाही शक्य आहे असे मला वाटत नाही. ह्या विषयावर जितक्या म्हणून लोकांशी मी बोलायचा प्रयत्न केला त्यांपैकी एकालाही त्याचा अन्वयार्थ सांगता आलेला नाही.

मी त्या विश्वविद्यालयाच्या परिसरातून हिंडायला लागलो. विद्यार्थ्यांचे थवेच्या थवे दिसत होते. त्यातले कोणीही मला संतप्त दिसत नव्हते. थट्टा-विनोद चालला होता. फुटपाथवर जुनी पुस्तके विकणारे पुस्तकविक्रेते होते. त्या एकाच विभागात किती तरी बुक

डेपो आहेत. (मुंबईत वस्तीच्या मानाने सगळ्यात कमी दुकाने पुस्तकविक्रीची !) विद्यार्थी फुटपाथवर मांडलेली पुस्तके चाळीत होते. सर्वसामान्य तरुण विद्यार्थी, हल्ली सगळीकडेच विद्यार्थी जसे दाढ्या-केस वगैरे वाढवतात, तसे होते. बरेचसे धोतर-पंजाबी ह्याच बंगाली वेषात होते. काही तंग तुमानवालेही होते. दिलीपकुमार होते, राजेश खन्ना होते. पुण्या-मुंबईसारख्या सलवार-खमीजवाल्या मुली होत्या. पण साड्या नेसलेल्याच अधिक. लाजऱ्या-बुजऱ्याच जास्ती. चेहऱ्यावर सगळ्या जगाची काळजी बाळगणाऱ्या चष्मेवाल्या स्कॉलर पोरींपासून ते '-आपण कुणाचे काही देणे लागत नाही-' हा भाव घेऊन तोऱ्यात जाणाऱ्या रूपगर्वितांपर्यंत सगळे नमुने होते. ह्यांतले कुणीही ॲसिड बल्ब फेकायला किंवा बस जाळायला निघाल्यासारखे दिसत नव्हते. अभ्यास देखील करीत असतील अशी शंकाही मला आली.

तिथून मग आम्ही एका मोठ्या कॉफी हाउसमध्ये शिरलो. भयंकर गोंगाट चालला होता. पूर्वी मुंबईला फ्लोरा फाउंटनपाशी असे एक कॉफी हाउस असे. तिथे 'इंटलेक्चुअल्स' जमत. किंवा तिथे जमून एक कप कॉफीत तीन तास बडबड करणाऱ्यांना 'इंटलेक्चुअल्स' म्हणत. ह्या कॉफी हाउसमध्येही नेमका तसाच गोंगाट चालला होता. पोरांचे घोळके टेबलाभोवती जमून जोरजोरात चर्चा करीत होते. पण भाटीखान्यापेक्षा मला इथे खूप बरे वाटले. कारण गोंगाटाच्या जोडीला घाण नव्हती. एवढेच नव्हे तर, त्या गोंगाटाला चैतन्याचा तजेला होता. मद्यालयातली मरगळ नव्हती. कॉफी, दॉसेई, वडेई आणि म्हैसूरी अगरबत्त्या ह्यांचा संमिश्र सुगंध होता. खुद्द कलकत्त्यातल्या बंगालीबाबूंना आणि त्या बाबूंच्या छोट्या बाबूंना इडली-दोशा खायला घालणारा उडपी हा खरा बहाद्दर ! त्या हॉटेलच्या कोपऱ्यात काही मोडक्या खुर्च्या आणि टेबले पडली होती. दोन-चार दिवसांपूर्वी विद्यार्थ्यांच्या दोन विरोधी गटांच्या तिथे 'इंडोअर मॅचेस' झाल्याचे कळले. एकमेकांवर खुर्च्या-कपबशा वगैरे फेकून मारामारी झाली होती म्हणे. हा सामना हुकल्याबद्दल सलीलला माफ़क दुःख झाले. त्याने मारामारीचे कारण शोधायचा प्रयत्न केला. वेटरकडून 'साला लडकी लोगका लफडा होगा' ह्या उत्तरामुळे तो निराश झाला. मला विद्यार्थ्यांच्याच काय, कुणाच्याच अशांततेची कारणे शोधायची नसतात; ती सापडत नाहीत. जर्मनीला एकाएकी अशान्त होऊन जग उद्ध्वस्त करायचे डोहाळे का लागले होते ? भाई-भाई वाल्या माओला भाऊबंदकी सुरू करायला कुठली अशांतता कारण होती ?

- माझ्या पोटात आपला साधा प्रश्न. अगदी मध्यमवर्गीय. तासन् तास इथे कॉफीचे गेले रिचवीत आणि वडे पचवीत बसलेल्या ह्या विद्यार्थ्यांना बिले चुकती करायला पैसे

कुठून मिळतात ? आणि मग एक तारखेकडे डोळे लावून खर्डेघाशी करणारा बाप, पोरगा शिकून म्हातारपणी आपली काळजी वाहील ह्या आशेने राबणारी आई, हुंडा न देता आल्यामुळे लग्नाची राहिलेली आणि कुठेतरी मास्तरणीची नोकरी करून विधवेचे जीवन जगत सक्तीने कुमारिका राहिलेली बहीण... असली चित्रे माझ्या डोळ्यापुढे नाचायला लागली आणि मी त्या विद्यार्थ्यांच्या कॉफीखान्यातून निघालो. जगातल्या श्रमिकांना एक व्हायला सांगणाऱ्या ह्या क्रांतिकारकांना, सकाळपासून रात्रीपर्यंत राबणारी 'आई' नावाची 'गुलाम' कशी दिसत नाही ? रेशनचे तांदूळ म्हणतात तो कचरा निवडून निवडून डोळे फुटंत आलेली ती घरातली सत्तेची गुलाम. घरातल्या त्या मजुरांना कौटुंबिक काबाडकष्टांतून आहेत का काही सुट्ट्या ? वैफल्याच्या आणि वैतागाच्या कविता खरडणाऱ्या आणि अनियतकालिकांतून वाटेल त्यांना बेजबाबदार शिव्या देणाऱ्या तापसी 'आयत्यां'ना उद्या जर त्यांच्या आयांनी मूठभर डाळतांदळाचा शिधा देऊन 'शिजव आणि खा रांडेच्या' म्हणून आयते गिळायला घालायचे नाकारले तर बराचसा राजकीय आणि साहित्यिक बकवास कमी होईल असे मला वाटते ! शोषण काय मजूर-मालक संबंधातच आहे ? अपत्य-प्रेमाचा दुबळेपणा साधून ही चांगली ताडमाड वाढलेली बाबू लोकांची मुले स्वतःच्या आईबापांचेच शोषण करीत होती. मालकाच्या अन्यायाविरुद्ध रस्त्यांतून आरडाओरडा करणारे कामगार स्वतःच्या बायकांना लाथा घालताना काय कोणी पाहिले नाहीत ? हिंदू, मुसलमान, जैन, ख्रिश्चन, कॉंग्रेसवाले, बिगर कॉंग्रेसवाले, सगळ्यांच्या घरांतली भारतीय स्त्री ही कुठल्याही कारखान्यातल्या मजुरापेक्षा अधिक शोषित आहे. उगीचच अपवादासाठी चार वर्तमानपत्री मथळ्यात येणाऱ्या बायका वगळल्या तर स्त्रिया आणि पूर्वास्पृश्य ह्यांना ह्या देशात भोगाव्या लागणाऱ्या भोगाकडे पाहिले की 'माणूस' म्हणून घ्यायला शरम वाटते. उद्या त्या अस्पृश्य मानलेल्या लोकांनी आम्हाला रस्त्यात धरून बडवायला सुरुवात केली तरी, त्यांच्यावर हात उगारायचा आम्हांला हक्क नाही. आणि हे कॉफी हाउसमध्ये तासन्‌तास खातपीत बसणारे विद्यार्थी केवळ समुदायाच्या शक्तीची ताकद आहे म्हणून आपल्या चर्चेचे पर्यवसान तिसऱ्याच एका हॉटेलवाल्याच्या कपबशा आणि फर्निचर मोडून करतात !

असल्या दंगेखोरांची संख्या फार नसते. नवीन प्रोफेसर आल्यावर स्टॅम्पिंग करून त्याला वैताग दिला नाही तर आपल्याला बावळट म्हणतील ह्या भीतीने नव्याने कॉलेजात गेलेले विद्यार्थी आपला 'स्मार्टनेस' सिद्ध करायला बाके बडवतात. मोर्च्यात सामील होण्यातही बहुतांशी असाच प्रकार असतो. एका विद्यार्थिनीने मला सांगितले की, मोर्च्यात आला नाहीत तर तोंडावर ॲसिड बल्ब फेकू, अशी आम्हाला धमकी असते. त्याच

सुमाराला वर्तमानपत्रात एका आईचे पत्र प्रसिद्ध झाले होते. तिचा मुलगा मेडिकल कॉलेजात शिकत होता. अभ्यासात हुषार, आर्थिक परिस्थती गरीब, त्यामुळे आपल्या अभ्यासाविषयी दक्ष. क्रांतिकारक (?) मुलांनी त्याला आपल्या दंग्यात सहभागी व्हायची जबरदस्ती सुरू केली. त्याने 'मला ह्यात गुंतवू नका' असे परोपरीने सांगितले. तो वळत नाही म्हणून त्याचे हातपाय तोडून त्याला पंगू केले गेले. त्या आईचा हंबरडा त्या पत्रातून ऐकू येत होता. मला मी विद्यार्थी असताना होणाऱ्या गांधीजींच्या चळवळी आठवल्या. शाळेत कधी-कधी हरताळ असायचा. त्या वेळी वर्गात नादार किंवा वारावर जेवणारी गरीब मुले असायची. हरताळात भाग घेतला तर नादारी जायची भीती. रडत रडत जाऊन वर्गात बसत. त्यांची चेष्टा करणाऱ्या मुलांना इतरांकडून दम बसायचा. त्यांना कुणी बांगड्यांचा अहेर केला नाही. त्यांच्या अश्रूंतून त्यांची देशभक्ती दिसायची आणि असहायताही. आता जमाना बदलला. आज पक्षातल्या कार्यकर्त्यांचे खून झाल्यावर कुणाची प्रेतयात्रा अधिक मोठी निघते यावरून पक्षाची 'पॉवर' सिद्ध होते.

कलकत्त्याला कोणी कोणी बुडणारे जहाज म्हणतात. काहींना कलकत्त्याच्या ह्या दंग्यांत जीवंतपणा दिसतो. महाराष्ट्रातले विद्यार्थी थंड आहेत असाही त्यांच्यावर आरोप केला जातो. पण थंडपणा आणि भडकपणा - जगण्याच्या ह्या काय दोनच तऱ्हा आहेत ? नुसते 'होय-बा' असू नये म्हणून नुसते 'नाय-बा'च असायला हवे ? प्रस्थापितांना उखडून काढण्याची भाषा बोलणारे काही क्रांतिकारक माझ्याही ओळखीचे आहेत. झोपडपट्टीवाल्यांचा कैवार म्हणजे चार भिंतींच्या घरात राहणाऱ्यांना शिव्या असा त्यांचा सोपा समाजवाद आहे. पण मग हे तरुण त्यांच्या आवडत्या झोपडपट्टीतल्या एखाद्या दरिद्री बापाची काळजी मिटवण्याऐवजी प्रत्यक्षात चांगल्या गोऱ्यापान, सुशिक्षित, सुखवस्तू पोरी शोधूनच प्रेमविवाह करते जाहले आहेत. आता गोऱ्या गालाचा मुका घेतल्यावर येणाऱ्या लालीत क्रांतीची प्रसादचिन्हे काळ्या गालापेक्षा अधिक सुस्पष्ट दिसत असतील कदाचित् !

आपल्या देशात विषमता नाही कशात ? उक्ती आणि कृतीत सगळ्यात जास्त ! माझ्या ओळखीत सत्यनारायणवाले समाजवादी आहेत, ताईतवाले कम्युनिस्ट आहेत, सत्यसाईबाबावाले वैज्ञानिक आहेत ! दारिद्र्याइतकाच श्रीमंतीचाही उद्वेग आणणारा देखावा इथे दिसतो. कलकत्त्यात मुळी पूर्व पाकिस्तानातून उद्ध्वस्त झालेल्या लाखो लोकांची भरती झाली आहे. शहरातली श्रीमंती मारवाड्यांच्या हाती. बंगाली बाबूंना व्यापाराची अक्कल मराठी माणसांइतकीच. बहुतेक लोक बोरूबहाद्दर आणि वाचस्पती.

मजूर बहुतेक बिहारी. मुंबईपेक्षाही इथल्या श्रीमंती-गरिबीमधल्या भयाण दऱ्या डोळ्यावर अधिक जोराचा आघात करून जातात. आजही भयानक अराजकाची नांदी म्हटली जात असताना, मी कलकत्त्यातल्या धनिकांच्या आवारांत पंचपक्वान्नांच्या जेवणावळी उठताना पाहात होतो. जगात सगळीकडे श्रीमंती-गरिबी आहे. पण आपल्या देशाइतके श्रीमंतीचे निर्लज्ज प्रदर्शन इतर कुठेही नसेल. कलकत्त्यालाच हे आहे, असे नव्हे. मला आठवते आहे - कोयनेचा भूकंप झाला होता. सगळीकडे हाहाःकार उडाला होता. मुंबईतदेखील वीजकपात केली होती. त्या दिवशी देखील काहींनी सरकार-दरबारी वशिले लावून लग्नसमारंभात विद्युद्दीपांचा झगमगाट केलेला माझ्याप्रमाणे अनेकांच्या स्मरणात असेल. मुंबईला काळबादेवी किंवा गिरगाव भागातून संध्याकाळी माणसांचे जे लोंढे फुटतात त्यापेक्षा कलकत्त्याचे काही निराळे नाहीत आणि गलिच्छपणात मुंबईची धारावी काही कलकत्त्यातल्या काही वस्त्यांपेक्षा मागे नाही. जिथे पंचवीस लाखांची सोय होती तिथे जर पाऊण कोटीच्या घरात लोकवस्ती गेली तर त्या शहराचे काय व्हायचे ? सत्तापिपासू राजकारणी लोकांच्या कृपेने सारी शहरे हळूहळू कलकत्त्याच्याच वळणावर जातील. रक्तपात, डोकेफोडी वगैरे झाल्याशिवाय राज्यकर्त्यांचे लक्ष आपल्याकडे जात नाही, या सिद्धान्तावर फक्त बंगाल्यांचाच नव्हे, सगळ्याच भारतीय लोकांचा विश्वास बसायला लागला आहे.

कलकत्त्याला गेल्यावर ज्योती बसू वगैरे पुढाऱ्यांना भेटण्याची फ्याशन आहे. मी कलकत्त्याचे पदच्युत पुढारी अतुल्य घोष यांना भेटलो. सत्तेवरचा राजकीय पुढारी हा माझा आवडीचा पदार्थ नाही. ही मंडळी सदैव एका अदृश्य व्यासपीठावरून बोलतात. बहुधा आज्ञार्थी. लेखक दिसला की, लेखकाने काय लिहावे ते सांगतात. शेतकरी दिसला की, त्याने काय करावे ते सांगतात. मास्तरांना धडे देतात. डॉक्टरना डोस पाजतात. हे ठाऊक असूनही अतुल्यबाबूंना भेटलो. एक तर बंगालच्या सत्तेच्या पटावरून ते बाजूला गेलेले असल्यामुळे फार आज्ञार्थी बोलतील, अशी भीती नव्हती. सत्तेच्या खुर्चीवरून उतरलेला पुढारी कवळी काढून ठेवलेल्या माणसासारखा केविलवाणा दिसायला लागतो.

अतुल्यबाबू म्हणजे केवढे मोठे राजकीय प्रस्थ. कामराज, अतुल्यबाबू, मुरारजी, एस्.के. पाटील ह्यांनी बोलावे आणि दीनदुबळ्या भारतीयांनी ऐकावे अशी परवा-परवापर्यंत परिस्थिती होती. राजकारणातले वारे फिरले. राजकीय पटावरून ही माणसे निष्प्रभ होऊन कुठल्याकुठे फेकली गेली. पश्चिम बंगाल म्हणजे अतुल्यबाबूंच्या


पंजाबी झब्ब्याच्या खिशात! पण आज आपल्या हिंदू कॉलनीत शोभेल अशा चार खोल्यांच्या ब्लॉकवजा जागेत एका लांब रुंद पलंगावर अतुल्यबाबू एकटेच पुस्तक वाचत पडले होते. एखाद्या प्रोफसराच्या घरासारखे त्यांचे घर आहे. फरक इतकाच की, अलीकडे प्रोफेसरांच्या घरातही मला इतकी पुस्तके दिसत नाहीत. अतुल्यबाबूंच्या घराच्या भिंतींना लागून पुस्तकांची कितीतरी कपाटे आणि स्टॅण्डस् होते. अतुल्यबाबू आजारी होते. एखाद्या रिटायर्ड पहिलवानासारखा त्यांचा देह बिछान्यावर पसरला होता. माझा नाटकाशी संबंध आहे हे कळल्यावर त्यांनी माझ्याशी नाटक ह्या विषयावर बोलायला सुरुवात केली आणि आधुनिक बंगालीच नव्हे, पण युरोपियन नाट्यवाङ्मयासंबंधी त्यांना असलेली माहिती आणि त्या विषयावरचा त्यांचा ग्रंथसंग्रह पाहून मी थक्क झालो. पण सलीलला गाडी राजकीय परिस्थितीवर आणायची होती, त्याने बरोबर सांधे जुळविले. अतुल्यबाबूंचे बंगालच्या राजकीय परिस्थितीवरचे भाष्य ऐकून यांना नाटकाविषयीच बोलत ठेवायला हवे होते, असे वाटले.

"...प्रत्येक देशाला राजकीय स्थैर्य मिळविण्यासाठी रक्तपाताची किंमत द्यावीच लागते. त्या मानाने आपण दिली नाही..." हे ऐकून मी थंडच झालो. राजकारणातल्या एकेकाळच्या एवढ्या बड्या माणसाच्या तोंडून हे असले अगतिक भाष्य ऐकायची माझी तयारी नव्हती. जाता-जाता त्यांचा एकच उद्‌गार बरा वाटला —

"गेल्या वीस-पंचवीस वर्षांत आम्ही काँग्रेसचे पुढारी म्हणविणारे लोक सामान्य माणसापासून दूर गेलो. त्याची ही फळे आहेत..." माझ्या तोंडावर 'बेबंदशाही' नाटकातल्या संभाजीची आत्मनिर्भर्त्सनेची वाक्ये आली होती — "-भले भरडलेस, खोटे कंठी धरलेस. कालचक्राला क्षमा मंजूर नाही-" विष्णुपंत औंधकर बिचारे बेतास बात शिकलेले नाटककार पण राजकारणातल्या पुढाऱ्यांच्या अधःपतनाची कारणमीमांसा ते किती थोडक्या शब्दांत करून गेले! एकेकाळी बंगाल्यांच्या उरावर नाचणारे अतुल्यबाबू बिछान्यावर आडवे पडले होते. राजकीय जीवनातही तसेच आडवे झाले होते. तसे त्यांनी अतिशय आपुलकीने आमचे स्वागत केले. मुंबई महाराष्ट्राला द्यायला नेहरूंनी आधी नकार का दिला हेही आपल्याला कळले नाही आणि नंतर होकार का दिला तेही कळले नाही, वगैरे बोलून मुंबईच्या मागणीला मराठी लोकांना आपला विरोध नसल्याचेही सुचविले होते. कलकत्ता सोडण्यापूर्वी जेवायला येण्याविषयी मनापासून आग्रह केला होता. पण एकूण चर्चेत मात्र नव्या काँग्रेसविषयी "बघू या, तुम्ही तरी काय उजेड पाडता ते -" हाच सूर होता. आपण आता सत्तेच्या क्षेत्रात मोडीत निघाल्याची वेदना लपू शकत नव्हती. तेही बरोबर आहे. ज्या दाराशी हजारो, याचकांची रीघ असायची तिथे आता शुकशुकाट. सत्ता संपली की सारे संपते. रेल्वेच्या स्टेशनावर जमणारे पोलिस अधिकारी,

सचिव - उपसचिव - हारतुरे, सगळे संपते. दुकानदार देखील घेतलेल्या मालाचे चक्क पैसे मागू लागतात. उद्घाटनांची आमंत्रणे संपतात. वार्ताहरांचा घोळका विरतो. कालच्या पोलादी पुरुषांचे आज टिन्पाट होते. 'पब्लिक्'चीही कमाल असते.

सत्ता गेल्यानंतरदेखील अत्यंत सहजतेने चार माणसांतला माणूस होऊन राहिलेला एकच राजकीय पुढारी माझ्या पाहाण्यात आला. तो म्हणजे कै. काकासाहेब गाडगीळ. सत्तेवर असतानाही ते उन्मत्त नव्हते आणि गेली म्हणून उदास नव्हते. काका आयुष्यभर लोकविलक्षण आणि मोठी मिश्किल प्रसन्नता घेऊन जगले. पंजाबचे राज्यपालपद सोडून पुण्याला आल्यावर चक्क एखाद्या रिटायर्ड पोष्टमास्तरासारखे टांगा करून आपल्या बिऱ्हाडी आले. काका हे खरे डेमॉक्रॅट होते. त्यांचाशी बोलताना कधी 'आता काय राह्यलंय् आमचं -' हा सूर नव्हता. इथे मात्र मला पदोपदी, वरपांगी दिसणाऱ्या बेफिकिरीमागे पराभवाचे दुःख दिसत होते. त्या खोलीत एका पलंगावर उद्ध्वस्त वटवृक्षासारख्या पडलेल्या त्या धिप्पाड माणसाकडे पाहाताना माझ्या डोक्यात पुन्हा पुन्हा ते औंधकरांचे वाक्य येत होते - 'कालचक्राला क्षमा मंजूर नाही.'





शांतिनिकेतनातल्या ब्रह्मचर्याश्रमाच्या स्थापनेच्या वेळी गुरुदेवांनी म्हटले होते, "जुन्या शास्त्रात काशी हे पृथ्वीबाहेरचे स्थान मानले आहे. आधुनिक भारतातही असे एखादे स्थान असावे की जे राज्यकर्ते आणि समाज ह्यांच्या सर्व प्रकारच्या 'बंधन-पीडना'च्या बाहेरील मानले जावे. इथे आम्ही खण्ड-काल यांच्या पलीकडे असावे!" टागोरांच्या ह्या विधानाबद्दल तत्कालीन पुरोगामी बंगाली लेखकांनी त्यांना पलायनवादी (एस्केपिस्ट) वगैरे ठेवणीतल्या शिव्या दिल्या होत्या. मलेरिया निमूर्लनापासून ते नृत्यनाटिकांपर्यंत जीवनातल्या अनेक विषयांच्या प्रयोगशाळा उघडून बसलेल्या रवीन्द्रनाथांना 'पलायनवादी' म्हणणे हा बंगाली भाषेतला सगळ्यात मोठा विनोद म्हणायला हवा. 'मला जरा स्वस्थ पडू द्या-' हे आयुष्यात प्रत्येक जण केव्हाना केव्हा तरी म्हणतोच. 'स्वस्थ' म्हणजे स्वतःमध्ये राहणारा. आपण सतत अस्वस्थ असतो, कारण आपल्या इच्छेची पर्वा न करता असंख्य भानगडीत आपण ओढले जात असतो, ढकलले जात असतो.

साथीच्या रोगात जसे आजारी पडणे न पडणे माणसाच्या हाती राहात नाही, तसे कलकत्त्याच्या ह्या राजकीय साथीच्या रोगाचे झाले आहे. विचार, विवेक यांच्या पलीकडे

गाडे गेले आहे. मी कलकत्त्याच्या त्या भयानक कोलाहलातून निघालो आणि शांतिनिकेतनात येऊन अभ्यासाला लागलो. बंगाली भाषेचा परिचय हळूहळू वाढत होता. संस्कृत तत्सम शब्दांचा बंगालीत खूप भरणा असल्यामुळे मराठी माणसाला छापील बंगाली समजायला वेळ लागत नाही. राम बहालजींकडून व्याकरणशुद्ध बंगाली समजत असे आणि बंगालीचा खरा स्वभाव कालोच्या हॉटेलात तासभर जाऊन बसल्यावर ध्यानात येई. कालोचे हॉटेल ही एक शांतिनिकेतनातली फार मोठी संस्था आहे. एका झोपडीवजा घरापुढे कायमचा मांडव घातला आहे. बाकडी आणि लांबलचक टेबले हेच फर्निचर. कोकणातल्या खेड्यात रस्त्यालगत एखाद्या बाबली गावकाराचे किंवा खळू बांदेकरांचे असते तसले हे (श्री वेताळ प्रसन्न) 'चाय' चे हॉटेल. खुद्द 'कालो' हा प्राचीन माणूस. साठी केव्हाच उलटली असावी. बंगाल्यांत सहसा न आढळणारी शरीराची उंची, सडपातळ आणि ताठ काठी. काळाभोर वर्ण, पण पांढरे स्वच्छ धोतर आणि स्वच्छ कुडता. मालवण-वेंगुर्ल्याला गेला तर हिंदळेकर किंवा भाटकर म्हणून सहज खपेल. 'कालो' म्हणजे 'काळू'. 'कालो' हे त्याचे नाव की विशेषण मला ठाऊक नाही; पण विशेषणच असावे, किंवा 'डाकनाम' ! मूळ गाव सुधीररंजनसुद्धा असेल. बंदरालगतच्या टावराणात असतात तसल्या त्या हॉटेलातल्या बाकड्यावर विश्वभारतीतल्या विद्वान प्राध्यापकापासून ते रिक्शावाल्यापर्यन्त सगळ्यांचा तळ असतो. आणि कालोची चहाची किटली सतत उकळत असते. कढईत 'चाप्स्' तळले जात असतात. कालो आणि त्याचे एक दोन मदतनीस राबत असतात. गुरुदेवांनी शांतिनिकेतनात चित्रकार, गायक ह्यांच्याप्रमाणे कालोसारखीही रत्ने जमविली. लहानपणी त्यांनी खेड्यातून आलेल्या ह्या पोराला आश्रय दिला. पाठशाळेत घंटा वाजवणारा, हजेरीपट, नोटिसा वगैरे फिरवणारा, शिपाई म्हणून काम करीत असताना अध्यापकाचे चहाचे डिपार्टमेंट सांभाळू लागला. गुरुदेवांच्या नृत्यनाटिकांच्या संघाबरोबर कालो चहापाण्याचे डिपार्टमेंट सांभाळण्यासाठी 'बाय् स्पेशल अपॉइंटमेंट टु रवीन्द्रनाथ टागोर' हिंडून आला आहे. त्याच वेळी शांतिनिकेतनात छोटेसे हॉटेल काढायला गुरुदेवांनी त्याला मदत केली. गांधींच्या आश्रमात आणि टागोरांच्या आश्रमात हा फरक !

बाहेरच्या जगात महत्पदावर चढलेले जुने विद्यार्थी आणि प्राध्यापक कधी काही योगाने शांतिनिकेतनात आले तर मोठ्या हौसेने घटकाभर आपले उच्च स्थान वगैरे विसरून त्या बाकड्यावर बसून कालोच्या हातचा चहा पितात आणि चॉप् खातात. माणसाला भूतकालात शिरायची खूप ओढ असते. कालोचे ते चिमुकले हॉटेल त्यांना पुन्हा एकदा विद्यार्थिदशेत घेऊन जाते. कालोने ते झोपडेदेखील तसेच ठेवले आहे. कालो गोष्टीवेल्हाळ वगैरे नाही. पण त्याच्या वागण्यात सुंदर सौजन्य आहे. तिथल्या गप्पागोष्टींत

तो प्रत्यक्ष भाग घेत नाही, पण त्याचे अस्तित्व मजेदार रीतीने जाणवते. असाच एकदा तिथे चहा पीत बसलो होतो. एक बंगाली गृहस्थ आले. तोंडात चिरूट होता. बंगालात चिरूट फार• लोकप्रिय. त्या गृहस्थाबरोबर इतरही दोन चार भद्र लोक होते.

"कालोदा-भालो आछे—" वगैरे आस्थेने चौकशी झाली. त्यांच्या बोलण्यावरून पंधरा-वीस वर्षांपूर्वी ते विश्वभारतीत विद्यार्थी असावेत असा अंदाज केला. त्यांनी चहा वगैरे मागवला. आपल्या मित्रांना बालपणीच्या आठवणी सांगितल्या. जायला निघाले तेव्हा कालोने विचारले, "किती दिवस मुक्काम ?"

"आहे दोन चार दिवस-"

"मग संध्याकाळी येता डीमेरचॉप् - अंड्याचे चॉप्स्-खायला ?- बाबू मोशायना अंड्याचे चॉप् फार आवडायचे-" त्यांच्या मित्रांना उद्देशून कालो म्हणाला. तो माणूस कालोकडे आश्चर्यचकित होऊन पाहात होता.

"डीमेर चॉप् ? - कालोदा तुम्हाला अजून आठवण आहे ?"

तो गृहस्थ विद्यार्थी असताना अंड्याचे चॉप्स त्याला फार आवडत ही गोष्ट कालोदाच्या लक्षात राहिली होती. "दारूण-चोमोत्कार मेमोरी-चोमोत्कार मेमोरी -" करीत तो गृहस्थ आणि त्याचे मित्र तिथून गेले. असा हा कालो आणि त्याचे ते हॉटेल. सारे जुने विद्यार्थी आपल्या खेड्यातल्या ग्रामदेवतेच्या देवळात गेल्याच्या भावनेने 'कालोर-दोकानी'त येऊन चहा पिऊन जातात.

तिथे बसून मी बंगालीतून चालणारी गिऱ्हाइकांची संभाषणे ऐकायचा. हळूहळू माझ्यापुढे चहाचा कप ठेवताना, न सांगता तो कडक चहा पातळ करायला गरम पाण्याची किटली येऊ लागली. कालोच्या स्मरणवहीत माझीही नोंद झाली. कलकत्त्याचा तो भयानक भाटीखाना, तें गोंगाटाने डोके उठवणारे कॉफी हाउस आणि कालोचे हे जुन्या आजीबाईसारखे वेडेबगडे पण अगत्यशील हॉटेल. शहरातले हॉटेलवाले इंटिरियर डेकोरेशनवर हजारो रुपये उधळतात त्याऐवजी 'या' असे आनंदाने स्वागत करण्यावर दहा सेकंद का खर्च करीत नाहीत ? नुकतीच आपल्या तीर्थरूपांची हाडे गंगेत टाकून आल्यासारख्या चेहऱ्याचे ते उद्दाम वेटर्स पाहिले की जेवण्यातला उत्साहच मावळतो. 'पैसे टिकवा-गिळा आणि टळा' हे इथले बोधवाक्य. मोटारच्या टाकीत पेट्रोलची नळी खुपसणारा पंपावरचा माणूस आणि गिऱ्हाइकाच्या पोटात लोटायच्या पदार्थांची थाळी आणणारा वेटर - सारखेच निर्विकार ! अशा ठिकाणी 'जेवण' हे देखील देहाच्या धावपळीसारखे लागणारे 'जळण' होते !

कालो-दाच्या हॉटेलात बसल्याबसल्या अनेकांशी परिचय होत होता. विद्यार्थ्यांच्या कॅण्टीनमध्येही अड्डा जमायचा. आता बंगाली शिकायला आलेला एक विद्यार्थी ह्या

भूमिकेशी मी जमून गेलो होतो. अशा वेळी शांतिदेव घोषांनी मला मराठी नाट्यसंगीतावर साग्रसंगीत भाषण करायचा आग्रह केला. वास्तविक भाषणबिषण काही द्यायचं नाही असा निश्चय करून मुंबई सोडली होती. पण शांतिनिकेतनात गानलुब्धांचा एवढा मोठा अड्डा जमत होता की त्यांना मराठी नाट्यसंगीताची परंपरा सांगण्याचा मोह आवरेना. त्यातून मराठी नाट्यसंगीत हा माझ्याही अतिशय आवडीचा विषय.

'उत्तरायण' ह्या गुरुदेवांच्या प्रासादतुल्य निवासस्थानातल्या एका दिवाणखान्यात शे-सवाशे छात्र, छात्री आणि इतर स्त्री-पुरुष जमले होते. त्यात पंडित डी.टी. जोशी, वझलवारजी, स्वतः शांतिदेव घोष यांच्यासारखे परिचित जाणकार होते. शांतिदांची वृद्ध आई देखील आली होती. शिवाय मंटू-दा, लेबू-दा यासारखे नवे मित्र होते. सलील अर्थातच होता. काही रशियन, अमेरिकन विद्यार्थिनीही होत्या. तीन चार दिवस तिथल्या तबलजीबरोबर गाण्याची तालीमही केली होती. आमचा नाटकी धुमाळीचा आणि उलट्या वजनाचा त्रितालाचा ठेका संभाळताना तबलजीची जरा गड़बड उडत होती. विशेषतः आपली कीर्तनकारी, म्हणजेच मूळची लावणीबाजीची धुमाळी, हा एक खास मराठी ढंगाचा बाज आहे. मी अण्णा किर्लोस्करांच्या 'पंचतुंडनररुंडमाळधर' ह्या नांदीने सुरुवात केली. नांदी संपली आणि श्रोतृवृन्दाने 'शाधु शाधु' असा गजर केला. शांतिनिकेतनात टाळ्या वाजवून दाद देत नाहीत. जुन्या संस्कृत नाटकातल्या सभाजनांसारखी 'साधु साधु' अशी गर्जना करायची गुरुदेवांनी परंपरा घातलेली आहे. इंग्रजीतून भाष्य आणि मराठी गाणी गळ्यांतून जशा निघतील तशा त्यांच्या तऱ्हा दाखवीत अडीच एक तास हा कार्यक्रम चालला होता. आमच्या नाटकातल्या पदांत संगीताची इतकी विविधता आहे की तालासुरात मुळातली पदांची 'आउटलाइन' म्हटली तरीही जाणकारांना आनंद होतो, आश्चर्य वाटते. अधूनमधून गाण्यांचे अर्थ सांगत, मूळ चीजा गाऊन, गळ्यातून जोरदार तान निघाली नाही तर पेटीतून वाजवून दाखवून मी नाट्यसंगीतावरचे कीर्तन चालवले होते.

माझ्या गायनाविषयी माझा अजिबात गैरसमज नाही. मला चार्लस डिकन्सच्या एका भाषणाची आठवण झाली. एका भाषणाच्या प्रारंभी डिकन्स म्हणाले होते, "सभ्य स्त्रीपुरुष हो, आज मी आपल्यापुढे माझे भाषण ऐकण्यासाठी आलो आहे!" - वास्तविक मी देखील त्या दिवशी माझेच गाणे काय उजेड पाडते ते पाहात होतो. पण त्या पदांचा उपजत गुणच एवढा मोठा की मराठी नाट्यसंगीतावरल्या त्या व्याख्यानाला मला फार मोठा प्रतिसाद मिळाला आणि माझ्या तिथल्या मुक्कामात मला तोच खेळ तीनदा निरनिराळ्या मंडळांसाठी करावा लागला.

ह्या व्याख्यानांमुळे एवढा मोठा मित्रपरिवार वाढला की रोज संध्याकाळी माझ्या

खोलीत किंवा आणखी कुणाकुणाच्या बंगल्यात गाण्याबजावण्याचा अड्डा जमू लागला. मला माझे फर्गसन कॉलेजातले दिवस आठवू लागले. सुरांच्या प्रेमाची ही एक अचाट शक्ती आहे. मी सुरांचा लोभी आहे ह्या एका आधारावर मला शांतिनिकेतनातली अनेक दारे मोकळी झाली. ललित, अभिजात, कसले का असेना, पण तिथल्या घराघरातून संगीत आहे. कुणीही गाणे म्हणायला सांगताना संकोचत नाही. रस्त्याच्या कोपऱ्यावर थांबवून देखील इथली माणसे मला ''पांडे-दा आपनार एई जे- 'शोकुल तारक शुता' गान धरून तो -'' म्हणून 'दे हाता', 'नृपकन्या', 'स्वकुलतारक सुता' म्हणायला लावीत. आश्रमाच्या परिसरात माणसे कशी मुक्त मनाने गाऊ शकतात. बागेत, रस्त्याच्या काठाला, हॉस्टेलमधल्या खोल्यांमधून, मोंटू-दाच्या 'वॉच ॲण्ड वॉर्ड'मध्ये - गाण्याचा अड्डा कुठे जमेल, सांगणे अवघड !

आता वाचनालयात गेलो की तिथली माणसे पुस्तके देण्याच्या बाबतीत मला मदत करू लागली. बँकेतले कारकून पुन्हा कधी पेटी ऐकवता म्हणून विचारू लागले. थंडीचे दिवस. त्यामुळे रात्री कॅम्पफायर्स असायचे. विद्यार्थी-विद्यार्थिनी तिथे मला आग्रहाने नेऊ लागले. त्या शेकोट्याभोवती रवीन्द्रांच्या गीतांचे वृन्दगायन सुरू होई. विद्यार्थी, प्राध्यापक, त्यांच्या बायका, येणारे जाणारे पाव्हणे सगळे त्या 'कोरस'मध्ये भाग घेत. विश्वभारतीत तर रोज काही ना काही सांस्कृतिक कार्यक्रम असतोच. कधी गायन, कधी नृत्य, कधी व्याख्यान, कधी काव्यवाचन, कधी कोणाचे पुण्यस्मरण, कधी विद्यार्थ्यांच्या साहित्यसभा. मी न चुकता ह्या संध्याकाळच्या कार्यक्रमांना जात असे. तेवढ्यात श्रीनिकेतनच्या जत्रेचा दिवस उजाडला.

बंगाली लोकांत आपल्यापेक्षाही जत्रेचा उत्साह मला अधिक दिसला. आपल्याकडे 'जत्रा' ही आता ग्रामीण जनतेची झाली आहे. सुशिक्षित म्हणवणारा समाज त्यात कमी भाग घेतो. बंगालात तसे वाटले नाही. रवीन्द्रांनी श्रनिकेतन आणि शांतिनिकेतन 'मॅला' सुरू केला. त्यांतला धार्मिक पूजेअर्चेचा आणि देवाच्या पुढल्या नवसनैवेद्याचा कार्यक्रम वर्ज्य करून त्याला निवळ आनंदोत्सवाचे आणि नवीन ऋतूच्या स्वागताचे स्वरूप दिले. त्यामुळे त्या 'मेळ्या'नादेखील पौषमॅला - म्हणजे पौषाची जत्रा, 'दोल' - म्हणजे वसंतोत्सव अशी नावे दिली. जत्रेचे बाकीचे स्वरूप तेच, तसेच फिरते चक्री पाळणे, 'दोन तोंडाचा माणूस', मिठायांची दुकाने, सारे काही यथासांग. श्रीनिकेतनच्या उत्सवाला कृषि-उत्सवाचे स्वरूप. भाजीपाल्याचे प्रदर्शन आणि हस्तोद्योगाचे प्रदर्शन हे मोठे आकर्षण.

श्रीनिकेतनच्या ह्या जत्रेत बंगालमधल्या लोकसंगीताच्या दोन निरनिराळ्या कार्यक्रमांचे मला फार सुंदर दर्शन घडले. एक म्हणजे बंगाली 'कीर्तनं' आणि दुसरे कविगान

(बंगालीत कोबीगान.) राधाकृष्ण-प्रेम हा बंगाली कीर्तनाचा एकमेव विषय. नदियानंदबाबू नावाचे प्रसिद्ध 'कीर्तनिये' होते. त्यांच्या साथीला 'खोल' वाजवणारे होते तेही कसबी. लावणी गायनासारखा 'कीर्तन' हा गायकीचाही प्रकार आहे. बंगाली कीर्तनात गद्य निरूपण जवळजवळ नाही. फार तर 'गौरांग महाप्रभु म्हणतात' - असा एखादा गद्य वाक्याचा तुकडा. बाकी गायन, वादन आणि माफक नर्तन. 'कीर्तनकार' हा सगळ्या 'परफॉर्मिंग आर्टस्'मधला मला तरी सर्वश्रेष्ठ कलावंत वाटतो. संगीत, नृत्य, अभिनय, बहुश्रुतता, व्यासंग सगळ्यांचा इथे मनोहर संगम. बंगाली कीर्तनात मात्र पुराणातल्या किंवा रामायण-महाभारतातल्या कथा नाहीत. 'कथा' सांगणारा कथाकारांचा एक निराळा प्रकार आहे. पण 'कीर्तन' म्हणजे राधाकृष्ण प्रेमाचे गायन ! राधेचे नाना प्रकारचे भाव, तिच्या त्या ललिता, विशाखा वगैरे मैत्रिणींची थट्टा, श्रीकृष्णाच्या गोपींसमवेत चालणाऱ्या लीला - ह्या साऱ्यांची ओढ चांदण्यासारखीच आहे. संपता संपत नाही. धर्मश्रद्धेने ऐकणारांचा एक प्रकारचा आनंद, पण संगीत, नृत्य, शब्दांचा सुंदर खेळ यांचा मनोहर संगम आणि विलास पाहाणे हेही मोठे आल्हाददायक असते.

सुरुवातीला अतिशय धीम्या लयीत चाललेले मंगलाचरण. त्याला 'गौरचंद्रिका' म्हणतात. दशकुशी नावाचा अठ्ठावीस मात्रांचा ताल ! ही गौरचंद्रिकाच चांगली अर्धा तास चालली होती. 'खोल' वाजवणारांच्या कीर्तनियाशी चाललेल्या लयकारीच्या आट्यापाट्या, मग साथीदारांचे गायन, कसलीही घाई नव्हती. राधामाधवांचा वियोग आणि मीलन ह्या दोन भोज्यांच्या मधला खोखो असतो. मग वियोग, उद्वेग, निद्राभंग किंवा स्वप्नात कृष्णदर्शन, मग 'चंदनाची चोळी माझे अंग अंग जाळी' असा देहाचा दाह - नाना अवस्थांचे गीतबद्ध वर्णन करीत करीत शेवटी मग राधामाधवांचे मीलन आणि रासक्रीडा अशा टप्प्याटप्प्याने रात्र जागवणारा कीर्तनिया आजही बंगालात अतिशय लोकप्रिय आहे. रवीन्द्र संगीतातच नव्हे, तर बंगाली चित्रपट संगीतातही कीर्तनअंगाच्या खूप चाली आहेत. ठाय लयीत संथपणाने फिरता फिरता तेवऱ्याची किंवा खेमट्याची दुडकी चाल सुरू झाली की लोकांचे भान हरपते. कीर्तनातसुद्धा गडेरहाटी, मनोहरशाही, रेनेटी, मन्दारिणी , झारखंडी अशी निरनिराळी घराणी आहेत. नदियानन्दबाबू मनोहरशाही घराण्याचे. ठाय लयीपेक्षा ह्या घराण्यात द्रुतावर अधिक भर. बंगाली कीर्तनात "राष्ट्रीय कीर्तन नावाचा" प्रकार शिरला नाही याचा मला अतिशय आनंद झाला.

शांतिनिकेतनातल्या मुक्कामात माझी आणखी एका फार विद्वान आणि गुणी कीर्तनियाशी दोस्ती जमली. त्यांचे नाव पंचाननदास. संगीतभवनात कीर्तनाची गायनपद्धती

समजावून सांगण्यासाठी त्यांना महिन्याभराच्या मुक्कामाकरिता बोलावले होते. सुदैवाने माझ्या शेजारच्याच खोलीत ते उतरले. बंगालीशिवाय त्यांना दुसरी कुठलीही भाषा येत नाही. संस्कृत बोलत. पण त्यांच्या त्या 'यजयोरभेद' असलेल्या संस्कृतातून मूळ उच्चार शोधून काढणे अशक्य होते. 'ज्ये ज्योथा मांग् प्रोपोद्दन्ते तांगश् तोथैबौ भोजाम्महम्—'मधून 'ये यथा माम् प्रपद्यन्ते —' शोधण्यापेक्षा त्यांचे बंगाली समजणे सोपे होते. शिवाय अनायासे मला बंगालीची 'नेट प्रॅक्टिस' मिळायचीं.

पंचाननबाबूंना शेकडो म्हणजे-शेकडो वैष्णव गीते पाठ. चंडिदासाची पदावली मुखोद्गत. दुपारी खोलीवर येऊन अड्डा ठोकायचे. आमची ख्याती आता 'शोंगीत शिल्पी' म्हणून झाल्यामुळे खोलीत मुख्य भरती गाणा-वाजवणारांची. तिथल्या साहित्यिक-समीक्षक वगैरेंनी माझा नाद सोडला असावा. पंचाननबाबू कीर्तनगाण्यातल्या खुब्या दाखवीत असायचे. त्या लांबलचक तालांचा आडाखा डोक्यात बसावा लागतो. पण कीर्तनियाचे खरे कसब आयत्या वेळच्या पद्यमय निरूपणात असते. 'आमार चांदबदनी ठुमकी ठुमकी चली जाय-' म्हटल्यावर ती चंद्रवदनी राधा त्या चांदण्यात कशी दिसत होती ह्यावर निरूपण सुरू. आणि हे निरूपण सुद्धा संगीतात. त्याला 'आखोर' म्हणतात. आखो म्हणजे अक्षर. कीर्तनियाची ही स्वतःची 'रसिक अक्षरे !' आमचे पूर्वीचे नाटकातले नट देखील पदातली 'अक्षरे' गोड आहेत म्हणायचे. सुरांचे नाते अक्षराअक्षराशीच अधिक असते. म्हणूनच कविता लिहिणे आणि 'गाणे' लिहिणे निराळे.

पंचाननबाबूंनी मला तालीमच द्यायला सुरुवात केली. माणूस मात्र खरोखरीच वैष्णवगीत माधुर्याने वेडा झालेला. रस्त्यातून गात गात जायचा. रस्त्यातून जाता जाता एकदम पंचाननबाबू थांबायचे आणि म्हणायचे - "पांडे-दा शुनून-आहा-की दारूण माधुज्ज !" म्हणून मग एखाद्या माधुर्य दाखवणाऱ्या कल्पनेवर रस्त्यातच 'आखोर' रचायला सुरुवात. रस्त्यातच गिरक्या बिरक्या मारून नाच सुरू. येणाजाणारे वाटसरूही आमची मजा बघत थांबायचे. 'चांदबदनी राधा कशी निघाली ?' पंचाननबाबूंनी सुरेख 'आखोर' रचला. 'आमार चांदेर गाछ - आहाहा ! आमचं हे चांदण्याचं झाडच चालत निघालंय असं वाटलं—" राधा देखील कृष्णाचा उल्लेख "आमार कालो शोना - माझं काळं सोनं" असा करते. दात पुढे असलेले, लुकडे, डोक्यावर भरपूर तेल माखून पिकल्या केसांचा भांग पाडलेले, कपाळाला उभे गोपीचंदन लावलेले, अंगात एक काळा कोट, धोतर, शर्ट अशा वेषामुळे एखाद्या प्राथमिक शाळेतल्या हेडमास्तरासारखे वाटणारे पंचाननबाबू अशा वेळी सुंदर दिसायला लागायचे ! आमच्या अड्ड्यात कॉलेजमध्ये

शिकणाऱ्या मुलीदेखील होत्या. त्या सुद्धा - दारूण, शांघातिक, चोमोत्कार, ईश - करून त्यांना दाद द्यायच्या. 'राधाकृष्ण प्रेम' याखेरीज पंचाननदांच्या डोक्याला दुसरा त्रासच नव्हता. मुर्शिदाबादेजवळच्या एका खेड्यात ते राहात. मी म्हणालो, 'पंचाननदा रेडियोवर कीर्तन करता की नाही ?''

''नको रे बाबा ! समोर माणसांची गर्दी नसताना कीर्तन ? पांडे-दा, पुकुरातल्या कमळासारखे फुलत गेले पाहिजेत समोर माणसांचे चेहरे - तर कीर्तन-'' हे सगळं चालीवर म्हणून लगेच 'हरी बोल !' करीत सम ! पदावलीतली ओळ मुखी नाही असा जागेपणी क्षण नाही. सारखे त्या नादात. एकदा विचारले, ''पंचाननदा कीर्तनावर चरितार्थ चालतो ?''

''एक मुलगा, एक बायको आणि एक मी ! - मुलगा जहाजावर नौकरीला लागला. आता मी आणि माझी ब्राह्मणी ! - दोन वेळचा भात मिळतो. डोक्यावर छप्पर आहे - बाकी हरि बोऽऽल ! दुःख गरिबीचे नाही. परंपरा संपली, नवीन कुणी शिकत नाहीत - मुलगा निराळ्या व्यवसायात गेला. इथे पैसा नाही म्हणतो. सुर-लयीची श्रीमंती समजत नाही-आमच्या मागून आमची वीणा उघडी पडणार हे दुःख. पांडे-दा अति दारूण ! — अस्तु. इश्शोरेच्छा बोलीज्यशीऽऽ'' पंचाननदासांची सगळी श्रीमंती चंडिदासाच्या पदावलीतली गीते गातांना त्यांना मिळते. श्रीमंतीचा हा हिशेब सगळ्यांनाच कळणारा नाही. पदावलीवर तसे साऱ्या बंगालचे अतोनात प्रेम. स्वतः रवीन्द्रांनी त्या पदावली ढंगाच्या रचनेची एक मौज केली होती. 'भानुसिंहेर पदावली' नावाचा स्वतःच रचलेल्या पदांचा संग्रह प्राचीन काळातल्या भानुसिंह नावाच्या वैष्णव संताचा संग्रह आपल्या हाती आला असे सांगून प्रसिद्ध केला. त्यावर विद्वानांचे उत्तम अभिप्रायही आले होते. शेवटी हळूच त्यांनी गुपित फोडले, 'भानुसिंह' हे 'रवीन्द्र'चेच सूचक भाषान्तर. थेट प्राचीन वैष्णवकवीच्या रचनेसारखी त्यांनी पद्यरचना केली होती.

ह्या कीर्तनासारखा लोकरंजनाचा आणखी एक प्रकार मी श्रीनिकेतनच्या जत्रेत पाहिला तोही थक्क करून सोडणारा. दिवसभर त्या जत्रेत भटकून भटकून थकलो होतो. रात्री जेवून आडवे होण्याच्या विचारात होतो. तेवढ्यात 'देशपांडे-दा' अशी हाक ऐकू आली. विद्यार्थी विद्यार्थिनींनी आता माझीही जिम्मा त्यांच्यातच केली होती. त्यामुळे कुठल्या प्रहरी हाक ऐकू येईल त्याचा भरवसा नव्हता.

''की ब्यॅपाऽऽर ?'' मीही आता बंगाली सुरात जवाब द्यायला लागलो होतो.

''च्योलून तो- निघा तर खरे-''

''कोथाय गोऽऽ'' बंगालीत 'गो' हे पुरुषांनाही उद्देशून असते. (उगीच गैरसमज नसावा.) बंगाली बाई नवऱ्याला 'गोऽ-' म्हणाली की मजा वाटते. त्या 'गो'चा

हेलदेखील कोकणीतल्या 'काय गोऽऽ'मधल्या 'गो' सारखाच!

ते टोळके मला पुन्हा श्रीनिकेतनच्या जत्रेला चला म्हणून सांगत आले होते. तिथे रात्री कविगान होते. कविगान हा कविसंमेलनासारखा प्रकार असावा अशी माझी समजूत. मी बंगाली कविसंमेलने पाहिली आहेत. धक्का आणि कंप दिल्याशिवाय बंगाली कवींना एक ओळ वाचता येत नाही. पण हे कविगान निराळेच निघाले.

टिपूर चांदणे पडले होते. उघड्यावर कार्यक्रम होता. मध्यावर एक रिंगण आणि भोवताली प्रचंड जनसमुदाय. त्या रिंगणात पहिलवानांच्या पवित्र्यात दोन कवी उभे होते. त्यांच्यामागे त्यांचे साथीदार. बंगालीत 'संगती' म्हणतात त्यांना. ढाक, ढोल आणि मंजिऱ्या घेऊन तेही सज्ज होते. तमाशात कडे-ढोलचीची जुगलबंदी होते तशी ढोलियांची एक जोरदार जुगलबंदी झाली. एक मुश्किल तिहाई घेऊन ढोलिये चूप झाले! मग ते दोन कवी रिंगणाच्या मध्यावर आले. त्यातला एक चांगला धिप्पाड होता. तो बंगाली दिसण्यापेक्षा युक्त-प्रांतीय वाटत होता. त्याच्या तोंडून 'सज्जनो और देवियों-' असे शब्द बाहेर पडणार असे वाटले होते. परन्तु 'बोंधुगोन' - म्हणजे मित्रहो अशी बंगाली सादच आली आणि त्याचे प्रास्ताविक सुरू झाले. त्याचा प्रतिस्पर्धी सुमारे पाच फूट उंचीचा, तोंडाचे बोळके झालेला, पार सुकलेला वृद्ध कवी होता. पण त्याच्या चेहऱ्यावरून मात्र तो महा अर्काट वाटत होता. हे कविगान म्हणजे दोन कवींमधले वाग्युद्ध असते. ह्या वाग्युद्धाला कुठलेही द्वंद्व चालते. त्या रात्री महाभारतातल्या दोन प्रतिस्पर्धी पुरुषांच्या भूमिकेत हे कवी उभे होते. भय्या दिसणारा कवी अर्जुन होता. तो टिल्ल्या म्हातारा कर्ण होता. त्यांचे सवाल-जवाब सुरू होणार होते आणि हे सारे शीघ्रकाव्यात! साथीदार शेवटल्या ओळीतल्या शब्दांच्या दश्या पकडून झील धरतात. ढाकढोलिये आणि करताळवाले आपला रंग भरतात. आणि जनसामान्यापुढे रामायण-महाभारतांतल्या ह्या व्यक्तिरेखा हे 'कवियाल' निरनिराळ्या दृष्टिकोनांतून शीघ्रपद्यांतून मांडत असतात. मराठी नागर साहित्यात इरावतीबाई कर्वे किंवा दुर्गाबाई भागवत ह्यांनी महाभारतातली व्यक्तिचित्रे आपापल्या दृष्टिकोनांतून उभी केली आहेत. पण जानपदांपुढे आपल्या दृष्टीतून ती व्यक्तिचित्रे पूर्वपक्ष-प्रतिपक्ष करून त्यांच्या गुणाप्रमाणे वैगुण्यांसकट उभी करण्याऱ्या ह्या शीघ्र कवींचे कसब पाहून आश्चर्य वाटले. ह्या प्रतिस्पर्ध्यांमध्ये कधी कधी जानपद वातावरणात सहज खपणारा खट्याळपणाही चालतो, चिडवाचिडवी चालते, फ्री स्टाइल कुस्तीसारखी ही शब्दांची कुस्ती कदाचित आपापसात आधी मथूनही करीत असतील. पण आभास मात्र अटीतटीचा असतो. अर्जुनाचा पूर्वपक्ष सुमारे अर्धा तास चालला होता. तेवढ्यात प्रेक्षकातून कुणीतरी आवाज दिला, "आता आवरा" लगेच कविवर्यांनी ज्या दिशेकडून आवाज आला त्या दिशेला मोहरा फिरवला आणि म्हणाले, "मी माझी बाजू

तुमच्याशी मांडीत नाही. तो - तो पाहा मांडवाबाहेर माझा प्रतिस्पर्धी उभा आहे. जणू काय आपले लक्षच नाही असं भासवतोय्. पण तो आपलं उत्तर जुळवीत उभा आहे. हे युद्ध आम्हा दोघांचे आहे. ते कोणी किती वेळ लढावे हा आमचा प्रश्न आहे. तुम्ही सगळे हे चोरून ऐकताय 'हे ध्यानात ठेवा. तेव्हा मध्ये बोलायचं काम नाही...आणि महाशय, दुसरा बोलत असताना असभ्यपणाने मध्येच त्या बोलण्याला आडकाठी करायला ही काय पश्चिम बंगालची विधानसभा आहे? सभ्यतचे सारे नियम मोडून आचरटपणा चालतो ती सभा ही नव्हे. ती विधानसभा नाहीतर दिल्लीची लोकसभा - ही कविसभा आहे.'' आणि हे सारे भाषण पठ्ठ्याने तिथल्या तिथे रचलेल्या शीघ्र काव्यातून केले. टाळ्या शिट्ट्यांचा हा कडकडाट !

अर्जुनाची 'केस' मांडून झाली आणि 'कर्ण' उठला. त्याने प्रथम पांडवांनी अधर्मयुद्ध कसे केले इथपासून सुरुवात केली. धर्मराजाची तर अशी रेवडी उडवीत होता की इथे येण्यापूर्वी आनंद साधल्यांचा 'जय नावाचा इतिहास' वाचून आलाय की काय असे वाटत होते. त्या कर्णाचे बोळके असे खणखणीत वाजत होते की पाच सहा हजार लोकांच्या समुदायाला त्याचा आवाज लाउडस्पीकर नसतानाही स्वच्छ ऐकू येत होता. हा नुसता शीघ्र कवी नव्हता. चांगला नकल्याही होता. बृहन्नडा झालेल्या अर्जुनाची आठवण करून देताना त्याने 'शेवटी लेका हाच नाच शिकवला होतास ना ?' असे म्हणून जो नाच केला तो अगदी अव्वंल होता. ढाक ढोल तर असे लाजवाब वाजवीत होते की ढोलावर तबल्यासारखा रेला फेकतात हे त्या दिवशी मी प्रथम ऐकले.

सलील गर्दीत घुसण्याच्या शास्त्रातला फारच मोठा तज्ज्ञ असल्यामुळे आमची 'ग्यांग' त्या रिंगणाच्या धारेवर जाऊन पोहोचली होती. त्या दोघांतला कर्ण सलीलच्या ओळखीचा निघाला. शांतिनिकेतनातल्या कचेरीत चपराशाची नोकरी करीत होता म्हणे. त्याने मधूनच गुरुदेवांच्या कर्ण-कुंती संवादातल्या ओळी फेकल्या आणि ढाक ढोलियांनी आमच्या दाद देण्यावर खूष होऊन आठ-आंठ दहा-दहा मिनिटांची झक्कड चालवली. रात्रीचे दोन वाजले कसे ते कळले सुद्धा नाही.





लोकसंगीताच्या, लोकनाट्याच्या निरनिराळ्या परंपरा बंगालात अजूनही जीव धरून आहेत. माझ्या मुक्कामात मी थेट पुरुळियापर्यंत जाऊन तिथल्या आदिवासींची नृत्ये आणि मुखवट्यांचे 'छौ' नृत्यनाट्य वगैरे पाहून आलो. आदिवासींची नृत्ये अशी जोरदार होती की ह्या संचांना अमेरिका किंवा युरोपात धाडले तर सगळ्या ट्विस्टबिस्टचा धुव्वा उडवून येतील. 'छौ' नृत्यातले मुखवटे फार मोहक. पुराणे आणि महाभारतातल्या लहान लहान उपाख्यानांवर आधारलेली ही नृत्यनाट्ये. मयूरभंज, सेराइखेला आणि पुरुळिया ही 'छौ' नाचाची तीन महत्त्वाची पीठे. अभिमन्यूवधाचे एक छौ नृत्य मी पाहिले. चक्रव्यूहाच्या असंख्य तुकड्या घड्याळांतल्या नाना तऱ्हेच्या चक्रांसारख्या फिरून तो व्यूह अभेद्य कसा करीत याची झलक त्या नाचात पाह्यला मिळाली. त्याशिवाय किरातार्जुनीय, दुर्गेने केलेला महिषासुराचा वध अशी नाना आख्याने होती. नृत्यात खास जोर नव्हता. परंतु ते मुखवटे आणि ढाकढोलाची साथ यामुळे गर्दी खिळून राहात होती. असली हे लोकनृत्ये, कविगान, कथा, कीर्तने ह्यांतून रामायण-महाभारतातल्या कथा झिरपत झिरपत जनसाधारणाच्या तळापर्यंत जाऊन पोहोचल्या आहेत.

बंगाली 'जात्रा' हा लोकनाट्याचा प्रकार पाहाण्याचा अचानक योग आला. माझ्या सांस्कृतिक विकासाची जबाबदारी मुख्यतः आमच्या गेस्टहाउसमधल्या नोकरवर्गाने घेतली होती. एके दिवशी मला भात आणि माछेर झोल वाढता वाढता तिथल्या वाढप्याने पुढल्याच आठवड्यात बोलपुरात 'भीषण शुंदर' जात्रा कंपनी येणार असल्याची वार्ता दिली. कलकत्त्याहून येणार असल्यामुळे त्याच्या दृष्टीने 'जगात अशी कंपनी पाहायला मिळणार नाही !' बंगाली अतिशयोक्तीला साजेसे वर्णन त्याने केले. जात्रा हल्ली ज्या स्वरूपात आहेत ते काही लोकनाट्याचे शुद्ध स्वरूप म्हणता येणार नाही. अनेक प्रवेशी नाटकांसारखे नाटक. फक्त रंगमंच मध्यावर आणि चारी बाजूला प्रेक्षक. आणि खुल्या मैदानात गावोगावी ही नाटके होत असतात. प्रेक्षकांत जानपदाची गर्दी अधिक. ही नाटके आपल्या जुन्या पौराणिक आणि ऐतिहासिक नाटकांसारखीच भडक, अतिरंजित. तसे पाहिले तर आजही आपल्या व्यावसायिक रंगभूमीवर अतिनाट्याचेच दर्शन अधिक घडते.

मी पाहिलेल्या जात्रा-नाटकाचे नाव होते 'पतिघातिनी सती'. सदैव ही नाटके उघड्यावरच करीत असल्यामुळे, नाटकातले नट आणि नटी शिरा ताणूनच बोलत होते. नायक, खलनायक, नायिका, खलनायकाच्या कपटी कारस्थानात मदत करणारे त्याचे मित्र, कॉमिक पार्टी हाच मालमसाला असतो. नायक नायिकेवर संकटे. त्यांतून नायक मेला तर ट्रॅजिडी, खलनायक मेला तर कॉमेडी ! 'हरहर !', 'हाय रे दैवा !', 'दुष्टा, चांडाळा, नरपशो' - छाप संवाद. टाळ्यांची वाक्ये. मायभूमी - बलिदान - रक्त - अश्रू - खून - मारामारी - विश्वासघात सगळे काही यथासांग असते. चौफेर गर्दीला धरून ठेवण्यासाठी असाच सगळा उठाव करावा लागतो. फक्त सीन सिनेरीची भानगड नाही. 'ड्रेस' मात्र झगमगीत. ह्या जात्रांमध्ये विवेक नावाचे एक गाणारे पात्र असते. भिक्षा मागून गुजराण करणारा हा संगीत विवेक प्रत्येक जात्रेत हवाच. आपल्या हिंदी सिनेमात मोक्याच्या वेळी हितोपदेशाचे गाणे किंवा भजन गाऊन नायक, नायिका किंवा खलनायक वगैरेंना सावध करणारा फिल्मी भिकारी जो आला, तो ह्या जात्रेतल्या विवेकाचा वारसदार. न्यू थिएटर्सच्या बंगाली चित्रपटात पूर्वी अंधगायक के.सी. डे हे पेटंट भिकारी असायचे. बंगाली कलावंतांचे आधिक्य असलेल्या हिंदी चित्रपटांत अजूनही रात्रीच्या वेळी निर्जन रस्त्यातून गात जाणारा भिकारी जीव धरून आहे. हे विवेकाचे पात्र ह्या 'पतिघातिनी सती'तही अधून मधून येऊन गात होते.

मात्र एक गोष्ट खरी की, जत्रेच्या त्या गर्दीत आपण स्वतःला झोकून दिले तर अतिनाट्यही मोठे मनोरंजक वाटते. एकतर नटनटी कसबी असतात. गर्दीच्या संमोहनाचे

नाटकी मंत्र जाणणारे असतात. 'पतिघातिनी सती' ही बंगालमधीलच एक ऐतिहासिक दंतकथा होती. बंगालच्या इतिहासात प्लासीच्या लढाईला आपल्या पानपतासारखे महत्त्व. सिराजउद्दौला वगैरेंना राष्ट्रवीर मानले जाते. मराठ्यांच्या डोक्यांत मुसलमानी अंमलाबद्दल इंग्रजी अंमलाइतकीच तिडिक आहे. बंगालमध्ये मुसलमानी अंमल उलथण्याचा आपल्याकडच्यासारखा जोरदार प्रयत्न झाला नसल्यामुळे तिथले हिंदू राजे मोगलांचे मांडलिक होऊन राहिले. आपापसात लढाया वगैरे केल्या असतील. मला तर बंगालचा इतिहास अगदी अपरिचित. सिराजउद्दौला तरी तिथे कसा आला हेही आठवत नव्हते. प्लासीची लढाई हा इतिहासात पाचएक मार्कांच्या किंमतीचा प्रसंग ! त्यामुळे सुरुवातीला त्या हिंदु-मुसलमान राजांपैकी दोस्त कोण आणि शत्रू कोण हे आधी समजून घ्यावे लागले. पण सिराजउद्दौला, बंगाली हिंदू राजे, फ्रेंच सेनानी अशी रंगीबेरंगी पात्रे त्या गर्दीला चमकदार संवादांनी आणि आवाजदारीने आणि कॉमिक पात्रांच्या कोलांट्यांनी मस्तपैकी रंगवीत होती यात शंका नाही. कडाडून टाळ्या होत होत्या. 'राष्ट्रप्रेम' हा विषय असल्यामुळे अधून मधून 'माओ आमादेरच्यारमन'वाल्यांना सणसणीत चपराका हाणल्या जात होत्या. 'परक्यांकडून दास्यमुक्तीची अपेक्षा करता ? थूः तुमच्या जिनगानीवर' इत्यादी इत्यादी ! प्रेक्षक टाळ्यांच्या जोडीला 'कापिताल -कापिताल' असे ओरडत होते. बंगाली बहुजनसमाजात 'कापिताल' हा फ्रेंच किंवा पोर्तुगीज भाषेतला 'वाहवा' कसा शिरला कोण जाणे. एरवी बंगाली दाद म्हणजे 'शांघातिक !', 'चोमोत्कार', 'दारूण' अशी असते. पण 'जात्रा'मध्ये मात्र दणकेबाज संवाद झाला की लोक 'कापिताल, कापिताल' असे ओरडतात. बाकी दाद देण्याचीसुद्धा परिभाषा आहे. गाण्याची दाद हिंदी-उर्दूतच बरी वाटते. उत्तम तान गेली आणि चपखल येऊन सम गाठली की 'क्या बात है', हेच खरे ! तिथे काही 'अत्यंत श्रवणीय' म्हणून चालणार नाही. तसेच ह्या कापिताऽलचे असावे.

चौकोनी रंगपीठाच्या दोन बाजूंना रुंदशा पायऱ्या असतात. तिथे ऑर्केस्ट्रा बसतो. ऑर्केस्ट्रा म्हणण्यापेक्षा ब्यांडवाले म्हणणे अधिक योग्य. कारण पेटी तबल्याच्या जोडीला ट्रंपेट, ड्रम, क्लॅरिओनेट, बासरी, ट्रँगल, हीही वाद्ये असतात. गाणे मात्र बेताचे. एकूणच बंगाली रंगभूमीवरचे संगीत आपल्या जुन्या काळातल्या 'मेळ्या'च्या दर्जाचे. जात्रेत मुख्य गाणे विवेकाला. 'पतिघातिनी सती'तली 'सती' ही एकदोन गाणी म्हणाली. ती ऐकूनही पती टिकला होता याचेच नवल वाटले. अगदीच सुमार ! संगीत बारीतल्या बायांच्या आवाजाचे लगाव असतात तसल्या थाटातले ते 'दारूण शोकरसात्मक' गाणे ! चौफेर गर्दीतून एक वाट काढलेली असते. पात्रे तिथून एंट्री घेतात. रंगमंचावर सिंहासन म्हणून खुर्ची मांडली होती. रेल्वेच्या मित्रमंडळाने जात्रा महोत्सवाचे आयोजन केले होते. त्यामुळे ती खुर्ची बोलपूरच्या स्टेशन मास्तरची असावी असा माझा आपला तर्क होता.

रंगभूमीवरची बारीकसारीक प्रापर्टी कंपनीच्या कपडेपटातले नोकर येऊन चार-चौघांसमोर गोळा करून जात होते.

'पतिघातिनी सती'नंतर मी लेनिनच्या चरित्रावरील जात्रा पाहिली. वेषभूषा रशियन. लेनिन, ट्रॉट्स्की, स्टालिन वगैरे मंडळींना जात्रेत पाहून मजा वाटली. विशेषतः लेनिनच्या पत्नीचे आणि साशा नावाच्या मुलीचे काम करणाऱ्या नट्यांचा मेकप आणि वेशभूषाच नव्हे तर बांधादेखील असा थोराड होता की कुणी रशियन बायकाच बंगाली बोलताहेत असे वाटले. खुद्द लेनिनही भलताच जोरदार होता. सारे चरित्र साहसकथेसारखे रचले होते. लेनिनचे वेषांतर 'बेमालूम' होते. पण त्या नाटकातली आता कम्युनिस्टांनी चावून चावून चरबट केलेली ठोकळेबाज लेक्चरबाजी मात्र, बंगाली जनसमुदायाला कंटाळवाणी वाटत असावी. कारण — 'आता नवे लेक्चर पाजा', 'हे जाऊन ज्योती बसूंना सांगा' अशी हेटाळणीही चालू पण अभिनयाच्या दृष्टीने 'पतिघातिनी सती'पेक्षा 'लेनिन' जात्रा खूपच चांगली होती. लेनिन, स्टालिन, ट्रॉट्स्की वगैरे थेट फोटोतल्यासारखे दिसत होते. रशियन शेतकऱ्यांचा समुदाय किंवा बंदुकांच्या चकमकी वगैरेमुळे वातावरण कमालीचे परिणामकारक होत होते. लेनिनचे चरित्र असल्यामुळे 'विवेक' नव्हता.

ह्या जात्रांच्या सुरुवातीला एखादा टॅब्लो, किंवा समूहनृत्याचा वगैरे कार्यक्रम करतात. 'पतिघातिनी सती'च्या आधी भारतमातेभोवती नाना प्रांतातल्या देशबांधवांचा नाच झाला. मुलींच्या शाळांच्या स्नेहसंमेलनात एखाद्या गोवंडेबाई किंवा पेंडसेबाई बसवतात त्यासारखा. 'लेनिन' जात्रेच्या वेळचे मूकनाट्य तर महाभयंकर होते. फॅक्टरीतल्या मजुरांना चिरूट ओढणारा मालक कसा छळतो, हंटर उडवून कामाला कसा लावतो, मग एका मजूर स्त्रीचे मूल भूक-भूक करीत कसे मरते (ते प्रेत घेऊन गाणे !) — लोक भलतेच वैतागले होते. काही वर्षांपूर्वी पीपल्स थिएटरचे लोक 'शेतकरी-दादा, कामकरी-दादा' नाच करायचे. मला तर सुखवस्तू कुटुंबातल्या मुलींनी ह्या कलापथकातून केलेली 'शेतकरी नृत्ये', 'कोळी-नृत्ये' वगैरे पाहिली की ती बसवणारांना प्रथम नेऊन औताला जोडावे किंवा होड्या वल्हवायला लावावे असे वाटते. इथेही असलाच नकली प्रकार होता. शेवटी ती लेनिनची जात्रादेखील लेक्चरबाजीच्या खडकावर जाऊन फुटली ! सगळ्या प्रकारांत एकाच गोष्टीचे कौतुक वाटले ते म्हणजे त्या नट-नटींच्या पल्लेदार आवाजाचे ! असले आवाज मी फक्त युरोपीय रंगभूमीवर ऐकले आहेत. कलकत्त्याची व्यावसायिक रंगभूमी आजही ह्या 'जात्रा'सारखीच अतिनाट्याने भरलेली आहे.

भाषा शिकण्याची आणखी एक शाळा म्हणजे नाट्यगृहे ! बरी, वाईट कसली का नाटके असेनात मी आपला कानावरून बंगाली भाषा जावी म्हणून नाटके पाहाण्याचा

सपाटा चालवला होता. शिवाय शांतिनिकेतनातल्या अनेकांनी मला 'शहाणे करोनि सोडावे' असाही संकल्प सोडला होता. आता मला र-ट-फ करीत बंगाली पुस्तके वाचता येत होती. एके दिवशी लेबू-दा म्हणाला, "देशपांडेजी रवीन्द्रनाथांचे सत्येन्द्रनाथ म्हणून भाऊ होते. ते पहिले भारतीय आय्.सी.एस्."- ह्या पहिलेपणाची बंगाल्यांना जरा अधिक हौस आहे. प्रत्येक क्षेत्रातला पहिलेपणाचा मान ते बंगालकडे घेतात. मला त्याचे अजिबात दुःख नाही. कदाचित् ही खोड इतर प्रांतांतल्या लोकांनाही असेल. कारण मराठीतला आद्य नाटककार देखील गोव्यातला की वऱ्हाडातला की सांगलीचा याबद्दलही वाद आहेच. किंबहुना मराठीतले सारेच आद्य कर्नाटकातले आहे असाही एक दावा मांडलेला मी वाचला आहे. त्यामुळे सत्येन्द्रनाथ पहिले आय्.सी.एस्. असण्याला माझा विरोध नव्हता. पण लेबू-दानी जेव्हा त्यांची सारी कारकीर्द जुन्या मुम्बई इलाख्यात गेल्याचे सांगितले तेव्हा - कुतूहल उत्पन्न झाले. मग लेबू-दांनी त्यांनी लिहिलेले 'आमार बाम्बाई प्रवास' - हे पुस्तक वाचायची भलामण केली, आणि लायब्ररीतून मी ते पुस्तक आणवले.

बंगालीत प्रवास याचा अर्थ 'दूर देशातले वास्तव्य' असा होतो. आणि ज्याला आपण प्रवास म्हणतो त्याला बंगालीत यात्रा म्हणतात. उच्चार 'जात्रा'. म्हणूनच गावोगावी भटकत नाटके करणाऱ्या नाटक कंपन्या ह्या जात्रा-कंपन्या ! भाषाभाषांच्या लीला अगाध असतात. बंगालीत 'सत्कार' म्हणजे अंत्यसंस्कार ! 'विचार' म्हणजे न्यायालयातला खटला, 'व्याख्या' म्हणजे स्पष्टीकरण, 'बंधू' म्हणजे मित्र आणि बायका एकमेकींशी अधिक आपुलकीने बोलताना 'भाई' म्हणतात ! 'आमार बाम्बाई प्रवास' वाचायला सुरुवात करताना पहिली ठेच 'प्रवासा'तच लागली. सत्येन्द्रनाथांनी मराठी अर्थाने मुंबईचा प्रवास केला होता. पण नोकरीतले आयुष्य इथे आपल्या देशापासून इतक्या दूर घालवले होते म्हणून 'प्रवास' !

गेल्या शतकातील मुंबईचे आणि मुंबई इलाख्याचे हे वर्णन आहे. त्यावेळी मुंबई इलाख्यात महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि सिंध असे चार प्रांत होते. जवळजवळ शंभर वर्षांपूर्वीची मुंबई. माडगावकरांच्या मुंबई शहर-वर्णनासारखे ह्या पुस्तकातले जुन्या मुंबईचे वर्णन एका बुद्धिमान बंगाली माणसाच्या दृष्टिकोनातून वाचताना मजा वाटली. डॉ. भाऊ दाजी लाड, जमशेदजी जिजीभाई, जगन्नाथ शंकरशेट, डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर हे त्यावेळचे सत्येन्द्रनाथांच्या भाषेत सांगायचे म्हणजे 'ख्यातनामा लोक'. त्यांच्याशी सत्येन्द्रनाथांचा साक्षात् परिचय होता. त्याकाळी बंगालातल्या तमाम भद्रमहिला पडदानशीन असत. मुंबईत मोकळेपणाने फिरायला जाणाऱ्या स्त्रिया पाहून त्यांनी लिहिले आहे, "मुंबईत ठिकठिकाणी चांगल्या घरांतल्या स्त्रिया मोकळेपणाने हिंडताना

आढळतात. ह्या बाबतीत मुंबई आणि कलकत्त्यात किती भयानक अंतर. (भयानक प्रभेद!) बंगालातली नारिवर्जित जनता किती अप्रिय दर्शन. केवळ पारशी स्त्रियाच नव्हेत तर कपाळावर कुंकुमतिलक लावलेल्या मराठी युवती देखील कशा प्रसन्न चित्ताने वावरत असतात.'' मराठी स्त्रियांना मिळालेले हे स्वातंत्र्य पाहून त्यांनी एक जुने शास्त्रवचन दिले आहे. घरात पुरुष मंडळीच्या पाहाऱ्यात राहणारी स्त्री ही अरक्षिता असते. 'आत्मानमात्मना यास्तु रक्षे युक्ता सुरक्षिता.'

सत्येन्द्रनाथ हे पहिले आय्.सी.एस्. होते की नव्हते कोण जाणे; पण स्वतःच्या पत्नीला घेऊन कलकत्त्यात फिरायला जाणारे मात्र ते पहिले बंगाली गृहस्थ! सनातनी वंगबंधूंनी ह्या असल्या थिल्लरपणाबद्दल त्यांच्याविरुद्ध आग पाखडली होती. त्यांनी मराठी बायकांच्या नऊवारी साडीचेही खूप कौतुक केले आहे. बंगाली बायका डोकीवरून पदर घेत असल्यामुळे, 'खोला माथाय' चक्राकार खोपा घालून, सुवर्णालंकार आणि वेण्या माळून रस्त्याने जाणाऱ्या 'माराठी महिला' दिसल्या की, त्यांना नवल वाटे. कासोटा घालण्याची पद्धत 'माराठी वीरांगना अश्वारोहण ' करीत असल्यामुळे आली असे त्यांनी म्हटले आहे. ह्या पुस्तकातून अव्वल इंग्रजीतल्या गुजरातचे आणि महाराष्ट्राचे मजेदार दर्शन घडते. बाळशास्त्री जांभेकरांचा तर त्यांनी 'उन्नतचेता महापुरुष' असा उल्लेख केला आहे.

पारशी ही त्या काळातल्या मुंबईतली फार महत्त्वाची जमात. सत्येन्द्रनाथ प्रथम मुंबईत आले ते माणेकजी नावाच्या कोणा धनवान पारशाच्या बंगल्यात उतरले. सदैव इंग्रज गव्हर्नर, कलेक्टर किंवा मोठमोठ्या संस्थानिकांच्या आणि आपल्या परिचयाच्या कथा सांगणाऱ्या आणि युरोपयात्रेचे पुराण लावणाऱ्या ह्या माणेकजीचे फार सुरेख शब्दचित्र त्यांनी काढले आहे. 'पारशी' म्हटल्यावर जुन्या मुंबईकरांच्या डोळ्यापुढे जो एक मनुष्यविशेषातला खास नमुना उभा राहतो, त्यातला हा माणेकजी. प्रेमळ, चक्रम, उदार त्याबरोबर नाही तो हट्ट धरणारा, 'साहेब' आणि त्याची संस्कृती यांबद्दल अपरंपार प्रेम पण घरात कमालीचा धर्मभोळा असा हा माणेकजी. फ्रियर नावाच्या गव्हर्नरने त्याला 'अपदस्थ' केल्यावर ह्या माणेकजीने त्या गव्हर्नरविरुद्ध लंडनला हाउस ऑफ लॉर्डसपर्यंत जाऊन कज्जा लढवला आणि नोकरी परत मिळवली. त्या काळी मुंबईचा सारा व्यापार पारशी आणि भाटिये लोकांच्या हातात होता. ''मराठी लोक हे वाणिज्य व्यवसायात 'सुदक्ष' नव्हते. ह्या बाबतीत बंगाल्यासारखेच.'' हे वाक्य वाचल्यावर सत्येन्द्रनाथांनाही एखाद्या तत्कालीन मराठी दुकानदाराने 'घ्यायचं तर घ्या नाही तर उतरा' असा हिसका दाखवला असावा, अशी मला जाता जाता शंका आली. ''मराठी लोक पूर्वी असि-जीवी होते ते आता मसि-जीवी झाले आहेत.'' ह्या एका वाक्यात सत्येन्द्रनाथांनी मराठी

लोकांच्या वृत्तिपरिवर्तनाचे वर्णन केले आहे. शत्रूच्या रक्तावर जगणारे मराठे शाईवर जगू लागले याचे त्यांना दुःखही आहे. कारण 'मराठा' म्हटल्यावर बंगाली माणसापुढे लढवय्याचे चित्र उभे राह्यचे. ती सगळी मंडळी त्यांच्या कलेक्टर कचेरीत 'भाऊसाहेब' केव्हा होतो, याची वाट पाहात किंवा 'बीइंग गिव्हन टु अंडरस्टॅंड'चे अर्ज घेऊन तिष्ठत उभी राहात असतील, असे कलकत्ता सोडताना त्यांना निश्चित वाटले नसेल.

तत्कालीन पुण्याचे, साताऱ्याचे, सोलापूरचे, कारवारचे ह्या पुस्तकात सुंदर वर्णन आहे. एकतर हे टागोर कुटुंबच कलाप्रिय, रसिक, ज्ञानोपासनेची परंपरा असलेले. त्यात सत्येन्द्रनाथ हे अत्यंत बुद्धिमान. त्यामुळे मराठी जीवनातील कितीतरी अंगे त्यांनी पाहिली. कारवारच्या सुंदर समुद्रकिनाऱ्याच्या वर्णनाइतकेच सोलापूरच्या वारदांच्या वैभवाचे वर्णन मार्मिक आहे. पुण्यातल्या डेक्कन कॉलेजविषयी आणि तत्कालीन अभ्यासू पंडितांविषयी केवढ्या गौरवाने लिहिले आहे. मराठीचा तर त्यांनी इतक्या बारकाईने अभ्यास केला होता की, तुकोबाच्या काही अभंगांचे त्यांनी कमालीच्या सुबोध बंगालीत वृत्तबद्ध भाषांतर केले आहे. मला त्यांचे महत्त्व पहिले आय्.सी.एस्. म्हणून वाटत नाही. सुशिक्षित वंग समाजाचे महाराष्ट्राकडे लक्ष वेधणारे, मराठी संस्कृतीचा, परंपरांचा सुंदर आलेख त्यांच्यापुढे उभा करून 'मराठी' माणसाची बंगालला ओळख करून देणारे पहिले बंगाली म्हणून त्यांचे महत्त्व अधिक वाटते. पण त्याहूनही आणखी एक मोठे कार्य सत्येन्द्रनाथांच्या महाराष्ट्र-प्रेमामुळे झाले. ते म्हणजे खुद्द रवीन्द्रनाथांचा महाराष्ट्राशी परिचय घडवून आणून देण्याचे.

सुशिक्षित मराठी कुटुंबांतून स्त्रीपुरुषांमधील मोकळेपणाचे वागणे हे सत्येन्द्रनाथांना अतिशय अनुकरणीय वाटत होते. आप्तस्वकीयांच्या मेळाव्यात मराठी स्त्रिया उगीचच खोट्या संकोचाने वागत नाहीत. लाजऱ्याबुजऱ्या असल्या किंवा पाश्चात्य बायकांइतक्या पुरुषी धिटाईने वागत नसल्या तरी राजेरजवाडे आणि सरदार जहागिरदारांची कुटुंबे वगळली तर मराठी स्त्रिया कधी पडद्याआड नव्हत्या. मुंबईतल्या ब्राह्मणच नव्हे, तर मराठा कुटुंबातल्या बायका देखील पडदानशीन नव्हत्या. बंगालात मात्र अंतःपुर असायचे. त्यामुळे तरुण रवीन्द्रांना विलायतेत संमिश्र समाजात मोकळेपणाने वागता यावे, त्यांचा बुजरेपणा जावा म्हणून सत्येन्द्रनाथांनी त्यांना मुंबईतल्या तर्खड कुटुंबात आणून ठेवले. तर्खडांच्या अन्नपूर्णेने रवीबाबूला 'धीट' केले. पडद्याआड राहणाऱ्या बंगाली भद्रमहिलांच्या अंतःपुरात दिदी-मा, काकी-मा, मेज बौ, बडी बौ - ह्या महिलांच्या दालनांतून संकोचाने वावरणाऱ्या बुजऱ्या रवीची आणि मनमोकळ्या ॲना तर्खडची मैत्री हे रवीन्द्रांच्या जीवनात यौवनाच्या उंबरठ्यावर घडलेले चिमुकलेच पण मनोहर पर्व आहे.

रवीन्द्रांचे वय त्या वेळी अवघे अठरा वर्षांचे. किशोर कवी रविबाबूच्या कविता ऐकताना ॲना मुग्ध होऊन जाई. तिला बंगाली येत नसे. रवीन्द्र तिला इंग्रजीतून भाषांतर करून सांगत. एकदा अन्नपूर्णेने आग्रह धरला, 'मला छानसे नाव द्या.' रवीन्द्रांनी तिचे नाव ठेवले 'नलिनी.' ते नाव गुंफून एक सुंदर कविता लिहिली. 'शून नलिनी खोल गो आंखी...' स्वतःचे रवी आणि ॲनाचे त्यांनी ठेवलेले 'नलिनी' हे नाव ह्यांच्यात एक मोठा सूचक श्लेष होता.

*...ऊठ नलिनी, उघड नयन,*
*अजुन नाही का सरली नीज ?*
*तुझ्या दारी पाहा -*
*तुझा रवी आला आहे -*
*निर्मल तलावाच्या आरशात तुझी*
*अप्रूप रूपराशी पाहा...*

...मोठे नाजूक गीत आहे हे ! ॲना अतिशय सुंदर होती. हुशार होती. दोघेही समवयस्क. रविबाबूची गाणी ऐकताना एकदा ॲना म्हणाली, "तुमची गाणी ऐकताना मला असं वाटतं की, मृत्युशय्येवर असताना जरी तुमचं गाणं कानी पडलं तर पुन्हा जिवंत होऊन उठेन." ॲनाचे पुढे एका इंग्रजाशी लग्न झाले आणि अल्पवयातच ती वारली. वृद्धापकाळीदेखील रवीन्द्रांना तिचे विस्मरण झाले नाही. खूप उतारवयात लिहिलेल्या आपल्या जीवनस्मृतीत तिच्या सहवासातल्या दिवसांचा टागोरांनी अतिशय हळुवारपणे उल्लेख केला आहे.

सत्येन्द्रनाथांमुळे टागोर कारवारला जाऊन राहिले. तिथल्या समुद्रकिनाऱ्याने त्यांना वेडे केले होते. 'राजा आणि राणी' हे नाटक त्यांनी सोलापूरात लिहिले. मुक्तपणाने आपले विचार मांडणारी त्यांनी पहिली बंडखोर स्त्री पाहिली तीही महाराष्ट्रात. पुण्यात ते पंडिता रमाबाईंचे भाषण ऐकायला गेले होते. 'स्त्रियांचे हक्क आणि सामर्थ्य' ह्या विषयावरचे त्या तेजस्वी मराठी पंडितेचे विचार 'मराठी वीरपुरुषां'नादेखील कसे सहन झाले नाहीत हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले आणि 'त्या अबलेचा क्षीण कंठस्वर तर्जनगर्जन करून गाडून टाकून जितं मया म्हणून घरी ओरडत गेलेले पराक्रमी पुरुष (?) पाहून स्त्रीशिक्षण आणि स्त्रियांचे मुक्ती आंदोलन करण्याची स्फूर्ती' त्यांना लाभली. कोवळ्या वयात त्यांना लाभलेल्या तर्खडांच्या कुटुंबातल्या आपुलकीमुळे त्यांच्या मनात महाराष्ट्र आणि मराठी माणसांविषयी जिव्हाळा होता. सत्येन्द्रनाथांमुळे मराठी संतकवींच्या काव्यपरंपरेची त्यांना ओळख झाली होती. लोकमान्यांना सहा वर्षांची शिक्षा झाल्यावर त्यांनी कलकत्त्यात

निषेधाची प्रचंड सभा घेतली आणि 'पथ आणि पाथेय' असा विषय घेऊन ब्रिटिशांच्या राजनीतीची धिंड काढली. वंगभंगाच्या चळवळीच्या वेळचे रवीन्द्रांचे गीत होते —

*माराठीर साथे आजि हे बांगाली*
*एक कंठे बोलो,*
*जयतु शिवाजी.*

'शिवाजी उत्सव' ही रवीन्द्रांची एक अत्यंत तेजस्वी कविता आहे. शिवगौरवाचा एक एक शब्द आगीच्या ठिणगीसारखा उडाला आहे. मूळ बंगालीतून मी ही कविता वाचली आणि वाटले की, व्याकरण, विभक्तिप्रत्यय, काळ, क्रिया, धातुसाधिते ह्या नाना तापत्रयाशी केलेल्या झटापटीचे सार्थक झाले. रवीन्द्रांची रविकिरणांसारखी सप्तरंगी प्रतिभा. परंतु सात्त्विक संतापाने ज्या वेळी हा महाकवी उफाळून उठतो त्या वेळी त्याचे गद्य काय नि पद्य काय ऋषिवाणीसारखे गर्जना करून उठत असते. अमकी कविता तात्कालिक आहे, अमक्यात काव्याची 'डेप्थ' नसून गीताची मांडणीच आहे, असल्या किरकिऱ्या समीक्षेची अशा वेळी कीव येते. प्रश्न विषयाचा नसतो, काळाचा नसतो, प्रश्न असतो तो त्या प्रतिभेच्या जातीचा ! विजेसारखी प्रतिभा असली म्हणजे तिने दाहक भट्टी पेटवली काय किंवा गार करणारा पंखा फिरवला काय त्यामागल्या सामर्थ्याची, त्या 'व्होल्टेज्'ची कल्पना आल्याशिवाय राहात नाही. दुबळ्या हाती संतापसुद्धा दगड लागलेल्या कुत्र्याच्या पिलाच्या 'क्यँव क्यँव'सारखाच वाटतो. शिवाजी महाराजांना उद्देशून रवीन्द्रांनी म्हटले आहे,

*'हे राजतपस्वी वीरा, तुझी ती उदात्त भावना —*
*भरून राहिली आहे असंख्य भांडारांतून,*
*त्यांतला एक कणदेखील काळाला नष्ट करता येणार नाही.'*

— ह्या ओळी वाचताना ह्या तपस्वी कवीच्या काव्याविषयीदेखील असेच म्हणावेसे वाटते की, 'तुझ्या काव्याचे कुंभदेखील असंख्य हृदयांत असेच साठून राहिले आहेत - त्यातला एक थेंबदेखील काळाला नष्ट करता येणार नाही.'

फार वर्षांपूर्वी कुसुमाग्रजांच्या

*कशास आई भिजविसि डोळे उजळ तुझे भाळ ।*
*रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल ।*
*सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते ।*
*उठतिल त्या ज्वालांतुनि भावी क्रांतीचे नेते ।*

ह्या ओळी म्हणताना अंग कसे सरसरून आले होते. तो अनुभव आजही शिळा वाटत नाही. टागोरांची शिवाजीमहाराजांवरची कविता वाचताना अंगावर काटा फुलत होता. एक तर 'शिवाजी' ही मराठी मनाला जडलेली व्याधीच आहे ! त्यातून आम्हाला सुटका नाही. सुटका नकोही आहे ! एका नव्याने शिकलेल्या भाषेतून एका अलौकिक कवीने लिहिलेल्या त्या ओळी वाचताना निराळाच थ्रिल् वाटत होता.

*'तोमार शे प्राणोत्सर्ग,*
*स्वदेश लक्ष्मीर पूजाघरे,*
*शे सत्यसाधन,*
*के जानितो होये गेछे*
*चिर युगयुगान्तर तरे भारतेर धन...*

स्वदेश लक्ष्मीच्या गाभाऱ्यात वाहिलेले तुझे प्राण, तुझी ती सत्यसाधना भारताची चिरयुगयुगांतराची धनसंपदा झाली आहे.'

— महाराजांच्या कृष्णा घोडीसारख्या टापा उडवत गेलेल्या ह्या ओळी मूळ बंगालीतून वाचताना वाटले की, याचिसाठी केला होता अट्टाहास !





एकदा बंगाली वाचून समजायला लागल्यावर माझी अवस्था नवी कुऱ्हाड गवसलेल्या, त्या लहानपणीच्या शाळेतल्या धड्यातल्या छोट्या जॉर्ज वाशिंग्टनसारखी झाली. 'अहो मला वाचता येतंय्' म्हणणाऱ्या दिवाकरांच्या अविस्मरणीय नाट्यछटेतल्या मुलासारखे जे दिसेल ते वाचत सुटायचा मी सपाटा लावला. रवीन्द्रनाथांची ग्रंथरचना पाहून तर छातीच दबली. त्यांची साहित्यनिर्मिती इतकी विविध आणि विपुल की एवढे लिहायला त्यांना सवड तरी कधी मिळाली ते कळले नाही. जिथे रवी पोहचत नाही तिथे कवी पोहोचतो म्हणतात. पण ही म्हण प्रत्यक्षात खरी करून दाखवणारे रवीन्द्रनाथ हे एकच कवी असावेत ! महाभारतापासून मलेरिया निर्मूलनापर्यन्त असंख्य विषयांवर त्यांनी लिहिले. जवळजवळ तीन हजार गीते स्वरलिपीसह बंगालला दिली. नाटके, कथा, कादंबऱ्या, प्रवासवर्णने, निबंध. नुसती पत्रे लिहिली ती देखील हजारोंच्या संख्येने ! नृत्य, नाटके बसवली. त्यांत भूमिका केल्या, गायले. एवढ्याने भागले नाही म्हणून शेकड्यांनी चित्रे काढली. विश्वभारतीसारखी 'वन्-मॅन्-युनेस्को' उभी केली. ग्रामोद्योग, शेती, हॅण्डीक्राफ्टस्, वैद्यकी, राष्ट्रीय आंदोलनात भाषणे, नव्या नव्या इमारती बांधणे आणि सतत पायाला चक्र लावल्यासारखा

जगभर प्रवास. इंग्रज, फ्रेन्च, पोर्तुगीज, स्पॅनिश, डच यांच्यासारख्या साम्राज्यवादी युरोपिअनांच्या आधिपत्याखाली गुलामांचे जिणे जगलेल्या, सत्व हरवलेल्या भारतालाच नव्हे तर साऱ्या आशिया खंडाला त्याचा हरवलेला 'आत्मा' शोधून दिला.

बंगालला तर टागोरांनी नवी बंगाली भाषाच दिली. कृत्रिमतेच्या बंधनात अडकलेल्या साधु किंवा पंडिती भाषेचे 'चलित' स्वरूपात रूपांतर करून तिच्यात नवे चैतन्य आणले. टागोरांची थोरवी नव्याने सांगायला हवी असे नसले तरी त्यांच्या प्रतिभेची उंची आणि व्याप्ती बंगाली भाषेशी परिचय झाल्याखेरीज लक्षात येत नाही. शिवाय त्यांचे ते भव्य आणि सुन्दर दर्शन, गायन-नृत्य-नाटक यांच्याशी असलेले साहचर्य यामुळे ह्या माणसाच्या आयुष्यात त्याला विपरीत परिस्थितीशी झगडावे लागले असेल, बंडे करावी लागली असतील याची कल्पनाही पुष्कळांना येत नाही. परकीय आणि स्वकीय दोघांच्याही विरोधाला तोंड देत त्यांनी मार्ग काढला आहे.

रवीन्द्रांच्या नाटकांशी आणि काही कवितांशी माझी भाषांतरातून ओळख होती. पण त्यांचे हे नाना विषयांवरचे लेख वाचताना कॅलिडिओस्कोपमधून हजारो रंगाकृती पाहिल्यासारखे वाटत होते. वयाची पंचाहत्तरी उलटली तरी लेखनात खंड पडला नव्हता. 'नित्य नवा दिवस जागृतीचा'. अखेरच्या दिवसापर्यंत जगाकडे लहान मुलाच्या कुतुहलाने आणि जिज्ञासेने पाहणारा हा महामानव. जीवनाकडून घेण्याची आणि घेतलेले ज्ञान समाजपुरुषाला सव्याज परत फेडण्याची इतकी धडपड आधुनिक भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासातदेखील कुठल्या महापुरुषाच्या जीवनात आढळेल की नाही कोण जाणे ! आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात लिहिलेली नाटके पुन्हा परिष्कृत करून, सुधारून, बदलून अधिकाधिक चांगली करण्याची त्यांची जिद्द लोकविलक्षण. त्यांना म्हणे चार-पाच तासांची झोप पुरत असे. झोपेवर प्रेम नसणारा हा एकमेव महान् बंगाली अपवाद ! कधी कधी अठरा तास लेखन करीत. वृद्धापकाळात तर ह्या श्रमांमुळे त्यांना मूर्च्छाही येई असे म्हणतात. पण थांबून राहाणे हे त्यांना ठाऊकच नसावे.

टागोरांच्या कथा किंवा कवितांप्रमाणेच त्यांचे वैचारिक निबंध वाचणे ही केवळ ज्ञानाचीच नव्हे तर सौंदर्याची अनुभूती आहे. भृगुसंहितेत म्हणे लाखो लोकांच्या कुंडल्या आणि भविष्य वर्तवलेले असते. टागोरांच्या उद्‌गारांतून कित्येकदा अशी भविष्यवाणी आढळते. देशाची भाषा एक झाली म्हणजे ऐक्य नांदेल अशी एक समजूत आहे. हिंदीचा आग्रह धरताना हे मत नेहमीच व्यक्त करतात. टागोरांनी म्हटले आहे - ऐक्याचा भाषेशी

काय संबंध ? राष्ट्राची भाषा एक करण्याने फार तर युनिफॉर्मिटी येईल. युनिटी ही गोष्ट निराळी आहे. 'ऐक्य कर्मेरमध्ये', 'ऐक्य कर्मात असते'. आम्ही 'कर्मदरिद्री' म्हणून भांडतो ! टागोरांचा विज्ञानावर नितान्त विश्वास. विज्ञानाची उपासना म्हणजे निसर्गाचे नियम समजावून घेणे, भौतिक सृष्टीशी संबंध दृढ करणे. आणि म्हणूनच कवी असूनही केवळ भावना चेतवणारे राजकारण त्यांना मान्य नव्हते. गांधींच्या चरख्याच्या आग्रहाला, त्यांनी हा आग्रह विवेकाला गौण मानणारा आहे म्हणून विरोध केला. सत्याचा शोध ही घाऊक रीतीने करायची चळवळ नाही असे त्यांचे ठाम मत होते. त्यांना अहिंसेचे सैन्यदेखील इतर सैन्यासारखे शिस्तीतूनच तयार व्हायला हवे होते. सत्याग्रहाची सामुदायिक चळवळ ही बाजारबुणग्यांची चळवळ होईल, शाळा कॉलेजे सोडण्याच्या आदेशातून ज्ञानाचाच विद्वेष सुरू होईल आणि मग अडाण्यांच्या स्वराज्यात अंधश्रद्धा, विवेकशून्यता, बुद्धिभेद यांचा धुमाकूळ माजेल हा इशारा त्यांनी प्रक्षुब्ध लोकमताची पर्वा न करता दिला होता. 'केवळ हृदय आणि बुद्धीच नव्हे तर जोडीला कर्म हवे - ते कर्म बुद्धीच्या निकषावर घासून घ्यावे आणि सहृदयतेने करावे -' म्हणणारे टागोर अशा वेळी लोकमान्यांच्या किती जवळ येतात. "ह्या राजकारणाची जबाबदारी घेतली नसती तर मी गणिताच्या अभ्यासात रंगलो असतो" म्हणणारे टिळक आणि "मी अनेक गोष्टीत रस घेतो - अनेक कार्यात भाग घ्यावा लागतो - पण मी खरा फक्त कवी !" म्हणणारे टागोर. दोघांनीही जीवनातले श्रेयस आणि प्रेयस ह्यांचा काय सुन्दर तोल साधला ! ब्रिटिश सत्तेशी लढा, असहकाराची चळवळ, तुरुंगवास, गीतारहस्य, आर्क्टिक होम इन् द वेदाज् आणि जनसाधारणासाठी किर्लोस्कर नाटक मंडळी, सार्वजनिक गणेशोत्सव अशा साधनांची अनेकता घेऊन समाजातले असाधारण आणि साधारण ह्या दोघांनाही बरोबर घेऊन जाणारे लोकमान्य. लोकमान्यांविषयी त्यांना इतका आदर की लोकमान्यांचा उल्लेख त्यांनी नेहमी 'तिलकमहाराज' असाच केला आहे. तेव्हापासून बंगालांत तिलकमहाराज असाच त्यांचा उल्लेख होतो. नृत्यसंगीताच्या जोडीला शेतीचे प्रयोग, साम्राज्यशाहीला विरोध करणारे आणि त्या काळी चीनवर बलात्कार करणाऱ्या जपानला, त्यांच्या देशातल्या स्वागत-समारंभाच्या वेळी ही साम्राज्यपिपासा बरी नव्हे असे बजावून, तिथल्या तिथे कानउघाडणी करून त्या लोकांचा रोष ओढवून घेणारे रवीन्द्रनाथ. त्यांची यापूर्वी मी कधीही न पाहिलेली स्वरूपे त्यांच्या बंगाली लेखांतून मी प्रथमच पाहात होतो. ह्या महापुरुषाच्या अशरीरिणी प्रतिभेच्या सहवासात मनाचे मालिन्य झडत होते.

ऋतुचक्राचे यापूर्वी क्वचितच अनुभवलेले परिवर्तन पाहात शांतिनिकेतनाच्या त्या परिसरातून हिंडताना गुरुदेवांच्या सुन्दर सुन्दर कल्पनांनी धरलेले आकार डोळ्यापुढे येत असत. तिबेटी वेशभूषा केलेले एखादे लामा वाचनालयातून बाहेर पडताना भेटायचे.

आणि बुद्ध कालानंतर भारताच्या इतर आशिया खंडाशी तुटलेल्या नात्याची साखळी गुरुदेवांनी जोडल्याचे स्मरण व्हायचें. एके काळी बुद्धदेवाचा धर्मचक्रपरिवर्तनाचा मंत्र घेऊन भारतातले अगणित भिक्षू जपानपर्यन्त गेले. कित्येक शतके ते नाते तुटले होते. गुरुदेवांनी ते देश पालथे घातले. तिबेट, चीन, सयाम, कांबोडिया ह्या आशियाई देशांतल्या विद्वानांना शांतिनिकेतनात आमंत्रण दिले. चीन-भवन उभे केले. भारतातल्या सरकारी विद्यापीठांपैकी कुठल्याही विद्यापीठात ह्या देशातल्या भाषा आणि संस्कृतीचा अभ्यास नव्हता. आमच्या मुम्बई विद्यापीठासारख्या 'साहेबी' विद्यापीठाला तर अजूनही आशियाई संस्कृतीच्या अभ्यासाची विद्यार्थ्यांच्यात गोडी उत्पन्न करावी असे वाटत नाही ! रवीन्द्रनाथांनी स्वतःच्या हिमतीवर जपानच्या राजप्रासादापासून ते अरबी वाळवंटातल्या बदायुनांच्या राहुट्यांपर्यन्त सगळीकडे संचार केला. आणि साऱ्या गुलाम आशियाला त्या साम्राज्यशहांच्या जोखडामुळे आलेला न्यूनगंड बाजूला सारून निर्भयतेने जगण्याचे आवाहन केले. 'हे अमृताच्या पुत्रांनो-' ही वेदकालीन ऋषींची साद त्यांच्या कानावर पोहोचवली. हतवीर्य आशियाई लोकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. एखादा तिबेटी लामा पुढून गेला की, गुरुदेवांचे हे कर्तृत्व समूर्त होऊन पुढे चालते आहे असे मला वाटे. मणिपुरात रवीन्द्रनाथ गेले होते. तिथल्या गोपालकृष्णाच्या मंदिरात मणिपुरी नृत्याचा सोहळा पाहिला. आपल्या बागेसाठी रोपटे आणावे तसे तिथून दोघा मणिपुरी नृत्यविशारदांना घेऊन आले. शांतिनिकेतनात मणिपुरी नृत्याचे शिक्षण सुरू झाले. आज भारतातल्या सर्वच प्रांतातल्या मुली मणिपुरी नृत्य करतात. परदेशात मणिपुरी नृत्य करणारांचे ताफे जातात. तिथल्या प्रेक्षकांना नाजूकतेची परिसीमा गाठणाऱ्या ह्या नृत्यलीलेने मुग्ध करतात. पण भगीरथाने हिमालयातून गंगा आणावी तशी गुरुदेवांनी ही नृत्यसलिला हिमालयाच्या कुशीतल्या यक्षभूमीतून इथे आणली. ईशान्येकडून मणिपुरी

नृत्य आणले तर नैर्ऋत्य दिशेहून कथाकली नृत्य शिकवणारे 'गुरु' शांतिनिकेतनात आले. बाली यवद्वीपाहून नृत्यनाटिका आणल्या. जपानमधून 'माळी' आणले. एखादी दक्ष गृहिणी जशी तीर्थयात्रा करीत हिंडत असतानाही आपल्या स्वैपाकघरासाठी पितळेची किसणी किंवा चांगल्याशा घाटाची कळशी वगैरे विकत आणते तसे रवीन्द्रनाथ देखील कुठेही हिंडत असले तरी त्यांची नजर इथून शांतिनिकेतनात काय नेता येईल ह्याकडे असे. शांतिनिकेतन हे विश्वनीड व्हावे - साऱ्या विश्वातल्या लोकांचे घरटे व्हावे ही त्यांची इच्छा. त्यामुळे साऱ्या जगात हिंडताना त्यांना भिन्न भिन्न भाषा, भूगोल आणि संस्कृतीत वाढणाऱ्या लोकांतून 'सारख्या पंखाचे पक्षी' दिसायचे.

आज पॅरिसमध्ये 'युनेस्को' आहे. जगभर शाखा आहेत. जगातल्या मोठमोठ्या देशांनी एकत्र येऊन सांस्कृतिक विकासासाठी उभी केलेली प्रचंड संस्था. कोट्यवधी रुपयांची शक्ती अंगात असलेली. मी पॅरिसला त्या संस्थेत दोन महिने शिष्यवृत्ती घेऊन राहिलो होतो. परंतु साधनांची आणि द्रव्याची इतकी विपुलता असलेल्या त्या संस्थेचे कार्य आणि पारतंत्र्यात असलेल्या देशातल्या नागरिकाला भोगाव्या लागणाऱ्या साऱ्या आपदा स्वीकारून रवीन्द्रांनी उभी केलेली ही विश्वभारती यांची तुलना केली तर 'युनेस्को' म्हणजे एक प्राणहीन अगडबंब धूड वाटते. गलेलठ्ठ पगाराच्या लोभाने जमलेले, कला, संस्कृती इत्यादींची पोपटपंची करणारे चतुर पंडित तिथे नुसत्या आरामात कामाचा देखावा मांडून बसलेले आहेत. त्याउलट रवीन्द्रांनी इथे चैतन्याने रसरसलेला यज्ञ उभारला होता. संस्कृतीचे एक अंग असे नव्हते की ज्याकडे रवीन्द्रांचे लक्ष गेले नाही. 'क्रियासिद्धीः सत्त्वे भवति महताम् नोऽपकरणे' म्हणजे काय हे पाह्यचे असेल तर रवीन्द्रांनी उभारलेल्या विश्वभारतीचा इतिहास पाहावा. ज्ञान आणि सौंदर्य, प्रतिभा आणि प्रज्ञा ह्यांची संगत जुळवणारा. तिथे माणसाला भयशून्य करण्याचे शिक्षण देण्याची धडपड होती. कारण ते स्वतः भयशून्य होते. टागोरांच्या स्वदेशप्रेमाविषयी आणि राज्यकर्त्यांचा रोष ओढवून घेण्याच्या तयारीविषयी आजच्या तरुण पिढीला फारशी माहिती नाही. कित्येक वेळा ह्या बाबतीत अपप्रचार करून त्यांची प्रतिमा डागाळण्याचाही प्रयत्न झाला आहे. 'जनगणमन' हे गीत त्यांनी ब्रिटिश सम्राटांच्या स्वागतासाठी रचले असाही आरोप झाला होता. एकोणिसशे नऊ साली जेव्हा सम्राटांचे युवराज, प्रिन्स ऑफ वेल्स ह्या देशात आले त्यावेळी त्यांच्या प्रचंड स्वागताची सक्ती झाली होती. आजही दुर्दैवाने सत्ताधीश मंत्र्यांचे बाजारपेठेतून सक्तीच्या वर्गण्या जमवून असेच प्रचंड स्वागत होते. बॅण्ड वाजंत्र्या लावून साठ बैलांच्या गाड्यांतून मिरवणुकाही काढतात. त्याविरुद्ध आपण आज स्वातंत्र्यकाळातदेखील ब्र काढू शकत नाही. मग पारतंत्र्यात काय असेल ? टागोरांनी त्या राजपुत्राचे स्वागत तर सोडाच, पण त्या सक्तीच्या स्वागताला वर्तमानपत्रातून जाहीर विरोध केला. त्यांनी लिहिले होते, "देवता असो की मानव असो जिथे केवळ प्रतापाचाच प्रकाश, बळाचे बाहुल्य, जिथे केवळ वेत, चाबूक, तुरुंगाची भीती, दंडधारी पोलिस, गोरे सार्जन्ट आणि गुरखा पलटणींचा प्रादुर्भाव, तिथे केवळ घाबरून, नतमस्तक होऊन वागणे ही आत्मवंचना आहे आणि अंतर्यामी ईश्वराची अवमानना आहे. या पलीकडे काहीही नाही-" निर्भयतेचे वस्तुपाठ गुरुदेव हे असे आपल्या करणीने छात्रांना देत असत. ते उत्तम गुरुजी होते; कारण ते उत्तम छात्र होते. साठी उलटल्यानंतरही त्यांनी संस्कृत भाषेच्या महापंडिताजवळ शिकवणीच्या विद्यार्थ्यासारखे बसून पुन्हा एकदा संस्कृत साहित्याचा अभ्यास सुरू केला होता.

'देखा', - 'पाहणे' - अशा शीर्षकाचा त्यांचा एक सुंदर निबंध आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की प्रकाश रोज रोज एकच संदेश घेऊन येत असतो, 'पाहा' ! बस्. एकवार न्याहाळून पाहा. प्रकाशाचे येण्याचे प्रयोजनच आपण पाहावे हे ! अन्तःचक्षूंनी वगैरे नव्हे. साध्या निसर्गदत्त डोळ्यांनी. विधात्याने हा जो काही सारा पसारा मांडला आहे तो काय उधळपट्टी करायची हौस म्हणून नव्हे. रोज इतका प्रकाश ओतला जातो तो काय केवळ सूर्यमाला तयार झाल्या म्हणूनच का ? हा सारा प्रकाश ओरडत असतो - की 'पाहा'. रोपटे त्या प्रकाशाकडे पाहात असते. पाहता पाहता, तो प्रकाश देहात साठवता साठवता एके दिवशी फूल उमलते. ते फूलही पाहू लागते. फळ पाहू लागते. त्याचे बीज जमिनीत जाते. प्रकाशाला भेटायची ओढ त्याला मातीतून वर ओढून आणते. असे हे पाहाणे. आकाशातल्या नक्षत्रलीलांपासून मलेरियांच्या डासांपर्यन्त टागोरांनी प्रत्येक गोष्ट अशी उत्कंठने पाहिली. रोपट्याच्या पाहण्यातून फूल यावे तशी त्यांची कविता आली. फुलाबरोबरच रंग यावा तसे उपजतानाच सूर घेऊन आली. टागोरांनी एका कवितेत म्हटले आहे - बाबांनो, मला मोक्ष कसा असतो ? कसा मिळतो ? हे असले काही विचारू नका. 'आमि तो साधक नई, आमि गुरू नई-' मी साधक नाही - गुरू नाही - मी कवी आहे. जमिनीच्या अगदी जवळ, ऐलतीरावरच्या, नावेच्या घाटावरचा. मी इहलोकवासी आहे. परलोकवासात काय असते ते मला विचारू नका म्हणणारा हा कवी. खरा क्रान्तदर्शी. पण कवी म्हणजे व्यवहारशून्य असाच सर्वसाधारण समज. सोयीसाठी डोळ्यावरून कातडे ओढीत जगणारांच्या जगात प्रत्येक गोष्ट डोळे उघडून पाहणाऱ्या रवीन्द्रांच्या, वेळोवेळी दिलेल्या धोक्याच्या इशाऱ्यांकडे व्यवहारी राजकारणी लोकांनी 'आहेत आपले कवी' म्हणून दुर्लक्ष केले. प्लेटोनेच मला वाटते आपल्या कल्पना-साम्राज्यातून कवींची हकालपट्टी केली होती. साम्राज्य स्थापन करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्यांना सत्यदर्शी कवी परवडणारच नाहीत. हुकूमशहा प्रथम गळे आवळतात ते स्वतंत्र प्रज्ञेने जगाकडे पाहणाऱ्या आणि सगळ्या मानवांच्या हृदयातली समान स्पंदने ओळखणाऱ्या कवींचे. सत्यशोधक ज्ञान आणि विज्ञानाच्या उपासकांचे. भासाचे ग्रंथ जाळले जातात, आइन्स्टाइनची हकालपट्टी होते ! ब्रिटिशांनी जालियाँवाला बागेत केलेल्या भीषण हत्याकाण्डाच्या निषेधार्थ टागोरांनी आपली 'सर' ही पदवी परत केली. त्यानंतर जेव्हा ते इंग्लंडात परत गेले त्या वेळी त्यांना एके काळी डोक्यावर घेऊन नाचलेल्या इंग्रज विद्वानांनी देखील वाळीत टाकले होते. पहिल्या इंग्लंड-यात्रेच्या वेळी त्यांची स्तुतिस्तोत्रे गाणारे ब्रिटिश कवी आणि सुहृद त्यांना शिष्टाचार म्हणून देखील भेटायला आले नाहीत. टागोर विश्वभारतीसाठी भिक्षापात्र घेऊन आयुष्यभर हिंडत असत. त्या पात्रात धनाढ्य अमेरिकेनेसुद्धा, 'राष्ट्रीयत्वाच्या संकुचित कल्पना सोडा.

साम्राज्यवादाचे दिवस संपले' हे सांगितल्याच्या अपराधाबद्दल निंदेचे गरळच ओतले. 'मा फलेषु कदाचन' म्हणून कर्मरत व्हायला सांगणाऱ्या तत्त्वज्ञानाचे आणि 'फलासाठी'च सर्व काही म्हणणाऱ्या प्रॅग्मॅटिझम नावाच्या जीवनप्रणालीचे पटायचे कसे ?

रवीन्द्रांच्या ह्या सत्कर्मयोगाच्या खुणा पाहात शांतिनिकेतनातून हिंडताना पुन्हा पुन्हा एकच विचार येई. आज ह्या साऱ्या कृती केवळ खुणा-प्रतीके होऊन राहिल्या नाहीत ना ? त्यांत प्राणाची फुंकर घालून ते निखारे पेटत ठेवणारे श्वास उरले आहेत का ? की त्या काळी लाभलेल्या गतीतून हा रथ नुसताच गतिक्रमाने घरंगळतो आहे ? रवींद्रांनी कविता लिहावी आणि नंदलालबाबूंनी तिला चित्ररूप द्यावे. रवीन्द्रांनी प्रकाशाचा किरण डोळ्यात टाकावा आणि राम किंकरदांनी दगडातून शिल्प उभारावे. गुरुदेवांनी नवीन नृत्य-नाटक लिहावे आणि छात्रछात्रींच्या पायांतून घुंगूर वाजू लागावे. 'एवढा मोठा नक्षत्रलोक त्याची जादू पोरांना कशी कळणार ?' असा नुसता निश्वास कानी पडावा आणि जगदानन्दबाबूंनी मुलांना हा खगोल समजावून देणारी एकापेक्षा एक सुंदर पुस्तके लिहावी. हिंदी साहित्याचे दालन मी सांभाळतो म्हणून डॉ. हजारीप्रसादांनी आयुष्य वेचावे, क्षितिमोहनबाबूंनी पांडित्याचे कलश भरून द्यावे, ॲण्ड्रयूजनी इंग्रजी साहित्यधन मोकळे करावे, एल्महर्स्ट साहेबांनी शेतीची नवी रीत सांगावी - सारा कसा महापूजेचा थाट. हे चैतन्य. ही तपस्येची ओढ. सत्कर्माचे मोहोळ तयार होत होते. आपापल्या विषयांत रमलेले आणि विद्यार्थ्यांना रमवणारे गुरुजन. आंधळ्या परंपरेच्या चिखलात बेडकासारखे रुतून न पडता सतत नव्या प्रकाशाच्या शोधात राहून सहस्त्र दलांनी विकसित होणारे हे शांतिनिकेतन नावाचे पद्म फुलत होते आणि नाना देशांतले भ्रमर इथे झेपावत होते. गुरुदेवांच्या कवितेतले भारततीर्थ इथे उभे राहिले होते.

पंजाब सिंध गुजरात मराठा द्राविड उत्कल वंग - असा एक प्रान्त नव्हता की जिथून इथे अध्यापक म्हणून किंवा छात्र म्हणून माणसे आली नव्हती. रवीन्द्रनाथांची भारत-तीर्थ ही प्रसिद्ध कविता आहे. तीत त्यांनी भारताविषयी म्हटले आहे -''माणसांचे हे प्रवाह इथे कोणाच्या आवाहनामुळे आले ते सांगणे अशक्य आहे. दुर्वार्यस्रोता सारखे - लोंढ्यासारखे माणसांचे लोंढे आले -'... ही कविता वाचताना माझ्या डोळ्यापुढे गुरुदेवांच्या काळातली विश्वभारतीच येत होती. जगाच्या चारी दिशांतून इथे माणसे येत होती. आणि शांतिनिकेतन हेच पुण्यतीर्थ झाले होते. आज तसे पाहिले तर सारे काही यथासांग चालू आहे. पण गुरुदेवांनी जशी त्या काळाची आव्हाने स्वीकारली तशी नव्या जमान्याची आव्हाने स्वीकारत, त्यातले खरोखरीच क्रांतिकारक कोणते आणि भ्रांतिजनित कोणते हे 'निकें सत्त्व निवडणारा', विद्यार्थ्यांना ज्याचे मौनसुद्धा व्याख्यान वाटावे असा इथे कोणी उरला नाही. महापुरुषाच्या कार्याचा उपसंहार हा नेहमी असाच का व्हावा ?

दोन तीन वर्षांपूर्वी मी सेवाग्रामात गेलो होतो. मला गोल्डस्मिथच्या 'डेझर्टेड व्हिलेज'ची आठवण झाली. गांधीजी असताना तिथे केवढा उत्साह होता. चैतन्याचा मळा फुलला होता. आता तिथली ती निर्मनुष्य निवासस्थाने आणि एका विझलेल्या यज्ञवेदीसारखे ते थंड पडलेले सेवाग्राम. शांतिनिकेतन सुदैवाने तसे थंड पडले नाही. पण त्याचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व होते, एक स्फूर्तिदायक निराळेपण होते, एक स्वतंत्र असा कलावंत मनाला साजून दिसणारा आग्रह होता - चाकोरी पडू न द्यायची दक्षता होती, नव निर्मितीची जिद्द होती, सर्वांत महत्त्वाचे म्हणजे - उद्याची चिन्ता न करता आपापल्या विषयात झोकून देण्याची ताकद असलेली माणसे होती. 'सिक्युरिटी' - 'उद्याची सोय' हा विचार आता उद्याचे स्वप्न ह्या विचारापेक्षा प्रबळ झाला आहे आणि आज विश्वभारती ही भारतातल्या इतर विद्यापीठासारखी मध्यवर्ती सरकारने चालवलेली सरकारमान्य पदव्या देणारी गिरणी झाली आहे.

'अचलायतन' नावाचे रवीन्द्रांचे एक नाटक आहे. मुक्त मानव होऊन जगू पाहणाऱ्या तरुणाचा, नियम-पोटनियम, शास्त्र, रूढी यांच्या संकेतांतून जाणाऱ्या शिक्षणसंस्थेत होणारा कोंडमारा त्यात त्यांनी दाखवला आहे. विद्येचे प्रयोजन विमुक्त करण्यात आहे हे विसरून वेळापत्रके, परीक्षा, ठराविक अभ्यासक्रम, शिस्त नावाच्या गोष्टींचा बाऊ ह्यातून मारून मुटकून एकाच छापाच्या मूर्ती घडवणाऱ्या शिक्षणाच्या कारखान्याविरूध्द त्या नायकाच्या मुखातून गुरुदेवांनी प्राणहीन यांत्रिक शिक्षण-पद्धतीविरुद्ध आपला आवाज उठवला. आपल्या साऱ्या शिक्षणसंस्था, त्यांतली गतिमानता जाऊन ती सारी अचलायताने झाली आहेत असे त्यांनी सुचवले आहे. विश्वभारतीत कुठलीही चाकोरी येऊ नये हा त्यांचा प्रयत्न होता. 'माणसांसाठी नियम - नियमासाठी माणूस नव्हे' हे केशवसुतानीही म्हटले आहे. 'व्यवस्थापक' आणि 'कलावंत' ह्यांच्यातला हा सनातन झगडा आहे! कारकुनी कसब हे चालत्या गाड्याला खीळ घालून आपले सामर्थ्य दाखवण्यात असते. पण व्यवस्थापक हा एक अपरिहार्य घटक असतो. आणि दारूच्या धुंदीपेक्षा कारकुनी शाईची धुंदी जबरदस्त असते. कलेच्या प्रगतीला हवे असते साहस! पण संस्थेत जेव्हा घटनेच्या चौकटीत जगण्याचे आणि नियम-पोटनियमांचे अन्वयार्थ लावण्याचे काम सुरू होते, त्या वेळी उरते एक प्राणहीन यांत्रिक क्रियापद्धती.

विश्वभारतीचे पुढेमागे असे होणार ही भीती गुरुदेवांना होती. 'शांतम् - शिवम् - अद्वैतम् हे निर्वासित होऊन जातील.' हे त्यांचेच उद्गार.

महिन्याभरातच विश्वभारतीत झालेल्या पदवीदान समारंभाच्या वेळी मला ती दुर्दैवी भविष्यवाणी खरी होणार असल्याची दुश्चिन्हे दिसायला लागली.



'रक्त करवी' - लाल कण्हेर हे टागोरांचे प्रसिद्ध नाटक. ह्या नाटकाची नायिका नंदिनी, राजाच्या विरुद्ध बंड करून उठलेली असते. सदैव चौकटीआड असणारा, प्रत्यक्षात न दिसणारा, परन्तु ज्याचे प्रजेची मने जखडून टाकणारे अस्तित्व मात्र सारखे भासत असते असा तो राजा. विश्वभारतीचा कारभार, घटनेच्या चौकटीचा तो सरकारी बडेजाव, ग्रंथालय आणि संगीत किंवा चित्रशाळेपेक्षाही अधिक मानाच्या स्थानी गेलेला तो कार्यकारी हिशेबनवीसांचा 'ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ब्लॉक' - हे सारे पाहून मला विश्वभारती ही त्या पोलादी चौकटीआडून सत्ता गाजवणाऱ्या राजाशी झुंजणाऱ्या नंदिनीसारखी वाटायला लागली. स्वच्छंदाने फुलू पाहाणारी लाल कण्हेर आणि जीवनातल्या साऱ्या सुन्दर आणि मुक्त आविष्काराच्या नाड्या आखडणारी लाल फीत ! जमिनीतून नवे नवे धान्य उगवावे त्या ऐवजी तिच्या पोटात गाडलेले मृत सुवर्ण खोदून काढणारा तो सुवर्णलोभी राजा ! आणि ज्ञानाच्या आणि कलेच्या विकासाऐवजी फक्त आपले आर्थिक स्थैर्य ह्या विषयाच्याच मागे लागलेला तो नवा अध्यापकवर्ग. 'शांतिनिकेतन' ही एक जीवनदृष्टी आहे असे मानणारे वृद्ध प्राध्यापक आणि नोकरीची जागा आहे म्हणणारे नवे लोक ह्यांच्यात संघर्ष सुरू झाला आहे. उदात्ततेचा ध्यास घेऊन

नवनिर्मितीसाठी ज्ञानाच्या आणि कलेच्या क्षेत्रात नवे कर्षण करण्याऐवजी आरामात जगण्याचे 'आकर्षण' हाच हेतू घेऊन जगणारे, भाडोत्री भावनेने तिथे आलेले अध्यापक. दोन मांजरांच्या भांडणात तराजू हाती असलेल्या माकडाने खवा खावा तसे सरकारी अनुदानाच्या खव्याचे मालक 'लालफीतवाले' झाले. उदात्त असंतोष गेला. पोटभरू कुरकुर सुरू झाली. चित्रापेक्षा चौकट मोठी मानणाऱ्या नोकरशाही राज्ययंत्रणेने ही प्रवृत्ती इथल्या प्राध्यापकांपर्यन्त नव्हे तर विद्यार्थ्यांपर्यन्त नेऊन सोडली.

पदवी-दानासारखा समारंभ. गुरु-देवांनी त्याची आखणी इतकी सुंदर केली आहे की, विश्वभारतीतला आतला असंतोष माहिती असूनही तो समारंभ पाहताना डोळ्याचे पारणे फिटले. भारताचे पंतप्रधान हे विश्वभारतीचे कुलाचार्य असतात. यंदा इंदिरा गांधी या आचार्या आणि डॉ. कालीदास भट्टाचार्य हे उपाचार्य. गेले काही दिवस आम्रकुंजात ह्या अनुष्ठानाची· तयारी चालली होती. कलाभवनातले छात्र आणि छात्री आपापल्या गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली आम्रकुंजात कुठल्या′ नव्या रंगवल्लिका (आल्पना) काढाव्या ह्यांच्या आकृती तयार करीत होत्या. संगीतभवनात दीक्षासमारंभाच्या वेळी म्हणण्यासाठी गुरुदेवांनी रचलेल्या गीतांच्या तालमी चालल्या होत्या. आम्रकुंजात मोहोराचा घमघमाट सुटला होता. वसंताच्या वैतालिकांचे तर सतत कूजन चाललेले असायचे. सावरी फुलली होती. पलाशाच्या डहाळ्यांवर भगव्या फुलांचे घोस फुलले होते. अंजनवृक्ष नीलांशुक ल्याले होते. आणि कधी नव्हे ते आश्रमाच्या परिसरात पोलिसांच्या गाड्यांची ये-जा सुरू झाली.

विश्वभारतीचा दीक्षान्त समारंभ. शांतिनिकेतनातील रहिवाश्यांनी दिवाळीसारखी पहाटे मंगलस्नाने केली. कलकत्त्याहूनही खूप पाहुणेमंडळी आली होती. सुस्नात, सुवसना महिलांची आणि धोतरे नेसून अंगात रेशमी किंवा पांढरे शुभ्र झब्बे चढवून अंगावर उत्तरीय घेऊन निघालेल्या भद्र लोकांची आम्रकुंजाकडे रीघ लागली होती. छात्रगणही धोतरात होता. पण ह्या साऱ्या सौंदर्याला पोलिस बंदोबस्ताचे गालबोट लागले होते. आश्रमात आणि थेट बोलपूरपर्यन्त इतके शस्त्रधारी आणि गणवेषधारी पोलिस दिसत होते की हा विश्वभारतीचा दीक्षान्त समारंभ आहे की पोलिसदिनाचा कार्यक्रम आहे असा प्रश्न पडावा.

जिथे सर्वांची चित्ते भयशून्य आहेत अशा भारताचे स्वप्न पाहणाऱ्या रवीन्द्रांच्या आश्रमात दीक्षाविधीसारख्या सुंदर समारंभाला पोलिसांनी ग्रहण लावले होते. बंगालची

राजकीय परिस्थिती स्फोटक. पंतप्रधानांच्या जिवाला अपाय झाला तर?

तो सारा मंगलविधी मांगल्याचे नाटक केल्यासारखा वाटत होता. वास्तविक किती सुंदर समारंभ. परतंत्र भारतात पदवीदान समारंभाला काळे झगे घालून आणि लॅटिनमधून मंत्र म्हणून इंग्रजांनी युरोपीय वळण दिले होते. ती पद्धती आजही आमच्या कित्येक विद्यापीठांना झुगारून देता आली नाही. आणि टागोरांनी इंग्रजी राजवटीतही पदवीदानाचा अस्सल भारतीय विधी सुरू केला होता. धोतर, उपरणे ह्या वेषात विद्यार्थी, रुंद लाल काठाच्या शुभ्र साड्या नेसून, केसात फुले माळून आलेल्या विद्यार्थिनी, वेदातला तो स्नातकांना केलेला उपदेश, त्याचे रवीन्द्रांनी बंगालीत केलेले भाषान्तर, भावी जीवनाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या तरुण-तरुणींना मंगल चिंतणारी, आशीर्वाद देणारी गुरुदेवांची गीते. मंचावर सुंदर पुष्परचना, धूपदीपाची प्रसन्नता. प्रत्येक स्नातक रंगमंचावर आला की, उपाचार्यांचे पदवंदन करीत होता. मग उपाचार्य जाईचे फूल चंदनाच्या गंधात बुडवून त्या विद्यार्थ्याला किंवा विद्यार्थिनीला तिलक लावीत होते. मग तो विद्यार्थी त्यांचा आशीर्वाद घेत असे. 'आचार्य' त्याच्या हाती पदवीचा कागद आणि सप्तपर्णी वृक्षाचे पान देत. महर्षी देवेन्द्रनाथांना परम आनंदाचे निधान जिथे गवसल्यासारखे वाटले तो हा सप्तपर्णीचा वृक्ष. नंतर कालीदासबाबूंनी बंगालीतून भाषण केले. फार सुंदर आणि हृदयस्पर्शी भाषण झाले त्यांचे. ह्या ज्ञानोपासकाला विश्वभारतीचा आत्मा हरवल्याचे दुःख होते. एक खोलवर गेलेली वेदनाच बोलत होती. तरुण प्राध्यापक म्हणत कालीदासबाबूंना ॲडमिनिस्ट्रेशन कळत नाही. त्यांना 'शासक' हवा होता. लोकांना शिस्तीच्या दावणीत बांधणारा रिंगमास्टर हवा होता. खरे सांगायचे म्हणजे ज्या कर्ममार्गावरून आपण चालतो आहो या मार्गावर प्रेमच नसलेल्यांना नेमके काय हवे असते ते त्यांचे त्यांना तरी कळते की नाही देव जाणे. कालीदासबाबूंचे त्या दिवशीचे भाषण निरोपाच्या सुरातले होते. त्यानंतर महिन्याभरातच त्यांनी आपल्या उपाचार्यपदाचा राजीनामा दिला. कालीदासबाबूंच्या भाषणानंतर इंदिराजी बोलल्या.

त्या तिथल्या माजी विद्यार्थिनी. जवाहरलाल नेहरूंवर टागोरांचे गाढ प्रेम. त्यांनी नेहरूंना ऋतुराज म्हटले होते. आश्चर्य असे की, इंदिराजींचे भाषण मात्र विद्यापीठाच्या 'आचार्यां'च्या भाषणासारखे उपदेशपर नव्हते. आपल्या किशोर वयातल्या आश्रमीय जीवनाचे त्यांना अपरिहार्यपणाने झालेले स्मरण. असाच वसंत फुलला होता आणि आपल्या आईवडलांसमवेत एका दौऱ्यावर बालपणी त्या वीरभूम जिल्ह्यातून हिंडल्या होत्या. घटकाभर असे वाटले की, तो आम्रकुंज, ती गीते, सुंदर वस्त्रे परिधान करून समोर बसलेले ते यौवन, रवीन्द्रांच्या मायेचे स्मरण ह्यामुळे पंतप्रधान इंदिरा गांधी क्षणभर

आपले पंतप्रधानपद, पोलिसांचा पहारा आणि 'हांजी-हांजी' इत्यादी विसंवादी गोष्टी विसरून जवाहरलाल नेहरूंनी जिला पत्रे पाठवली होती ती इंदिरा प्रियदर्शिनी झाली. राजकारणाच्या चिखलाखाली दडलेले शांतिनिकेतनातले सुंदर संस्कार घटकाभरासाठी का होईनात, परन्तु एखाद्या कमळासारखे फुलून वर आले. खरे खोटे कोणी शोधावे ? परन्तु त्या दिवशीचा त्यांचा 'परफॉर्मन्स' अतिशय हृदयस्पर्शी होता हे त्यांच्या विरोधकांनीही मान्य केले. ही जादू गुरुदेवांच्या शब्दसुरांनी भारलेल्या कवनांची होती, त्या सुंदर रंगवल्लिका आणि पुष्पसज्जेची होती की आम्रकुंजातल्या तरुवल्लीवर दाटलेल्या वसंतवैभवाची होती कोण जाणे ! माझ्या बाजूलाच एक पोलिस अधिकारी उभा होता. क्षणभर अंगावरच्या गणवेषाची गुर्मी विसरून तो म्हणाला, 'ओह, दारूण शुंदर !' कलकत्त्याच्या एका मातबर वर्तमानपत्राचे एक दोन वार्ताहर माझ्या परिचयाचे झाले होते. दुपारच्या लंचला त्यांनी मला बोलावले होते. मी सहज थट्टेने म्हणालो, "ज्या कुणी पंतप्रधानांना भाषण लिहून दिले असेल त्याचे अभिनंदन केले पाहिजे." "मग तुम्हाला पंतप्रधानांचेच अभिनंदन करावें लागेल. कारण मी भाषणाची प्रत मागायला गेलो तेव्हा मला कळले की, त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात भाषण लिहिल्यामुळे प्रती काढायला वेळ मिळाला नाही."

मला आश्चर्य वाटले आणि आनंदही झाला. फार दिवसांनी का होईना, त्या इथल्या आम्रकुंजात आल्या असतील. समारंभ चालू असताना जिथल्या एका झाडाखाली त्यांनी आपल्या मैत्रिणींशी किशोर वयातली हितगुजे केली असतील, त्या आम्रवृक्षाने त्यांना दुरून पालविले असेल. त्या आम्रकुंजातून छात्र-छात्रींचे कौतुक करीत, त्यांना गोष्टी सांगत, गाणी शिकवीत हिंडणाऱ्या गुरुदेवांची भव्य मूर्ती दिसू लागली असेल आणि ते 'ते हि नो दिवसा गताः' म्हणणाऱ्या रामासारखा त्यांनी टाकलेला निश्वास भाषण होऊन प्रकटला असेल. मला विश्वभारतीच्या स्थापनेच्या वेळी गुरुदेव म्हणाले होते ते पुन्हा आठवले, '...भारतवर्षात एखादे असेही स्थान असावे की जे राज्य आणि समाजाच्या बंधन पीडनाच्या बाहेरचे मानले जावे. इथे माणसाला देश कालातीत होऊन जगता यावे.'

इंदिरा गांधींच्या भाषणाचा त्या दिवशी लागलेला सूर पाहून असे वाटले की गुरुदेव गेले तरी तिथल्या आम्रकुंजामध्ये अजूनही माणसाला घटकाभर आपल्या अंतःकरणात डोकावून पाहायला लावण्याचे सामर्थ्य आहे. समारंभ संपल्यावर पुन्हा एकदा संरक्षक पोलिसांच्या पाहाऱ्यातून परतणाऱ्या इंदिरा गांधींकडे पाहाताना आम्रकुंजाच्या मोकळ्या वातावरणातून दिल्लीच्या राजप्रासादातल्या बंदिवासात निघालेल्या सत्तेच्या गुलामासारख्या मला त्या वाटल्या.

शांतिनिकेतनातील माझ्या वास्तव्यात मी बंगाली भाषेशी सलगी जमवीत होतोच. परंतु मुख्य म्हणजे जे दिसेल ते निरुद्देश पाहात होतो, ऐकत होतो. खूप हिंडत होतो. ह्या असल्या कार्यक्रमात सुरुवातीला सलीलची साथ होती. पण तो मुम्बईला परत गेल्यानंतरही मला तिथले काही मित्र लाभले होते त्यांच्या बरोबरही हाच कार्यक्रम चालू होता. कलाभवनाचे प्राचार्य दिनकर कौशिक हे संगीत आणि चित्रकला ह्या दोहोंचेही प्रेमी. स्वतः उत्तम चित्रकार. मूळचे पुण्याचे. त्यामुळे पान जमले. दिल्लीला ते होते तेव्हा ओझरता परिचय झाला होता. सुंदर आणि सौम्य व्यक्तिमत्त्वाचे दिनकरदा हे विद्यार्थ्यांत अतिशय लोकप्रिय. कलाभवन आणि संगीतभवन हे तर विश्वभारतीचे श्वास निश्वास ! एकदा दिनकरदा आणि मी असेच रस्त्यात गप्पा मारीत उभे होतो. तितक्यात समोरून रिक्षा आली. चांगली भरघोस दाढी वाढवलेला, अस्ताव्यस्त केस, तंग जीन्स् आणि ढिल्या पण आखूड बाह्यांचा आणि बुशशटपेक्षा जरा लांब, गडद निळा तोकडा आंगरखा घातलेला असा एक तरुण रिक्षा हाकीत होता. दिनकरदांना पाहून रिक्षा थांबली. दिनकरदा म्हणाले, "थांबा, तुमची एका थोर कलावन्ताशी ओळख करून देतो.-" रिक्षावाला उतरला. "-हे शर्वरी रायचौधरी. फार मोठे शिल्पकार आहेत."

माझी आणि शर्वरीबाबूंची ही पहिली ओळख. थकलेल्या रिक्षावाल्याला मागे बसवून त्याची रिक्षा चालवीत हा शिल्पकार रतनपल्लीतल्या आपल्या निवासस्थानी निघाला होता. हेन्री मूरसारख्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या शिल्पकाराने त्याची शिल्पकृती आग्रहाने मागून घेतली आहे. पण शर्वरीच्या वागण्याला त्याच्या यशाची आणि त्याच्या क्षेत्रातल्या लौकिकाची कसलीही बाधा नाही. त्याची आणि माझी ओळख करून देताना दिनकरदांनी सांगितले की, शर्वरीबाबूंकडे ध्वनिमुद्रिका आणि संगीताचे ध्वनिमुद्रण केलेल्या टेप्सचा फार मोठा संग्रह आहे. 'संगीत' ही त्यांची खरी भूक. इटालियन सरकारची शिष्यवृत्ती घेऊन शिल्पकलेच्या अभ्यासासाठी ते इटालीला गेले होते. तिथून युरोपमधले अनेक देश हिंडले. इंग्लंड-अमेरिकेतही त्यांच्या शिल्पकलेचे खूप कौतुक झाले. दिनकरदा त्यांचा परिचय करून देत असताना शर्वरीबाबू मोठ्या मिष्किल नजरेने माझ्याकडे पाहात होते. जणू काय दिनकरदा माझी चेष्टा करताहेत आणि मला बनवताहेत असे सुचवल्यासारखे. "मोठ्या मुश्किलीने मी हे पार्सल कलकत्त्याहून इथे आणले" दिनकरदा म्हणाले. "पुन्हा भेटू या-" म्हणून रिक्षाची प्याडले मारीत शर्वरी रतनपल्लीच्या दिशेला निघून गेला. त्यांचा हा रिक्षा ओढायचा षौक, किंवा थोडासा चित्रविचित्र पोशाख, दाढीत फूल खोचण्याची स्टाइल हा शांतिनिकेतनातल्या लोकांचा कुतूहलाचा, थट्टेचा, कधी कधी टीकेचाही विषय आहे. अर्थात् कलावंतांचा तऱ्हेवाईकपणा ही काही शांतिनिकेतनात नवी

गोष्ट नाही. तिथल्या राम किंकर बैज ह्या प्रसिद्ध शिल्पकाराच्या चमत्कारिकपणाचे तर अनेक किस्से आहेत. दुर्दैवाने अतिरिक्त मद्यपानामुळे राम किंकरदा रोगजर्जर होऊन पडले आहेत. पण त्यांच्या हातच्या शिल्पांचे सामर्थ्य अचाट आहे! जंगलातला सुन्दर शिलाखंड पाहून त्याचे चुंबन घेणारे राम किंकरदा. शर्वरी मात्र युरोपात राहूनही मद्य, धूम्रपानच नव्हे तर चहा-कॉफीपासूनही अलिप्त. त्याला मुख्य व्यसन संगीतश्रवणाचे !

शर्वरीचा दिनकरदांनी परिचय करून दिला. त्यानन्तर बरेच दिवस त्याची आणि माझी पुन्हा भेट झाली नाही. एके दिवशी दुपारी खोलीचे दार वाजले. मी दार उघडून पाहातो तो दारात शर्वरीराय चौधरी उभे. दाढीत एक चाफ्याचे फूल खोवले होते. बरोबर संगीत भवनातले माझ्या परिचयाचे दोन चार विद्यार्थी. त्याने माझ्याशी एकदम बंगालीतच बोलायला सुरुवात केली. त्याचे मुख्य कारण म्हणजे त्याला बंगालीखेरीज दुसरी देशी भाषा येत नाही आणि जी परदेशी भाषा येते ती इटालियन ! हिंदी बोलतो. पण अचाट. एकूणच बंगाल्यांचे हिंदी अचाट. आपल्या बिऱ्हाडी मला निमंत्रण देण्यासाठी शर्वरी आला होता.

दुपारी चारच्या सुमाराला मी त्याच्या खोलीवर गेलो. 'आशून-आशून' म्हणून त्याने स्वागत केले आणि स्वागतपर गीत सुरू करावे तसा रेकॉर्डप्लेअर सुरू केला आणि अहो आश्चर्यम् - एका क्षणात गोविन्दराव टेंब्यांनी वाजवलेल्या सोहनी मधल्या 'प्यारा मेंडा नजर नहि आवंदा'च्या हार्मोनियममधल्या सुरांनी खोली भरून गेली. मी अवाक् ! शांतिनिकेतनात एका पस्तिशीच्या घरातल्या तरुण शिल्पकाराच्या खोलीत आमच्या गोविन्दरावांची पेटी वाजत होती, आणि तो शिल्पकार देखील, 'गुंतवला की नाही जाळ्यात ?' अशा चेहऱ्याने माझ्याकडे पाहात होता. किती वर्षांनी मी गोविन्दरावांच्या पेटीचे सूर ऐकत होतो ! आणि अशा अकल्पितपणाने, अकल्पित ठिकाणी ! त्या क्षणी आमची दोस्ती जमली. कारण त्यानन्तर त्याने चक्क बालगंधर्वांची 'सुजन कसा'च सुरू केली. आता जिव्हाळ्याच्या बंधनासाठी आणखी दुसऱ्या कसल्याही उपचाराची आवश्यकता नव्हती. त्या क्षणापासून शांतिनिकेतनातच नव्हे तर वर्धमान स्टेशनातून मुम्बईला जाणाऱ्या गाडीत मी बसेपर्यन्त आम्ही सतत बरोबर होतो. त्याचे अध्यापनाचे आणि माझे अध्ययनाचे तास संपले की अड्डा सुरू !

एक रुंदसा दिवाणखाना, एक बेडरूम आणि एक छोटेसे स्वैपाकघर हे त्याचे बिऱ्हाड. इथे चोवीस तास विद्यार्थी-विद्यार्थिनींना मुक्तद्वार. खोलीत अखंड टेपरेकॉर्डर किंवा रेकॉर्ड

प्लेअर वाजत असतो. भिंतीवर शर्वरीच्या काही प्रसिद्ध शिल्पांचे 'फोटो' लावले आहेत. काही फोटोग्राफ्स् दारांना नुसतेच अडकवले आहेत. पण जपानी तोकोनामासारखा कोपरा आहे. तिथे मात्र फैयाझ खांसाहेबांचा मैफिलीत गात बसल्याचा एक दुर्मिळ फोटो, त्याच्याजवळ सिद्धेश्वरीबाईंचा, बाजूला मल्लिकार्जुन मन्सूर. त्यात आता, केसरबाई आणि हिराबाई बडोदेकर एकमेकींना कडकडून भेटताहेत असा मी त्याला भेट म्हणून दिलेला फोटो भले मोठे एन्लार्जमेंट करून लावला आहे ! हे सारे शर्वरीचे देव आणि देवता. टेपरेकॉर्डर आणि डिस्कप्लेअर ही पूजेची उपकरणे ! शेकडो ध्वनिमुद्रिकांचा संग्रह आहे. केवळ भारतीय संगीतच नव्हे तर युरोपीय आणि जपानी वगैरे आशियाई संगीतही आहे. मी एकदा त्याच्या निर्व्यसनीपणाची चेष्टा केल्यावर म्हणाला, "एवढे हे एक व्यसन मला कफल्लक बनवायला पुरेसे आहे. बाकीच्या व्यसनाला पैसा कुठून आणू ?"

आणि शर्वरीचे हे सुरांचे व्यसन खरोखरीच अचाट आहे. माझ्या आयुष्यात मी गाण्याचा षौक करणारी खूप माणसे पाहिली. पण तासभरात ज्याला सुरांची तहान लागते असा हाच ! रात्री झोपेतून पाणी प्यायला उठावे तसे हा रेकॉर्ड लावायला उठतो. दोन चार गाणी ऐकतो आणि पुन्हा झोपतो. त्याच्याकडे किती जुन्या जुन्या ध्वनिमुद्रिका ऐकायला मिळाल्या ! गोहरजान, मलकाजान, मोजूद्दिनखां यांच्या ठुमऱ्या, दादरे. बनारसच्या कुण्या काशीबाईच्या ठुमऱ्या ऐकताना सिद्धेश्वरीचा आवाज फिका वाटला. शिवाय बिजलीसारखा तानेचा सट्टा. पाचपाच सहासहा तास हा श्रवणाचा कार्यक्रम चालायचा. पण सांगता मात्र केसरबाईंच्या ध्वनिमुद्रिकांनी. ध्वनिमुद्रिकेतून केसरबाईंचे सूर उमटू लागले की शर्वरी म्हणायचा - "आह्, की पोरिष्काऽऽरशूर !" खानदानी संगीतप्रेमी लोकांत केसरबाई केरकरांविषयी अत्यंत आदर. पण त्यांतल्या त्यात बंगालात फारच. त्यांचा तो 'परिष्कार सूर' ! स्वच्छ साफ ह्याला बंगालीत 'परिष्कार' म्हणतात. विशेषतः 'पोरिष्काऽऽर' असा त्याचा उच्चारच स्वच्छतेचं चित्र डोळ्यापुढे आणतो. केसरबाईंचे गाणे ऐकून खुद्द रवीन्द्रनाथांनी 'अद्‌भुताचा अनुभव' आला असे लिहिले आहे. केसरबाईंच्या त्या जुन्या दुर्मिळ ध्वनिमुद्रिका शर्वरीकडे पुन्हा ऐकायला मिळाल्या. तान निघाल्यापासून संपेपर्यन्त तिच्या आकारात कुठे कमजास्तपणा नाही, आलापी किंवा तान सुरू होतानाचा श्वास आणि समेत विलीन होतानाचा श्वास ह्याच्या भात्यात फरक नाही. गाण्यातले गाणेपण सुटायचे नाही. खोटी नजाकत नाही. पण पांडित्याला कुठे रुक्षपणाचा स्पर्श नाही. ग्रीक शिल्पासारखे स्वरस्थापत्य ! निरनिराळ्या गायकगायिकांच्या ध्वनिमुद्रिका ऐकता ऐकता शेवटी केसरबाईंची रेकॉर्ड लागली की सारी तीर्थे हिंडून गंगाकिनारी येऊन तो शुभ्र संथ प्रवाह पाहात बसल्यासारखे वाटायचे. तसलाच तो खोल, संथ आणि

'परिष्कार' स्वरप्रवाह. शर्वरीची फार मोठी महत्त्वाकांक्षा त्याने मला एकदा बोलून दाखविली.

"केसरबाईंचा स्टॅच्यू करायला मिळेल का मला ? मला एकदा त्यांच्या पायावर नेऊन घाला-" (आणि केसरबाईंच्या कृपेने शर्वरीची ही महत्त्वाकांक्षा पुरी झाली.)

आम्ही शर्वरीच्या बिऱ्हाडाची तर गायनशाळाच करून टाकली होती. गाण्याच्या अड्ड्यावर जमायला आमंत्रण कशाला ? खेड्यात तर कृत्रिम उपचारांची गरजच नसते. शांतिनिकेतन त्या बाबतीत खेड्यासारखेच आहे. गुरुदेवांचा तर असल्या ग्रामीण अनौपचारिकतेविषयी फार आग्रह. त्यांच्या नाटकांच्या तालमींना सगळ्यांना मुक्तद्वार असे. प्राथमिक शाळेतली मुलेदेखील खुशाल त्यांच्यापाशी जाऊन खाऊ मागितल्यासारखे 'नूतन गान' मागत असत. गाण्याबजावण्याच्या बैठकीतली ही अनौपचारिकता अजूनही इथे आहे. शर्वरीच्या घरी आता रोज गानलुब्धांची बैठक भरू लागली. त्याच सुमाराला कलकत्त्याहून कालीपदबाबू पाठक आले होते. ऐंशी वर्षांचा हा म्हातारा सगळ्यात उत्साही निघाला. कलकत्त्याच्या रवीन्द्र भवनातल्या मैफिलीत त्यांच्याशी ओझरता परिचय झाला होता आता दोस्तीच जमली. शेकडो बंगाली टप्पे त्यांना याद होते. आणि मुक्त मनाने ते कुणालाही शिकवीत. संगीतभवनातल्या मुलामुलींना शिकवण्यासाठी विश्वभारतीने त्यांना बोलावले होते. गेस्टहाउसमध्ये माझ्या शेजारच्या खोलीत त्यांचा तळ होता. म्हातारबुवांची सकाळी हाक यायची -

"देशपांडेदा - चा खाबेन ?"

मग चहा वगैरे 'खाल्ला' की अर्धा पाऊणतास तैलमर्दन करीत बसायचे. वृद्ध गायकांचा गोष्टीवेल्हाळपणा होता आणि इतके वय झाले तरी गाण्याची अतोनात हौस होती. बुधवारची सुट्टी आली की कलकत्त्याला जायचे. मी थट्टेने म्हटले - "काय कालीपदबाबू कलकत्त्यात कोण वाट पाहात असतं ?"

"तिथे मुलं आहेत माझी-"

"किती मुलं आपल्याला ?"

"कोणी मोजली आहेत !" मिष्किलपणाने म्हातारा म्हणाला. मग मला कळले की कालीपदबाबू एकटेच होते. ही मुले त्यांच्या गल्लीतली. म्हाताऱ्याची पोरांत दोस्ती. त्यांना खाऊ घेऊन जाई. आमच्या मैफिलीत कालीपदबाबूच सगळ्यांत तरुण होते. पिकॅसो, स्वतःचे वय आज गेली पन्नास वर्षे 'तीस' आहे म्हणून सांगतो. कालीपदबाबूही असे चिरंतन तिशीतले होते.

आमची ती मैफिल केवळ आंतरप्रांतीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय असायची. शर्वरीच्या घराशेजारी ब्रिजेन्द्रसिंग राह्यचे. केवळ वेषामुळे शिख. एरवी संपूर्ण बंगाली. गाण्याचे अतोनात षौकीन. त्यांचे मेहुणे डॉ. बाजपेयी उत्तम संस्कृतज्ञ. युरोपीय भाषापंडित. शांतिनिकेतनातल्या हिंदी भवनातले प्रमुख प्राध्यापक. ते देखील आमच्या गाण्याच्या अड्ड्यावर असायचे. लोरिया नावाचा एक इटालियन तरुण, एक जपानी तरुणी, थायलंडमधली काही मुले आणि मुली. जॉर्ज नावाचा केरळातला एक कलंदरासारखा वागणारा चित्रकार तरुण. शिवाय मग कितीतरी बंगाली तरुणतरुणी. मंटूबाबू, रेंटूबाबू, वझलवारजींसारखे बुजुर्ग असा हा चित्रविचित्र अड्डा होता. गाण्याच्या प्रेमाने जमणारी एक मिनी-विश्वभारतीच होती. हळूहळू आमचा हा मेळा आज इथे, उद्या तिथे असा हिंडू लागला. कितीतरी नव्या ओळखी होत होत्या. रात्री अकरा साडेअकरा वाजताही दार ठोठावले जाई.

'खोलीत दिवा दिसला- आलो' म्हणत एखादा श्यामोल-दा, निलो-दा किंवा असाच कुणीतरी 'दा' मुक्काम ठोकायचा. किंवा 'खोलीत काय बसता ? चला बाहेर' म्हणून बाहेर खेचून न्यायचा. तिथे मोकळ्या माळावर अड्डा जमलेला असे. मग कुणीतरी गाणे सुरू करायचा. त्यातून आता मोकळ्या हवेत जायची अधिक ओढ वाटत होती. कारण पौषाची हुडहुडी संपली होती. माघ सरता झाला होता आणि वसंताची खबर घेऊन दक्षिणवायू आला होता. ह्या मलयानिलाविषयी आजवर संस्कृत वाङ्मयातून नुसते वाचत होतो. पण हिमालयाकडून येणारा तो हाडात जाऊन रुतणारा उत्तरवारा आणि दक्षिणेकडून बंगालपर्यन्त 'नवतान आणि नवप्राण' घेऊन येणारा दक्षिणवायू ह्यांची प्रत्यक्ष गाठभेट शांतिनिकेतनात झाली. तिथल्या खुल्या मैदानात, त्या मित्रपरिवारात गप्पागोष्टीही करीत, गुरुदेवांनी रचलेली - 'ओगो दखिन हावा पथिक हावा - दोदुल दोलाय दाव दुलिये' सारखी गीते ऐकताना अंगावरून त्या गीतातल्या सुरासारखीच दक्षिण मारुताची ती झुळूक जायची. आणि मनात एकच विचार येई... 'बाई ग किती उशिरा भेटलीस...'



शिशिराला निरोप देण्यासाठी आता विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शेकोट्यांचे समारंभ सुरू केले होते. कलाभवन आणि संगीत भवनातले छात्र आणि छात्री सगळ्यात उत्साही. त्यांचे प्राध्यापकही त्याच उत्साहात आपला उत्साह घेऊन येणारे. त्या मानाने साहित्य आणि विज्ञान शाखेचे प्राध्यापक इस्त्री-संरक्षक वाटत होते. नाहीतरी साहित्याचे अध्यापन म्हणजे भाषेचे शवविच्छेदन शकविण्याचे शास्त्र अशीच समजूत आहे. एखादा अपवाद वगळला तर आश्रमभर पसरलेल्या आम्रमंजरीचा घमघमाट अनुभवायला त्या खात्यातली ही वरिष्ठ मंडळी फारशी फिरकत नसावीत! पण ह्या 'दखिखन' हवेने छात्र-छात्रींना मात्र वेड लावले होते. नाना वृक्षांनी सुगंधाची खैरात चालवली होती. 'दक्षिण वायुदेवा, तुझ्या पावलांची भाषा ओळखतो आम्ही...' ह्या गुरुदेवांच्या ओळीचा अर्थ समजायला शांतिनिकेतनातच जायला हवे. 'मम अन्तर कंपितसे निखिलाच्या हृद्छन्दे' म्हणजे काय ते तिथेच समजते. एके दिवशी संध्याकाळी उत्तरायणाच्या प्रांगणात लोकांची रीघ लागली होती. छोट्या विद्यार्थ्यांच्या साहित्य सभेचा कार्यक्रम होता. दर महिन्याला प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतल्या मुलामुलींची ही अशी साहित्यसभा भरते. गुरुदेवांनीच ही परंपरा सुरू केली. रंगवल्लिका

आणि पुष्पसज्जेने मंच सजवतात. समोर प्रेक्षकांत केवळ मुलेच नव्हेत, तर शांतिनिकेतनातले कुणीही नागरिक येऊ शकतात. इथे सगळ्या कार्यक्रमांना सगळ्यांना मुक्तद्वार ! मग बाल कलावंत आपली साहित्यरचना वाचतात. गीते गातात. नृत्य करतात. मग सभाजन त्यासंबंधी आपली मते मांडतात. असा हा मुलांच्या दरमहा निघणाऱ्या हस्तलिखित मासिकाचा प्रकाशन समारंभ असतो. एवढी एवढी मुले ही सभा चालवतात. एक प्रौढ मुख्य पाहुणा असतो. बालकलावत्तांच्या रचनेवर बालसमीक्षक आलोचना करतात. मोठ्या धिटाईने सभेत उठून आपली मते मांडतात. त्या दिवशीच्या साहित्यसभेवर मात्र वसंतऋतूने आपली जादू टाकली होती. फुलांचा साज लेऊन बालबालिकांचा वृन्द त्या छोट्याशा मंचावर म्हणजे 'शामली' कुटिरापुढच्या सुन्दर ओसरीवर नाचत, गात आला आणि 'अरे भाई, फागुन लेगे छे बने बने - डाले डाले फुले फुले पाताय पाताय रे, आडाले आडाले कोने कोने...' म्हणून वसंतागमनाची वार्ता दिली. गर्द फुललेल्या पलाशाची डहाळी त्या पोरांच्या डोक्यावर दक्षिणवायूबरोबर मजेदार झुलत होती. मग चिमुकल्या 'कोबीं'नी आपल्या 'कोबीता' वाचल्या. कथा वाचल्या. एका छोटोबांनी चंद्रारोहणावर 'बोक्तोब्ब' केले. सभाजनातून काळी पाचच्या टिपेला 'शाधु-शाधु' अशा आरोळ्या उठत होत्या. पालकांचे कौतुक डोळ्यांत मावत नव्हते. चांगली दीडएक तास ही काव्यशास्त्रविनोदाची भातुकली चालली होती. सभा संपली आणि आबालवृद्ध 'फागुन लेगे छे बने बने' म्हणत निघाले.

आता सर्वांना वसंतऋतूने झपाटले होते. बंगालीत उन्हाळ्यात येणाऱ्या गोवर आणि कांजिण्यांनादेखील 'बसंत रोग' म्हणतात. वसंतऋतूचे असे वैभव आणि कौतुक मी अनुभवले नव्हते. एक तर मुम्बईत झाडांचे आणि पानांचे बदलते रंग बघायला सवड कुणाला आहे ? शांतिनिकेतनात आपण झाडांकडे पाहण्याऐवजी झाडे आपल्याकडे पाहात असतात. नाना विभ्रमांनी, फुलांच्या साजांनी, रंगांनी आणि सुगंधांनी लक्ष वेधून घेत असतात. आता तर काय साक्षात् ऋतुराजाचे आगमन ! जावे तिथे 'दोल', 'दोल' हेच ऐकू येत होते. 'दोल' म्हणजे झोपाळा. गुरुदेवांनी आपल्या ह्या सुन्दर सणांतल्या रूढींचे घाणेरडे शेवाळ काढून टाकले. दोलोत्सवात होळी केली ती अभद्र आचार-उच्चारांची. प्रत्येक ऋतूच्या आगमनाबरोबर भारतीयांचे सण येतात. पण सणांचे निसर्गाच्या नव्या स्वरूपाशी असलेले साहचर्य विसरून घरात बसून तन्निमित्त केलेले पक्वान्नांचे ढीग रिचवणे हेच उरले होते. सुन्दर ऐहिकांचा संबंध तोडून पारलौकिकाच्या मृगजळामागे धावणे असला प्रकार झाला आहे. गुरुदेवांनी बंगालचे लक्ष आपल्या चर्मचक्षूंना दिसणाऱ्या निसर्गाच्या नर्तनाकडे वेधले. पावसाच्या आरंभी वर्षामंगल. मग

शारदोत्सव. आता हा दोलोत्सव. सगळीकडे गडबड उडाली होती. ह्या उत्सवाला जुनेजुने विद्यार्थी-विद्यार्थिनी आता मुलं-नातवंडांना घेऊन शेकडो मैलांवरून येतात. आयुष्यातला अत्यंत रम्य काळ ज्या वातावरणात घालवला त्याचे स्मरण ठेवून येतात. शांतिनिकेतनातला हा सर्वात मोठा उत्सव.

एके दिवशी रात्री काही मुले माझ्या खोलीवर आली आणि म्हणाली, "उद्या पहाटे चार वाजता आम्ही तुम्हाला न्यायला येऊ."

"कुठे ?"

"वैतालिक ऐकायला."

आणि दुसऱ्या दिवशी पहाटे माझ्याच दाराशी कोरस ऐकू आला -

"ओ रे गृहवासी-खोल दार खोल-लागलो जे दोल..."

थोडक्यात म्हणजे उठा उठा हो सकळिक. फक्त वाचे स्मरावा गजमुखच्या ऐवजी दक्षिण हवेबरोबर सारे विश्व कसे आनंदाने झोके घेऊ लागले आहे पाहा - हे सांगत आले होते. शांतिनिकेतनातल्या मुलामुलींचे जथे युरोपात ख्रिसमस कॅरल्स् गातात तसे 'वैतालिक' गात दारे बंद करून झोपणाऱ्यांना सांगत होते - गृहस्था झोपतोस काय ? दार उघड. हे 'खोल दार खोल' गीत तर त्यातल्या छंद, अर्थ आणि सुरांनी वेड लावणारे आहे... जळी स्थळी रानी वनी वसंताने झोपाळे टांगले आहेत —

*त्या झोपाळ्यावर झोके घ्यायला बाहेर पडा...*
*अशोक-पलाश वृक्षांवर रंगीत हास्य फुलले आहे...*
*प्रभात मेघांना रंगीत नशा चढली आहे...*
*दक्षिण वायूने छू मंतर केलेले वेळूचे बन गाते आहे...*
*फुलांकडे भिक्षा मागत मधमाशी हिंडते आहे...*
*तिच्या पंखांतून भिकारिणीची वीणा वाजत आहे...*
*माधवीच्या मंडपात सुगंधाने वायू विव्हल झाला आहे...*
*अशा वेळी घरात काय बसून रहातोस ?*
*गृहस्था दार उघड...*
*बाहेर ये...*

अशी किती गीते. मुलांचेच काय पण प्रौढांचेही थवे आता मुक्तपणाने ही गीते गात होते. वसंतवैभव पाहात होते. लोकांच्या नजरेला आणून देत होते. शांतिदेव घोषांच्या पत्नी इला-दी ह्या एकेकाळच्या कलाभवनातल्या छात्री. आता पन्नाशीत आल्या.

कलाभवनावरून आम्ही जात होते. समोर पलाशवृक्ष फुलला होता. मला म्हणाल्या, 'हा पलाश किती उंच झाला पाहा. आम्ही विद्यार्थिनी असताना आमच्याच एवढा उंच होता. त्याची फुले सहज जाता जाता खुडून आम्ही वेणीत घालत होतो... आमच्याच वयाचा असेल हा पलाश.' तपोवनातल्या वृक्षांचे निरोप घेणारी शकुन्तला आणखी काय निराळी होती. 'केवढी मोठी दिसायला लागली हो तुमची नंदिनी !' हे ज्या कौतुकाने एखाद्या मुलीबद्दल म्हणावे त्या कौतुकाने तिथल्या वृक्षवल्लरींविषयी बोलणाऱ्या इला-दी सारख्या त्या आश्रमातच त्या वृक्षवल्लरींच्या जोडीने लहानाचे मोठे झालेल्यांना तपोवनवासाचा आनंद उमजला.

वसंतऋतूच्या आगमनकाळातल्या त्या रात्री तरुण मुले मुली शेकोट्या पेटवून गात, नाचत असत. कलाभवनाजवळच असाच एका रात्री शेकोटीचा कार्यक्रम चालला होता. बंगाली लोक नृत्यप्रिय. स्त्रीपुरुष सहजभावाने नाचतात. त्यातून शांतिनिकेतनातल्या जुन्या रहिवाशांनी गुरुदेवांच्या जमान्यात वृंदगायनात किंवा समूहनृत्यात भाग घेतलेलाच असे. सगळ्यांनी सुजाता-दी आणि त्यांचे यजमान सुखमय मित्र यांना नाचायचा आग्रह केला. सुखमयबाबू चित्रकलेचे अध्यापक आहेत. सुजाता-दी रवीन्द्रांनी बसवलेल्या नृत्यनाटिकेत भाग घेत असत. आता त्यांच्या लेकीचे लग्न झालेले आहे.

"छे, आता कसले नाचता-" म्हणत त्या ओढेवेढे घेत होत्या. पण मुलामुलींनी हट्ट धरला आणि गाणे सुरू केले !

*रांगिये दिये जाव - जाव जाव जाव गो एबार*
*जाबार आगे रांगिये दिये जाव -*
*(रंगवून जा - जा जा पण जाण्या आधी एकदा मला*
*रंगवून टाक आणि जा)*

वृन्दगायन सुरू झाले आणि सुजाता-दी आणि सुखमय-दा त्या शेकोटीभोवती फेर धरून मुक्तपणे त्या छंदावर सुन्दर नृत्य करू लागले. त्या शेकोटीभोवती काजवे चमकावे तशी ती दोघे नाचत होती. मुले गात होती. ढोलक वाजत होता. मंजिऱ्या किणकिणत होत्या. मनाच्या कुठल्या विमुक्तावस्थेत रवीन्द्रांनी हे गीत रचले ते तेच जाणे. सूर, छंद, शब्द आणि अर्थ एकमेकांशी स्पर्धा करीत त्या गीतात लवथवताहेत.

*...अंधाऱ्या रात्रीच्या वृक्षावर*
*जशा तारा जागताहेत...*
*पाषाणाच्या कुशीत जशी*

*निर्झराची धार जागते*
*मेघाच्या छातीवर जसा*
*मेघांचा मंद्र स्वर जागतो*
*आणि विश्वनृत्याच्या केन्द्रात जसा*
*छंद जागतो*
*- माझ्या जाण्याच्या पथावर तसा*
*मला एक झोका देऊन*
*जागवून जा - साऱ्या बंधनातून*
*मुक्त करून जा...*

वरील अर्थाचे ते गीत. ती रात्र, शेकोटी, त्या तरुण-तरुणींनी मुक्त मनाने गायलेले ते अलौकिक वृन्दगीत आणि मांडीवर नातवंडे खेळवणाऱ्या आजोबा-आजींनी दूरवर गेलेल्या यौवनाला परत पकडून केलेले ते मुक्त नृत्य. ते पाहताना टागोरांचा आत्मा निश्चित् म्हणाला असणार - याचिसाठी केला होता अट्टाहास. शेवटलाच का, प्रत्येक दीस गोड व्हावा म्हणून !

आणि दोलोत्सवाची पहाट उगवली. शांतिनिकेतनातला कोपरान् कोपरा माणसांनी फुलून आला. वासंतिक पीतवसने नेसून, गळ्यात पुष्पमाला, केसात नाना रंगांची वासंतिक फुले माळून स्त्रीसमुदाय नटला. ढोल वाजू लागले. आम्रकुंजात भला मोठा रंगमंच तयार होत होता. गेस्टहाउसच्या मॅनेजरने मला सांगितले, 'देशपांडे-जी उद्या तुमच्या मित्रांकडेच निमंत्रण लावून घ्या - इथे लोकारण्य.' आदल्या रात्रीपासून हजारो माणसांची रीघ लागलेली. गुरुदेवांची गीते गात माणसे चाललेली. कलकत्त्याहून तर मोटारी भरभरून कुटुम्बे येत होती. होळी पुनवेची रात. खोलीत कोण झोपून राहणार ! मी रात्री दोनच्या सुमाराला माझ्या निवासस्थानाकडे परत चाललो होतो. वाटेत कुकुलची आई सुप्रिया, तिचा भाऊ विश्वजित - तिची वहिनी आणि आणखी काही मित्रमंडळी भेटली.

"छे छे - झोपता कसले ? शांतीदांना भेटू या —"

"अहो ते झोपले असतील. दोन वाजून गेले..."

"उठवू या -"

परत फिरलो. सगळी टोळी शांती-दांच्या बंगलीपुढे उभी राहिली. कोरस सुरू केला.

"खोल दार खोल... लागलो जे दोल..." पटापट दिवे लागले. साठीच्या घरातले शांती-दा, इला-दी, शांतीदांची वृद्ध आई... सगळे कुटुम्ब उठले. पुन्हा मैफिल सुरू ती

चार वाजेपर्यन्त.

आम्रकुंजात सकाळी सात वाजल्यापासूनच लोकांनी जागा धरल्या होत्या. अतोनात गर्दी. एका बाजूला विस्तीर्ण रंगमंच. झाडांच्या फांद्यांवरदेखील माणसे चढून बसली होती.

आठ वाजता नृत्योत्सव सुरू होणार होता. बंगाली मंडळींना शिस्तीचे एकूण वावडेच. हीऽ चेंगराचेंगरी. स्वयंसेवक माणसांना शिस्तीत बसवायचा प्रयत्न करीत होते. आम्रकुंजाच्या धारेवर प्रेक्षकांची सोय होती. मधला आम्रकुंज मात्र समूहनृत्यासाठी मोकळा होता. माइकवरून घोषणा चालल्या होत्या. वृंदगायन चालले होते. त्यात ओळखीची गाणी अनेक. त्यामुळे गर्दी आपलाही आवाज मिसळीत होती. आणि उत्सव सुरू झाला. फुलांचा ताटवाच नाचतनाचत यावा तशी प्रथम शिशुभवनांतली बाल-गोपाळ मंडळी नाचतनाचत आली. वासंतिक पीतवस्त्रे नेसलेली. वासंतिक फुलांची आभूषणे ल्यालेल्या आणि कपाळावर ठसठशीत कुंकवाचा मळवट भरलेल्या पोरी. सजवलेल्या शेकडो गौरी नाचत आल्यासारख्या वाटल्या. त्यांच्या मागून असेच रंगीबेरंगी साज लेऊन सावताळांच्या पोरींसारख्या फुले माळून कॉलेजमधल्या, कला भवनातल्या, संगीतभवनातल्या शे-दोनशे मुली आणि त्यांच्यामागून मुलगे टिपऱ्या घेऊन नाचत आले. रंगमंचावर एका मोठ्या थाळ्यात अबीरगुलाल भरून ठेवला होता. त्याच्या भोवती आल्पना आणि फुलांची आरास. वृंदगायक नाना छंदांतली रवीन्द्रगीते गात होते. वसंताची गीते. तास दोन तास हा नृत्योत्सव चालला होता. शेवटी नृत्य करीत करीत काही मुली रंगमंचावर गेल्या. त्या थाळीतला गुलाल त्यांनी मुठीमुठींनी सभाजनांवर उधळला. उपाचार्य कालीदासबाबूंचा मान पाहिला. त्यांच्या कपाळी गुलाल लावला. त्यांना प्रणाम केला. त्यांनी त्या विद्यार्थिनींच्या मस्तकावर गुलाल उधळला आणि मग रंगोत्सवाची दंगल सुरू झाली. रंगाच्या पिचकाऱ्या उडू लागल्या. गौरप्रांगणात मुले, मुली, अध्यापक, अध्यापिका, पाहुणे, आबालवृद्धांनी रंगोत्सव सुरू केला. लाल, हिरव्या, शेंदरी रंगाने स्त्रीपुरुष माखून निघाले. वृद्ध, तरुण स्त्री-पुरुष एकमेकांच्या तोंडाला रंग फासत होते. शर्वरीला तर कुणीतरी रंगांची आंघोळच घातली होती. माझ्या डोक्यावरून कलाभवनातल्या मुलांनी रंगाची बादलीच रिकामी केली. कौशिक-दांना रंगाच्या हौदात बुडवले. सगळे परिचित अपरिचित बेहोष होऊन गात होते, नाचत होते, एकमेकांच्या तोंडांना रंग फासत होते. ह्या साऱ्या खेळात कुठे असभ्यता नव्हती. गलिच्छपणा नव्हता. घरोघरी जाऊन माणसे एकमेकांना भेटत होती. वडील मंडळींना प्रणाम करीत होती. त्यांच्या अंगावर रंगही उधळीत होती. 'मिष्टी' खिलवली जात होती. अकरा साडेअकरा

वाजेपर्यन्त हा कार्यक्रम चालला होता. चारी दिशांना नाना रंगांनी माखलेल्या स्त्री-पुरुषांनी भोवती फुललेल्या रंगीबेरंगी निसर्गाशी हे असे सुंदर नाते जोडले होते.

दोलोत्सवासाठी जमणाऱ्या हजारो पाहुण्यांसाठी संध्याकाळी गौर प्रांगणातल्या खुल्या रंगमंचावर नृत्यनाटिका करून दाखवण्याचा प्रघात आहे. गुरुदेव तर ह्या उत्सवासाठी नवीन नाटिका रचीत असत. सकाळचा उत्सव चांगला साजरा झाला आणि दुपारपासून आकाशात मेघोत्सव सुरू झाला. बंगाली हवेची लहर फिरली. ढगांचा पखवाज सुरू झाल्याबरोबर इथे रंगमंचावरचा खेळ सुरू होतो की नाही याची चिन्ता उत्पन्न झाली. यंदा 'श्यामा' ही गुरुदेवांची सुंदर नृत्यनाटिका होणार होती. संध्याकाळी आभाळ निवळल्यासारखे झाले आणि नृत्यनाटिका सुरू झाली. समोरचे विस्तीर्ण पटांगण माणसांनी फुलून गेले होते. मुंगीला शिरायला वाव नव्हता. मी माझी व्यवस्था वृंदवादकांच्या ताफ्यात करून घेतली होती. नाटिका सुरू झाली, प्रेक्षक 'श्यामा'च्या सुखदुःखाशी एकरूप होऊ लागले. एकापेक्षा एक सुन्दर गीतांनी आणि तरुण कलावन्तांच्या नृत्याभिनयाने मुग्ध झाले. तासाभरातच वरुणराजाची तबियत बिघडली. हां हां म्हणता ढग जमले. विजांचा कडकडाट सुरू झाला, आणि पावसाची मुसळधार कोसळायला लागली. दिवसभर ह्या ऋतूराजाचे एवढे कौतुक केले होते. शेवटी राजघराण्यातल्या लोकांच्या वळणावर गेला. काय बिनसले कोण जाणे. धोधो पाऊस. महिनामहिना तालमी करून बसवलेली नृत्ये, गीते, सुन्दर वेषभूषेची योजना... दहा मिनिटांत पावसाने सारा खेळ उधळून लावला.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी आम्रकुंजातून जाताना मला त्या वृक्षांकडे पाहावेना. रात्रीच्या पावसाने आम्रमंजिऱ्यांना झोडपून काढले होते. आम्रवृक्षांच्या दुःखाने यापूर्वी मी इतका कधीही व्यथित झालो नव्हतो. काल सकाळी कसल्या आनंदाने फुलले होते ते वृक्ष आणि आज सकाळी हतभाग्यासारखे उभे होते. समोरून कालच्या नृत्यात भाग घेतलेल्या दोनतीन मुली येताना भेटल्या. "पावसाने विरस केला नाही काल..." "चालायचंच" एखाद्या तत्त्वज्ञान्यासारखा चेहरा करून एक मुलगी म्हणाली. "आमच्या नाटकाचं काल कालवैशाखीत 'भाशाण' झालं — नाहीतरी आपण इतकी सरस्वती सजवून शेवटी नदीच्या पाण्यात नेऊन भाशाण करतोच की-" विसर्जनाला बंगालीत 'भाशाण' म्हणतात. अवसानघातकी वळवाच्या पावसाला 'कालवैशाखी' म्हणतात. कालच त्या आम्रकुंजात वसंताचा केवढा मोठा खेळ मांडला होता. आज कसा सगळा डाव उधळला होता.

"हा कालवैशाखीचा, खेळ मोडण्याचा खेळ" एक मुलगी म्हणाली.

"खेळ मोडण्याच्या खेळाची कल्पना सुरेख आहे."

"माझी नाही ती - गुरुदेवांचे गीत आहे. शुनून..." असे म्हणून तिने गीत गुणगुणायला सुरुवात केली —

"आज खॅला भांगार खॅला खेलबि आय... ये... आज खेळ मोडायचा खेळ खेळूया-ये... कालवैशाखीचा नाच होईल-तिच्यासह तुझेही जीवन मरण नाचू दे...

हसणे रडणे झुगारून देऊ या-ये... खेळ मोडायचाच खेळ खेळूया...

आज खॅला भांगार खॅला खेलबि आय..."

- हजारो लोकांपुढे उत्साहाने केलेला खेळ काल पावसाने धुऊन नेला होता. घटकेपूर्वी रंगलेल्या श्रोत्यांची ती पांगापांग. मोहोर गळून पडावा तशा रंगमंचावरून निराश होऊन परतलेल्या त्या नृत्यवृन्दातल्या नाना आभरणांनी नटलेल्या मुली. ते सारे करुण दृश्य माझ्या डोळ्यापुढे उभे होते. आणि ह्या तरुण पोरीला गुरुदेवांच्याच त्या ओळी सांत्वना देत होत्या. खेळ मोडण्याचाही खेळ खेळावा लागतो. नाना आभूषणांनी नटवलेल्या सरस्वतीचे शेवटी पाण्यात तितक्याच आनंदाने विसर्जन करावे लागते. प्राणप्रतिष्ठेच्या मिरवणुकीसारखीच अखेरच्या विसर्जनाची मिरवणूक वाजतगाजत जावी. त्या पोरीने सुरू केलेली ओळ पकडून बाकीच्या मैत्रिणीही 'आज खॅला भांगार खॅला खेलबि आय...' म्हणत निघून गेल्या. आणि मी आम्रकुंजातला तो कालवैशाखीने मोडलेला खेळ पाहात उभा राहिलो.





'आज खॅला भांगार खॅला खेलबिआय - ये खेळ खेळुया खेळ मोडण्याचा ।' त्या उद्ध्वस्त आम्रकुंजात ऐकलेल्या ओळींनी माझा पिच्छा पुरवला होता. शांतिनिकेतनात मिळालेल्या नव्या मित्र-मैत्रिणींच्या सहवासात मांडलेला खेळ मोडायची वेळ आली होती. माझा मुक्काम संपत आला होता. आलो त्यावेळी खूप थंडी होती. आता भरपूर तापायला लागले होते. दिवसाचा देव लवकर येऊन उशिरा जायचा. धूळ उडायची. पण संध्याकाळी मात्र निरनिराळ्या फुलांना असा गंध फुटायचा की, साऱ्या दिवसाचा उन्हाळा मी विसरून जात असे. रोज संध्याकाळी कुणा ना कुणाच्या घरच्या भोजनाचे निमंत्रण असे. गेस्ट हाउसचे मॅनेजरबाबूदेखील थट्टेने विचारायचे, "देशबाबू - आज निमंत्रण कोथाय ?" बंगालीत निमंत्रण म्हणजेच भोजनाचे निमंत्रण. एके दिवशी सकाळी सुखमयबाबू आले आणि म्हणाले, 'देशपांडेजी आपनि शूँटकी माछ खाबेन तो ?' - कसली तरी मासळी खाता ना ? हे विचारले आहे एवढे समजले होते. मी लगेच 'निश्चय खाबो !' म्हणून निमंत्रण पक्के केले. आणि मग डिक्शनरी काढून 'शूँटकी' हा काय मत्स्यप्रकार आहे ते पाहिले. शूँटकी माछ म्हणजे 'सुकी मासळी' हे वाचल्यावर महदानंद ! सुखमयबाबूंना तर मी

सुकी मासळी खातो हे ऐकून 'आज खरा माणूस भेटला' असा आनंद झाला. सुखमयबाबू पूर्व बंगाली. पश्चिम बंगाल्यांना सुक्या मासळीची चव नाही. त्यांच्या पत्नी सुजाता-दी पश्चिम बंगाली. त्यामुळे त्या सुकी मासळी खात नाहीत. त्यामुळे त्या दिवशी माझ्यापेक्षा सुखमय-दानाच स्वतःच्या घरात इतक्या वर्षांनंतर 'घरी जेवतोय' असे वाटले असणार. त्या वासाच्या मागून ते पूर्व बंगालातल्या आपल्या खेड्यात जाऊन पोहोचले होते. आज अनेक वर्षे ते पश्चिम बंगालात होते. सारा संसार इथेच होता. मुले मार्गी लागत होती. शांतिनिकेतनात चांगले चालले होते. पण आत कुठे तरी, 'निर्वासिता'ची वेदना होती. शांतिनिकेतनात राहाणाऱ्या किती तरी पूर्व बंगाली स्नेही मंडळींशी बोलताना ही वेदना मला जाणवली आहे. पश्चिम बंगाली त्यांना 'बांगला' म्हणून हिणवतात. हे कलकत्तेवाले आणि ते गावंढळ असा एक शिष्टपणा आहे म्हणतात. निर्वासितांचे आर्थिक पुनर्वसन होईल, पण त्यांच्यापैकी ज्यांच्या ज्यांच्या म्हणून बालपणीच्या आठवणी पूर्व बंगालात रुजलेल्या आहेत त्यांना आपल्या जीवनाची रोपटी उखडून इथे फेकून दिले आहे, असे आजही वाटते. कुठल्याही निर्वासितांशी जेव्हा जेव्हा म्हणून मला बोलण्याचे प्रसंग आले त्या त्या वेळी त्यांच्या जखमा वर्षानुवर्षे ओल्या आहेत असेच मला वाटले. केवळ पाकिस्तानच्या निर्मितीमुळे झालेले भारतीय निर्वासितच नव्हे, तर बर्लिनमध्ये भिंत पडल्यामुळे बर्लिनवासियांना वाटणारी ही उखडल्याची भावनाही मी पाहिली आहे. मी पूर्व आणि पश्चिम दोन्ही बर्लिनमध्ये राहिलो आहे. पूर्व बर्लिनमधल्या माणसाला पश्चिम बर्लिनमधली एखादी गल्ली आठवत असते आणि पश्चिम बर्लिनमधल्या माणसाला उंटर लिंडन स्ट्रासऽवरच्या लिंडनच्या झाडाखाली झालेली पहिली ओळख गोडीची स्मरत असते आणि ते झाड पाहण्याची ओढ छळत असते. सुखमयबाबूंना त्या सुक्या मासळीच्या वासाने 'खाड्या त्या तव जन्मभूमि नयनी पाहीन केव्हा तरी' असे झाले होते.

रोज असे कोणाना कोणाच्या घरी निमंत्रण असायचे. रस्त्यात कोणी तरी भेटायचा आणि म्हणायचा, "आमच्यासाठी एक संध्याकाळ राखून ठेवा हं !" एखादे वेडेवाकडे पद म्हणून दाखवणे - पेटी वाजवणे यापलीकडे त्यांना मी काहीच देऊ शकत नव्हतो. माझ्या हातून त्यांचा फायदा व्हावा असा मी कोणी सरकारी अधिकारी नव्हतो की मंत्री नव्हतो. त्यांची भाषा शिकायला, त्यांची गाणी शिकायला मी तिथे गेलो होतो हाच आनंद. लोभाचे एवढे एकच कारण. एखाद्या घरी माझ्यापुढे पुस्तक ठेवीत आणि इतर पाहुण्यांपुढे मला आपण लहान पोरांना धडा वाचायला लावतो तसे वाचायलाही लावीत. आणि माझ्या वाचनाला 'की आश्चर्ज ?' म्हणून दादही देत. वास्तविक हा काही माझा फार मोठा पराक्रम नव्हता. माझे वाचन बंगाली भाषेचा खून करीत चालायचे. पण यशाहूनही

प्रयत्न सुंदर, ह्या भावनेने ही माणसे ऐकत. चुकीच्या उच्चाराला 'एटा आपनार मराठी उच्चारोन' म्हणून चेष्टाही करीत. मग आम्हीही मृच्छकटिकातला शकार हा शूद्रकाने बंगालातच पाहिला वगैरे ऐकवीत होतो. ह्या थट्टेला कुणी रागावले नाही की रुसले नाही. बंगाली लोकांपुढे मराठ्यांची प्रतिमा ही ऐतिहासिक कथांमुळे लुटारूंची आहे. इतिहासकार सरदेसायांचा मुलगा श्यामकांत शांतिनिकेतनात शिकायचा. तो जेव्हा शालान्त परीक्षेत बंगालीत पहिला आला, तेव्हा गुरुदेवांनी त्याची पाठ थोपटताना 'हा हा मराठा बंगाली भाषेचे पहिले बक्षिस लुटणारा लुटारू आहे' असे कौतुकाने म्हटले होते म्हणतात.

शांतिनिकेतनात शिकत असताना श्यामकांत आपल्या आई-वडिलांना नियमित पत्रे पाठवीत असे. श्यामकांताच्या अकाली निधनानंतर त्याच्या वडिलांनी 'श्यामकांताची पत्रे' हे पुस्तक छापले. मी शाळेत असताना हा संग्रह वाचला होता. तेव्हापासून आयुष्यात शांतिनिकेतनात शिकायला मिळावे ही इच्छा दरिद्र्याच्या मनोरथाप्रमाणे प्रत्यक्षात आली नसली तरी एखाद्या चिवट हरळीच्या मुळीसारखी मनात टिकून होती. खूप उशिरा का होईना, आयुष्यातला काही काळ इथे घालवता आला याचे समाधान होते. लहानपणी तो खेळायचा राहिलेला खेळ पुन्हा मांडला होता - आता पुन्हा पुन्हा एकच चरण ओठावर येत होता - माझ्या मनाला मीच सांगत होतो - चल बाबा - खेळ मोडण्याचा खेळ सुरू कर.

खेळ संपवण्याचा निर्णय खेळ सुरू करण्याच्या निर्णयासारखा आपल्यालाच घ्यायला हवा. तोदेखील खेळातलाच भाग मानला पाहिजे. निसर्ग तेच करतो. ऋतूची शोभा मांडतो आणि उधळतो. पुन्हा नव्या ऋतूची नवी विटी आणि नवा दांडू ! शांतिनिकेतनात हा खेळ आयुष्यात मी प्रथमच इतक्या बारकाईने पाहिला. माणसे भेटली तशी झाडे भेटली. इतकी वर्षे त्या मित्रांकडे पाहिले नव्हते. तशी मधूनमधून निसर्गशोभा वगैरे पाहिली होती. पण पावसाने झोडपलेल्या आम्रवृक्षांचे मंजिरी गमावलेले दारिद्र्य पाहून हळहळलो नव्हतो. अचानक आलेल्या सुगंधाचा शोध घेत फुलांची ती वेल कुठे लपली आहे हे शोधत हिंडलो नव्हतो. आणि ती भेटल्यावर संकेतस्थळी लपून राहिलेल्या प्रेयसीच्या लपंडावासारखा हाही एक लपंडाव खेळता येतो हे ठाऊक नव्हते. शर्वरीसारख्या शिल्पकाराबरोबर उघड्या माळावर निर्हेतुकपणाने रात्र पाहात बसण्याचा योगही आला नव्हता. एके काळी शांतिनिकेतनात एक माणूस मध्यरात्री किंवा भल्या पहाटे असाच उभा राह्यचा. रात्र पाहात. पहाट पाहात. झाडांच्या फांद्यांचे

दक्षिणवाऱ्याबरोबरीचे हेलकावे पाहात. रवीन्द्रनाथ ठाकूर नावाचा.

असलेच काहीतरी पाहता पाहता तीन महिने कसे गेले ते कळले नाही. निघायच्या दोन दिवस आधी संगीत भवनांतल्या छात्रछात्रींनी मला निरोप द्यायचा समारंभ केला. संध्याकाळी समारंभ होता. दिवेलागण झाली होती. तीन महिन्यांपूर्वी एका संध्याकाळी ह्या रंगमंचापुढल्या खुल्या सभांगणात मी एकटाच उभा होतो. तीन बाजूंच्या इमारतींमध्ये हे सभांगण आहे. त्या इमारतींतून त्या दिवशी नाना सूर कानी पडत होते. एखाद्या मोकळ्या अंगणात एकट्याने उभे राहून पावसाच्या धारेत स्नान करावे तसे सुरांचे स्नान करीत मी त्या चौकात एकटाच उभा होतो. समोर ते सुबक रंगपीठ. टागोरांच्या कितीतरी नाटकांच्या, नृत्यनाटिकांच्या, गीतांच्या, संगीतिकांच्या आठवणी असतील त्या रंगपीठाला. आज त्या रंगपीठावर आणि समोरच्या सभांगणात माझ्या इष्टमित्रांचा मेळावा जमला होता. श्यामलकृष्ण घोष किंवा कालीपद रायसारख्या वृद्ध पेन्शनर मित्रांपासून ते कुकुलसारख्या माझ्या चिमुकल्या गुरुजनांपर्यंत सगळे जण मला 'बिदाय' द्यायला आले होते. जो तो 'आबार कोबे आशबेन ?' पुन्हा केव्हा येणार म्हणून विचारीत होता. कौशिकदा, वाजपेयजी, भूदेवबाबू, शर्माजी, वझलवारजी, जोशी-दा, मिश्राजी, चैती-दा, विरेन-दा अशी प्राध्यापक मंडळी होती. शांतिदेव घोष तर समारंभाचे यजमान होते. अनेक तरुण मित्र, मैत्रिणी. कोणी माझ्यासाठी रवीन्द्रांची गाणी टेपरेकॉर्डरवर ध्वनिमुद्रित करून दिली होती. कोणी गोष्टी वाचून ठेवल्या होत्या. विजय-दा एवढे मोठे रवीन्द्र म्युझियमचे संचालक, पण त्यांनी गुरुदेवांच्या आणि स्वतःच्या कवितांचे वाचन रेकॉर्ड करून दिले होते. समोरच्या गर्दीतल्या प्रत्येकाला मी ओळखत होतो. 'आर एकटु आर एकटु' - आणखी एक आणखी एक म्हणत माझ्याकडून मराठी गाणी शिकणारी अल्पना (शेवटपर्यंत शोकुल तारक शुता शुबोराच म्हणत होती), रवीन्द्र संगीताच्या गायिका म्हणून बंगालात लोकप्रिय असलेल्या कणिका बानर्जी, नीलिमा सेन, सुरेख फिरतीचा गळा असलेला मोहनसिंग, चोवीस तास सुरांच्या धुंदीत वेड्यासारखा वावरणारा नोनी गोपाळ, रोज आठ आठ दहा दहा तास रियाझ करून 'एसराज'वर हात 'परिष्कार' करणारा रणजित राय, तबलजे मानसबाबू, शांतिनिकेतनात घरच्यासारखे वाटावे म्हणून माझ्यासाठी कुरमुऱ्याचे लाडू करणारी सलीलची ऐंशी वर्षांची वृद्ध आई, लेबू-दा, शांतिनिकेतनात फुलबागा फुलवणारा त्याचा भाऊ आलू, मंटूबाबू, मातृभाषा असल्यासारखी मराठी बोलणारी चित्रा, कलाभवनातल्या, पाठभवनातल्या, संगीतभवनातल्या कलाप्रिय विद्यार्थिनी, कालोच्या दुकानात आमच्या बरोबर चहा घ्यायला चला म्हणून ओढून नेणारे माझे तरुण मित्र.... मला टागोरांची पुस्तके आणून देऊन हे वाचा ते वाचा म्हणून आग्रह करणारा अनुत्तम. तीन महिन्यांपूर्वी आम्हाला

एकमेकांची नावेसुद्धा ठाऊक नव्हती. आज हे सारे जण आप्तस्वकीय होऊन मला निरोप द्यायला जमले होते. इतक्या गर्दीत असल्या आपुलकीचा समारंभ मी यापूर्वी अनुभवला नव्हता.

पंडित वझलवारजींनी 'श्रद्धेय' पु.ल. देशपांडेजीवर भाषण केले. आणि छात्रछात्रींना उपदेशपर चार शब्द सांगण्याची विनंती केली. आता श्रद्धेय झाल्यामुळे इलाजच उरला नाही. मी ते चार शब्द सांगायला उभा राहिलो. समोरचा तो मेळावा पाहिला आणि गुरुदेवांची कविता आठवली.

***कतो अजानारे जानाइले तुमि कतो घरे दिले ठायी***
***दूरके कोरिले निकटि बोन्धु परके कोरिले भाई -***
***किती अनोळखी केले ओळखीचे थारा देसी किती गृही***
***दूरचे केलेसी निकट स्नेही परके केलेसी भाई -***

वडील मंडळी होती, तरी मुख्य मेळावा होता छात्रछात्रींचा. त्यांना म्हणालो, ''मित्रांनो, ह्या शांतिनिकेतनात सप्तपर्णीच्या वृक्षाखाली महर्षी देवेन्द्रांना सच्चिदानंदांचा साक्षात्कार झाला होता. त्रिदळाला तीने पाने असतात, तसे हे सप्तदळी पान. सप्तसुरांचे आणि सप्तरंगांचे प्रतीक असल्यासारखे. उद्या स्नातक होऊन जाताना तुमचे आचार्य तुम्हाला ते पान देतील. त्यांतून सात सुरांच्या आणि सप्तरंगांच्या उपासनेचा संदेश मिळाला आहे असे मानून जीवनात जिथे जिथे रंग आणि सूर भरता येतील तितके भरा.''

अर्धापाऊण तास त्यांच्याशी हितगुज केले. आणि गुरुदेवांच्याच एका कवितेतल्या दोन ओळींनी त्यांचा निरोप घेतला.

*-जाबार आगे एइ कथाटी बोलते चायि*
*जा देखेछी जा पेयेछी तार आर तुलना नाई —*

'' . जाण्यापूर्वी एकच गोष्ट सांगून जातो - इथे जे मी पाहिले, जे मला लाभले त्याला तुलना नाही.''

आणि शांतिनिकेतनातला शेवटला दिवस आला. नाही म्हणता म्हणता त्या खोलीत किती संसार साठला होता. बहुदींनी खाण्याचे पदार्थ भरून पाठविलेले डबे, कुणी वेळी-अवेळी वीज जाते म्हणून आणून दिलेला कंदिल, मध्यंतरी थोडासा आजारी पडलो होतो तेव्हापासून श्यामलकृष्ण घोष घरून पाणी उकळून पाण्याच्या बाटल्या भरून आणीत त्या बाटल्या. कुणी आग्रहाने 'हे वाचा' म्हणून आणून दिलेली पुस्तके. ह्या वस्तू

त्यांच्या त्यांना पोहोचवायच्या होत्या. शिवाय मी शे-दोनशे पुस्तके विकत घेतली होती. 'सामानाची आवराआवर' ह्या गोष्टीचा मला अतोनात कंटाळा आहे. सगळी बॅग भरून झाली की नेमकी काहीतरी अशी वस्तू बाहेर राहून जाते आणि ती इतर वस्तूंशी सामोपचाराने मिळतेजुळते घ्यायला अजिबात तयार नसते. तेलाची बाटली मुद्दाम बाथरूममध्ये विसरून ठेवल्यासारखी ठेवली होती. लगेच कुणीतरी 'ही राहिली बघा' म्हणून आणून द्यायचे. निम्मी उरलेली साबणाची वडी ही काही बरोबर नेलीच पाहिजे अशा मोलाची वस्तू नव्हे. नेमकी ती कोणाला तरी दिसायची आणि ती अर्धी वडी कुठे कोंबता येईल याच्यावर सल्ला मिळायचा.

ही सगळी आवराआवर चालू असताना त्या खोलीत मित्रांची रीघ होतीच. सकाळीच म्हातारे कालीपदबाबू पाठक आले आणि म्हणाले, "तुम्हाला देण्यासारखे माझ्यापाशी काही नाही, दोन टप्पे ऐकवतो. ते घेऊन जा." म्हणून त्या पसाऱ्यात त्यांनी गाण्याची बैठक मांडली. झाले. आवराआवर बंद. मैफिल सुरू. आपल्याबरोबर मला गायला लावले. माझाही गळा त्यांच्या वृद्ध गळ्याइतकाच जड वळणाचा. त्यामुळे बंगाली टप्पा कंठगत करायला वेळ लागला नाही. यंदा नोव्हेंबरात कालीपदबाबूंनी आपली इहलोकीची यात्रा संपवल्याची दुःखद वार्ता वाचली आण त्यांच्या 'मनोहारणी' ह्या काफीतल्या टप्प्याचे सूर मनात उमटायला लागले. कसा अंतर्बाह्य शुभ्र-निर्मळ होता म्हातारा !

सकाळी अकराच्या सुमाराला बोलपूरला गाडी पकडून वर्धमान जंक्शनला जायचे होते. तिथे चांगला सात आठ तास त्या भयानक स्टेशनवर मुक्काम करून रात्री दहाच्या सुमाराला मुंबईची गाडी गाठायची. सामानाच्या आवराआवरीतले माझे कौशल्य पाहून ब्रिजेंद्रसिंगानी ते कार्य आपल्या अंगावर घेतले. कालीपदबाबूंचे टप्पे चाललेच होते. तेवढ्यात कणिका बॅनर्जी आल्या. त्यांनी त्या मित्रमैत्रिणींशी काय हितगुज केले कळेना, सगळ्यांनी मिळून अजून प्रचूर समय आहे निघायला असे सांगायला सुरुवात केली.

"प्रचूर समय ? एक तास उरला गाडी सुटायला—" मी म्हणालो.

"ती बोलपूरला. कणिकादी तुम्हाला त्यांच्या मोटारीतून रात्री वर्धमानला पोहोचवणार आहेत—"

"छे छे - उगीच साठ मैलांचा फेरा कशासाठी ?"

"तोपर्यंत इथे मैफिल होईल."

मग गुरुदेवांनी रचलेली निरोपाची गीते सुरू झाली. एकाहून एक सुंदर आणि हृदयस्पर्शी. एकतर ह्या बंगाली पोरींचे आवाज मुळातच आर्त. खूप उंच पल्ला गाठणारे. शिवाय बुधवार असल्यामुळे सुट्टीचा दिवस. त्यामुळे मित्रमैत्रिणींनी खोली गच्च भरली होती. मॅनेजरबाबू चहा पाठवीत होते. (निघताना मी चहाचे बिल विचारल्यावर म्हणाले, "आजचा हा चहा बिदाईचा. बिल वगैरे काही नाही.") तेवढ्यात ब्रिजदांच्या पत्नीने चाफ्याच्या फुलांचा सुंदर हार करून आणला. देवळाच्या परिसरात असतो त्या चाफ्याचा. क्षितिमोहन रॉयबाबूंची शर्मिला म्हणून मुलगी आहे. शांतिनिकेतनात शिकते. तो हार पाहून तिने गाणे सुरू केले —

*एबार बिदायेर शूर धरी ओ चाँपा ओ करबी —*
*आता निरोपाचा सूर धरा—*
*कण्हेरी-चंपका...*
*अखेरच्या बहराने*
*दुरड्या भरा*

आता निरोपाचा सूर धरा...ह्या मुलामुलींनी माझ्या डोळ्यांच्या कडा भिजवायचा जणू निश्चयच केला होता.

संध्याकाळी सहाच्या सुमाराला शांतिनिकेतन सोडले. मोटारीभोवती मित्रमंडळींनी घेराव घातला होता. माझ्या बरोबर स्वतः शांतिदेव घोष, बहु-दी, मंटु आणि शर्वरी होते. तीन महिन्यांपूर्वी ह्याच सुमाराला मी इथे आलो होतो. एक संकल्प सोडून. रवीन्द्रनाथ, शरदबाबू, ताराशंकर, विभूतीभूषण यांचे साहित्य त्यांच्या भाषेतून वाचायची हौस पुरी करायची होती. विवेकानंदांची ती ओजस्वी भाषणे मूळ तेजाने कशी चमकतात ते अनुभवायचे होते. "हे भारत भुलिओ ना-" ह्या त्यांच्या प्रसिद्ध भाषणाचे भाषांतर पूर्वी वाचले होते. पण बंगालीतून जेव्हा ते वाचायला लागलो तेव्हा साक्षात् विवेकानंदांच्या प्राणकोशातून उमटलेले शब्द कानावर आल्यासारखे वाटले... "भारतेर समाज आमार शिशुशय्या, यौवनेर उपवन, आमार वार्धक्येर वाराणशी - बोल भाई भारतेर मृत्तिका आमार स्वर्ग, भारतेर कल्याण आमार कल्याण..." मंत्रासारखी ही वाणी. मंत्राची शक्ती भाषांतरात कुठून येणार ? मुळातल्या ध्वनिरूपाचे सामर्थ्यच निराळे असते. ज्ञानेश्वरी हिंदीतून वाचवत नाही आणि तुलसी रामायणाच्या मराठी भाषांतरात राम वाटत नाही. गालिबचा उर्दूचा मिजाज इतर कुठल्याही भाषेत कसा येणार ? शांतिनिकेतन सोडताना एक लहानसा का होईना पण संकल्प पुरा केल्याचे समाधान होते.

मोटर वर्धमानच्या दिशेने धावत होती. एरवी शांती-दा, बहु-दी, शर्वरी वगैरे जमलो की अखंड बडबड चालायची. पण वर्धमानच्या प्रवासात सारे चूप. तीन महिने सतत चाललेल्या मैफिलीने पैदा केलेला सन्नाटा होता. वीरभूमच्या शेतांचा, छोट्या छोट्या अरण्यांचा निरोप घेत घेत निघालो होतो. इथे औषधालाही कुठे डोंगर म्हणून नाही. विस्तीर्ण माळ. मध्येच अरण्याचा पट्टा. मधून मधून छोटी खेडी. बंगाली भाषेत पल्ली. वर्धमानात मोटार शिरली होती त्यावेळी रात्रीचे साडेआठ झाले होते. पण शहरात स्मशानशांतता पसरली होती. तीन चार दिवसांपूर्वी राजकीय गुंडगिरीत एका संपूर्ण कुटुंबाचा वध झाला होता. रस्त्यातल्या दिव्यांच्या त्या भगभगीत उजेडात पुन्हा एकदा बंदुकीच्या नळीची भाषा करणाऱ्या विद्रूप घोषणांनी रंगवलेल्या भिंती दिसू लागल्या. त्या विद्रूपतेकडे डोळेझाक करूनही चालणार नाही. कुणीतरी असहाय, अगतिक होऊन त्या मार्गाने जात नसेल कशावरून? समाजात कारणाशिवाय काहीही होत नसते. मी निघायच्या आदल्याच दिवशी पाटण्याला ज्योती बसूंच्या दिशेने कोणीतरी गोळी झाडली होती. त्या साहसाचा सूड कलकत्त्यात घेऊन दाखवण्याच्या आरोळ्या उठल्या होत्या. वर्धमानच्या रेल्वेबाबूला शांतीदांनी विचारले, "कलकत्त्याहून आगगाड्या येताहेत ना ?"

"हो येताहेत - पण येतीलच असे कोणी सांगावे ?"

पण मुंबईच्या दिशेने गाडी आली. गाडीत चढण्यापूर्वी शांतीदा आणि बहु-दींना प्रणाम केला. शर्वरी आणि मंटूला कडकडून भेटलो आणि गाडीत चढलो. कंपार्टमेंटमध्ये कलकत्त्याहून आलेला एक तामीळ तरुण होता. आगबोटीवर इंजिनियर आहे. मला म्हणाला, "तुमचे हावरा स्टेशनवर रिझर्वेशन होते. आणि तुम्ही आला नाही. जीव मुठीत धरून बसलो होतो."

"का ?"

"मला वाटले तुम्ही बहुधा स्टेशनपर्यंत पोहोचू शकला नसाल. आणि सारा प्रवास ह्या कंपार्टमेंटमध्ये एकट्याला बसून करावा लागणार. मी गावातून हावरा स्टेशनपर्यन्त कसा आलो ते माझे मलाच ठाऊक. -कलकत्त्याला एकेक दिवस म्हणजे प्राणसंकटासारखा वाटत होता. आपल्या नावावरून आपण महाराष्ट्रीय आहात हे ओळखलं - आणि म्हटले चला मी सेफ आहे."

"आपण कुठे राहता ?"

"माटुंग्याला ?"

"तरीही मराठी माणूस प्रवासात सोबती म्हटल्यावर सेफ वाटलं ?"

तो तरुण मनापासून हसला आणि मग मुंबईत वर्षानुवर्षे राहिलेल्या दाक्षिणात्यांचेच वर्तन कसे कूपमंडुकासारखे आहे ते सांगू लागला. जहाजावर जगभर फिरणाऱ्या त्या

तरुणाची पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर दिशांची मर्यादा फार व्यापक होती.

"आपण बंगालमध्ये किती दिवस होता ?" त्याने विचारले.

"तीन महिने."

"ओ गॉड् ! मग आपण सगळं पाहिलं असेल."

"काय ?"

"गोळीबार, डोकेफोडी - खून-"

"पाहिले थोडे फार. आणखीही खूप पाहिले... बाऊल कीर्तन, जात्रा - " मला एक बंगाली ओळ आठवली. "एतो भंग वंगदेश - तबू रंगे भरा" इतका भंगलेला वंगदेश तरी नाना रंगांनी रंगलेला !

रात्री गाडीत मला अजिबात झोप येत नव्हती. अनेक चित्रांची-सुरांची आणि संवादांची डोक्यात गर्दी भरली होती. मला ठाऊक होते की, मुंबईतले माझे स्नेहीसुद्धा मला एकच प्रश्न विचारणार, "बंगालात हे नक्षालवाद्यांनी घातलेले थैमान पाहिले का हो तुम्ही ?"

माझ्या डोक्यातल्या वंगचित्रांत ती चित्रे खूपच कमी. त्यांची निराशाही होईल. त्यांची चूक नाही. कारण आज तरी त्या रंगाने बाकीचे रंग अजिबात नाहीसे केले आहेत. न जाणो उद्या गुरुदेवांचे ते सुंदर विश्वही ह्या आगीत भस्मसात होईल. एका निराळ्या अर्थाने सारा खेळ मोडण्याचा खेळ चालू आहे. त्यात साऱ्या विश्वातून ज्ञानाची आणि सुंदर विचारांची काडीकाडी जमवून बांधलेले हे घरटे उद्ध्वस्त होईल. चित्र, शिल्प, सूर, साहित्य हरवून बसलेले जग मानवांचे राहणार नाही. चिकाटीने पुन्हा काडी काडी गोळा करीत नवीन घरकुले उभी करावी लागतील. कोण कुठली एखादी अल्पना नावाची बंगाली मुलगी. दोन मराठी गाणी शिकवल्याच्या कृतज्ञतेने मोटारी भोवतालच्या गर्दीत राहून - नाही - तुम्हाला आम्ही जाऊ देणार नाही - म्हणून रडते. एक बंगाली आजी मला नातू मानून कुरमुऱ्याचे लाडू पाठवते. मुंबईत केशवराव दात्यांच्या पत्नी माझ्यासाठी राजगिऱ्याचे लाडू घेऊन यायच्या. दाते वहिनींच्या निधनानंतर अशीच एक आजी मला वयाच्या पन्नासाव्या वर्षी भेटणार आहे - आणि ती देखील दूरवर बंगालात - हे मला कुठे ठाऊक होते ? आंतरराष्ट्रीय कीर्तीचा तरुण शिल्पकार शर्वरी, गोविंदराव टेंब्यांच्या पेटीचा शौकीन निघतो. सागरमय घोष म्हणतात 'नृपकन्या तव जाया'सारखी भैरवी नाही. आणि शांतीबाबू भट्टाचार्यांना 'बाजरीची भाकरी आणि वांग्याचे भरीत' याची सर रोशोगुल्ल्याला देखील नाही असे वाटते. ही सारी माणसे आणि मी ह्यांच्यात बंधन उत्पन्न करणारी शक्ती कुठली ? पण बंदुकीच्या नळ्यांची भाषादेखील माणसे सुखासुखी कशाला करतील ? घाम गाळून उभे केलेले पीक जोतेदार कापून न्यायला लागला आणि शेतकऱ्याच्या तोंडात माती घालू लागला तर त्या शेतकऱ्याने तरी काय करावे ? त्या

यातना मला भोगाव्या लागल्या असत्या तर मी देखील नक्षालपंथी झालो नसतो कशावरून ? ज्या मायभूमीकडून मायेचा अंश लाभला नाही तिच्या विषयीचे प्रेम, राष्ट्रभक्ती यांची अपेक्षा तरी कशी करायची ? आंबेडकर म्हणाले होते, "मला मातृभूमी आहेच कुठे ?" - काय चुकले होते त्यांचे हा प्रश्न विचारण्यात ?

पण सत्तर ऐंशी वर्षांपूर्वी रवीन्द्रनाथांनीच उद्गार काढले होते - "आज आमची खेडी अर्धमेली आहेत. आम्ही संपूर्ण जिवंत आहोत ही जर आमची कल्पना असेल तर ती चूक आहे. कारण मरणोन्मुख बहुजन समाज मूठभर सजीव समाजाला मृत्यूच्याच दिशेला खेचतो !" ही भविष्यवाणी ज्या शांतिनिकेतनाच्या तपोभूमीतून झाली तेही जर ह्या आगडोंबात जळणार असेल तर यासारखा दुसरा दैवदुर्विलास तो कोणता ?

पण इमारती जाळून शांतिनिकेतन जळत नसते. शांतिनिकेतन ही संस्था नसून एक जीवनदृष्टी आहे. शांतिनिकेतनात कुठलाही समारंभ संपला की सर्वजण शांतिनिकेतनाचे गीत गातात. गुरुदेवांनी केलेले. फार सुंदर चालीवरचे. आमादेर शांतिनिकेतन. संध्याकाळी आश्रमाच्या परिसरात हिंडताना मुलांचा तो कोरस अचानकपणे कानी यायचा...आमादेर शांतिनिकेतन....

*मोदेर मनेर माझे प्रेमेर सेतार बांधा जे तार सुरे*
*मोदेर प्राणेर संगे प्राणे से जे मिलिये एक ताने*
*मोदेर भायेर संगे भाय के से जे करे छे एक मन*

असंख्य मनामनांना जुळवणारी प्रेमाची सतार जिथे जुळली आहे ते शांतिनिकेतन आहे. ती सतार घेऊन बंगालात जावे किंवा पृथ्वीच्या पाठीवर आणखी कुठेही जावे.

खिडकीबाहेरच्या अंधारात बाहेरचे काही दिसत नव्हते. मनापुढे मात्र गेल्या महिन्यांत दिसलेली अनेक वंगचित्रे नाचत होती. गाडीच्या चाकांनी ताल धरला - पंख्याचा तंबोरा लागला होता. पार्श्वसंगीतासारखे मनात गाणे चालू होते. आमादेर शांतिनिकेतन.. आमादेर शांतिनिकेतन....





पूर्वी प्रत्येक पुस्तकाच्या सुरुवातीला एक उपोद्घात आणि शेवटी एक उपसंहार असायचा. काळाच्या ओघात अनेक वस्तूंसारखे शब्दही वाहून जातात. तसेच हे उपोद्घात आणि उपसंहार नामक, पुस्तकाच्या मुखपृष्ठाला आणि मलपृष्ठाला अस्तरासारखे चिकटलेले दोन भिडू औट झाले. त्यातल्या 'उपसंहारा'ला मी पुन्हा एकदा धरून आणतो आहे.

ही वंगचित्रे एकोणीसशे सत्तरच्या जानेवारी ते मार्च अशा तीन महिन्यांतल्या माझ्या बंगालातल्या वास्तव्याची आहेत. बंगाली लोक, त्यांची भाषा आणि संस्कृती यांचा हा इतिहास नव्हे. संस्कृतीचा अभ्यास करणारांना हे लेख उथळ वाटतील. कारण ते उथळच आहेत. त्यामुळे सखोलतेपेक्षा खळखळाटाची मजा पाहाणारांची फारशी निराशा होऊ नये. ही प्रथमदर्शनी प्रेमाची कथा आहे. द्वितीयदर्शन हा प्रथमदर्शनी प्रेमाच्या व्याधीवरचा रामबाण इलाज आहे म्हणतात. शांतिनिकेतनाच्या मी प्रेमात पडलो हे खरेच आहे. बरोबर एक वर्षानंतर म्हणजे एकाहत्तर सालच्या जानेवारी महिन्यात मी पुन्हा एकदा तीन महिन्यांच्या वास्तव्यासाठी शांतिनिकेतनात गेलो. तेव्हा झालेले द्वितीयदर्शन प्रेम कमी करणारे नाही. परंतु खिन्नता

वाढवणारे आहे. एखाद्याशी अचानक स्नेह जुळतो आणि आपल्या नकळतच आपण त्याच्या भल्याची चिंता करायला लागतो. रवीन्द्रनाथ, बंगाल आणि शांतिनिकेतन ह्या विषयांवर गेल्या काही महिन्यांत मी इतकी बडबड केली की आमच्या काही मित्रांनी माझ्या बंगालीबद्दलच्या प्रेमाचा धसका घेतला. 'जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे' असे मला होते खरे. माझाही नाइलाज आहे.

एका वर्षापूर्वी गाठली तशीच एक जानेवारी एकोणीसशे एकाहत्तर रोजी मी कलकत्ता मेल गाठली. मागल्या खेपेला सोबत सलील आणि शार्लट होते. आता एकटाच होतो. एकटा म्हणजे अगदी एकटा होतो. कंपार्टमेंटमध्ये कोणीच नव्हते. रीतसर येऊन वर्धमान स्टेशनवर उतरलो. तिथे बोलपूरची गाडी पकडेपर्यंत पाच सहा तास घालवायचे होते. स्टेशने, विमानतळ अशा ठिकाणी तासन्तास एकट्याने काढायची मला आता सवय झाली आहे. पूर्व जर्मनीतून भारतात परतताना मॉस्कोच्या विमानतळावर मी अखंड अकरा तास एका बाकावर बसून काढले आहेत. तिथे उतरल्याबरोबर पासपोर्ट काढून घेतला होता. भाषा कळत नव्हती हा भाग सोडला तरी कुणी फुकटची हस्तिदंती करायलाही उत्सुक नव्हता. तिथले अधिकारी येता जाता माझ्याकडे अशा चमत्कारिक नजरेने पाहात की काही वेळाने मी गुप्त हेर वगैरे नाही ना अशी माझी मलाच शंका यायला लागली. इथे वर्धमानला इतका परकेपणा नव्हता. आनंद बाजार पत्रिकेचा अंक घेऊन कलकत्त्यात आणि आसपास गेल्या चोवीस तासांत किती बसेस् जळल्या, किती खून झाले वगैरे उद्बोधक माहिती वाचत होतो. वर्षापूर्वी स्टेशनातली बंगाली अक्षरांतली पाटी तेवढी अंदाजाने वाचली होती. आता त्या स्टेशनात बसून बंगाली 'पेपर' वाचताना जर एखाद्याला मी साधे वर्तमानपत्र वाचायला इतक्या ऐटीत का बसलो आहे याची शंका आली असती तर तो त्याचा दोष नव्हता ! तेवढ्यात समोरून शांतिनिकेतनात गेल्याच वेळी परिचय झालेला अनिल समर्थ आला. आणि 'काय ? - कसं काय ?' होईपर्यंत शर्वरीची "पुल-दाऽऽ" अशी हाक आली. शांतिनिकेतनातले आणखीही काही छात्र छात्री भेटले. शांतिनिकेतनाची हालहवाल विचारल्यावर सगळ्यांकडूनच गुळमुळीत उत्तरे मिळायला लागली. आणि बोलपूर स्टेशनात जाऊन पोहोचेपर्यन्त लक्षात आले की विध्वंसकांनी त्या तपोवनात आता यथेच्छ धुमाकूळ घातला आहे. सगळीकडे भयंकर दहशतीचे वातावरण. व्हाइस चॅन्सेलरपासून ते अनेक प्राध्यापकांपर्यन्त अनेकांना खुनाच्या धमक्या. अमक्या तारखेला अमक्या प्राध्यापकाचे मुण्डके उडवण्यात येईल असे भिंतीवर जाहीर निवेदन. एके ठिकाणी 'सविनय निवेदन' असा मथळा देऊन खाली मुण्डके उडविण्याच्या कार्यक्रमाची जाहिरात होती असेही मला कळले. अशक्य नाही. इष्ट

दैवताला नररुंडमाळा वाहण्याचा नवस भारतीय संस्कृतीच्या अभिमान्यांना नवा वाटू नये. जिथे जावे तिथे त्याच खूनखराबीची चर्चा - 'काळ तर कठीण आला' ह्या चालीवर ! पाच साडेपाच वाजता सूर्यास्त झाला की माणसे दारे खिडक्या बंद करून घरात ! ज्या शांतिनिकेतनात रात्री अपरात्री तरुणांचे तांडे गाणी गात, थट्टामस्करी करीत निर्धास्तपणे हिंडायचे तिथे आता संध्याकाळपासून शुकशुकाट ! विद्यार्थिनींच्या वसतिगृहात 'सहाच्या आत परत या' ही सक्त ताकीद, त्यात पुन्हा रोज घरफोड्या आणि चोऱ्या !

खुद्द शर्वरीबाबूंच्या घरी खिडक्यांचे गज कापून चोर शिरले आणि त्यांचा मौल्यवान कॅमेरा आणि अनेक इतर चीजवस्तू लांबवल्या. सुदैवाने त्यांच्या शिल्पकृती वाचल्या. चोरांना त्यांच्या आधुनिक शिल्पकलेत फारसा रस वाटला नसावा. तरीही पितळेची शिल्पे वजनावर विकायला पळवली. सहानुभूती दाखवायला येणारा प्रत्येकजण म्हणत होता, "नशीब समजा शर्वरीबाबू तुम्हाला जाग नाही आली. जागे झाला असता तर मुडदाच पडला असता."

एकूण सारी धडपड आता गुंडांपुढे नमवलेले, शिर सलामत ठेवण्याची होती. कुणाचे कशात लक्ष नव्हते. माणसे कशी वाट हरवल्यासारखी बावरलेली. भ्यालेली. रोज नव्या धक्के देणाऱ्या घटना. श्रीनिकेतनात आगी लागल्या. रात्री दुरून रवीन्द्र संगीताच्या लकेरी ऐकू यायच्या तिथे आता गस्तवाल्यांच्या आरोळ्या. एके रात्री विश्वभारतीतल्या ट्रेनिंग कॉलेजच्या ग्रंथालयाला आग लावून पंधरावीस हजार ग्रंथांची राखरांगोळी करण्याचीही क्रांती झाली. तंत्रशुद्ध रीतीने पहारेकऱ्यांच्या मुसक्या बांधून आग लावली होती.

माझ्या ह्या मुक्कामात एके दिवशी जितेन्द्र अभिषेकी शांतिनिकेतन पाहावयास म्हणून आले. संध्याकाळी शर्वरीबाबूंच्या घरी दोन-अडीच तास खूप सुंदर गायले. दुसरे दिवशी संगीतभवनात जलसाही ठरला. इथली मैफिल संपली. माणसे आनंदात परत जायला निघाली. संध्याकाळचे साडेसात वाजले असतील. इतक्यात बातमी आली की विश्वभारतीतल्या कचेरीतल्या एका हेडक्लार्कचा गुंडांनी त्याच्या घरात शिरून खून केला होता. त्याची बायको आणि दोन लहान मुले यांच्या देखत ! सुऱ्याने पन्नासबावन घाव घालून कोहाळ्या सारखा त्याचा देह कोचवला होता. मी विचारले, "एकदा कोथळा बाहेर काढल्यावर शरीरभर हे घाव कशासाठी ?" मग मला एका गृहस्थाने ह्या खुनाच्या तंत्राची माहिती दिली. एका तज्ज्ञ मारेकऱ्याबरोबर दोनचार उमेदवार खुनी असतात म्हणे. त्यांची भीती घालवण्यासाठी, मुडदा होऊन पडलेल्या माणसावर घाव घालण्याचे शिक्षण

देण्यात येते, म्हणजे मग नजर मरते. हात थरथरत नाही. स्वैपाकघरात कोबी वगैरे चिरतात तशा अलिप्तपणाने माणूस चिरता येतो.

त्याच काळात कलकत्त्यातल्या एका कॉलेजात, भरलेल्या वर्गात घुसून दोन-तीन तरुणांनी समोरच्या तीसपस्तीस विद्यार्थ्यांच्या देखत एका प्राध्यापकाचा खून केला. बंदुकीची नळी रोखून त्यांनी विद्यार्थ्यांना बाकावर बसवून ठेवले होते आणि त्यांच्या गुरुजींचा देह फाडला होता. ह्या साऱ्या भयानक प्रकाराची फक्त वर्तमानपत्रात बातमी. त्यानंतर त्याची कुठे दाद ना फिर्याद. पोलिस तपास चालू असतो. विध्वंसवाद्यांचे हे असे थैमान, तर ज्यात काही राजकीय हेतू नाही असलीही गुण्डगिरी चालू होती. बोलपूरला रिक्षातून जाताना तरुणांची मोकाट सुटलेली टोळकी केवळ आचरटपणा म्हणून आत बसलेल्या माणसांना टपल्या मारून फिदीफिदी हसायची. विशेषतः वृद्ध प्रवाशांना ! बोलपूरचे कॉलेज विध्वंसवाद्यांनी जाळून बंद पाडल्यामुळे तरुण मंडळी मोकाट सुटली होती. त्यातली काही नाक्या नाक्यावर सरस्वतीपूजेची वर्गणी गोळा करण्याच्या कार्यात दंग होती. हे सरस्वतीपूजक, ग्रंथालये जाळून, कॉलेजे पेटवून, पुन्हा सरस्वती पूजेचाही कार्यक्रम करीत. त्यासाठी दमदाटीने चंदा जमवायचा. त्यातल्या पैशातून मोलोटोव्ह कॉकटेल, हातबॉम्ब वगैरेची खरेदी करून उरलेल्या पैशात मांडव, सरस्वतीची मूर्ती, रात्रंदिवस बोंबलणाऱ्या ध्वनिमुद्रिका आणि मिष्टी यांची व्यवस्था ! कानठळ्या बसवणारा लाऊडस्पीकर लावायला तर खास कारणही नसायचे. एकदा मी एका रिक्षातून लता मंगेशकर, रफी वगैरे मंडळींना ठणाणत नेणारा लाऊडस्पीकर पाहिला. रिक्षाबरोबर आठदहा तरुण चालले होते. मला वाटले कसली तरी जाहिरात असेल. पण तसे काही नव्हते. पूर्वी माणसे रस्त्यातून गात गात जात. आता सायकल रिक्षातून ध्वनिमुद्रिका वाजवीत फिरण्याचा नुसता षौक ! कुठूनही शांततेचा भंग करीत हिंडायचे हा कार्यक्रम. 'ग्यांग' जमवता आली की झाले. मग मनाला वाटेल ते करावे. रात्री अपरात्री लाऊडस्पीकरवरून ठणाणा चालवावा, दुकानदारांना दमदाटी करून हवे ते उकळावे, आगगाड्यांतून विदाउट् तिकिट प्रवास करावा. काय वाटेल ते करावे. फक्त 'टोळी' हवी. लहान असले की टोळकं म्हणायचं - वाढले की राजकीय पक्ष ! रोज काही ना काही तरी लहान मोठा उत्पात चालूच. एकदा शर्वरीबाबू कलकत्त्याला गेले होते. मी त्यांच्या बिऱ्हाडी एकटाच होतो. एकदोन विद्यार्थी लाठ्याकाठ्या घेऊन रात्री माझ्या सोबतीला असत. शर्वरीबाबू परत यायच्या दिवशी आम्ही वाट पाहात बसलो होतो. सहा वाजता यायची गाडी रात्रीचे नऊ वाजले तरी बोलपूरला येऊन पोहोचली नव्हती. स्टेशनवर जावे तर रिक्षावाला यायला तयार नाही. शेवटी रात्री दहाच्या सुमाराला शर्वरीबाबू उगवले.

"काय झालं ?"

"सर्वनाश. गाडी तीन तास लेट." आणि लेट होण्याचे कारण अजब होते. बोलपूरच्या अलीकडच्या स्टेशनात विद्यार्थ्यांनी गाडी अडवून धरली होती. त्या स्टेशनजवळून अजय नदी वाहते. नदीच्या तीरावर विद्यार्थ्यांचे पिकनिक होते. शे-सव्वाशे विद्यार्थी. त्यांचे सहभोजन, गाणी, खेळ, पोहणे वगैरे कार्यक्रम संपेपर्यंत टोळ्याटोळ्यांनी विद्यार्थी रुळांच्या मधे येऊन बसत होते. त्या सर्वांना त्याच गाडीने जायचे होते. पण पिकनिकचे कार्यक्रम संपले नव्हते. इथे पॅसेंजर लोक ड्रायव्हरवर उखडू लागले. तो म्हणाला, 'रुळावर मुले बसली असताना मी गाडी कशी चालवणार ? - जास्त गडबड कराल तर इंजिन बंद करीन आणि घरी जाईन !' मग सहलीतले सगळे कार्यक्रम संपवून तीन तासानंतर ती तरुण पिढी - अर्थातच बिनतिकिटाने - गाडीत चढल्यावर गाडी सुरू करावयाची ड्रायव्हरला परवानगी मिळाली. कदाचित् गाडीचा बावटा आणि शिट्टी त्या मुलांनी ताब्यात घेतली असतील, तीही त्याला परत मिळाली असावी.

अवघ्या वर्षाच्या अवधीत शांतिनिकेतनाच्या परिसरात कलकत्त्यातल्या गुंडगिरीचे सारे प्रकार सुरू झाले होते. विश्वभारतीतल्या एका प्राध्यापकाच्या घरी विद्यार्थ्यांच्या कुठल्याशा कमिटीची बैठक होती. एक विद्यार्थी सरळ उठला आणि त्यांच्या टेबलावरचा गांधीजींचा प्लॅस्टर ऑफ पॅरिसचा पुतळा उचलून त्याने "हा इथे कशाला ?" म्हणून सर्वांच्या देखत फोडून टाकला. कुणाचीही त्या विरुद्ध ब्र काढायची छाती नव्हती.

तीन महिने पुन्हा मुक्काम करावा, बंगाली भाषा बोलण्याचा सराव करावा, विश्वभारतीतल्या प्रचंड ग्रंथागारातून बंगाली ग्रंथ घेऊन वाचावे; बंगाली कलावंतांना भेटावे, असे बेत ठरवून आलो होतो. पण एका महिन्यात गाशा गुंडाळून निघालो. अवघ्या वर्षापूर्वी इथल्या मुक्कामातला क्षणन् क्षण साहित्य, संगीत, नृत्य, नाट्य, नव्या स्नेही मंडळींच्या बरोबर वेळेचे भान हरपून केलेल्या गप्पागोष्टी यांनी रंगला होता. आता एखाद्या, केवळ परंपरा म्हणून पाळल्या जाणाऱ्या उत्सवाला गेले तरी मन रमत नव्हते. चांगल्या जमलेल्या बैठकीत गवयाच्या मागले तंबोरे सारखेसारखे उतरायला लागले म्हणजे जसा बैठकीचा विचका होतो तसे चालले होते. गेल्या वर्षी नेताजी जयंतीचा केवढा सुंदर दीपोत्सव झाला होता. ह्याही वर्षी तशीच 'आलोक सज्जा' झाली. छात्रछात्रींनी पणत्या लावल्या होत्या. शाळेतली मुलेमुली आणि शांतिनिकेतनच्या परिसरातच वृद्धापकाळ काढणारी वृद्ध मंडळी! मधूनच गारुड्याचा खेळ पाहायला जमल्यासारखी काही तरुणांची टोळकी. गुरुदेवांची काही संघगीते गाताना फक्त ती मुले आणि वृद्ध मंडळी गात होती. सुभाषबाबूंवर रवीन्द्रनाथांचे अतिशय प्रेम. तरुण

सुभाषचंद्राचा त्यांनी उद्याचा 'देशनायक' म्हणून गौरव केला होता. बंगालात सुभाष-जयंतीची सुटी असते. पण दीपोत्सवात मला कॉलेजातले तरुण किंवा त्यांचे प्राध्यापक दिसले नाहीत. घरातला कर्ता पुरुष गेल्यावर कुळाचार म्हणून घरातल्या एखाद्या मुंज झालेल्या मुलाकडून गणपतीची पूजा करून चतुर्थी साजरी करावी तसा हा नेताजींचा उत्सव सुतकातल्या सणासारखा साजरा होत होता. दोलोत्सवही तोंडावर आला होता. विश्वभारतीतल्या संगीत भवनातल्या विद्यार्थिनी एके दिवशी हिरमुसल्या होऊन सांगू लागल्या - "पांडे-जी, ए बार दोल होबे ना - उत्सव होणार नाही - नृत्य नाटक होणार नाही." राजकीय वातावरणाचे फक्त विषारी वारे वाहात होते. कुठली दक्षिण हवा आणि कुठले त्या वाऱ्याबरोबर झोके घेणारे झोपाळे ! सगळीकडे आर्.एस्.पी.चा सशस्त्र पहारा ! त्यातून काही दीडशहाणे, तथाकथित पुरोगामी प्राध्यापक 'पोलिसांचे अभद्र पाय ह्या पवित्र भूमीला लावू देता कामा नये' म्हणतच होते. हे खरे म्हणजे खुन्यांचे आणि विध्वंसकांचे प्रच्छन्न साथीदार. सत्तापिपासू पक्षांधांनी आणि पोटभरू प्राध्यापकांनी विश्वभारतीच्या तुळया किती पोखरल्या आहेत, याचा रोज प्रत्यय येत होता. परस्परातले हेवेदावे आणि सत्तेच्या जागा पटकावण्याची चढाओढ शिगेला जाऊन पोहोचली होती. आपल्या सगळ्याच विद्यापीठांची हे रड आहे म्हणा! ज्यांच्या स्वार्थी भांडणांची लक्तरे वर्तमानपत्रातून जाहीरपणे धुतली जातात, असल्या प्राध्यापकांना कुलगुरूंना विद्यार्थ्यांना अमुक एक गोष्ट करू नका हे सांगण्याचे मनोधैर्यच कुठून येणार ? मी विश्वभारतीतल्या विद्यार्थ्यांना भेटत असे. ही भांडणे त्यांनाही अस्वस्थ करतात हे दिसत असे. जीवनाला सामोरे जाण्याची शक्ती इथे आम्हाला लाभत नाही ही चांगल्या विद्यार्थ्यांची तक्रार होती. 'मोले घातले रडाया' ही आमच्या सगळ्याच सार्वजनिक जीवनाची परवड आहे. एखादा कोणी तरी राबत असतो आणि बाकीचे उंडारत असतात. विश्वभारतीची लायब्ररी नव्या प्रचंड इमारतीत हलविण्याचे काम चालले होते. ज्या कामाला आठ दिवस लागावे ते काम महिना झाला तरी चालूच होते. आणि त्याची कोणालाही खंत नव्हती. विद्यार्थ्यांच्या परीक्षा तोंडाशी आल्या होत्या. त्यांना पुस्तके मिळू शकत नव्हती. आमच्या सगळ्या शाळा, कॉलेजे आणि विद्यापीठे म्हणजे ज्ञानाच्या कच्च्या पोळ्या निर्विकारपणाने पानात फेकणाऱ्या खाणावळी. तुम्ही जेवा किंवा जेवू नका ! पानातले अन्न पचो न पचो, वाढपी आपले वाढत चालले आहेत. पदवीधरांचे घाऊक उत्पादन करणारे कारखाने ! गुरुदेवांनी प्रत्येक विद्यार्थ्यांतील त्याच्या त्याच्या उपजत गुणांचा विकास कसा होत जाईल याची चिंता केली. आता फक्त छापाचे गणपती ! सगळीकडे हीच अवस्था. शांतिनिकेतनाचा तरी अपवाद होईल असे वाटत होते. असे वाटणे ही आमची चूक. पूर्वी प्लेगच्या साथीचे उंदीर मरून पडत. माणसे

भराभर गावाबाहेर पळत. माळावर झोपड्या बांधून राहात. काही श्रीमंत वस्त्यांतल्या लोकांना वाटे आपली पेठ स्वच्छ आहे, तिथे काही उंदीर पडायचा नाही. विश्वभारतीतल्या काही जुन्या अपवादस्वरूप निष्ठावंत गुरुजनांचे दुःख हे आमच्या पेठेत उंदीर पडणार नाही, असे मानणाऱ्या त्या लोकांसारखे होते. विश्वभारतीत आता ही लागण झाली आहे. ह्या साथीत कुणाला आणि केव्हा बळी जावे लागेल हे सांगणे अवघड आहे. एक भयाण अगतिकता. त्या अगतिकेतेची बाधा मलाही जडली. कशातच मन रमेना. ते जळलेले ग्रंथालय, तो पन्नास ठिकाणी भोसकलेला मुडदा, त्या गस्तवाल्यांच्या आरोळ्या, ती मुंडकी उडवण्याची धमकी देणारी पत्रके. बेजबाबदार रीतीने निर्लज्ज चेहरे घेऊन हिंडणारे ते आचरट तरुणांचे तांडे. रोज सकाळी कानी येणाऱ्या शांतिनिकेतनातच्या परिसरातल्या घरफोडीच्या आणि मारामारीच्या बातम्या.

त्या आम्रवनात तसाच मोहोर फुलला होता. कोकिळांचे संगीत सुरू होते. हवेत सरत्या थंडीची झिंग होती. पळस फुलू लागले होते. आवळेबनाची पानगाळ सुरू झाली होती आणि डेलियाच्या फुलांनी रंगोत्सव सुरू केला होता. देवाची दुनिया माणसाच्या दुनियेला खिजवत होती.

•

मुंबईला परतण्याच्या आदल्या दिवशी सप्तपर्णी वृक्षाच्या चबुतऱ्यापाशी गेलो. सहा साडेसहाच वाजले होते. पण अंधार झाला होता. रस्त्यात चिटपाखरू नव्हते. त्या चबुतऱ्यावर ट्यूबचा भगभगीत प्रकाश पडला होता.

•

आणि एखाद्या चित्रपट दिग्दर्शकाने भयाण इफेक्ट साधण्यासाठी आणून बसवावे तसे एक घुबड त्या चबुतऱ्यावर येऊन बसले होते. माझा शकुन-अपशकुनावर विश्वास नाही. परंतु बाहेर पडताना मांजर आडवे गेले तर कुत्रे आडवे गेल्यासारखी ती घटना मी झटकून टाकू शकत नाही. चार पक्ष्यांसारखा तोही एक पक्षी. त्याला हिंदू लोकांनी अशुभ करून ठेवला आहे. युरोपात त्याला शहाणपणाचे प्रतीक मानतात. हे सारे भेद माणसानेच निर्माण केले. टागोरांचीच एक कविता आहे. त्यात आंबा म्हणतो, "माकोलभय्या - (माकोल हे एक उग्र वासाचे पण बाहेरून दिसायला सुंदर असे फळ असते.) - माकोलभैय्या आपल्या दुनियेत आपण सगळे सारखे होतो. हा माणूस नावाचा प्राणी आपली रुची घेऊन आला आणि त्याने आपल्या दुनियेत हा 'मूल्यभेद' सुरू केला."

माणसाने हा 'मूल्यभेद' फळाफुलांच्याच नव्हे तर स्वतःच्या दुनियेतही भरपूर केला आहे. विश्वभारतीप्रमाणेच कलकत्त्याला रवीन्द्रभारती नावाचे विद्यापीठ आहे. तिथल्या दीक्षान्त समारंभाच्या वेळी एका स्नातकाने पदवीपत्र घेतले आणि तिथल्या तिथे सर्वांच्या


देखत फाडून टाकले. "हा कागद मला काय करायचा ? मला चाकरी द्या." ही घोषणा केली. रवीन्द्रनाथांनी स्नातकांच्या हाती सप्तपर्णीची पाने देण्याची पद्धत सुरू केली होती. त्या प्रतीकामागे कल्पना होती ती अध्ययन आणि अध्यापन ही जीवनाची नित्य साधना मानण्याची. जेव्हा अध्ययन आणि अध्यापन ही साधना न होता चाकरीचे साधन होते त्यावेळी त्या प्रतीकालाही अर्थ उरत नाही. - 'मानली तर बागशाही नाहीतर कोण्या झाडाचा पाला !' असे गडकऱ्यांनी म्हणून ठेवलेच आहे. ज्ञानाची तळमळ नसताना शंभरातले पस्तीस गुण मिळवून उरलेले पासष्ट टक्के अज्ञान चालू देणाऱ्या विद्यापीठातली साधनाच संपली आहे. म्हणून पदवीचे पत्र हा एक कागदाचा कपटा होऊन जातो. आंधळ्या परंपरेचे कूप उपसून त्यातला गाळ फेकून द्या हे सांगण्याचे धैर्य असलेले ईश्वरचंद्र विद्यासागर किंवा रवीन्द्रनाथ हे अप्रिय पण पथ्यकर असे बोलायला भीत नव्हते. आज तो धोका पत्करून नव्या काळाने निर्माण केलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधायला निर्धाराने पुढे सरसावणारे नेतृत्वच मुळी विश्वभारतीत नाही. सगळीकडूनच अंधारून आले आहे.

मानवतेच्या भल्याची चिंता करणाऱ्या अवघ्यांची जीवनयात्रा आनंदयात्रा व्हावी म्हणून धडपडणाऱ्या साऱ्या जगातल्या विद्वानांचे, कृषिपंडितांचे आणि कलावंतांचे कार्यक्षेत्र व्हावे म्हणून गुरुदेवांनी हे विश्वनीड उभे केले होते. इथे चैतन्याचे पाट अखंड वाहात राहावे ही त्यांची तळमळ होती. त्याचाही गाळ साचलेला पुकुर झाला.

ही खंत मनाला खूपच अस्वस्थ करीत होती. वास्तविक विश्वभारतीचा आणि माझा तसा कायदेशीर असा कसलाच अनुबंध नाही. एक वर्षापूर्वी तिथे गेलो. सूर जुळत होता. तोच, गुरुदेवांच्याच भाषेत सांगावयाचे म्हणजे - 'सूर न लागले, जुळली न कथा, आली व्याकुळता प्राणामाजी' अशी अवस्था झाली. त्याबरोबर हेही पटले की शांतिनिकेतन ही एक दगडाविटांच्या इमारतींनी उभारलेली शाळा नसून ते एक जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. विश्वभारती ह्या संस्थेत कितीही जाळपोळ झाली तरी ते तत्त्वज्ञान शस्त्रांनी तोडले जात नाही की आगीने जाळले जात नाही. हिंदूंशी भांडण करून निराळे झालेले बंगाली मुसलमान गुरुदेवांची गीते गाण्याचे स्वातंत्र्य मिळावे म्हणून पूर्व पाकिस्तानात आत्मबलिदान करून 'बांगला देश' निर्माण करतात. इतिहास असे विलक्षण चमत्कार दाखवतो. असाच एखादा चमत्कार घडवणारा महापुरुष आज शांतिनिकेतनातही लहानाचा मोठा होत असेल. सत्ताबलाने सगळ्यांना त्राही भगवान करणारा हुकूमशहा निर्माण होतो तसा प्रेमबलाने असंख्य मनात प्रेमाची सुरावट वाजवणारा महामानवही निर्माण होतो. रावण आहे तिथे रामही आहे आणि कंस आहे तिथे कृष्णही आहे.

गुरुदेवांच्या गंगेसारख्या अथांग साहित्यातून स्फूर्ती घेऊन विश्वभारतीचे हे बुडते जहाज पुन्हा वर आणून वाऱ्यावादळाला तोंड देणारा कर्णधार यापुढे निपजणारच नाही, असले अशुभ भविष्य मी का करावे ? शांतिनिकेतनातल्या सप्तपर्णीच्या पारावरचे घुबड हिंदू शकुनापशकुनाच्या कल्पनेप्रमाणेच अशुभाचे सूचक मानण्याऐवजी युरोपियनांच्या समजुतीप्रमाणे शहाणपणाचे प्रतीक मानणेच मला अधिक आवडेल.

बंगालात सध्या संहारकाण्ड चालू आहे. त्या काळात लिहिलेला हा उपसंहार आहे. हे काण्ड संपावे आणि नव्या सुंदर जीवनाचा उपोद्‌घात व्हावा हे बंगाली लोकांप्रमाणेच मलाही वाटते, माझ्या आयुष्यात लाभलेली सुंदर अनुभवाची मोरपिसे मी आजही एखाद्या शाळकरी मुलाच्या उत्साहाने जपून ठेवतो. बंगालात तर मला गोड अनुभवांची खूपच मोरपिसे गवसली. आयुष्याच्या ग्रंथातली उपसंहाराच्या दिशेला नेणारी पाने उलटताना तसली आणखी सुंदर पिसे जमवून ठेवायची मला उमेद आहे आणि म्हणूनच 'वंगचित्रां'च्या उपसंहाराचा हा मी पूर्णविराम न मानता नव्या उपोद्‌घातासाठी घेतलेला अर्धविराम मानतो. बंगालवर प्रथमदर्शनातच जडलेले प्रेम द्वितीय दर्शनात मिळालेल्या काहीशा निराशाजनक अनुभवानंतरही तितकेंच टिकून आहे आणि म्हणूनच 'प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' हे गीत ज्या उत्साहात मी गातो त्याच उत्साहाने मी वंगपुत्र आणि वंगकन्यांच्या सुरात सूर मिसळून म्हणेन की – 'आमार शोनार बांगला आमि तोमाय भालोबाशी'. इति ।



## पु.ल. देशपांडे यांची इतर पुस्तके

तुका म्हणे आता
अंमलदार
भाग्यवान
तुझे आहे तुजपाशी
सुंदर मी होणार
तीन पैशाचा तमाशा
मोठे मासे छोटे मासे
विठ्ठल तो आला आला
आम्ही लटिके ना बोलू
वयं मोठं खोटम्
नवे गोकूळ
पुढारी पाहिजे
बटाट्याची चाळ
असा मी असामी
खोगीर भरती
नस्ती उठाठेव
गोळा बेरीज
हसवणूक
गांधीजी
व्यक्ति आणि वल्ली
गणगोत
गुण गाईन आवडी
अपूर्वाई
पूर्वरंग
जावे त्यांच्या देशा
एका कोळियाने
काय वाट्टेल ते होईल

*

मराठी ग्रंथ संग्रहालय
भू-प्रकाश
वा. क्र. ७०६८
२०७९१
शाखा (स्थळ प्र

REFBK 0027419

REFBK-0027419